घ

घ मराठी वर्णमालेमधील एकोणिसावे अक्षर आणि चौथे व्यंजन.

घई पहा : **गई** : 'योग्य जाहला संग म्हणावा काय घई या कैवारासी।' – राला ४३.

घई स्त्री. (घराच्या दालनाची) गर्भी; विस्तार; रुंदी; (समासात) दुघई; चौघई इ.

घऊस वि. लठ्ठ; धष्टपुष्ट.

स्त्री. घुशीसारखा लठ्ठ माणूस : 'शरिरानें बनली घऊस। तुला निजाया बसायची हौस।' – पला ७७.

घघाची विद्या, बाराखडी (घच्या बाराखडीतील) घेणे या क्रियापदापासून झालेला विशिष्ट वाक्प्रचार. घेऊ जाणे पण देऊ न जाणे अशी वृत्ती; दुसऱ्याचे घेण्याचे, लाटण्याचे ज्ञान, स्वभाव; लोभ; हावरेपणा; स्वार्थी वृत्ती; अप्पलपोटेपणा.

घच्च पु. 'रुतनेचा अवाजा.'– (तंजा.)

घजन्फर पु. १. सिंह. २. (ल.) वीर; योद्धा. [फा.]

घजन्फरजंग पु. एक बहुमानाची, युद्धनैपुण्यदर्शक पदवी; युद्धात सिंहाप्रमाणे शूर; रणसिंह. [फा.]

घट पु. (भौ.) रासायनिक क्रियेने विद्युतप्रवाह निर्माण करू शकणारे साधन.

घट न. सोंगट्या वगैरेच्या पटावरील घर.(गो.)

घट पु. १.पाणी इ. ठेवण्याचे भांडे; घडा; घागर (मातीची किंवा धातूची) : 'जैसीं भांडघटशरावीं। तदाकारें असे पृथ्वी।' – ज्ञा १३.८७३. २. नवरात्रात उपास्य देवतेजवळ पाण्याने भरून ठेवलेली मातीची घागर; घडा; कलश; नवरात्र बसणे; विशेष प्रकारची देवीची पूजा. (क्रि. बसणे.) ३. (ल.) विश्व; ईश्वराने निर्माण केलेले यच्चयावत जगत; शरीर इ. सृष्ट जीव, पदार्थ : 'म्हणौनि प्राणिजातांच्या घटीं। करूनि कंदावरी आगिठीं।' – ज्ञा १५.४०७. प्राणी, त्याचे शरीर : 'घटघटाभिमानीए अनुस्युत'– लीच १३३. ४. वाद्यविशेष. दक्षिण हिंदुस्थानात मातीचा माठ पालथा घालून त्याच्या पाठीवर दोन्ही हातांनी तबल्यासारखे वाजवून गायनाची साथ करतात. ५. नवरात्राकरिता कुंभाराकडून मातीची घागर घेण्याचा हक्क. (वा.) ० **उठणे**– नवरात्र संपणे; ० **घटी बसणे** – १. नवरात्र सुरू होणे; (नवरात्री मध्ये) आराध्य देवता घटावर अधिष्ठित होणे; देवतेची स्थापना होणे. २. घटस्थापना करणारा यजमान अथवा उपाध्याय यांनी घट असेपर्यंत व्रतनियमाने असणे इ. विधी प्रचलित आहेत. ३. (ल.) (आजारामुळे, आळसामुळे किंवा इतर काही कारणामुळे) घरात बसून असणे. ४. (ल.) (स्त्रीने) विटाळशी होणे; अस्पर्शपणामुळे निरुद्योगी बसून असणे. [सं.]

घट, घटती स्त्री. १. दागिने तयार करताना, घासताना, कानसताना त्यांचे गोळा न करता येण्यासारखे परमाणू उडाल्याने मूळ वजनात येणारी तूट : 'गाळणींत, घाट करण्यात अगर वहिवाटींत लागलेली घट खर्च घालण्याची मंजूरी देणे.' – (बडोदे) खाजगी खात्यांतील अंमलदारांचे अधिकार १७८. २. धान्य मापताना, तूप इ. पदार्थ तोलताना मूळ मापात–वजनात होणारी तूट, घस : 'आमचा माल निर्मळ असून त्यांत घट फार निघाली अशा प्रकारे पुष्कळ बोभाटे नेहमीं पत्रांतून येतात.' – मुंव्या प्रस्तावना ५. ३. नुकसान (गळती, नास, आटणी इ. मुळे झालेले); तूट (क्रि. येणे, लागणे.) ४. (सामा.) ऱ्हास; उतार; कमी होणे; बटाव. (क्रि. येणे, लागणे.) ५. (मातकाम) घोटकाम करताना किंवा कोरीव काम करताना खाली पडलेली माती.

घट (प्र.) घट्ट.

घटइल वि. वाळलेले; शुष्क: 'म्हाइंभटासि... घटइलें ऐसें (अन्न) भीक्षेसि घालिती।' – गोप्रच २५०.

घटक पु. १. पूर्णाचा एक भाग; अंगभूत अवयव. २. मूलमान; एकक : 'यानंतर गांव सुटून घराणें हा सामाजिक घटक झाला.' – सासं २.४१९.

घटक पु. एखादी वस्तू, पदार्थ ज्या ज्या द्रव्यांनी बनलेला असतो त्या त्या द्रव्यांपैकी प्रत्येक; (रसा.) मिश्रणातील कोणतेही स्वतंत्र द्रव्य.

घटक पु. १. (ग.) गुणाकाराच्या गुणकांपैकी एक गुणक. २. (संख्या.) संशोधनात विचारासाठी घेतलेला एखादा चल अथवा विशेषक. ३. (संख्या.) चलांच्या गटातील सहसंबंधाचे स्पष्टीकरण करण्यासाठी उपयोगात आणला जाणारा फक्त एकाच चलात दिसून येणारा किंवा अनेक चलात सर्वसामान्य असणारा निर्धारक अथवा कारक.

घटक पु. (शिक्षण) १. पाठ्यवस्तूंच्या संदर्भात वापरला जाणारा शब्द; अध्ययन, अध्यापनाचा भाग, अंश; दैनंदिन अध्यापनाच्या दृष्टिकोनातून केलेले पाठ्यवस्तूचे विभाजन. २. चाचणीच्या रचनेतील सर्वात लहान घटक. उदा. खरे खोटे चाचणीतील प्रत्येक विधान.

घटक पु. १. मध्यस्थ; मध्यस्थी करणारा; दोन पक्षात तडजोड करणारा (विशेषत: लग्ने जुळविताना.). २. (सामा.) व्यवस्थापक. ३. घडविणारा; कार्यसाधक : 'क्रोधन नामा यत्नें आला नृपकार्यसिद्धिचा घटक।' – मोरा १.७२. ४. ज्योतिषी. ५. कर्ताकरविता (पर्यायाने ईश्वर). [सं.]

घटककण पु. अंशभूत, अवयवभूत अणू : 'मांसाच्या घटक – कणास चलनवलनाचे.... इत्यादी कामें नेमलेलीं असतात.' – आरोशा १.४.

घटकद्रव्य न. (मिश्र पदार्थातील, धातूंतील) अवयवभूत पदार्थ.

घटकधातू पु. मिश्रधातूंतील अवयवभूत मूल धातू : 'पण कांहीं गुणांनीं मिश्रधातू घटक – धातूंहून भिन्न असतो.' – मपु ६. १६८.

घटक पृथक्करण (शिक्षण) प्रमाणित चाचणी तयार करताना त्यातील घटकांचे केलेले शास्त्रशुद्ध पृथक्करण.

घटकप्रेरणा स्त्री. फलित प्रेरणा ज्या भिन्न भिन्न प्रेरणांपासून उत्पन्न झालेली असते त्या प्रेरणांपैकी एक; अवयवभूत प्रेरणा : 'फलित प्रेरणेच्या संबंधाने प्रत्येक प्रेरणेस घटकप्रेरणा म्हणतात.' – यंस्थि ६.

घटक बाजार (अर्थ.) भूमी, श्रम, भांडवल ही उत्पादनाची साधने किंवा उत्पादन घटक होत. उद्योजकाला हे घटक त्या साधनांच्या मालकाकडून खरेदी करावे लागतात. उद्योगाचे संयोजन करणारा उद्योजक आणि

साधनांचे मालक यांच्यामधला विनिमय व्यवहार हीच घटकांची बाजारपेठ.

घटकभाग पु. फलाचा अंश; रचनेतील मूळ निरनिराळे भाग : 'जेव्हां घटकप्रेरणा एकमेकांशी काटकोन करतात तेव्हां त्यांपैकीं प्रत्येक घटकास मूळ प्रेरणेच्या त्या दिशेतील घटकभाग असें म्हणतात.' – यंस्थि १५.

घटकभार पु. (शिक्षण) १. घटक संरचित साच्यांमधील नोंदी. २. घटक काढीत असताना झालेली चाचणीची संपृक्तता. ३. काढण्यात येणाऱ्या घटकाचा विशिष्ट चाचणीशी असणारा सहसंबंध.

घटकराज्य न. संघराज्याचा स्वतंत्र भाग असलेले राज्य.

घटकविश्लेषण न. (शिक्षण.) १. मूळ साच्यामधील मूल्यांच्या गणांतील सहसंबंधाचे विश्लेषण करण्याची एक पद्धत. २. चाचणी अगर चाचण्यांमधील सहसंबंध ह्यांचे विश्लेषण करण्याची एक पद्धत.

घटक सप्रमाणता ज्याच्याशी चाचणी सहसंबंधित असते अशा प्राथमिक घटनांच्या सूचीच्या अथवा त्या घटकांच्या चाचणीतील प्रमाणांच्या साहाय्याने मोजली जाणारी चाचणीची वैधता.

घटकसारणी स्त्री. रासायनिक संयुक्त पदार्थ कोणत्या मूलद्रव्यांचा बनलेला आहे, ते मूल पदार्थ कसे निराळे करता येतात. इ. माहिती दर्शविणारी सारणी, आराखडा.

घटकंचुकी पंथ पहा : **काचोळी पंथ**

घटका स्त्री. तोंड खाली करून वाद्यासारखे वाजवायचे एक भांडे : 'समागमें हत्तीवर घटकाहि वाजत होती.' – भाब ६७.

घटका स्त्री. १. साठ पळांचा किंवा चोवीस मिनिटांचा काळ; एक विशिष्ट कालविभाग; कालाचे एक परिमाण; दिवस व रात्र मिळून होणाऱ्या कालाचा साठावा भाग. अडीच घटकांचा एक तास होतो. २. घटिकापात्र [सं. घटिका] (वा.) **एखाद्याची घटका घातलेली असणे –** एखाद्याला अंतकाळच्या वेदना होऊ लागणे; मरणोन्मुख अवस्था, स्थिती असणे; अंतकाल जवळ येणे. **० घालणे –** १. निश्चित वेळ ठरवणे. २. मरण अगदी जवळ आलेले असणे. **० भरणे –** १. दिलेली, ठरलेली मुदत संपणे. २. विनाशकाल जवळ येणे; आयुर्मर्यादा पूर्ण होणे, संपणे; आयुष्य संपुष्टात येणे : 'इंग्लिशांच्या सत्तेची घटका आता भरत आली आहे.' – के १०.६.३०.

घट(टि)कापात्र न. कालमापनासाठी वापरले जाणारे, तळाशी छिद्र असलेले, धातूचे द्रोणाकृती पात्र. हे पात्र भरून बुडाले की एक घटका होते. लग्नप्रसंगी मुहूर्त साधण्यासाठी या पात्राचा उपयोग करतात.

घटकाभर क्रिवि. १. तूर्त; सध्या. २. थोडा वेळ; अंमळ; किंचित्काल.

घटकावेळ स्त्री. नेमकी वेळ; निश्चित समय.

घटकेचा गुण कालमाहात्म्य; वेळेचा गुण, सामर्थ्य; वेळेचा परिणाम; विशिष्ट काली विशिष्ट क्रिया घडल्यामुळे त्या कालाचा त्या क्रियेवर होणारा सामान्यत: वाईट परिणाम.

घटकेचे घड्याळ (ल.) क्षणभंगुर जीवित; नश्वर देहाची किंवा अशाश्वत वस्तू इ. टिकण्याची शाश्वती नसते तेव्हा म्हणतात.

घटक्रिया पहा : **घटस्फोट** : 'तदनंतर हिंदूरीतीप्रमाणे विधियुक्त घटक्रिया करून....' – राजकार ५. (गो.)

घटघट–टा क्रिवि. पाण्याचा घोट गिळताना किंवा पाणी पिताना घशात होणारा आवाज. (क्रि. पिणे, घोटणे.) : 'घटघट त्या स्व– हितासृगुदका पी।' – मोकर्ण ४५.१४; 'मदमुखांचिया घटा। घेतु आहाति घटघटा।' – ज्ञा ११.३८९. [ध्व.]

घटघटीत वि. दाट; घट्ट : 'पिंपळाच्या कचातनं घटघटीत चीक बाहीर येऊ लागला.' – गोता १३३.

घटण–णा न. स्त्री. १. पहा : **घटन, घटना**. २. भेट; एकी; एकत्र येणे; संघटन : 'महाकार्यार्थ आगमन। होतां झालें आमुचें घटण।' – निमा १.१५०. [सं. घटन्]

घटण स्त्री. ढाळ; मूस; साज; पोत; वीण; तलम, बनावट, रचना.

घटणिया स्त्री. घडण; ठेवण; रचना : 'दोही बाही घटणिया चांगी।' – वसा ३६. [सं. घट्]

घटणूक स्त्री. (लग्न इत्यादी संबंधात) रदबदली, मध्यस्थी घडवून आणण्याची खटपट, बेत, सल्लामसलत.

घटणे अक्रि. १. घडणे; होणे : 'ऐसेंनिहि प्राणसंकटें। जरी विपायें पां निघणें घटे।' – ज्ञा २. २०५. २. सिद्ध होणे; फलद्रूप होणे : 'त्यांस आम्ही जाबसाल घटे तसा करावा तरी समई नाहीं पेचांत आहो.' – पेद ५.७४. [सं. घट्]

घटणे अक्रि. १. (कापड इ.) आकसणे; आखडणे; लहान होणे. २. (धान्य, तेल, तूप, गूळ इ. पदार्थ मापात, वजनात) कमी होणे. ३. शांत होणे; नाहीशी होणे; शमणे. ४. घट्टे पडणे; झिजणे; (शिथिल अवयव) घट्ट होणे : 'कटि खांदे वाहतां घटले।' – मध्वमुनी (नवनीत ४४६.). [सं. घृष्ट, घट्ट.]

घटणे अक्रि. (शरीर, अवयव इ.) बळकट होणे; मजबूत होणे; भरदार बनणे; सुदृढ बनणे.

घटणे अक्रि. १. (शास्त्राभ्यास, कला इ. व्यासंगाने) घोकून घोकून, घोटून घोटून पक्का होणे; पाठ होणे : 'गांवठी शाळेंतील मुलें अक्षर घटावें म्हणून बखरांच्या नकला करितात.' – विवि ८.८.१४८. २. (शास्त्रात, कलेत, मनुष्याने) तरबेज, निष्णात, कुशल होणे; सरावणे.

घटणे अक्रि. योग्य दिसणे; शोभणे; साजणे; सजणे.

घटणे क्रि. लोटणे; ढकलणे; कंठणे.– (तंजा.)

घटती स्त्री. नुकसान; ऱ्हास; घट; अवनती.

घटन पहा : **घटना**

घटना स्त्री. १. निरीक्षणास वाव असलेली वस्तुस्थिती, घडलेली स्थिती (गोष्ट) अथवा परिस्थिती. २. (तत्त्व) वास्तविकत्व; वास्तविक अस्तित्वात असलेले काहीतरी; वास्तविक घटित होणे. ३. (तत्त्व.) इंद्रियगोचर; ज्ञानेंद्रियांनी समजण्यासारखे काहीही.

घटना स्त्री. (राज्य.) १. संविधान. २. राज्याच्या सभेच्या किंवा संस्थेच्या अंतर्व्यवस्थेच्या कारभाराची नियमावली, कायदेकानू : 'हिंदी स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या घटनेबद्दलचा हा लेख येथें संपवितो.' – केले १.४९.

घटना स्त्री. १. घडणे; निर्मिती; घडण; कृती; रचना; विधिघटना; योजना. २. हस्तकौशल्य; कलाकुसरीचे काम. ३. प्रसंग; बनाव; उपस्थिती :

'काननामाजीं पडलें घटन। डोंगरारण्यीं कैचें जीवन।' – दावि २८०. ४. पहा : **घटणूक :** 'येईल शीघ्र घटना करूनी तियेची।'–र ३०. ५. कार्याची योजना : 'कोणत्याही एका घटनेचा बिघाड झाला असतां तिच्या जागीं दुसरी घटना करावयाची झाली तर...'–केले १.४१. ६. निर्मिती; बनण्याची क्रिया, पद्धत. ७. (शाप.) संयोगीकरण; समाहार. [सं. घट् – घटना]

घटनात्मक वि. १. राज्यघटनेशी, संविधानाशी संबंधित. २. विधायक; रचनात्मक. ३. निर्मिती, घटना याबद्दलचा; घटनेसंबंधी.

घटनामंडळ न. (एखाद्या संस्थेची, सभेची, राज्याची) घटना तयार करण्याकरिता नेमलेले मंडळ.

घटनावाद पु. (तत्त्व.) आपले ज्ञान दृश्यप्रपंच अथवा दृश्यजगतापुरतेच मर्यादित असते असा दृष्टिकोन. या मतानुसार दृश्यप्रपंचामागे एखादे अदृश्य तत्त्व आहे याचा अस्वीकार तरी केला जातो अथवा अशा तत्त्वासंबंधी अज्ञेयवाद तरी स्वीकारला जातो.

घटनासमिति–ती स्त्री. देशाची राज्यरचना कशा प्रकारची असावी हे ठरविण्यासाठी नेमलेले कायदे तज्ज्ञांचे मंडळ.

घटनासादृश्य न. समधर्मता; सममूलता; घटनेतील सारखेपणा.

घटनासापेक्ष वि. (विधि) आनुषंगिक; प्रसंगोपात्त. [सं.]

घटपट, घटंपटं स्त्री. न. न्यायशास्त्रात नेहमी घट (घडा) व पट (वस्त्र) यांची उदाहरणे देण्याची चाल आहे. त्यात घट व पट हे शब्द पुढील अर्थी रूढ आहेत. १. फुशारकीचे – शेखीचे – चढाईचे – पोकळ ऐटीचे भाषण. २. असंबद्ध, टाळाटाळीचे बोलणे. लप्पंछप्पं; थाप. ३. निष्कारण उरस्फोड; वाचाळता; व्यर्थ बडबड; माथाकूट; वितंडवाद; शब्दावडंबर. कवी निरंकुशतेचे भोक्ते असल्यामुळे नैयायिक व वैय्याकरणी यांनी घातलेल्या भाषेवरील व्याकरणविषयक निर्बंधाच्या खटाटोपास घटपट असे हेटाळणीने संबोधतात : 'नलगे व्याकरणाची न्यायाची घटपटादि खटपट ती। वैकुंठ पेठ मोठी नामावरि हीनदीन खट पटती।' – कीर्तन १.३७.

घटपर्ण न. (वन.) कीटकभक्षक वनस्पतींच्या रूपांतरित पानाचा टोकाकडील चंबूसारखा भाग.

घटपर्णी स्त्री. (वन.) रूपांतरित चंबूसारखी पाने असलेली एक कीटकभक्षक वनस्पती.

घटपाण न. शक्ती; सामर्थ्य; बळकटपणा; घट्टपणा. (गो.)

घटबड स्त्री. चढउतार. (झाडी)

घटभंग पु. घटाचा नाश; घागर फुटणे : 'घटभंगीं घटाकाशें। आकाश जेवीं।।' – ज्ञा १४.५४.

घटमठ पु. १. घट आणि मठ. २. (ल.) सर्व सृष्ट वस्तू (ज्यात पोकळ अवकाश आहे अशा) : 'घटमठ नाम मात्र। व्योम व्यापक सर्वत्र।' – ब २६२. घटाकाश आणि मठाकाश असे प्रयोग वेदान्तात आहेत.

घटमान वि. १. चालू असलेले; हाती धरलेले, घेतलेले. २. होणारे; घडणारे; घडण्याजोगे; संभवनीय : 'म्हणूनि दुर्घटत्त्व हें भूषण। मायेसी नव्हे दूषण। ती ब्रह्मी असे घटमान। तरी माया नव्हे ती।' – विपु ३. [सं.]

घटमाळ स्त्री. नवरात्रात देवीच्या पूजेकरिता स्थापना केलेल्या घटावर सोडलेली फुलांची माळ; देवतांप्रीत्यर्थ बसविलेला माळेसहित घट.

घटमूट–ठ वि. १. धडधाकट; सुदृढ; मजबूत बांध्याचा; भक्कम. २. टिकाऊ; मजबूत, घट्ट विणीचे (धोतर, कापड इ.); भरीव : 'गुलमट कलसे, घटमुठ दिसती, हुमनाबादी निपटनिरुंदी, कलबुर्गा हलबुर्ग लूगडें।' – अमृत ४९.

घटवटना स्त्री. १. मध्यस्थी; वाटाघाट; चर्चा; रदबदली; जुळवाजुळव (विशेषत: लग्नासंबंधीची). २. विचार; चर्चा : 'जावें न जावें अशी मनाशीं घटवटना करीत तो इकडे आहे.' – वज्राघात १३३.

घटवध स्त्री. (वजन–माप–इ.तील) तूट अथवा वाढ; कमजास्तपणा. [गुज.]

घटवना क्रि. १. कमी करणे. २. अपमान करणे. (झाडी)

घटवाई पु. घाटावरील कर घेणारा. [हिं.]

घटवाई, घटाई स्त्री. धडधाकटपणा. पहा : **घट्टाई**

घटवाटप न. घरदार, भांडीकुंडी, जमीनजुमला इ.ची कुटुंबियात वाटणी. (को.)

घटवात स्त्री. १. नवरात्रात घटाजवळ अखंड दिवा तेवत ठेवणे. २. या हक्काचे वेतन, मान : 'होलीस पोली व घटवात वगैरे मानपान जो घ्यावयाचा तो घेतो.' – मसाप २.१७२.

घटसर्प पु. १. घशाला सूज येऊन होणारा एक सांसर्गिक रोग. २. घाटसर्प; गळ्याला विळखा घालणारा साप: 'तो मदनाचा घटसर्पु काढी। तरि मी सत्य होएं।' – शिव १९८.

घटसान वि. बळकट; घट्ट; मजबूत. (गो.) [क. घट्टीसु = शक्ती मिळविणे]

घटस्थापना स्त्री. घट बसविणे; देवतेची घटावर स्थापना; देवप्रतिष्ठा. आश्विन शुद्ध प्रतिपदेला मातीच्या स्थंडिलावर घट ठेवतात व त्यावर पूर्णपात्र ठेवून त्यात कुलदेवतेची स्थापना करतात. नंतर तिची नऊ दिवस पूजा करतात. दररोज घटावर फुलांची नवी माळ लोंबती बांधतात. अखंड दीप जाळतात. तसेच सप्तशतीचा पाठ इ. कर्मे करतात. या विधीला घटस्थापना म्हणतात.

घटस्फोट पु. १. (मृत्यू, फारकत इ. दर्शक) घडा फोडणे : 'जेवीं नष्टलिया, पुत्रासी। पिता घटस्फोटें त्यागी त्यासी।' – एभा २३.४८८. २. नवराबायकोची फारकत; कायदेशीर विवाहविच्छेद; नवराबायकोंनी विवाहाचे बंधन रद्द ठरवून स्वतंत्र होणे; सोडचिठ्ठी; काडीमोड : 'इंग्रज लोकातील घटस्फोटाचे वाईट वाईट खटले कोर्टापुढें येतात....' – लोटिकेले ४.९५. (क्रि. घेणे.) ३. (ल.) पतिताचा जिवंतपणी प्रेतविधी; जो पतित प्रायश्चित्त घेऊ इच्छित नाही त्याला वाळीत टाकण्याकरिता – समाजाच्या दृष्टीने तो मेलेलाच आहे दर्शविण्यासाठी – मातीची घागर फोडणे इ. अशुभ क्रिया, विधी. ४. जातिबहिष्कृत करणे : 'जारकर्मांत विधवा गरोदर सांपडली असतां तिला बहिष्कृत करून तिचा घटस्फोट नामक विधी करतात.' – व्यनि २.

घटस्फोटित वि. ज्याने किंवा जिने घटस्फोट घेतला आहे अशी व्यक्ती : 'आठवे एडवर्ड ह्यांनी वालिस सिंपसन ह्या घटस्फोटित अमेरिकन स्त्रीशी लग्न करावयाचे ठरविल्यामुळे....' – हुंदके १७९.

घटंपटा स्त्री. खटपट; अवडंबर; लटपट. (व.)

घटा स्त्री. १. समुदाय; जमाव; टोळी; कळप : 'जैसे न गणिजे पंचाननें। गजघटांतें।।' – ज्ञा १.९२. २. मेघजल; मेघमंडल; मेघमाला.

घटा पु. १. भोपळ्याचे, कलिंगडाचे कोवळे फळ. (को.) २. हरभऱ्याचा टरफलासहित दाणा, शेंग. पहा : **घाटा**

स्त्री. (प्रा.) घडण; घटाव; रचनाविशेष; घाट; तऱ्हा; बांधा : 'शरीरसंपती तरुण तयारिंत गर्द घटा दुसरी ।'–प्रला १५४. [सं. घट]

घटा, घट्टा पु. घसरण्यामुळे शरीराच्या एखाद्या अवयवावरील भागाचे रक्त साकळल्याने घट्ट झालेली जागा. [सं. घृष्ट]

घटाई स्त्री. १. घटवाई. पहा : **घट्टाई.** २. लूट; कमीपणा; घट. [सं.]

घटाई स्त्री. बनाव; व्यवस्था. २. निश्चय; दृढता.

घटाकाश न. (वेदान्त) घटातील पोकळी; अवकाश; रिती जागा : 'कोणें धरोनियां आकाश। घटीं घातलें सावकाश। तरी घटयोगें घटाकाश। मिथ्या गगनास नांव आलें।' – एभा १३.७३२.

घटाटोप पु. १. (गाडी, पालखी, हौदा, पलंग, देव्हारा, अंबारी, रथ इत्यादिकांचा) घुमटाकार चांदवा; मंडपी; छत. २. घुमट; डेरा.

घटाटोप पहा : **खटाटोप**

घटाटोप पु. पोकळ आवरण; गवसणी: 'मिरजेहून घटाटोप पावल्याचे उत्तर आलें कीं, नाहीं?' – ऐलेसं ५३५६. (वा.) **० करणे** –जामानिमा करून सज्ज होणे; चिलखत वगैरे घालून शस्त्रसज्ज करणे : 'सदाशिव खिजमतगार यांजला दरवाजाबाहेर चारजण व कोठीकडील माडीवर एक दोन घटाटोप करून बसविले.' – ऐलेसं ६१९१.

घटाली स्त्री. एक फुलझाड. (झाडी)

घटाव पु. १. (सैन्य इत्यादिकांची) मांडणी; रचना : 'कलम ज्यारीचे घटाव मचले। मोंगलावर मोर्चे रचले।' – ऐपो २१४. २. (सुरू असलेल्या, योजिलेल्या कामाच्या दिग्दर्शनार्थ) मांडणी; थाटमाट; देखावा; डौल (क्रि. घालणे.) : 'गरतिचा अवघा साज करून या घटाव घटून।' – होला १००. ३. (भाषणाचा, कृतीचा) झोक; स्वरूप; ढब; रूपरेखा : 'बाई घटाव खुब स्वारिचा। चाले गोल थटुन बाहारिचा।' – प्रला ११७. ४. मिलाफ; मेळ; संयोग; अनेक पदार्थ एकत्र केल्याने उत्पन्न होणारा गुणविशेष; उत्पन्न होणारा परस्परांचा आनुकूल्य भाव : 'आनंद घटाव ब्रह्म कटाव।' – दावि ३१३. ५. पहा : **घटना** [सं. घट]

घटावणे अक्रि. तयार होणे; सराईत होणे : 'भाषणें उतरून ठेवण्याच्या कलेत तो घटावत गेला.' – नि ६९१.

घटाळणे सक्रि. गटागट पिणे : 'व्याघ्रेस्वराकडे धाव घेतो नि बोंडलीचं तांब्याभर पाणी घटाळतो.' – गाबा ११.

घटिका स्त्री. लहान घडा.

घटिका स्त्री. साठ पळे; चोवीस मिनिटांचा काल; घटी. पहा : **घटका** : 'म्हणौनि उपजतखेंवो बुडाली। लग्नघटिका।' – ज्ञा ६.४७१.

घटि(टी)कायंत्र न. १. कालगणनेसाठी वापरण्यात येणारे, तळाला छिद्र असलेले पात्र. २. रहाटगाडगे : 'उपजे तें नाशे। नाशलें तें पुनरपि दिसे। हें घटिकायंत्र जैसें। परिभ्रमे गा।।' – ज्ञा २.१५९.

घटिकास्थान न. घटाच्या आकाराचे लहान देऊळ : 'स्वयंभ घटिकास्थान वटेस्वर देवालय।' – वेळापूर शिला ४.१.७.

घटिकास्थापन–ना न. स्त्री. विवाहादी मंगल कार्यात मुहूर्त साधण्यासाठी वेळ मोजता यावा म्हणून सूर्योदय होताक्षणी पाण्यात घटिका (पात्र) टाकण्याचा विधी.

घटिगोपुर न. घड्यांचा, मातीच्या कलशांचा मनोरा.

घटित न. (विप्र.) घटीत. १. पत्रिकांवरून ठरणारे वधूवरांच्या ग्रहांचे आनुकूल्य; (वधूवरांच्या) ग्रहयोगांची जुळणी; पत्रिका जुळणे. (क्रि. उतरणे, जमणे, काढणे, पाहणे, ठरवणे.) : 'कृष्ण अगुणांचा अरूप। कन्या सगुण आणि स्वरूप। दोहींशीं घटिताचा विकल्प। शून्यसंकल्प सोयरीके।।' – एरुस्व १.९६. २. मैत्री; सख्य; मिलाफ. (क्रि. जुळणे, जमणे, होणे, जुगणे.) ३. दैव; नशीब; संचित; दैवयोग; पूर्वकर्म; भवितव्य : 'शरीर संबंधाचे कारण। घटित आहे मज अधीन।' – एरुस्व २.३४.

घटित वि. (समासात) युक्त; बनलेले; रचलेला. जसे : – सुशब्दघटित; अनुस्वारघटित.

घटितार्थ पु. १. खल करून, विचारविनिमय करून काढलेला निष्कर्ष. २. दैवयोग; भवितव्य; कर्मगती. ३. (वधूवरांचे) घटित; पत्रिकांचा मेळ, जुळणी : 'ब्राह्मणीं घटितार्थ पाहिलें। गुण छत्तीसही उतरले।' – भवि २.५७. [सं.]

घटिवत वि. घड्याळाचे काटे फिरतात त्याप्रमाणे; समोरून पाहताना वरपासून खालपर्यंत उजव्या दिशेने.

घटी स्त्री. १. घटका. पहा : **घटिका.** २. घडी; घड्याळ; तासांचे ठोके वाजवण्यासाठीची मिश्र धातूंची वाटोळी व जाड तबकडी; तास.[सं.]

घटी स्त्री. लहान घडा, मडके. (समासात) मृद्घटी, सुवर्णघटी : 'कां झांकलिया घटीचा दिवा। नेणिजे काय जाहला केव्हा।' – ज्ञा ८.९८. [सं.]

घटी स्त्री. खुबी; कळ; युक्ती. (गो.)

घटी स्त्री. गळा. (झाडी) [सं.]

घटी वि. कडक; घट्ट; मजबूत; टणक (बोरू, इ.) : 'नाना देशींचे बरू आणावे। घटी बारिक सरळे घ्यावे।' – दास १९.१.१६.

घटीगोत्र न. पत्रिका आणि गणगोत्र. (क्रि. मिळणे, येणे, जमणे, जुळणे)

घटी (टि) लग्न न. गोरज मुहूर्ताखेरीज अन्य शुभ मुहूर्तावर लागणारे लग्न.

घटीव वि. १. कमावलेले, सुदृढ, बळकट, कणखर झालेले (शरीर, शरीरावयव). २. घोटलेले; चांगले वळलेले; वळणदार (अक्षर, लेखन, हात). ३. परिशीलनाने, अभ्यासाने पक्की झालेली (कला, विद्या). ४. कसबी; सराईत झालेला; सरावलेला; कुशल बनलेला (मनुष्य). ५. (सराईत हाताने) उत्तम रीतीने केलेले; तडीला नेलेले, उत्कृष्टपणे साधलेले (काम इ.). [सं. घट]

घटीवरी क्रिवि. आकंठ. (झाडी)

घटे क्रिवि. घट्टपणे; निश्चयेकरून; खात्रीने.

घटोत्कच पु. भीमाला हिडिंबा नामक राक्षसीपासून झालेला मुलगा. हा अत्यंत शूर व इंद्रजालविद्येत कुशल होता. [सं.] **घटोत्कचाचा बाजार**

– १. माया; मायावी बाजार. घटोत्कचाने वत्सला – अभिमन्यू यांच्या विवाहाच्या वेळी एक मायावी बाजार तयार केला होता या कथेवरून. २. (ल.) फसवणूक. **घटोत्कचाची माया –** फसवणूक; कपटयुक्ती; जादू; भुरळ : 'आमचे महाजन आतां मात्र याच्या घटोत्कची मायेंत पूर्णपणे सांपडल्यासारखे दिसतात.' – माझी बहीण.

घट्ट वि. १. बळकट; मजबूत; भक्कम; घटमूठ (शरीर, मनुष्य, कापड इ.). २. घन; दाट; पाण्याचा अंश कमी असलेले (दही, दूध, पातळ पदार्थ). ३. पक्के आवळलेले; गच्च बसलेले; सैल नसलेले (झाकण, चौकट, पट्टी.). ४. दु:खाला न भिणारे; कठोर; हळुवार नसलेले (मन इ.) : 'मन अंमळ घट्ट केलें पाहिजे.' – रप्र १०६. ५. निलाजरा; निर्लज्ज; बेशरम; कोडगा; निगरगट्ट : 'घट्ट मोठी हो जोगडी जाती।' – दावि ३४७. ६. अचाट; न डळमळणारे : 'पहा धैर्य हें केवढें घट्ट।' – दावि ३९. [क. ग(घ)ट्टी] (वा.) ० **करणे –** पाठ करणे; घोकून मनात पक्के करणे.

घट्टण, घट्टाण न. निर्मूलन; नि:संतान. (गो.)

घट्टमुट्ट वि. भक्कम; दांडगा : 'दिसायला थोडी घट्टमुट्ट पण अनवाणी, जीर्ण सुडके नेसलेली...' – पुअं ५२.

घट्टव न. जमीनदोस्त झालेल्या इमारतीच्या खुणा; पडक्या इमारतीचे अवशेष. (गो.)

घट्टवणे सक्रि. जोराने दाबणे : 'जानराव त्याच्या डोळ्यांवर आपले पंजे घट्टवत होता.' – धग २५.

घट्टा पु. १. जखमेभोवती तयार होणारा कोशिकांचा थर. २. घर्षणामुळे त्वचा घट्ट, राठ होणे; त्यामुळे त्वचेला पडणारी खूण : 'आम्हा शुद्रांच्या गळ्यातील दासत्वाच्या पट्ट्याचा घट्टा कोणासहि जलदी घासून काढवणार नाही.' – जोफु १३४.

घट्टाई स्त्री. १. (कापडाचा) घटमूटपणा; विणीचा घट्टपणा. २. (शरीराचा, इमारतीचा) भक्कमपणा; दृढता; मजबूतपणा. ३. आवळपणा; पक्केपणा (बांधलेल्या पट्टीचा, बंधनाचा). ४. (पातळ पदार्थांचा) घट्टपणा; पाण्याचा भाग कमी असल्याची स्थिती; दाटपणा; घनता.

घट्टी स्त्री. जात्याची तळी; घरटी. (खा.) [सं. घरट्ट]

घट्टीकरण न. (रसा.) द्रवस्थितीतून घनस्थितीत रूपांतर करणे; घनीकरण; विरजणे.

घट्मूट, घट्टा, घट्टाघोळ पहा : **घटपट, घटमूट**

घट्य वि. जाड : 'घट्य कागद आणावें। ...नानापरी।' – दास १९.१.१४.

घठार न. रांजण, मडकी ठेवण्याचे कोठार : 'तेलातूपाचेया घठारा।' – राज्ञा १६.३९३.

घठ्ठ पु. काठी; दंडा : 'हातीं घठ्ठ, शरीर घट्ट प्रथमे येकाचि ये सासुरा।' – आ नवरस चरित्र ३२.

घड पु. १. (फळांचा) गुच्छ; घोस; फाडा; लोंगर : 'कां येऊनि फळाचा घडु। पारुषवी केळीची वाढु।' – ज्ञा १८.९६८. २. आकार; डौल; घाट : 'बाप विंदानीं हृषीकेश। तेणें घड कळास मेळविला।' – एभा २८.६९६. ३. (ल.) वृषण. ४. चारपाच वाट्या जोडून कोशिंबिरी, चटण्या इ. ठेवण्याचे तबकासारखे केलेले पात्र, संच, पाळे : 'चांदीच्या वाट्यांचा घड मध, तूप व साखर ठेवलेला.' – ऐरापुप्र ८.४१३. ५. टोळी; जमाव; झुंड : ६. जुळणी; मिश्रण; मिलाफ; ऐक्य. (को.) ७. (ल.) सख्यभाव; सलोखा. ८. (सामा.) समुदाय; जुट; जुडगा. [सं. घट्]

घडई स्त्री. घडण; घडकाम : 'हातानें घडई पुरी करून भांड्यास सुबकपणा आणावा लागतो.' – पदाव ४८.

घडका पहा : **घटका**

घडकाम न. १. (धातूंची भांडी वगैरे) घडविण्याचे, बनविण्याचे काम, कला. २. (भांडी वगैरे) घडण्याच्या कामातील कुशलता, कारागिरी. ३. (हातोड्याने घडलेल्या, ठोकून तयार केलेल्या वस्तूंचा) घाट; आकार; घडण; ढाळ.

घडग(घ)शीळ न. खडकाळ, ओबडधोबड, उतरण.
वि. खडकाळ; कडा तुटलेला; ओबडधोबड. (राजा.)

घडघड–डा क्रिवि. १. (गाडी, रथ इ. चालताना होणारा) घड घड असा आवाज करीत. २. अस्खलित; न अडखळता; मोठ्याने; झरझर : 'हस्तलिखित पोथ्या त्या घडघड वाचू शकत' – कोरकि २२. [ध्व. घडचे द्वित्त्व]

घडघडणे अक्रि. १. गडगडाट होणे, करणे; गर्जना करणे; गडगडणे : 'संहार प्रलअे मेघु घडघडिला। कीं खवळैला महाकाळु डाडाइला।' – शिव १०७७. २. (रथ, गाडी इ. चालताना) घडघड आवाज होणे; कडाडणे; घडघड, खडखड, आवाज करीत (रथ, गाडी इ.) चालणे, खाली पडणे, कोसळणे : 'रथ घडघडिला समीरगतीं।' – ह १८.११८. ३. (बेत, काम, मसलत) ढासळणे; निष्फळ होणे; रसातळाला जाणे. ४. (ल.) मरणे. ५. घरघर आवाज करणे : 'वळे जिभेची बोबडी। कफें कंठ घडघडी।' – दास ३.५.३७.

घडघडा पु. गडगडा; पाणी काढण्याचा लाकडी, लोखंडी आखाभोवती फिरणारा ठोकळा; फिरकी : 'विहिरीचें पाणी लोखंडी पोयरा व सांखळी यांनीं रहाटावरून अथवा घडघड्यावरून काढावें.' – आरोशा १.९१.

घडघडा क्रिवि. स्वच्छ.

घडघडाट पु. घडघड असा मोठा आवाज; गडगडाट; कडकडाट; खडखडाट : 'करुणाकीर्तनाच्या लोटें। कथा करावी घडघडाटें।' – दास ४.२.१२.
क्रिवि. १. घडघडा; अस्खलित; मोठ्याने; जोरात : 'रत्नखचित मांडलासे पाट। त्यावरी बैसविला द्विजश्रेष्ठ। संकल्प म्हणतसे घडघडाट।' – जे ७३.१९. २. (गाड्या, रथ इत्यादिकांच्या) घडघड, खडखड आवाजाने युक्त होत : 'तुका म्हणे वाहे वाट। वैकुंठींची घडघडाट।' – तुगा.

घडघडे क्रिवि. पटापट; तडाख्याने. पहा : **घडाघड**

घडघंच वि. रगड; विपुल. (कर.) पहा : **गडगंच**

घडघूप वि. निबिड; दाट; गुडूप (अंधार) : 'तें देखोनियां विवर। गजबजिले वानरवीर। भीतरीं घडघूप अंधार। रविचंद्र असेना।' – भारा किष्किंधा १४.७६. पहा : **गुडूप**

घडघोस पु. घोसाळ्यांचा घड.

घडघोसाळी स्त्री. न. घोसाळ्याची एक जात; एक प्रकारच्या घोसाळ्याची वेल. हिला घोसाळ्यांचे घड येतात; सातपुती; सहस्रफळी.

घडण स्त्री. १. (घडून केलेल्या वस्तूंचा) घाट, डौल; आकार; ढाळ. २. घडण्याचे कौशल्य, हातोटी. ३. (दागिने, भांडी) घडण्याची, बनविण्याची मजुरी; घडणावळ. ४. घटना; कृती.
पु. वस्तूचा घाट.
न. भांडी घडण्याकरिता कासाराला दिलेला धातूचा पत्रा, मोड इ.

घडणावळ स्त्री. १. घडकामाची मजुरी, किंमत. २. घाट; घडण; आकार. ३. (क्व.) घडण्याची कुशलता; घडकामातील कारागिरी, हातोटी.

घडणी स्त्री. १. घडणे; करणे; बनविणे. २. (घडलेल्या दागिन्यांचा, वस्तूंचा) घाट; डौल; ढाळ; ढब. ३. घडण्याचे कौशल्य, कसब, कारागिरी, हातोटी.

घडणी स्त्री. १. कुळकर्ण्याने ठेवायचा गावातील कुळवार हिशेबाचा तक्ता. २. जमाबंदीचे वगैरे हिशेब व खतावणी. ३. समुदाय; जमाव : 'येती ऋषीच्या घडणी.' – वसा ४५.

घडणे, घडून येणे अक्रि. १. जुळून येणे; होणे; बनणे; अस्तित्वात येणे. २. उत्पन्न होणे : 'हे आंगा तंव घडले। जीवींचीं आधी जडले।' – ज्ञा ३.२५५. ३. पार पडणे; शेवटास जाणे : 'तेथें वाग्निश्चयो घडे कैचा।' – एरुस्व २.२९. ४. मिळणे; होणे; जुळून येणे; साधणे. ५. (एखाद्याकडून एखादी गोष्ट) सिद्धीला, तडीला जाणे. [सं. घटन]

घडणे अक्रि. १. हातोड्याने ठोकून ठोकून, तासून तासून, भट्टीत तापवून, कोरून आकार देणे, बनविणे; तयार करणे; निर्माण करणे; उत्पन्न करणे : 'शब्द कैसा घडिजे। प्रमेयीं कैसें पां चढिजें।' – ज्ञा १८.१७६८. २. (माहिती, हिशेब, जमाखर्च) लिहून काढणे; नमूद करणे; तयार करणे; आकारणे. [सं. घटन]

घडणे उक्रि. १. स्पर्श करणे; शिवणे. या क्रियापदाचा प्रयोग करताना कर्त्याची नेहमी प्रथमाच पाहिजे. कर्ता तृतीयेचा नसावा. २. भेटणे : 'नातरीं उद्यानीं माधवी घडे।' – ज्ञा १४३.

घडता वि. योग्य; मान्य; जुळणारे : 'तैसें घडतें प्रमेय घेइजे। उणें तें मज देईजे।' – ज्ञा १५.५९६. [सं. घट]

घडती पहा : **घटती**

घडते न. १. प्राप्ती. २. अनुकूलता : 'म्हणौनि शास्त्राचें घडतें। नोहे प्रकारें बहुतें।' – ज्ञा १७.२९. ३. साधन. (वा.) **घडत्यास पडता** – समयोचित; प्रसंगोपात्त; त्या त्या वेळेला योग्य; प्रसंगाला अनुरूप.

घडबड क्रिवि. भांडी इ. एकमेकांना लागल्यामुळे होणाऱ्या घड्घड् आवाजाने. [ध्व. घड्चे द्वित्त्व]

घडबडणे अक्रि. घडबड आवाज होईल अशा तऱ्हेने (भांडी इ. परस्परांस लागल्याने) वाजणे; खडखडणे. [ध्व.]

घडबड्या क्रिवि. (प्र.) गडबडा. (क्रि. लोळणे इ.)

घडमाळ स्त्री. रहाटगाडग्यावरील लोट्यांची, मडक्यांची एकेरी माळ; रहाटाची माळ. (को.)

घडमोडणे अक्रि. घडले, बनवले, मोडले जाणे; उत्पन्न आणि नष्ट होणे.

घडली, घड्डी, घल्डी, घडळी स्त्री. लहान घडा; घागर; कळशी (व.खा.) [सं. घटिका]

घडवट न. १. घडवलेली वस्तू. २. (ल.) देह. ३. पायघडी : 'वेगीं मंडपासी चला। घडवटें आधीं घाला।' – एरुस्व १५.१२.

घडवण पहा : **घडण** (राजा.)

घडव(वि)णे उक्रि. १. उत्पन्न करणे; बनविणे : 'तेथ इच्छा आणि बुद्धि। घडवी अहंकारेंसीं आधीं।' – ज्ञा १३.९६९. २. घडवून आणणे; जुळवून आणणे; साधणे; शेवटाला नेणे. ३. तयार करणे; बनविणे : 'तोड्यांचा जोड तुम्हि। कां घडविला कां घडविला।' – मसाप२.१.२७. ४. घडून येणे.

घडवशी, घडवंची स्त्री. १. मृदंग ठेवण्याची घडवंची; घोडी. २. लाकडी पाय असलेली बैठक, चौकी. ३. घडोंची; तिवई; लाकडाच्या फळीला तीन किंवा चार पाय बसवून केलेली बैठक, चौकट (घागरी, भांडी, पेट्या इ. सामान ठेवण्याकरिता केलेली); लाकडी चार पायी चौकट; चौकी; शिडी. ४. (भात इ. झोडण्याची) घोडी. (को.) ५.अडणी. [सं. घट + उच्च (?)]

घडशी–सी पु. १. वाजंत्र्याचा – गाण्याबजावण्याचा धंदा करणारी कर्नाटकातील एक जात. २. घडशी जातीचा मनुष्य. हे लोक वाद्य वाजवण्याचा धंदा करतात. [का. गड्डे = आवाज (?)]

घडशी वि. स्त्री. १. विटाळ झालेली. २. विटाळशी. (राजा.)

घडसण स्त्री. १. गर्दी; दाटी; खेचाखेच. २. अडवणूक; अडचण. (व.)

घडसणे सक्रि. (अक्षरे इ. पुन्हा पुन्हा काढून) घोटणे; घटवणे : 'ब्राह्मणें बालबोध अक्षर। घडसुनी करावें सुंदर।' – दास १९.१.१.

घडळ स्त्री. घडण. (गो.)

घडा पु. १. घागर; घट; गाडगे; मडके : 'अवतरली गाडग्यां घडां। पृथ्वी अनोळख जाली मूढां।' – ज्ञा १८.५४३. २. ताडाच्या पोंगीला (ताडी काढण्याकरिता) लावायचे गाडगे. [सं. घट] (वा.) **० फोडणे** – संकेत, खरे तत्त्व बाहेर सांगणे; गुप्त गोष्ट प्रकट करणे. **(एखाद्याचा) ० भरणे** – अपराधांची परमावधी होऊन शिक्षेला पात्र होणे. **(आयुष्याचा) ० भरणे** – १. अंतकाल जवळ येणे; आयुष्य संपणे. २. (ल.) अधिकाराची मुदत संपण्याच्या बेतात येणे. **(पापाचा) ० भरणे** – (पापपुण्ये साठवण्यासाठी घडे असतात या कल्पनेवरून) दुष्कृत्यांचा कळस होऊन त्यांचे फळ भोगण्याची वेळ येणे. **(कच्च्या) घड्याने पाणी भरणे, वाहणे** – १. निष्फळ काबाडकष्ट करणे; निरर्थक उद्योग, मेहनत करणे. २. अतिशय हाल काढणे, कष्ट करणे.

घडा पु. जम; घडी.

घडाई स्त्री. १. (दागिने, भांडी इ.) घडण्याची मजुरी. पहा : **घडणावळ १.** २. घडकामाची, घडण्याची, घिसाड कामाची मजुरी. ३. (दागिने, भांडी, दगड इ.) घडण्याचे काम; घडकाम.

घडाईदार वि. घडविण्याचा धंदा करणारा. (घिसाडी, शिलावट इ.)

घडाघड स्त्री. १. लोहार, तांबट इ.कडे चालणारी ठोकाठोक; घडण्याच्या

कामाने होणारा आवाज. २. घडकाम. [घडणेचे द्वि.]

घडाघड–डा, घडाडा क्रिवि. १. पदार्थ एकामागून एक उंचावरून गडगडत, धडाधड पडताना होणाऱ्या धड्धड् आवाजाप्रमाणे; मडक्यांची रास, घर, कोसळल्याने होणाऱ्या घड्घड् आवाजाप्रमाणे. २. न अडखळता; अस्खलित. पहा : **घडघड**

घडाड पु. घडघड अशा आवाजाचा अतिरेक; घडघडाट; गडगडाट; घणघणाट इ.

घडाडणे अक्रि. कोसळणे. पहा : **घडघडणे**

घडापड स्त्री. विटाळ; स्पर्शामुळे येणारी अशुचिता. (राजा.)

घडाबाजी स्त्री. दारू उडविण्याचा प्रकार; मडक्यात फटाके, चिचुंद्र्या (उडविण्याच्या दारूचा एक प्रकार) इ. ठासून त्यांचा धडाका करणे. पहा : **घडेबाजी**

घडामोड स्त्री. १. घडलेल्या गोष्टी, घटना; फेरफार; उलथापालथ; नवे जुने करणे. २. (भांडी, मडकी, दागिने इ.) घडण्याची आणि मोडण्याची क्रिया; बनवणे व नष्ट करणे. ३. (ल.) देण्याघेण्याचा, खरेदीविक्रीचा, उसने देण्याघेण्याचा व्यवहार; व्यापार. ४. रचना; घाट; बनावट; घडण (यंत्रावयवाची, भागाची इ.). ५. (धंद्यातील, व्यापारातील) भानगडी, गुंतागुंत, गाशा गुंडाळणे, दिवाळे इ. ६. (एखाद्या श्लोकाची, कवितेची, उताऱ्याची) गुंतागुंत; घोटाळा; क्लिष्टता; लपेटी; नाना तऱ्हेच्या युक्त्या. ७. (नाटकाच्या संविधानकातील) कूट, डावपेच, खुबी, गुंतागुंत. ८. (सामा.) कुशलता; चातुर्य; खुबी; हातोटी; कला (एकत्र मांडणे, विवरण करणे, वागविणे इ. ची.).[सं. घट् + मोट् (द्विधातुसंयोग.)]

घडारणे अक्रि. वृक्ष फळांच्या घडांनी, घोसांनी बहरणे, युक्त होणे.(कु.)

घडाव स्त्री. घडणावळ. कधी कधी घडण या शब्दाच्या इतर अर्थीही.

घडावले न. लहान घड. (गो.)

घडिक क्रिवि. एका घटकेत; एका वेळी, क्षणी : 'घडिक म्हणति जाऊ प्राणही हे अमासे।' – सारुह ३.६३.

घडिघडि, घडीघडी क्रिवि. प्रत्येक घटकेला; प्रत्येक क्षणी; वारंवार; घटकोघटकी; पदोपदी. [घडीचे द्वि.]

घडित वि. घडवलेली: 'श्रीची मूर्ती घडित।' – काटी शिला १.८. [सं. घटित]

घडितघाट वि. आयता घडलेला; विक्रीकरिता घडून ठेवलेला; तयार (जिन्नस, दागिना, भांडे इ.). पहा : **घडला घाट**

घडि(डी)बंद वि. १. घडी केलेला. २. ज्याची घडी मोडली नाही असा; नवा कोरा (धोतरजोडा इ.).

घडिया स्त्री. पात्र; तस्त : 'शुद्धमती देतसे विडिया। पीक धरावया सुवर्णघडिया।' – एरुस्व १६.३३ [सं. घटिका]

घडियाल–ळ पहा : **घड्याळ** : 'नफेरी अरु मोरचंग। घडियाल वाजे चंग।' – देवनाथ कृष्णजन्म ७२.

घडियाळ पु. सुसर : 'शुशुमार घडियाळ मछमगर।' – मुआदि २९.७७.

घडिव वि. हातांनी केलेला; घडवलेला : 'अगराचे उंबरे घडिव।' – रुस्व ४२०.

घडिवटे न. १. घटिकापात्र. २. घडा. ३. वेळ दाखविण्यासाठी वाजविण्याचे झेंगट : 'जैसें पाणि पीये घडिवटे।' – उगी ५१०.

घडी स्त्री. १. घटका; साठ पळांचा अथवा चोवीस मिनिटांचा अवधी : 'तो अवकाळु मेघु काय घडी। राहात आहे।।' – ज्ञा १७.२५१. २. (ल.) थोडासा वेळ; क्षण : 'पृथ्वीचिया पैसारा। माजीं घडीं न लगतां धनुर्धरा।' – ज्ञा १०.२५०. ३. योग्य संधी; वेळ; काळ : 'ही पुन्हां न ये बा घडी।' – राल ८८. ४. कालमापनाचे साधन; यंत्र; घटका; वाळूचे घड्याळ; घड्याळ इ. ५. (सामा.) तास (इंग्रजी ६० मिनिटांचा); वेळ मोजण्याचे साधारण परिमाण तास हे असल्याने तासाऐवजी चुकीने घडी शब्द वापरतात. ६. वाद्य.[सं घटिका] (वा.) **एखाद्याची घडी भरणे –** १. पहा : **घटका भरणे** : 'आला समजूं पिशाच आपण घडी भराया माझी।' – विक ५५. २. शिक्षा भोगण्याची वेळ येणे; घडा भरणे. **घडीघटकेचा गुण** – एखादी गोष्ट अमुक प्रकारेच का घडली, तशीच का घडली नाही हे सांगता येत नसले म्हणजे या वाक्प्रचाराचा उपयोग करतात. एखादी गोष्ट ज्यावेळी – ज्याक्षणी घडली असेल त्या विवक्षित वेळेचे सामर्थ्य, प्रभाव, गुण.

घडी स्त्री. १. एकेरी वस्त्र, कागद इ. दुहेरी, तिहेरी, चौपदरी केले असता होणारी स्थिती, आकार; दुमड; चूण; निरी : 'इयें पदें नव्हतीं फुडिया। गगनाचिया घडिया। येथ आमुची मति बुडालिया। थावो न निघे।।' – ज्ञा ७.१९५. २. दुमडलेली, चुणलेली स्थिती. ३. घडीबंद कापड, वस्त्र इ. उदा. लुगड्याची घडी; कापडाचा, वस्त्राचा सणंग. (क्रि. मोडणे.) ४. (ल.) संच; बस्तान; जम; संघटित स्थिती; ऐक्य; सलोखा. (क्रि. बसणे, जमणे, विस्कटणे, बिघडणे, मोडणे.) : 'घडी जों मानाची बिघडलि असे तोंवरि घडी।' – वामन भामाविलास ११. (नवनीत १००.) [सं. घट् = रचणे] (वा.) **० फोडणे –** चामड्यास चुना देऊन त्याची घडी घालतात ती दोन–तीन दिवसांनी उलगडणे. **० बसणे –** १. समज पटणे; समजूत होऊन सलोखा होणे. २. बस्तान, जम बसणे : 'आतां मात्र मनाजोगती घडी बसली.' – विवि ८.९.१७४. ३. योजलेले कार्य यथास्थित जुळणे. **० बसवणे –** जम बसवणे; सुनियंत्रित करणे : 'बुद्धिमतीने स्वतां बसविली पतिराज्याची घडी।' – विक २८. **० बिघडणे, विस्कटणे –** १. दोन व्यक्तीत असलेला सलोखा नष्ट होणे; वेबनाव होणे; वितुष्ट येणे. २. (धंद्याची, कारभाराची, राज्याची) भरभराट, सुव्यवस्था, सुस्थिती नाहीशी होणे; विस्कळितपणा येणे; (कार्याचा) सुरळीतपणा नष्ट होणे : 'पुण्याच्या राज्यकारभाराची घडी बिघडली होती.' – इंप १३७.

घडी स्त्री. रचना; निर्मिती : 'घडी स्त्रीजातीची घडविलि असे ख्याति सुघडी।'–वामन भामाविलास ११ (नवनीत १००.). [सं. घट् = रचणे]

घडी स्त्री. पायघडी; वरून चालण्याकरिता अंथरलेले वस्त्र, कापड इ. : 'एवं द्विधा समाधिचिया। तैसी चालतां नेती घडिया। तळीं उपर जाणविती तया। उपनिषदें।' – विउ ९.७९.

घडी स्त्री. १. लहान घागर; लोटी. २. भंडारी लोक दारू काढण्यासाठी माडावर जे मडके लावतात ते. पहा : **घडा**

घडीकच् क्रिवि. १. क्षणार्धात. २. एकदा. (झाडी)

घडीचा वि. क्षणाचा; क्षणभरसुद्धा; थोडासुद्धा; जरासुद्धा : 'पावसाळ्यात सल्फेटची मागणी सुरू झाली की काही दिवस तरी मला घडीचं रिकामपण नसतं.' – कोसला २८६.

घडीचे घड्याळ क्षणभंगुर जीवित, शरीर; पाण्यावरचा बुडबुडा.

घडीत न. १. घडण्याकरिता दिलेला धातू, धातूचा पत्रा, तुकडा, मोड इ. २. घडलेला, घडवलेला जिन्नस. ३. घडणावळ; घडण्याची मजुरी. ४. (दागिन्याचा, भांड्याचा) घाट; घडण; ढाळ; रचना.

घडीत न. विकून येणारी किंमत. (गो.)

घडीभर क्रिवि. घटकाभर; थोडा वेळ.

घडीभराने क्रिवि. थोड्या वेळाने; घटकाभराने; एका घटकेनंतर; मागाहून.

घडीमोड वि. घडी करता येईल आणि पाहिजे तेव्हा सोडवता येईल असा : 'नाटक मंडळांच्या प्रवासी वृत्तीमुळे त्यांचे देखाव्याचे व इतर सामान घडीमोड (फोल्डिंग) करीत.' – बहुरूपी ३७.

घडीव वि. १. घडून, हातोडा इत्यादीने ठोकून ठोकून तयार केलेला (जिन्नस, दागिना, भांडे इ.). याच्या उलट ओतीव. २. हातावर केलेली (पोळी). ३. घोटीव; भक्कम : 'तांब्याच्या कांबीसारखं घडीव...' – विभूत १४५.

घडीवट स्त्री. मुहूर्त; घटका : 'बोले इंद्र सुरपती। जालि घडीवटीयांची आईती। नोवरा येऊंद्या झडती। संभ्रमेंसी।' – कालिकापुराण १६.४२.

घडीव लोखंड घडलेले लोखंड.

घडुला पहा : **घोडुला**

घडुला–ली–ले स्त्री. न. लहान मडके, घडा, डेरा : 'यैसी घडुलि तोंडवरि भरिलि।' – पंच ५.९.

घडुले न. केळीचा लहान, नुकताच बाहेर पडलेला कोवळा घड; लोंगर. (कु.)

घडेबाजी स्त्री. १. मडक्यात फटाके वगैरे भरून त्यांना बत्ती देणे; आतषबाजी; दारूकाम : 'झाडें नानाप्रकारचीं व घडेबाजी... दारू सुटावयाची.' – ऐलेसं ४५८७. (क्रि. उडवणे, करणे, लावणे.) २. (ल.) एकदम होणारा वाद्यांचा गजर; कडकडाट.

घडेस्त्री स्त्री. कानउघाडणी. (क्रि. करणे.) (कु.)

घडोघडी क्रिवि. वारंवार; पदोपदी; क्षणोक्षणी; हरघडी. [घडीचे द्वि.]

घडोशी स्त्री. घडवंची. (को.) पहा : **घडवशी**

घडौते न. साधन (कार्य इत्यादीचे); घडवून आणते ते.

घड्डॉ, घॉड्डॉ पु. भाजलेल्या तांदळाचे पीठ पाण्यात कालवून तयार केलेले पक्वान्न. (गो.)

घड्यावरघळ पु. वरगळ भाताची एक जात.

घड्याळ न. १. कालमापनाचे साधन. यात तबकडीवर तास, मिनिटे, सेकंद इ. दाखवणारे आकडे आणि काटे असतात. २. वाळूचे कालमापक यंत्र; वाळूचे घड्याळ. ३. तासाचे ठोके जिच्यावर वाजवतात ती घंटा; तास : 'स्वराज्यात घड्याळ वाजविण्याचा मान सरकारकडून मिळे. स्वारीमध्यें तासे वाजंत्रीप्रमाणें घड्याळहि वाजवीत.' – वाडबाबा २.१२१. ४. काही विशिष्ट वस्तूंचा विनियोग दर्शविणारे मापन यंत्र. उदा. मोटारीतील पेट्रोल, हवा, इंजिनातील वाफ, किटसन् बत्तीतील हवेचा दाब इ. [हिं. घडियाल] [सं. घट्, घटी + आलय]

घड्याळची–जी पु. १. तासाचे ठोके वाजवणारा कामगार. २. घड्याळे दुरुस्त करणारा; घड्याळे विकणारा.

घड्याळटिपरू न. १. घड्याळ वाजवण्याचा लाकडी हातोडा. २. (ल.) भाकर व मिरची.

घण पु. लोखंड, तांबे इ. ठोकण्याचा, घडण्याचा लोखंडी मोठा हातोडा : 'घणाचे घाई पिटे तैसा।'–विउ २.७. [सं. हन्; घन = लोखंडी गदा]

घण न. दाट परिचय : 'तरीसुद्धा अप्पाशी तिचे एवढे घण कसे?' – गणूराया ८७.

घण न. एक प्रकारचे जाळे. (को.)

घणकणे अक्रि. (भोवरा इ. गरगरा फिरताना) घण्ण्ण्ऽऽण् असा आवाज करणे, वाजणे : 'त्रैअवस्था त्रिवेणी संगम घणघणाट घणके भंवरा।' – पला १४. [ध्व.]

घणकरी पु. (लोहाराच्या दुकानातील) घण मारणारा मनुष्य, गडी.

घण (न) कोरा पहा : **घणाखालचा**

घणगा पहा : **गणंग**

घणघण स्त्री. १. घंटा इत्यादिकांचा घणघण असा आवाज. २. ठकठक; ठाठू इ. कोणताही आवाज. ३. चिलटाचे गुंगावणे; गुंगू. ४. स्पष्ट व खणखणीत गाणे, म्हणणे, बोलणे. ५. कटकट; किरकिर. (ना.) [ध्व. घण्चे द्वि.]

घणघण–णा क्रिवि. १. झण्झण्; छण्छण्; झणत्कार, टणत्कार इत्यादिकांच्या होणाऱ्या घण्घण् अशा आवाजाने. (क्रि. वाजणे, करणे.) २. स्पष्ट व खणखणीत आवाजाने. [ध्व. घण्चे द्वि.]

घणघणघंटा स्त्री. नकारघंटा; पूर्ण अभाव; (विहिरी इत्यादिकांचा) ठणठणीत कोरडेपणा.

घणघणणे अक्रि. १. घणघण असा (घंटा इत्यादिकांचा) आवाज करणे; छणछणणे; झणझण वाजणे; खणखणणे. २. (मनुष्याचा आवाज, कंठ इ.) खणखणीत, साफ, स्पष्ट असणे.

घणघणाट पु. घणघण या आवाजाचा अतिरेक; मोठा घणघण असा आवाज; (घंटा इत्यादिकांचे) मोठ्याने वाजणे; (वाद्यांचा) दणदणाट; खणखणाट; झणत्कार; कडाका.

घणघणावचे अक्रि. १. मोठा आवाज काढणे. २. कीर्ती पसरणे. (गो.)

घणघणीत वि. ठणठणीत; खणखणीत; स्पष्ट; मोकळा; कानाला वेधणारा; घणघणणारा (आवाज).

घणघाई स्त्री. दडपण; मारा : 'ह्या सहभोजनाच्या घणघाईखाली एकदा का रोटीबंदीच्या बेडीचे तुकडे उडाले...' – ससावा २७१.

घणघाव, घणघावू(उ)क वि. १. (काही लोकांत रूढ) जाडेभरडे; दणकट; दाट विणीचे (कापड). (राजा.) २. बोजड; अजस्र; जाडाजुडा; मोठाघाटा (दागिना इ.); दांडगा; मजबूत; भक्कम (मनुष्य).

घण(णा)घोर पहा : **घनघोर** : 'मौंजीबंधन लग्न रायाचें खूपरायाचें झालें घणघोर।' – ऐपो १७७.

घणघोष पु. घणघण असा आवाज, नाद, ध्वनी : 'झळंबाचे घणघोषां।

मिळतां बुंथि घालितांअें आकाशा।' – शिव १०१८.

घणणे अक्रि. घाण येणे; वास मारणे : 'मढं कुजल्याग घणत हुतं.' – खळाळ ३७.

घणदाट स्त्री. गर्दी; खेचाखेच; जमाव; समुदाय.
वि. १. अतिशय दाट; संकीर्ण; गडगच्च. २. (सामा.) दाट; घट्ट (द्रवपदार्थ). ३. निबिड; गहन; गर्द (झाडी, अरण्य); भरगच्च; भरीव; ऐवजदार (देणग्या, इनाम इ.); जोराचा (पाऊस).

घणदाटी स्त्री. जीवश्चकंठश्च स्नेह; दाट परिचय, मैत्री.

घणमण (न) णे अक्रि. घाबरणे; डगमगणे; मागे पुढे पाहणे, फिकिरीत पडणे : 'ज्ञानी हीन स्वनांशीं घणमणीत, न त्या साहवे मानहानी।' – मोकृष्ण ५७.४.

घणस–सा पु. सर्पाची एक जात, घोणस. [सं. गोनस]

घणसकांडे–वेल न. स्त्री. एक वेल. घोणसकांडे, घोणस वेल असेही म्हणतात. ही घोणसाच्या विषावर उपयुक्त आहे असे मानतात.

घणसदी–बी – स्त्री. जबरदस्ती; जोरा : 'घणसबी केले वाचून मुलूक व पैके राहणार नाहीं.' – इएम्पी १०२.

घणसर स्त्री. केकताड; एक प्रकारची वनस्पती; घायपात. (बे.)

घणसर वि. १. दाटसर; बरेच दाट (ताक इ.). २. राकट; कणखर (मनुष्य इ.); जाडाभरडा (कपडा); भक्कम; ऐवजदार; मजबूत; टिकाऊ; भरीव.

घणसा–से पडवळ पु. घोणसे; एक आखूड जातीचे पडवळ.

घणसा पु. भोपळ्याची एक जात.

घणसाचे न. घोणसाचा दंश. (राजा.)

घणसाबैल पु. नंदीबैल; पांगूळ बैल.

घणा पु. घाणा. (बे.)

घणा पु. अतिशय मोठा घण; हातोडा. (वा.) **घण्याघायी नांदणे, असणे** – १. दागिने नेहमी घणाखाली घडवण्यास दिलेले असणे. २. (ल.) श्रीमंत असणे.

घणा पु. संपत्ती; घन. [फा. गना]

घणाखालचा वि. १. घणकोरा; टांकसाळीतून नुकताच बाहेर निघालेला (रुपया, नाणे इ.). २. कोराकरकरीत (जिन्नस); कारागिराच्या हातून नुकताच तयार झालेला (जिन्नस, दागिना इ.).

घणाघणा क्रिवि. घणघण असा मोठा आवाज करत.

घणाघणा पु. १. तुंबलेले काम. (व.) २. कटकट; घणघण. [ध्व.]

घणाघाई स्त्री. अतिशय घाई; काम त्वरित व्हावे म्हणून वाटणारा अधिरेपणा : 'बायकोची अशा रीतीनं घणाघाई चालू होती.' – एल्गार १०२.
क्रिवि. जोरात : 'कारखाना घणाघाई चाललेला.' – माजी ६३.

घणाघाती वि. अत्यंत जोरदार; घायाळ करणारी; शक्तिमान; तीव्र. झोडपून काढणारे; प्रहार करणारे (भाषण, लेखन इ.).

घणाटी स्त्री. हेलपाटा.

घणाट्या स्त्री. अव. १. निरर्थक, अकारण हेलपाटे, हिसके, फेऱ्या; पायपिटी. २. (सामा.) व्यर्थ शीण; फुकट प्रयत्न. (क्रि. खाणे, घेणे.)

घणाणघंटा पहा : **घणघणघंटा**

घणाणा पहा : **घणघणा**

घणानकन क्रिवि. घण असा एकदाच मोठा आवाज करून : 'देवळातील घंटा कुणीतरी घणानकन वाजवीत होता.' – त्रिशंकू २२.

घणावणे अक्रि. दृढ होणे; निश्चित होणे : 'सुषुप्ति बैसे। घणावोनी ।।' – ज्ञा १४.१४२. [सं. घन]

घण्याघायी क्रिवि. घणाच्या (वीरश्रीयुक्त) आवाजात.

घतणे अक्रि. इजा करणे; बाधणे; अपाय होणे; हानिकारक होणे; ठार मारणे : 'रुसला तरि प्राणा घतैल।' – लीचउ ५८५. [सं. घात]

घतन न. १. घातुक, अपायकारक, मारक, वस्तू किंवा गोष्ट. २. संकट; धोका; प्राणसंकट. ३. (सामा.) नुकसान; नाश. ४. प्राणनाश. ५. पहा : **घात** : 'रसरसली नवती नुतन। तुजकरितां केली जतन। त्यागितां करिन जिव घतन।' – प्रला १७८.
वि. १. घातुक; अपायकारक; मारक. २. (सामा.) अनर्थकारक; अहितावह. [सं. घात, घातन]

घन पु. १. (भौ.) आयतन व आकार निश्चित असणारा पदार्थ. २. (ग.) लांबी, रुंदी व उंची या तिन्ही बाजू सारख्या असणारी वस्तू. ३. (भूमिती) सहा (सम) चौरसांनी मर्यादित अशी घनाकृती.
वि. १. लांबी, रुंदी व जाडी यांनी मर्यादित अशी (पोकळी, आकृती, पदार्थ इ.). २. (ग.) तुल्य तीन अंक परस्पर गुणून जे फल येते ते; संख्येच्या वर्गाला पुन्हा त्या संख्येने गुणणे. उदा. चोहोंचा घन चौसष्ट (४ × ४ × ४ = ६४); पाचाचा घन एकशे पंचवीस (५ × ५ × ५ = १२५) इ.

घन पु. मेघ; ढग : 'वर्षावेयां गाजे आनंदाचा घनु।' – शिव ६६. [सं.]

घन न. १. घाट; तास; पितळेचे, काशाचे वाद्य या अर्थी सर्वसाधारण शब्द; घड्याळ : 'घनाचा घमंड तंत लावितो लया।' – दावि १६३. २. घंटा, करताल, टाळ, झांज, झेंगट इ. सारखे एक वाद्य. पहा : **घनवाद्य**

घन पु. लोहाराचा मोठा हातोडा. पहा : **घण** : 'घन सांडस नागफणी। रात हात हातवडे ऐरणी।' – कथा ३.१७.९४. [सं.]

घन वि. १. (शाप.) ज्याचा आकार सहज बदलता येत नाही असा, द्रवस्वरूपात किंवा वायूस्वरूपात नसलेला (पदार्थ). २. जाड; जाडेभरडे; घट्ट विणीचे (कापड). ३. भरीव; दाट; फार पातळ नसलेले (ताक इ.). ४. दाट; गर्द; निबिड (छाया, झाडी, पालवी इ.). ५. जाड; बळकट (फळी). ६. घट्ट; अप्रवाही; द्रव, वायुरूप पदार्थाविरहित. ७. दुर्भेद्य (अंधार). ८. गाढ; स्तब्ध (झोप इ.) : 'ना स्वरूप अवस्थान। ते सुषुप्ति कां घन। जैसी होय ।।' – ज्ञा १४.७४. ९. मोठा; जोराचा; मोठ्या सरीचा (पाऊस इ.) : 'इंदिराकळत्रा इंद्रे वर्षतां घन घन धारा।' – र ६२. १०. घुमेपणाने स्तब्ध असलेला (मनुष्य). ११. ठेवा. १२. उलट; दृढ. [सं.]

घनकंद पु. (वन.) वनस्पतीचे जमिनीखाली राहणारे मांसल, पाती अथवा खवल्यासारख्या पानांनी वेढलेले फुगीर खोड. यात अन्नसंचय केलेला असतो व त्यावर डोळे असतात.

घनकंदिका स्त्री. (वन.) मुळातल्या घनकंदापासून बनलेला लहान घनकंद.

घनगडना क्रि. गडगडत खाली येणे. (झाडी)

घनगडा पु. फोडून वेगळे केलेले मडक्याचे तोंड; मडक्याचा काठ (व.).

घनगडी स्त्री. १. लहान लोखंडी कडे. २. जिलेबीची कडी. ३. वेटोळे. (झाडी)

घनगर्जना स्त्री. मेघांचा गडगडाट : 'हें ना घनगर्जना सरिसा । मयूर वोवांडे आकाशा ।' – ज्ञा १८.४८४.

घनगार स्त्री. गारांचा पाऊस पाडण्यासाठी केलेले चेटुक : 'पांढरकवड्यावर रचविल्या घनगारा अद्भुत ।' – ऐपो ४०१.

घनघटा स्त्री. मेघपटल; मेघडंबर; ढगांची गर्दी : 'चट उठवल्या घनघटा, पडति पटपटा बिंदु कटितटासि बळकट धरा ।' – राला ५६.

घनघन स्त्री. १. किरकिर. २. कटकट. ३. कुरकुर. (व.) [ध्व.]

घनघमंडी स्त्री. घनाचा आवाज; टाळ, करताल, घड्याळ, झांज इत्यादी वाद्यांचा तालबद्ध गजर : 'घनघमंडी उदंड होतसे । तंत भरे भरपूर ।' – दावि ४६८.

घनघोख–फ पु. मेघ गर्जना. 'जैसा कां घनघोखु । मयोरासि ।' – ज्ञा ११८०.

घन(ना)घोर वि. १. निबिड; दाट; जोराचा (पाऊस, ढग). २. भयंकर; निकराचे; तुमुल; भीषण; तुंबळ; हातघाईचे (युद्ध, लढाई). ३. भडिमाराची; आवेशाची; जोराची (शिवीगाळ). ४. दाट; निबिड; गर्द (अंधार, झाडी, रान इ.). ५. दाट; गजबजलेला; खेचाखेचीचा; भरगच्च (मनुष्यांचा जमाव, पीक, फळे इ.). ६. गाढ; स्वस्थ. (झोप.) [सं. घन + घोर]

घनचकर, चक्कर, चक्र न. पु. स्त्री. १. मेघ; ढग; फिरणाऱ्या ढगांचा समुदाय; ढगांचे चक्र. २. निबिड, दाट असे मेघमंडळ; झंझावात; मेघपटल; मेघजाल; ढगांची गर्दी. वावटळ; चक्रवात. (माळवी) ३. तुंबळ व निकराचे युद्ध; हातघाईची लढाई; रणकंदन; कडाक्याचे भांडण : 'गजावरी गज लोटले । रथाशीं रथ झगटले । एकची घनचक्र मांडिलें । रामकृष्ण पहाती ।' – ह २२.९५. ४. थाटमाट; भव्य देखावा; मोठा पसारा; लयलूट; अवडंबर; जलसा; मजा (गाणे, नाच, तमाशा, खेळ इत्यादीचा). ५. (जेवणाची, पोळ्यांची, तुपाची) चंगळ; विपुलता; चमचमाट; रेलचेल. (वरील ४ व ५ अर्थी प्रयोग करताना जेवणाची, गाण्याची घनचक्कर अशी शब्दरचना करतात.) (क्रि. उडणे, उडवणे.) वि. क्रिवि. पहा : **घनघोर.** १. मेघांच्या मंडलांनी युक्त (आकाश इ.); जोराचा, मोठ्या सरींचा (पाऊस). २. निकराची; हातघाईची; तुंबळ (लढाई, युद्ध, भांडण). ३. निबिड; दाट; गर्द (अरण्य, पालवी, अंधार, छाया). ४. विपुल; भरगच्च, दाट (पीक); रेलचेलीचे, चंगळाईचे (जेवण, खाद्यपदार्थ). ५. गाढ; स्वस्थ (झोप). ६. मोठ्या प्रमाणावर चाललेला; जोराचा (धंदा, व्यापार इ.). (वा.) ० **उडणे,** – १. एकदम सर्व बाजूंनी गर्दी उडणे, हलकल्लोळ उडणे. २. खूप रंग येणे. ३. भयानक लढाई होणे.

घनचक्कर वि. विचित्र; चक्रम.

घनचित्र न. एखाद्या पदार्थाचे, स्थलाचे, इमारतीचे हुबेहूब भरीव चित्र.

घनजालक न. (भौ.) मूलभूत एकक घनाकार असेल अशी संरचना (असलेले स्फटिक).

घनणे अक्रि. घाणणे; दुर्गंधी येणे. (खा.) पहा : **घणणे**

घनणे क्रि. थांबणे; स्थिर होणे : 'ऐसे घनु घनु म्हणत : पातले यादवांचे राउत :' – शिव ९५९.

घनता स्त्री. (भौ.) द्रव्याच्या एकक घनफळाचे – आयतनाचे वस्तुमान.

घनता स्त्री. १. घट्टपणा; दाटपणा. २. दार्ढ्य; वजनाला घनफळाने भागले असता येणारा भागाकार त्या पदार्थांची घनता होय. ३. विशिष्ट जागेत असू शकणारे पदार्थाचे कमीअधिक प्रमाण; दाटपणा : 'कमी घनता, कठीणपणा आणि ठोकून पत्रे करता येण्याची क्षमता ह्या गुणधर्मांमुळे त्याला (अल्युमिनियमला) फार महत्त्व प्राप्त झाले आहे.' – भाख ७०. [सं.]

घनतामापक पु. (भौ.) प्रकाश किंवा क्ष किरण इत्यादींमुळे फोटो काचेवर येणाऱ्या काळेपणाचे मापन करण्याचे उपकरण.

घनतुरूप पु. १. तोफखाना : 'विजयादशमीच्या स्वारीला घनतुरूप पागा रिसाला ।'–गापो ३५. २. बरोबर तोफखाना बाळगणारी फौज.

घनत्वबोध पु. लांबी, रुंदी व जाडी यांचा भास.

घनथिर वि. मेघ गंभीर : 'निसानाचेनि नादें घनथिर शबदें ।' – गरा ३८.

घनदाट वि. १. गर्द; निबिड : 'भरला घनदाट हरि दिसे ।' – ज्ञा. हरि. २. घट्ट; पातळ नसलेला (द्रवपदार्थ). ३. (ल.) अतिशय सलगीचा; जिवलग; सलोख्याचा (स्नेहभाव, मैत्री). ४. गजबजलेला; खेचाखेचीचा (जमाव, सभा इ.) : 'ऐसी सभा बैसली घनदाट ।' – शनि ८.

घनदाटणे अक्रि. गर्दी होणे; खेचाखेची होणे; गच्च भरणे : 'सभा घनदाटली विमानीं ।' – देवीची भूपाळी ३०.

घनदाटी स्त्री. १. जीवश्चकंठश्च, मैत्री; जिवलग सख्य. २. अतिशय दाटी.

घनन, घनीकरण–भवन न. पदार्थाचे द्रवरूपातून घनस्वरूपात रूपांतर.

घननिलांग वि. सावळ्या रंगाचा.

घनपद–मूळ न. (ग.) एखाद्या संख्येच्या घनापासून काढलेली मूळ संख्या; घनाचे मूळ. उदा. चौसष्टाचे घनपद – मूळ चार होय. [सं. घन + मूल]

घनपाग न. मासे पकडण्याचे बारीक भोकांचे जाळे. हे आडपागापेक्षा लहान असते. (राजा.)

घनपाठ पु. वेदाचा पाठ करण्याची विशिष्ट पद्धत, रीत. [सं.]

घनपाठपूर वि. घनपाठापर्यंत अध्ययन केलेला. [सं.]

घनपाठी वि. १. वेदाचा घनपाठ म्हणणारा; घन नावाची वेदाची विकृती पठण करणारा. २. वेदपारंगत; मोठा विद्वान; वैदिक : 'विप्र शोभती वेदघनपाठि ।'–दत्तपदे २५. [सं.]

घनप्रसरण न. १. (शाप.) घन पदार्थाचे उष्णतेने होणारे प्रसरण; आकारमानात वाढ. २. ढगांचा फैलाव.

घनफल–ळ न. (भूमिती) (पदार्थाच्या, पोकळीच्या) लांबी, रुंदी व उंची यांचा गुणाकार करून आलेले फल. उदा. भुज ४, कोटी ५, उंची ३ यांचे घनफळ ६०. कोणत्याही पदार्थाने व्यापलेला अवकाश, पोकळी.

घनमणणे अक्रि. पहा : **घणमणणे.** घाबरणे; डगमगणे : 'बरगडी रगडीत

असे सदा । घनमणी न मनींहुनि तो कदां ।' – किंगवि ३२.

घनमाकड पु. मुलांचा एक खेळ.

घनमुंडी वि. भक्कम : 'चांगलं जाडजूड घनमुंडीदार.' – ऊन ३९.

घनरस पु. कापूर.

घनवट वि. १. मजबूत; जाड; घट्ट विणीचे (कापड इ.). २. सर्वव्यापक; श्रेष्ठ; सर्वव्यापी; सर्वांचा सारभूत. ३. जड; भारी; वजनदार : 'मेरूपासाव घनवटें। जीं हिंसीं जालीं तुकमठें।' – ऋ ३०. ४. भरीव; भरदार : 'कीं भूस बीज एकवट। उपणितां राहे घनवट।' – ज्ञा २.१३०. ५. घट्ट; भरीव; कठीण : 'कां मी येतुली घनवट ऐसें। पृथ्वीचि जाणे ।।' – ज्ञा १०.१७६. [सं. घन + वट (प्रत्यय)]

घन (ण) वटणे अक्रि. १. घनदाट, चिक्कार भरणे (सभा इ.); दाटणे; एकवटणे; जमणे : 'सभा घनवटली अपार।' – वेसीस्व १.१७. २. ऐक्य होणे : 'चंचळ निश्चळ घनवटे। हें तों घडेना।' – दास १५.१०.१४. ३. दाटी, गर्दी करणे; खेचाखेच, चेंगराचेंगरी होणे.

घनवटता, घनवटप स्त्री. न. भारीपणा; जडपणा; घट्टपणा; भरीवपणा; भरदारपणा : 'कीं अवधान आणि श्रवण। कीं पृथ्वी आणि घनवटपण।' – भवि ४५.१२९.

घनवटा स्त्री. (निजण्याची) गादी, गालिचा.

घनवटुपण न. काठिण्य; जडत्व : 'तेआतें देखौनि श्रीकृष्ण घनवटुपण अंगीकारलें।' – श्रीकृच ५.

घनवर्ग पु. (ग.) एखाद्या संख्येच्या घनाचा वर्ग; समान सहा अंक परस्पर गुणून आलेला गुणाकार हा त्यापैकी प्रत्येक अंकाचा घनवर्ग होय. एखाद्या संख्येचा षड्घात. उदा. तीन या संख्येचा घनवर्ग २७ × २७ = ७२९ होय. [सं.]

घनत्वबोध न. लांबी, रुंदी व जाडी यांचा भास.

घनवर्धनीय–यत्व वि. न (शाप.) प्रसरणशील; घणाने ठोकल्यामुळे किंवा दाब घातल्याने न मोडता पसरणारे.

घनवाट वि. १. असंख्य; २. गजबजलेला.

घनवाड वि. निबिड; दाट; गर्द.

घनवाद्य न. दोन भागांपैकी एका भागाचे दुसऱ्यावर आघात करून वाजवले जाणारे वाद्य. चिपळ्या, करताल, झांज, मंजरी, तास, घंटा, टिपऱ्या, जलतरंग इ. वाद्ये ह्या प्रकारात येतात.

घनविद्रव पु. (भौ.) दोन घनपदार्थांचे एकजिनसी मिश्रण. यात एका पदार्थांचे अणू अथवा रेणू दुसऱ्या पदार्थात इतस्तत: वितरित झालेले असतात.

घनविरोध पु. (शाप.) पदार्थाच्या आकारमानामुळे उत्पन्न होणारी प्रतिबंधक शक्ती. [सं.]

घनविल्हन वि. घट्ट विणीचे, पण पातळ (वस्त्र) : 'ते पासवडी नावेक घनविल्हन होती।' – लीचउ ६८.

घनश्याम वि. मेघाप्रमाणे; कृष्णवर्ण; काळासावळा : 'घनश्याम हा राम लावण्यरूपी।' – राम ६७.

घनसर वि. १. दाट; विपुल; ऐवजदार; भरदार : 'पिकें होतां धान्यें घनसर बरीं स्वस्त विकतीं।' – दावि २२५. २. मजबूत; शक्तिसंपन्न. पहा : **घणसर**

घनसावळा वि. घनश्याम; मेघासारखा; सावळ्या रंगाचा (कृष्ण, राम) : 'पाहावया घनसांवळा। कृष्ण श्यामता आली बुबुळां।' – एरुस्व ७.२३.

घना वि. सोळा. (नंदभाषा)

घनाकार पु. भरीव आकार; गोळ्याचा आकार; लगड : 'पुढती तो घनाकारू हारपे। जे वेळीं अलंकार होती।।' – ज्ञा ८.१७३.
वि. ज्याची लांबी, रुंदी व उंची सारखी आहे असा. [सं.]

घनाकृति–ती स्त्री. एक किवा अनेक पातळ्यांनी सर्वांगाकडून मर्यादित अशी आकृती, अवकाश. [सं.]

घनाना पु. घोटाळा. (व.) [ध्व.]

घनानी वि. सदा कुरकुर करणारी. (व.)

घनान्या वि. त्रासदायक. (झाडी.)

घनाभ वि. घन आकाराचा; सहा चौरस पृष्ठभाग असणाऱ्या आकाराचा.

घनाभरूप वि. घनाकृती.

घनावणे अक्रि. १. घन होणे; घट्ट बनणे. २. साकार होणे : 'निजानंद घनावला।' – ज्ञागा ४९७.

घनावणे अक्रि. (आकाश) ढगांनी युक्त होणे; अभ्राच्छादित होणे.

घनावली वि. दृढ झालेली : 'घनावली आवडी। अव्याभिचारें चोखडीं। तियें घालू जोडीं। आंगुळियां।' – ज्ञा १५.५.

घनाश्रय पु. वातावरण; अंतराळ.

घनास्त्र न. रक्ताची गुठळी. (व.)

घनाक्षरी स्त्री. ओवीसारखा सोळा चरणांचा मराठीतील एक छंद, वृत्त. [सं. घन + अक्षर]

घनांग न. भूमितिविषयक एक परिमाण.

घनांधकार पु. दाट काळोख; घोर अंधार : 'घनांधकारांत दिवा जसा वनीं।' – मृच्छ.

घनिष्ठ वि. अतिशय दाट, दृढ, बळकट : 'आपण व श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा संबंध घनिष्ठ होण्याचा योग आला.' – साअप (गं. दे. खानोलकरकृत) पत्र ६ वे. [सं.]

घनिष्ठता स्त्री. दाट परिचय; सलगी : 'नोकर लोकांबरोबर इतकी घनिष्ठता मला पसंत नसावी हे तिने चटकन ताडले.'–विविध २७.६.१९१४.[सं.]

घनीकरण न. (मानस.) स्वप्नातील अनेक सुप्त घटकांचे एकत्रीकरण होऊन एक व्यक्त घटक तयार होणे.

घनीकरण न. १. (शाप.) पातळ, वायुरूप पदार्थ घट्ट करणे. २. (शाप.) पातळ, वायुरूप पदार्थ दाट, घट्ट होणे. उदा. पाण्याचे बर्फ बनणे, पातळ मेण थिजून घट्ट होणे. [सं.]

घनीभूत वि. गोळ्याच्या, लगडीच्या रूपाने असलेले; घट्ट झालेले; आकार धारण करणारे : 'नानाघनीभूत सुवर्ण। जैसें न्याहाळितां साधारण।' – ज्ञा १.४४. [सं.]

घनीमत न. फायदा. [फा. गनीमत]

घनीय–घन विद्राव्यता (भौ.) एका घनपदार्थांची दुसऱ्या घन पदार्थात मिश्रित होण्याची क्षमता.

घनीय संकोचन (भौ.) द्रवरूप धातूचे घनरूप होऊन नेहमीच्या तपमानाला येईपर्यंत होणारी त्याची घनफळातील घट.

घनू वि. पुष्कळ; विपुल; भरपूर. (माण.)

घनोघनो स्त्री. १. कटकट. २. कुरबुर. (झाडी)

घन्कर पु. चरकात ऊस टाकणारा. (झाडी)

घनगडा पु. १. मडक्याचा गोल काठ. २. लोखंडी कडे. ३. वेटोळे. (झाडी)

घपकन–कर–दिशी–दिनी क्रिवि. वासाचा, घाणीचा आकस्मिकपणा व विपुलता ध्वनित करणारे क्रियाविशेषण. पहा : **गपकन** [क.]

घपका पु. उग्र वास; दर्प : 'जेवणात मसाल्याच्या वासाचा घप्का (घपका)' – मवाइ २४८.

घपघप–घपा, घपाघप–पा, घपापा क्रिवि. पदार्थ एकदम गिळताना होणाऱ्या आवाजाने. पहा : **गपगपा** [ध्व. घप्चे द्वित्त्व]

घपला पु. घोटाळा; गुंतागुंत. [अर. गफलत]

घपा (प्पा) घोळ पु. १. अनेक वाद्यांचा अव्यवस्थित असा संमिश्र आवाज. २. (ल.) (वस्तूंचा, सामानाचा) पसारा; राडा; चिवडा; संकर. ३. (कामांचा, हिशेबाचा) गोंधळ; घोटाळा; अव्यवस्था. ४. अनेक कार्ये, धंदे एकत्र आल्याने उडणारी तारांबळ, धांदल, ताणाताण. ५. लगबग; धामधूम; घायकूत.

घबके न. अवचित होणारा लाभ; अलभ्य, आगंतुक लाभ; घबाड; टाऊक; टावके. (क्रि. लागणे, मिळणे, सापडणे.) पहा : **गबका**

घबघबीत पहा : **गबगबीत**

घबड स्त्री. पोकळ जागा : 'धबधब्याच्या आतल्या अंगाला एक मोठी घबड होती.' – सराई १२.

घबदूल वि. गलेलठ्ठ; धष्टपुष्ट; भक्कम; दांडगा. पहा : **गबदूल**

घबराट स्त्री. १. घाबरगुंडी; भयभीत अवस्था. २. (रोग्याचा) जीव घाबरणे; बेचैन वाटणे; काहिली होणे; गलबलणे. ३. (ल.) भीती; धास्ती; दु:ख. ४. गोंधळ; घोटाळा. ५. एकाएकी निर्माण झालेली तीव्र (निराधार) भीती.

घबाड न. १. एक शुभ मुहूर्त. सूर्यनक्षत्रापासून चंद्रनक्षत्रापर्यंत मोजून येणाऱ्या संख्येला तीन या संख्येने गुणून गुणाकारात चालू तिथी मिळवून आलेल्या संख्येला सातानी भागून बाकी तीन उरल्यास त्या दिवशी हा योग येतो. २. (सामा.) शुभ वेळ; मुहूर्त; सुयोग. ३. (ल.) आकस्मित लाभ; अनायासे झालेली मोठी द्रव्यप्राप्ती; लाट. (क्रि. मिळणे, साधणे.) : 'गाण विहंगमें गेला । घबाड अवचित पावला ।' – दावि २७४.

घबाड पु. दाराच्या फळीच्या खालच्या टोकाला फिरण्याकरिता जो गट्टू वगैरे बसवतात तो; खालचा वात्या, दाराचे कुसू.

घबाडचूक स्त्री. मोठी चूक; घोडचूक.

घबाडमाप न. १. बाजारात चालणाऱ्या शिरस्त्याच्या मापापेक्षा, वजनापेक्षा मोठे माप, वजन. २. मोठा आहार असणाऱ्या माणसाचे पोट; कधी तृप्त न होणारा कोठा.

घबी स्त्री. आडोशाची पोकळी : 'दरडीला त्यांची घबी असते त्यात ते (मासे) सुरक्षितपणे जाऊन बसतात.' – शिस ४४.

घबुकेळ न. आकस्मिक झालेला मोठा लाभ; अकल्पित सापडलेला ठेवा, डबोले; मिळालेल्या पुष्कळ देणग्या, बक्षिसे, इनाम इत्यादी. (क्रि. लागणे, मिळणे, सापडणे.)

घबूक न. १. अवचित होणारा लाभ. पहा : **घबके** (क्रि. लागणे, मिळणे, सापडणे.) २. विपुलता; समृद्धी; रेलचेल; अतिरेक.
वि. भरपूर; अतिशय; विपुल.
क्रिवि. विपुलतेने; अतिशयपणे.

घम क्रिवि. स्तब्धपणे; मुकाट्याने. पहा : **घम्म**

घम स्त्री. १. क्षमा; अपराध गिळणे; सहन करणे; सहनशीलता; गय; गई. (क्रि. खाणे, करणे, घेणे, म्हणणे.) २. दम; विश्रांती; विसावा. (क्रि. खाणे) पहा : **गम** [अर. घम् = दु:ख, फा. गम]

घम पु. ढेपाळे; गुळाच्या ढेपा घालण्याकरिता केलेले भांडे. (बे.) पहा : **घमेले** [सं.]

घमकर–कन–दिशी पहा : **घपकर–कन–दिशी**

घमगी वि. विषादयुक्त; दु:खी; कष्टी.

घमघम पु. (गो.). पहा : **घमघमाट**
क्रिवि. १. आत्यंतिक सुवासाचे निदर्शक क्रियाविशेषण. २. एकदम; भरपूर; सुरळीतपणे; संतोषाने. ३. धडकून; जोराने. [ध्व.]

घमघमणे अक्रि. अतिशय सुवास येणे; सुगंधाने, दरवळणाऱ्या वासाने युक्त होणे.

घमघमाट पु. वासाची अतिशयता; मधुर व उग्र वासांचा संयोग; सुगंधाचा अतिरेक, दर्प; फार दरवळणारा सुगंध : 'फुलांचा घमघमाट व झऱ्यांचा झुळझुळ आवाज यांपासून मोठा आवाज होई.'–पाव्ह ३७.

घमघमित वि. जाडसर.

घमघमीत वि. उग्र, मधुर आणि दरवळणारा (सुगंध); घमघम सुवासयुक्त (फोडणी इ. पदार्थ); खमंग.

घमट गुळवणी १. पहा : **घमंड गुळवणी**. २. तोंडापुरते लाडीगोडीचे भाषण; गोड थापेबाजी; खुशामत.

घमत स्त्री. तारवास भोक पडून त्यातून तारवाच्या तळाच्या भागात साचलेले किंवा झिरपलेले पाणी; गलबतातील गाळ, पाणी. (को.) पहा : **गमत**

घमतड–डी स्त्री. जेथे घमत साचते ती जागा; गलबताचे पोट. (राजा.) पहा : **गमतड**

घमताड स्त्री. १. घमतड २. गलबतातील गाळपाणी. (को.) पहा : **गमताड**

घमशण न. गडबड; धांदल : 'माझा परकरसुद्धा शिवायला झालाय. लक्षात असू द्या. नाहीतर आपल्याच घमशणात...' – रथचक्र.

घमशा(स्या)न न. १. (क्रियेचे आधिक्य, जोर किंवा पदार्थांची रेलचेल दाखविण्यासाठी अनियमितपणे या शब्दाचा उपयोग करतात.) धांगडधिंगा; धुमश्चक्री; खिदडा; धुडगूस (क्रि. घालणे, मांडणे.). २. चमचमाट, खाणे, पिणे, गाणे, बजावणे इ. प्रकारांची चैनबाजी; धूमधडाका. ३. (पावसाची, खाद्यपदार्थांची, पिकांची) रेलचेल; चंगळ; लयलूट; समृद्धी; विपुलता : 'साहित संगीत प्रसंग मानें । करावीं कथेचीं घमशानें ।' – दास १८.३.१८. ४. दांडगाई; लाथाळी; तुडवणी. ५. पराभव; फडशा; धुव्वा (वाद, शिवीगाळ इ. मध्ये.).
वि. १. धिप्पाड; भक्कम; धटिंगण; दांडगा (मनुष्य). २. भव्य; शोभिवंत; छानदार; नामी (इमारत इ.). ३. भक्कम; दणगट; मजबूत; टिकाऊ (कापड,

दोर इ.). ४. घमंडानंदन; विलासी; चैनबाज; खुशालचंद (मनुष्य).

घमशाम वि. भरघोस.

घमंड–डी स्त्री. १. विपुलता; प्राचुर्य; अतिशयता; रेलचेल; समृद्धी; अतिरेक. २. (कामाचा, काळजीचा) रगाडा; नेट; कचका; निबिडता : 'अशा ह्या कर्जांचे पेंचाचे घमंडींत तो अद्यापि पडला आहे.' – व्यनि ९०. ३. थाट; बहार; मजा; रंग : 'केलें घमंड कीर्तनीं।' – दावि ४१६. ४. अतिशय उपभोग; चैन; चंगळ : 'त्यावेळेस त्यांचे खाण्यापिण्याची व नाना प्रकारचे मळीण विषयोपभोग घेण्याची मोठी घमंडी उडती.' – व्यनि ४३.

वि. भरपूर; विपुल; समृद्ध; मोठा; मनसोक्त : 'नटोनि घमंड नाचो लाऊं लोकां।' – दावि १४.

घमंड–डी स्त्री. घोष; गजर; एकतानता; नादमधुरता : 'ताळमृदांगघमंडी। मिळोनि जातां उठे अधिक आवडी।' – दावि १७५.

वि. कर्णमधुर; सुस्वर; सुश्राव्य : 'भजन कीर्तन घमंड करित।' – दावि १६७.

घमंड, घमंडी पहा : **घमेंड**

घमंड–घमंडखोर, घमंडानंद–दी, घमंडानंदन, घमंडीनाथ वि. १. प्रौढी मारणारा; बढाईखोर; गर्विष्ठ : 'कां घमंडे हो ठाकिला संसार।' – दावि ३०९; 'पेनिलोप राणीच्या पाणिग्रहणार्थ जमलेल्या राजपुत्रांप्रमाणें घमंडानंदन आहेत.' – ब्रावि ३. २. (जो पोटाशिवाय दुसऱ्या कशाकडेही लक्ष देत नाही अशा माणसाला उपरोधाने लावायचा शब्द) पोटभरू; पोटबाबू. ३. चैनी; खुशालचेंडू; रंगेल; विलासी. [हिं. घमंड = गर्व]

घमंडगुळवणी न. लापशी इ. गोडसर पातळ पदार्थ बिघडून बेचव, पाणचट झाले असताना त्यांना तिरस्काराने लावायचा शब्द. गरगट; ढपळवणी; खरकटवणी; घमटगुळवणी.

घमाघम, घमाघमा पहा : **घमघम**

घमामा क्रिवि. घमाघमा; भरारा; घमघम : 'दोहूं चला रे गाई घमामा।' – दावि ७६९.

घमासान वि. घनघोर; जोराचा; तुंबळ : 'ब्रिआन्स्क आणि खार्कोव्ह या दोन्ही शहरांच्या वेशीवर घमासान लढाई सुरू झाली.'–दुम १९५.

घमेले न. १. लोखंडी पाटी, टोपली, तगारी. २. आगगाडीच्या रुळाखाली आधार देण्याकरिता पालथी घातलेली लोखंडी जाड तगारी. एका स्लीपरखाली ह्या दोन्ही बाजूला दोन असतात. ३. घम; ढेपाळे. [सं. घर्म (कढई) + आलय]

घमेंड स्त्री. पोकळ ऐट; डौल; ताठा; अहंकार; गर्व. [हिं. घमंड]

घमेंड स्त्री. ताकद; जोर. (अहि.)

घमेंडखोर वि. १. गर्विष्ठ. २. ऐटबाज.

घमेंडी पहा : **घमंड, घमेंड** : 'त्याच्या सर्व घरच्या माणसांना घमेंडी चढली आहे.' – दुर्गा ४.

घमोऱ्या स्त्री. घामोळ्या. (झाडी) [सं. घर्मावलि]

घम्म क्रिवि. स्तब्ध; मुकाट्याने. पहा : **घम** : 'पण मास्तरीणबाई अगदीं घम्म बसल्या, अगदी रामा! शिवा! गोविंदा!' – खरादे ३०.

घम्मनगेट वि. खंबीर; घट्ट; पक्का. (माण.)

घम्माघोर वि. दाट; घनघोर.

घर न. १. राहण्यासाठी बांधलेली जागा; वाडा. २. एका कुटुंबातील (एके ठिकाणी) राहणारी मंडळी; कुटुंब; (सांकेतिक) पुनर्विवाहित स्त्रीला पहिल्या पतीपासून झालेला मुलगा. ३. गृहस्थाश्रमधर्म; संसार; प्रपंच; (ल.) नवरा किंवा बायको. 'हा जिन्नस घरात दाखवून आणतो.' – विवि १०.४.७; 'आमच्या घरांतल्यांनी दादासाहेबांना दारूचें व्यसन लावलें.' – एकच प्याला. ४. एखाद्या व्यवसायात जुटीने काम करणारी माणसे, मंडळी, संस्था; अडतीची जागा. ५. एखादी वस्तू सुरक्षितपणे ठेवण्यासाठी केलेले धातूचे, लाकडाचे आवरण, वेष्टण, कोश. उदा. चष्म्याचे घर. ६. पेटीतील, टाइपाच्या खणातील कप्पा, खण, खाना. ७. सोंगट्यांच्या, बुद्धिबळाच्या पटावरील, पंचांगातील (प्रत्येक) चौक; चौरस; मोहऱ्याचा मूळचा चौरस; मोहऱ्याचा मारा. ८. (ज्यो.) कुंडलीच्या कोष्टकांतील भावदर्शक स्थान. ९. घराणे; वंश; कुळ. १०. (वर्तमानपत्राचा, पत्रकाचा, कोष्टकाचा) रकाना, सदर : 'येऊन जाऊन पत्रप्रकाशकास स्वत:चा असा मजकूर दर खेपेस पराकाष्ठा दोन तीन घरें घालणें येतें.' – नि १५. ११. (मधमाशाचे पोळे वगैरेतील) छिद्र : 'केळीच्या सोपटाचीं घरें ज्यांनीं पाहिली असतील....' – मपु ६.२२५. १२. ठाणे; ठिकाण : 'कुबल, बांकी घरें। शिवराजाच्या हाता आलीं।' – ऐपो ९. [सं. गृह] (वा.) **० आघाडणे –** घर जळून खाक होणे. (को.) **० उघडणे –** १. लग्न करून संसार थाटणे. २. एखाद्याचे लग्न करून देऊन त्याचा संसार मांडून देणे. **० उभारणे, ० उभे करणे –** संसारातील अडचणी दूर करून ते सुरळीत चालू करणे. **० करणे –** १. बिऱ्हाड करणे; राहण्यास जागा घेऊन तीत जेवणखाण इ. गोष्टी करायला लागणे. २. (त्रासदायक वस्तूंनी) ठाणे देणे; राहणे; वास्तव्य करणे : 'माझ्या हृदयांत घर करून बसून त्याने मला घायाळ केलें.' – बाय ३. ३. **० खाली असणे –** १. घर मोकळे असणे. २. घरातील पुरुषमनुष्य मृत्यू पावणे : 'कासीबा देशपांडे यांचा घर खालीं होता. त्याची बायको तिसी कासीबा देशपांड्या गेला.' – ऐसंसाखं ४.१०७. **० खाली करणे –** घर सोडून जाणे; घर मोकळे करून देणे. **० घालणे –** (एखाद्याच्या) घराचा नाश करणे. **० घेणे –** १. (सामा.) लुबाडणे; लुटणे; नागविणे; बुचाडणे : 'मग रेणुकेनें बोलिलें। अहो जेऊनि कैसें घर घेतलें।' – कापु २३.४०. २. (एखाद्याचा) नाश करणे : 'म्हणती जन्मोनि द्रौपदीनें। आमचें घर घेतलें तिणें।' – जै ७१.९९. ३. (त्रासदायक वस्तू) घर करून बसणे, ठाणे देऊन बसणे. पहा : **० करणे** २. **० चालविणे –** प्रपंचाची, संसाराची जबाबदारी वाहणे. **० जोडणे –** इतर घराण्यांशी, जातींशी, लोकांशी इ. मैत्री, शरीरसंबंध घडवून आणणे; मोठा संबंध, सलोखा उत्पन्न करणे : 'लक्ष्मीपतीचें घर थोर जोडे।' – सारुह २.१. **० डोक्यावर घेणे –** आरडाओरड करून घर दणाणून सोडणे; घरात दांडगाई, कलकलाट, दंगामस्ती करणे. **० तुटणे –** मैत्रीचा, नात्याचा संबंध नाहीसा होणे; स्नेहात बिघाड होणे. **दुसऱ्याचे घर दाखवणे –** १. आपल्या घरी कोणी त्रासदायक मनुष्य आला असता काही

युक्तीने त्याला दुसऱ्याच्या घरी लावून देऊन आपला त्रास चुकविणे; (एखाद्याची) ब्याद, पीडा टाळणे. २. घालवून देणे; घराबाहेर काढणे. ० **धरणे** – १. घरात बसून राहणे; घराच्या बाहेर न पडणे, संकटाच्या, दंगलीच्या वेळी पळून जाणे, पळ काढणे, गुंगारा देणे. २. (रोग इत्यादींनी शरीरावर) अंमल बसविणे; एखादा आजार पक्केपणाने जडणे. ३. चिकटून राहणे; चंचलपणा न करता एकाच ठिकाणी भिस्त ठेवून असणे. ४. (बुद्धिबळात, सोंगट्यात) सोंगटी एकाच घरात ठेवून घर अडविणे. ० **धुणे, ० धुऊन नेणे** – एखाद्याचे असेल नसेल ते लबाडीने गिळंकृत करणे; हिरावून नेणे; नागविणे; बुचाडणे; लुबाडणे; लुटणे; अगदी नंगा करणे : 'शंभर वर्षांनी घर धुऊन नेल्यानंतर ही ओळख आम्हांस पटूं लागली आहे.' – टिव्या. ० **निघणे** – नवऱ्याला सोडून दुसऱ्या मनुष्याबरोबर नांदणे; दुसऱ्याच्या घरात, कुटुंबात निघून जाणे : 'माझें घर निघाली.' – वाडमा २.२०९. ० **नेसविणे** – घरावर गवत घालून ते शाकारणे; घर गवत इत्यादिकांनी आच्छादणे; घर शिवणे. ० **पाहणे** – १. (एखाद्या) घराकडे वक्रदृष्टी करणे; (रोगाचा, मृत्यूचा) घरावर पगडा बसणे; घरात शिरकाव करणे. २. (बायकी) वधूवरांचे योग्य स्थळ निवडणे : 'सुशील तारेने आपल्या पुण्यबलाच्या साह्याने योग्य घर पाहून....' – रजपूतकुमारी तारा. ३.घरी जाणे, मुलाबाळांत जाणे. ० **पालथे घालणे** – हरवलेली वस्तू शोधण्यासाठी घराचा कानाकोपरा धुंडाळणे. ० **पुजणे** – १. आपले काम करून घेण्यासाठी एखाद्याच्या घरी आर्जवे, खुशामत करण्यास वारंवार जाणे. २. (घरे पुजणे) आपला उद्योग न करता दुसऱ्यांच्या घरी चकरा मारणे. ० **फोडणे** – १. संसार आटोपणे, आवरणे. २. कुटुंबातील माणसांत फूट पाडणे; घरात वितुष्ट आणणे. ३. घराला भोक पाडून आत (चोरी करण्यासाठी) शिरकाव करून घेणे. ० **बसणे** – कर्ता मनुष्य नाहीसा झाल्यामुळे, दुर्दैवाच्या घाल्यामुळे कुटुंब विपन्नावस्थेला पोचणे; घरांची वाताहत, दुर्दशा होणे. ० **बसविणे** – संसार थाटणे; घर मुलाबाळांनी भरून टाकणे. स्त्रीच्या विवाहोत्तर जीवनात या वाक्प्रचाराचा उपयोग करतात. ० **बुडणे** – १. कुटुंबाची नासाडी, दुर्दशा होणे; कुटुंब धुळीला मिळणे. २. संतती नसल्यामुळे वंशाचा लोप होणे. ० **बुडविणे** – १. (एखाद्याच्या) कुटुंबाचा विध्वंस करणे; संसाराचा सत्यानाश करणे. २. घराला काळिमा आणणे. ० **भरणे** – १. दुसऱ्याला बुडवून, त्यांची उपेक्षा करून आपण श्रीमंत बनणे. २. दुसऱ्याचे घर लुटणे व स्वत: गबर होणे. ० **भंगणे** – कुटुंब मोडणे, विस्कळीत होणे; कुटुंबाला उतरती कळा लागणे; कुटुंबाचा नाश होणे; मंडळीत फूट पडणे. ० **मारणे** – घर लुटणे. ० **मांडणे, थाटणे** – (संसारोपयोगी जिन्नसांनी) घर नीटनेटके करणे; घराची सजावट करणे.० **म्हणून ठेवणे** – एखादी वस्तू, सामान प्रसंगविशेषी उपयोग पडावी म्हणून संग्रही ठेवणे; प्रत्येक वस्तू जतन करून ठेवणे. ० **रिघणे** – पहा : ० **निघणे.** ० **लागणे** – घर भयाण भासणे. (एखाद्याचा मुलगा अथवा पत्नी वारली असता घरातील भयाण स्थिती वर्णन करताना ह्या वाक्प्रचाराचा उपयोग करतात.) **घराचा उंबरठा चढणे** – घरात प्रवेश करणे. **घराचा खांब, घराचे धारण, घराचे पांघरूण** – घरातील कर्ता माणूस; घरातला मुख्य; घरमेढा. **घराचा पायगुण** – घरामुळे घडणाऱ्या शुभाशुभ गोष्टी; घरातील माणसांची वागणूक, वर्तणूक, वर्तन, शिस्त; घराचे पुण्य पाप. **घराचा पायगुणच तसा, घरची खुंटी तशी** – कुटुंबातील माणसाची वागण्याची रीत असेल त्याप्रमाणे; एखाद्या कुटुंबातील माणसांची सर्वसाधारण अशा वाईट व्यसनाला, खोडीला, सवयीला उद्देशून म्हणतात. **घराचा वासा ओढणे** – एखाद्या कामधंद्यासाठी आवश्यक असलेले साधन, वस्तू, गोष्ट नाहीशी करणे; एखाद्या मोठ्या कामातून फार जरुरीचे साधन नाहीसे करणे; अडवणूक करणे. **खाल्ल्या घराचे वासे मोजणे** – कृतघ्न होणे; केलेला उपकार विसरणे. **घरात पैशाचा, सोन्याचा धूर निघणे** – घरची अतिशय श्रीमंती असणे. **घराला रामराम ठोकणे** – घर सोडून जाणे : 'आज या घराला रामराम ठोकण्यापेक्षा घटकाभर जुलमाचा रामराम पत्करला.' – भा ९०. **घरावर काट्या घालणे, गोवरी ठेवणे, निखारा ठेवणे** – एखाद्याच्या कुटुंबाची धूळधाण, बदनामी करणे. **घरावर कुत्रे चढविणे** – (गोव्याकडे घरावर कुत्रे चढल्यास घर सोडावे लागते यावरून) १. एखाद्याच्या घरात कलागती, भांडणे लावून देणे, तंटे उत्पन्न करणे. २. दुष्टावा करणे; अडचणीत आणणे. **घरावर गवत रुजणे** – घर ओसाड, उजाड पडणे. **घरावर तुळशीपत्र ठेवणे** – घरादाराचा त्याग करणे; संसाराबद्दल पूर्णपणे अनासक्त होणे. **घरास आग लावणे** – एखादे दुष्कृत्य करून घराचा नाश करणे. **घरास काटी लागणे** – घर उद्ध्वस्त होणे; घरात कोणी न राहणे. **घरास काटी लावणे** – १. घराच्या भोवती काटे, काटक्या लावून येणे - जाणे बंद करणे. २. घर उजाड, उद्ध्वस्त, ओसाड करणे. **घरास येणे** – अवस्थेप्रत येणे. **घरास हाड बांधणे, घरावर टाहळा टाकणे** – (एखाद्याला) वाळीत टाकणे; समाजातून बहिष्कृत करणे; जातीबाहेर टाकणे. **घरास राखणे** – १. घराचे रक्षण करणारा मनुष्य. २. (ल.) थोडासा संचय, शिल्लक, साठा, संग्रह. **घरी बसणे** – (एखादा मनुष्य) उद्योगधंदा नसल्यामुळे, सोडून दिल्यामुळे घरी रिकामा असणे; बेकार होणे. **घरी पाणी भरणे** – (एखादा मनुष्य, गोष्ट) एखाद्याच्या सेवेत तत्पर असणे; त्याला पूर्णपणे वश असणे. **घरी बसवणे** – अधिकारावरून किंवा कामावरून काढून टाकणे : 'किचनेरलाही घरी बसविण्याचा त्याचा विचार होता.' – पम ४०३. **घरी येणे** – (एखादी स्त्री) विधवा झाल्यामुळे सासरच्या आश्रयाच्या अभावी पितृगृही, माहेरी परत येणे; विधवा होणे : 'कुटुंब मोठे, दोन बहिणी घरी आलेल्या.' – मनोरंजन आगरकर अंक.

घर न. १. (उंदीर, चिचुंदरी इ. कांचे) बीळ. २. एखादा पदार्थ शिरकविण्यासाठी केलेला दरा, भोक, खोबण, खाचण. ३. (मालकाच्या इच्छेविरुद्ध बळकावलेले) वस्तीचे ठिकाण. उदा. काट्याने टाचेत घर करणे. [सं. गर्त = खळगा; भोक; अर. घार = जखम]

घर न. १. उत्पत्तिस्थान; प्रांत, प्रदेश, ठिकाण, ठाणे (वारा, पाऊस, प्रेम, विकार, रोग इत्यादिकांचे) : 'सर्वज्ञतेचि परी। चिन्मात्राचे तोंडावरी। परी ते आन घरीं। जाणिजेना।' – अमृ ७.१३०. २. रोग इत्यादिकांच्या उत्पत्तीचे कारण, मूळ, उगम. [सं. गृह]

घर न. १. वादातील आधारभूत मुद्दा, गमक, प्रमाण. २. शास्त्र, कला, इत्यादिकांतील खुबी, मर्म, रहस्य, मख्खी, किल्ली. [सं. गृह]

घर न. सामर्थ्य; संपत्ती; ऐपत; आवाका; कुवत. [सं. गृह]

घर न. १. सतार इत्यादी वाद्यांतील सुरांचे स्थान; सनईसारख्या वाद्याच्या दोन भोकांमधील अंतर; सतारीच्या दोन पडद्यामधील अंतर. २. मृदंग इत्यादी चर्मवाद्यांचा वादी, दोरी इत्यादींमुळे होणारा प्रत्येक विभाग. ३. (संगीत) तान, सूर यांची हद्द, मर्यादा, क्षेत्र.

घर न. (अडचणीच्या, पराभवाच्या वेळी) निसटून जाण्यासाठी करून ठेवलेली योजना; आडपडदा; पळवाट; कवच.

घर न. खुद्द; आपण स्वत:; स्वत:चा देह.

घर न. वयोमानाचा विभाग; कालमर्यादा : 'हा नवा गृहस्थ पन्नाशीच्या घरांत आला होता.' – कोरकि ३२.२५.

घर न. विशिष्ट खुणांनी दर्शविलेले अंतर; टप्पा : 'मिनिट काटा एका तासात ६० घरें चालतो.' – के. [सं. गृह] ३. चौरस : 'घर चौवीस हाथ।' – विजापूर शिला. १.५.६.

घरअसामी स्त्री. १. वतनवाडी; जमीनजुमला; मालमत्ता. २. घरकामासंबंधीचा मनुष्य; घराकडचा माणूस.

घरइतें वरइतें न. नवरा बायको : 'इथे अनादि घरइतें वरइतें। जे वियालीं ब्रह्मादि प्रपंचातें।' – विसि १३.५.

घरकज्जा पु. घरातील तंटा; कौटुंबिक भांडण; गृहकलह.

घरकरी पु. पत्नीने नवऱ्याला उद्देशून वापरायचा शब्द; घरधनी; कारभारी; यजमान; घरमालक.

घरकसबी पु. आपल्या अक्कलहुशारीने घरगुती जरुरीचे जिन्नस घरच्या घरी तयार करणारा व घरची मोडतोड दुरुस्त करणारा मनुष्य; घरचा कारागीर; बाहेर काम करून उपजीविका न करणारा मनुष्य..

घरकंद पु. एक प्रकारचा कंद. (सामा.) कोनफळ; गोराडू.

घरका पु. १. काटा इत्यादिकांनी कातडीत, पायात केलेले घर. (कु.) २. वस्त्र, लाकडाची फळी इत्यादिकांना पाडलेले छिद्र, भोक.

घरकान्न स्त्री. घरधनीण; बायको; घरकरीण. (गो.)

घरकार–री पु. १. नवरा; पती. २. घरचा यजमान; घरधनी; मालक. (गो.कु.)

घरकारणी पु. घरचे सर्व काम पाहणारा; दिवाणजी; खाजगी कारभारी.

घरकी वि. घरातला; घरासंबंधीचा : 'गावकी व घरकी कामे करणाऱ्या....' – गांगा २७.

घरकुबडा, घरकुबा–कोंबा–कोंग्या–कोंडा–कुंडा–कोंधा, घरघुबडा पहा : **घरकोंबडा**

घरकुरती पहा : **घरगुती**

घरकु (कू) ल न. १. लहान घर; भातुकलीच्या खेळातील मुलींनी केलेले लहानसे घर : 'तिया खेळतां करिती घरकुलीं।' – ज्ञा ९.३७४. २. लहानसे झोपडीवजा घर : 'वस्तीकरितां झावळ्याचे घरकूल करीन.' – पाव्ह २८. ३. घरटे; खोप. (वा.) **घराचे घरकूल होणे –** वाताहत होणे.

घरकुली स्त्री. लहान घर; खेळातील घर : 'करूनि ब्रह्मांडाची घरकुली। माजी बैसविली ब्रह्मांडादिक बाहुली।' – जै २९.४५.

घरकुल्ली वि. बहुश: घराबाहेर न पडणारी (स्त्री); घरकोंबडी. (गो.)

घरकुंडा पु. १. पक्ष्याचे घरटे. भुंग्याचे घर; वाळवीचा निवारा. २. (ल.) आश्रयस्थान (को.) : 'आम्हीं तुझ्या विश्रांतीचा घरकुंडा सोडतांच हे आमचे अद्वैतज्ञानाचे पांख आम्हांस तोलत नाहींसे होऊन आम्ही खालीं पडों लागलों.' – यशोदा पांडुरंगी.

घरकुंडी वि. घरातला : 'पोरीतला घरकुंडी खेळ....' – जोफु ९७.

घरकोल्या वि. १. लाजाळू. २. आळशी. (झाडी)

घरकोंबडा पु. (दुबळ्या व सुस्त माणसाला – प्राण्याला तिरस्काराने लावायचा शब्द) नेहमी घरात राहणारा; एकलकोंड्या; माणुसघाण्या; चारचौघांत उठणे, बसणे, गप्पा मारणे इ. ज्याला आवडत नाही असा, कधी बाहेर न पडणारा मनुष्य; घरबशा.

घरखटला–ले पु. न. १. घरचा कामधंदा; गृहकृत्य; प्रपंच, शेतभात इ. घरासंबंधी काम. २. घराची, कुटुंबाची काळजी, जबाबदारी, अडचणी इ. ३. गृहकलह; घरातील भांडण.

घरखण न. घर्षण; (ल.) आदळआपट : 'प्रियाप्रियवंसजाली। घरखणें स्नेहदावानलीं।' – वह ४५०.

घरखण्या वि. घरातील धुणे, पाणी भरणे इ. सामान्य कामाकरिता ठेवलेला गडी; घरच्या कामाचा माणूस.

घरखास(न,ज)गी वि. घरातील मालमत्ता, कामे, कारखाना इ. संबंधी; घरगुती बाबीसंबंधी; घरगुती, खासगी व्यवहाराबाबत.

घरगणती स्त्री. १. गावातील घरांची संख्या. २. गावातील घरांची मोजणी, मोजदाद. ३. गावातील घरांच्या मोजणीचा हिशेब, तपशील. (क्रि. करणे, काढणे.)

घरगाडा पु. संसाराची एकंदर कामे, जबाबदारी; प्रपंचाची राहाटी; प्रपंच; संसार; घरखटला. (क्रि. रेटणे, हाकणे, चालवणे, सांभाळणे.)

घरगु(ग)ती, घरघराड वि. १. घरचा; घरी तयार केलेला (माल, सामान, वस्तू); घरी वाढवलेला, पाळलेला (घोडा, पशू); घरी लावलेला (रोप, झाड इ.). २. घरचा. ३. घराशी संबंध असलेला; खाजगी.

घरगुती क्रिवि. १. स्वत:च्या अंगमेहनतीने; कौशल्याने. २. घरच्या माणसांकडून.

घरगॅर, घरबॅर न. पिरपीर; टुमणे. (गो.)

घरगोहो पु. चुलीपाशी, बायकांत, आश्रितात शौर्य दाखवणारा मनुष्य; गेहेशूर; घरातील माणसांवर जरब ठेवणारा पण बाहेर भागुबाईपणा करणारा पुरुष.

घरघर स्त्री. १. चरक, रहाट, जाते इ.चा होणारा घर्् असा आवाज. २. कंठात कफ दाटल्यामुळे होणारा घोगरा, विशिष्ट आवाज (विशेषत: मरणासन्न माणसाचा) : 'मग कशाची जाते घरघर।' – तोबं १४. [ध्व.] (वा.) ० **लागणे –** थोड्याच वेळात मरणार अशा स्थितीत असणे; मरण्याच्या बेताला येणे; धंदा, उद्योग बंद पडण्याच्या स्थितीस येणे.

घरघर–रा क्रिवि. जाते, चरक, रहाट इत्यादिकांच्या होणाऱ्या घरघर आवाजाप्रमाणे; तसा आवाज करीत. [ध्व.]

घरघर–रा–री पु. स्त्री. मरायला टेकलेल्या माणसाच्या घशातील घरघर आवाज. (क्रि. लागणे, वाजणे.) [ध्व. घरघर]

घरघरटी स्त्री. दारोदार हिंडणे; एकसारखी फेरी घालणे. (क्रि. करणे.) : 'चंद्र कथुनि मग महेंद्रगृहीं घरघरटी करित वायां।' – आमहाबळ १९.१.

घरघरणे अक्रि. घरघर वाजणे; कंठ कफाने दाटल्यामुळे घरघर आवाज होणे; घरघर असा आवाज करणे.

घरघराट पु. घरघर असा मोठा आवाज : 'मोटारीच्या घरघराटातूनही ओरडून बोललेली बोलणी आमच्या कानी येत होती.' –वावटळ २५.

घरघशा पहा : **गरगशा**

घरघाला–ल्या–लू वि. १. खोडसाळ; फसवाफसवी करणारा; बिलंदर : 'भिजल्या पोरी कशी होरी ग हे घरघाली।' – राला ४०. २. कुळाची अब्रू घालवणारा; घरबुडव्या; दुसऱ्याचे घर बुडवणारा किंवा व्यसनादिकांनी आपले घर बुडवून घेणारा : 'कशी घरघाली रांड बसली आम्हां गिळून।'– राला ४६. ३. सर्वनाश करणारा : 'भयानका क्षिति झाली घरघाली रुद्रविंशति जगिं फांकली।'– ऐपो ३६८.

घरघुबी स्त्री. ओलसर जागेत राहणारा एक लहान प्राणी. हा सहसा बाहेर दिसत नाही. नेहमी आपल्या घरात मातीखाली असतो. कोकणात तर याचे दर्शन हे पाहुणे येण्याचे लक्षण समजले जाते.

घरघुबेपणा पु. एकलकोंडेपणा; घरघुबडेपणा.

घरघुशा–सा वि. सर्व दिवसभर उदासवाणा घरात बसणारा; घरबशा, घरकोंबडा.

घरघुशी–सी स्त्री.१. नवऱ्याचे घर सोडून दुसऱ्याच्या घरात नांदणारी; दुसऱ्याचा हात धरून गेलेली विवाहित स्त्री : 'कोण धांगड रांड घरघुशी।' – राला ७८. २. ठाकर वगैरे जातींत लग्न होत नसलेली स्त्री कोणाच्या तरी घरात घुसते व तेथे राहू लागते. पुढे दंड घेऊन जात त्यांचे लग्न लावते. अशी स्त्री. (ठा.)

घरघेऊ–णा वि. घराचा, कुटुंबाचा नाश, धुळधाण, करणारा; घरघाला; घरबुडव्या; दुसऱ्याला मोह पाडून, फसवून त्याचे घर बळकावणारा : 'जळो आग लागो रे। तुझि मुरली हे घरघेणी।' – देप ८०.

घरचा वि. १. कुटुंबातील; घरातील (माणूस); घरात जन्मलेला, वाढलेला, तयार केलेला इ. २. (ल.) नवरा; पती : 'आम्हांस आतां फार रात्र झाली, घरचीं रागें भरतील.' – रत्न ५.४. ३. स्वत:सिद्ध; स्वसंपन्न; दुसऱ्याची अपेक्षा नसणारा. उदा. घरचा गाणारा, सुतार, विद्वान इ. ४. घरी उत्पन्न केलेले, घरच्या शेतातले (धान्य). (वा.) **घरचा ना घाटचा –** कोण, कुठला, कोणाचा, काय उपयोगाचा इत्यादी ज्यासंबंधी काहीही सांगता येत नाही असा (मनुष्य, पदार्थ, प्राणी); अगदी अनोळखी; परका.

घर(रा)चार पु. १. कुटुंबाची रीतभात; घराची चालचालणूक; कौटुंबिक रूढी, वहिवाट. २. गृहस्थधर्म; संसार; प्रपंच : 'दु:खाचा घरचार निर्धन जिणें भोगावरी घालणें।' – किंसुदाम ५०. [सं. गृहाचार]

घरचारि (री) णी स्त्री. गृहपत्नी; घरधनीण; यजमानीण; घरमालकीण.

घरची उतरंड, कूड दुसऱ्याला निरुत्तर करण्यास किंवा त्याची फजिती करण्याच्या हेतूने वापरण्यात येणारा अशिष्ट शब्दप्रयोग. (ना.)

घरची विद्या कुटुंबात चालत आलेली विद्या, धंद्याचे ज्ञान; घरी शिकता येण्यासारखी विद्या.

घरजमा स्त्री. घरावरील कर; घरपट्टी.

घरजावई पु. बायकोसह सासऱ्याच्या घरी राहणारा जावई; सासऱ्याने आपल्या घरीच ठेवून घेतलेला जावई; सासऱ्याच्या घरी राहून तेथील कारभार पाहणारा जावई : 'तो संसाराचा आपण। घरजांवई झाला जाण। देहाभिमानासि संपूर्ण। एकात्मपण मांडिलें।।' – एभा २२.५९२. (वा.) **० करणे –** १. (एखाद्याला) सर्व संपत्तीसह कन्यादान करणे; जावयाला घरी ठेवून घेणे, त्याला आपली जिंदगी देणे : 'त्याला त्यांनीं घरजावईच केला आहे.' – इंप २७. २. (उप.) एखादी उसनी घेतलेली वस्तू लाटण्याच्या हेतूने, मालकाने परत मिळण्याविषयी तगादा लावीपर्यंत, ठेवून घेणे. **० होऊन बसणे –** आपल्यावर सोपवलेल्या कामाचा किंवा धंद्याचा नफा आपणच घेऊन टाकणे.

घरजिंदगी, घरजिनगानी स्त्री. १. घरातील सामानसुमान, उपकरणी, भांडीकुंडी यांसारखी द्रव्याव्यतिरिक्त इतर मालमत्ता; घरातील जंगम चीजवस्तू; मिळकत. २. (सामा.) मिळकत; इस्टेट : 'पादशहाची घरजिनगानी समग्र लुटून....' – ऐलेसं ८.४२२४.

घरजुगूत, घरजोग(गा)वणी स्त्री. १. काटकसर, मितव्यय; थोडक्यात घराचा निर्वाह. २. घरातील जरुरीची संपादणी; कसाबसा निर्वाह : 'एक म्हैस आहे तिणें घरजुगूत मात्र होत्ये.' – शास्त्रीको.

घरट–टा–टी पु. स्त्री. १. घिरटी; धान्य भरडण्यासाठी, दळण्यासाठी केलेले मोठे जाते : 'हिरे, माणकें, मोतीं सर्व जबरदस्ती घरटाखाली घालून त्यांचा चुरा केला.' – वज्राघात ६६. २. भात भरडण्याचे मोठे जाते. (को.) ३. दळणारा; धान्य इत्यादी दळून पोट भरणारा : 'घरट भुसारी याजवर मोहतर्फा मलिकबरी याचे कारकीर्दीपासून होता तो....'– मसाप २.१६३. ४. (ल.) पहारा; गस्त; घिरटी. [सं. घरट्ट]

घरट न. घर; कुटुंब.

घरटका–क्का पु. घरपट्टी; घरजमा; घरावरील कर.

घरटण–णा १. पहा : **घरठाण.** २. घरबंद. ३. पडलेल्या घराची जागा, जमीन, चौथरा.

घरटणे उक्रि. भरडणे; घरटात घालून दळणे.

घरटा–ठा पु. १. पक्ष्याचे घरटे; खोपा : 'या लक्षयोजनांबुधि – परतीरीं आमुचा असे घरटा।' – मोकर्ण २८.५७. (को.) २. घर; राहायचे ठिकाण : 'ब्रह्मग्रहो राक्षसु। ग्रामु घरटा पाडी वोसु।' – गीता २.३४१५. ३. आश्रयस्थान; ठिकाण : 'विश्वाचिया अभिलाषा। पायपाखळणिया दोषां। घरटा जाला।' – ज्ञा १८.६५१. ४. पडलेल्या घराची ओसाड जागा, जमीन, चौथरा; घरठाण. ५. काटा इत्यादिकांनी कातडीत केलेले छिद्र, घर; एखादी वस्तू राहील, ठेवता येईल असे भोक. ६. न्हाणीघर.

घरटाण न. पडके घर. (कु.) पहा : **घरटण–णा**

घरटाळे न. सोनाराची काटा ठेवण्याची पेटी.

घरटी स्त्री. १. घिरटी; फेरी; गिरकी : 'सुमनें गुंफिलीं वीरगुंठीं। त्यावरी मधुकरांची घरटी।' – एभा ३.८३६. २. गस्त; पहारा : 'यापरी स्वयें मन। दुर्ग पन्नासी आपण। त्यासी सबाह्य राखण। घरटी जाण स्वयें करी।' – एभा २२.३०६. ३. येरझारा; हेलपाटा; खेप; खेटा; जाणे व परत येणे. इ.ची निष्फळ क्रिया. ४. (ल.) आडकाठी; कैद; प्रतिबंध

: 'जयातें अभ्यासाची घरटी । यमनियमांची ताटी ।' – ज्ञा २.३११.

घरटी स्त्री. १. प्रत्येक घराचा, कुटुंबाचा वर्गणीतील, वाटणीतील भाग, हिस्सा; घरपट्टी. (को.) २. वर्गणी, पट्टी, दंड, देणग्या देण्याच्या किंवा घेण्याच्या बाबतीत स्वतंत्रपणे मोजलेले प्रत्येक घर.

घरटी, घरटीस क्रिवि. प्रत्येक घरागणिक; घरोघर; प्रत्येक घरी; एकही घर न वगळता : 'खोजेवाडीस घरटी काठी चालू आहे इतका नारूचा उपद्रव डोळ्यांनी पाहिला.' – खेया २५.

घरटीक (का)र वि. १. गस्त घालणारा; पहारा करणारा; राखणदार; रखवालदार : 'रामाश्रमीं अहोरात्र । जटायु झाला घरटीकार ।' – भारा किष्किंधा १६.१३२; 'गांवांत रात्रौ जागती घरटीकर ।' – मक ३४.१००. २. चार; हेर; गुप्त पोलीस. ३. (सामा.) जासूद; बातमीदार : 'तों सभेस घरटीकार सांगत । रावणासन्मुख वर्तलेलें ।' – रावि १९.१७३. ४. कोतवाल – (तंजा).

घरटीखोती स्त्री. गावचे सगळे दळण दळून देण्याचा मक्ता.

घरटीप स्त्री. १. गावातील घरांची गणती. (क्रि. करणे, काढणे.) २. घरमोजणीचा हिशेब, तपशील. पहा : **घरगणती** (वा.) ० **काढणे, करणे, घेणे –** (शोधीत, लुटीत, मोजीत, आमंत्रण देत) गावातील एकही घर न वगळता सर्व घरांची हजेरी घेणे; कोणतीही क्रिया, रोग, प्रादुर्भाव गावातील एकही घर न वगळता होणे.

घरटीभर–सारा पु. मराठ्यांच्या अमदानीत जात्यांवर, घरटांवर बसविलेला कर.

घरटीया वि. पु. पहारेकरी; घरटी करणारा : 'घोषें गजी घरटीया ।' – गरा १२.३.

घरटे न. घरटा; प्राणी, पक्षी इत्यादिकांचे घर; राहायचे ठिकाण; बीळ. पहा : **घरटा**

घरटोळ स्त्री. प्रत्येक घराचा झाडा, झडती. (को.) पहा : **घरडोळ**

घरठा(ठ)ण न. १. घर बांधलेली जागा. २. मोडलेल्या घराचा चौथरा; पडक्या घराची जागा. पहा : **घरवंद** [सं. गृहस्थान]

घरठाव पु. १. नवरा; पती; संसार. २. अनीतिकारक आश्रय; रखेलीचा दर्जा; रखेलीला दिलेला आश्रय : 'नीरांजनीला मुंबईत एका गुजराथी धनवानानें चांगला घरठाव दिला होता.' – बहकलेली तरुणी ८.

घरठाव पु. विवाह; योग; स्नेह; ऐक्य : 'मुस्लीम लीग व काँग्रेस या दोन संस्थांशी घरठाव जमण्याचा योग नसल्यामुळे...' – विविध १.१०.१९३९.

घरड पहा : **घरट**

घरड स्त्री. मरण्यापूर्वीची घरघर:'...बापू घरड लागेतवसर...' – सीपो ७६.

घरडई स्त्री. १. मरणोन्मुख माणसाच्या तोंडाला पडणारी कोरड व घशात होणारी जळजळ. २. (सामा.) अजीर्णामुळे येणारा करपट ढेकर. पहा : **गरढई** (क्रि. लागणे, येणे.) [ध्व.]

घरडणे उक्रि. १. घरटात घालून (धान्य इ.) भरडणे. २. (माणसाची, प्राण्याची मान, गळा) नरडी वाकडेतिकडे तोडणे; खांडणे; छिंदणे; खापलणे; चोचावून तोडणे; कापणे. ३. रगडणे; दात रगडणे.–(तंजा.)

घरडहुळी, घरडोळ–ळी स्त्री. १. घराचा झाडा, झडती; धांडोळा; बारीक तपास :'मग थावलि ये वाहटुळी । सैंघ घेऊनि घरडहुळी ।'–ज्ञा ६.२१६; 'तया आघवियांचि आंतु । घरडोळी घेऊनि असें पाहतु ।' – ज्ञा ११.५८६. २. प्रत्येक घराची केलेली झडती. (क्रि. घेणे.)

घरडा पु. १. भरडताना जात्याचा होणारा घरघर आवाज. २. (ल.) गाढ झोपेत, अंतकाळी होणारी घशातील घरघर. (क्रि. लागणे.)

घरडा पु. घरटे; विशेषत: ज्यात एखादी वस्तू राहील, ठेवता येईल असे लहानसे भोक, पोकळी. (राजा.)

घरडुकर न. १. गावडुक्कर; पाळीव डुक्कर. २. (निंदाव्यंजक) कुटुंबातील आळशी, निरुद्योगी स्त्री.

घरडुळणे अक्रि. घराचा झाडा घेणे; धुंडाळणे; कानाकोपऱ्यातून शोधणे; घरडोळ.

घरण–णी स्त्री. घरधनीण; घरातील मुख्य कारभारीण; गृहिणी, बायको. (राजा. कु.) [सं. गृहिणी]

घरण न. घरटक्का किंवा वाणटक्का; घरावरील कर.

घरणी स्त्री. १. लहर. २. सर्प विषाचा प्रभाव : 'काल भुजंगाचीया घरणी ।' – वह ४४९.

घरत स्त्री. (प्र.) गरत; कुलीन व सभ्य (विधवा, सधवा) स्त्री; मर्यादशील व अब्रूदार स्त्री. [सं. गृह+रत]

घरतवरते न. नवराबायको :'पुडती घरतवरते । वंदिली तिये ।'–अमृ ४९.

घरदार न. (व्यापक) घरातील माणसे, चीजवस्तू इ. प्रपंचाचा पसारा, खटले. (वा) ० **खाऊन वासे तोंडी लावणे –** सारी धनदौलत नासून, फस्त करून कफल्लक बनणे. **घरादारावर नांगर फिरविणे –** संसार, जीवन उद्ध्वस्त करणे; सत्यानाश करणे.

घरदेणे पहा : **घरपट्टी**

घरधणी–नी पु. १. यजमान; गृहपती; घरातील कर्ता माणूस : 'निर्वीरा धरणी म्हणे घरधणी गोंवूनी राजे पर्णी ।' – आसी ५२. २. पती; नवरा; घरकरी : 'मग धरधन्यास्नी पकडूनश्येनी न्ये.' – बाय. २.२.

घरधसी स्त्री. रखेली. (झाडी)

घरधंदा पु. घरातील कामधाम; गृहकृत्य.

घरन(नो)ळे न. म्हशीच्या, रेड्याच्या (काहींच्या मते उंटाच्याही) उरोभागी पुढच्या दोन पायांमध्ये असलेला मांसल भाग, आवाळू.

घरनिघ(घो)णी स्त्री. १. पहा : **घरनिघी.** २. (क्व.) घरभरणी अथवा गृहप्रवेश शब्दाबद्दल वापरतात. केव्हा केव्हा या दोन्हीही शब्दांबद्दल योजतात.

घरनिघी स्त्री. वाईट चालीची, दुर्वर्तनी, व्यभिचारिणी; घरातून बाहेर पडलेली, स्वैर स्त्री : 'कीं घरनिघेचें सवाष्णपण ।' – नव १८.१७२.

घरनिघ्या पु. १. स्वत:चे कुटुंब, घर, जात सोडून दुसऱ्या घरात, जातीत जाणारा; दुर्वर्तनी, व्यभिचारी मनुष्य. २. एखाद्या व्यभिचारिणी स्त्रीने बाळगलेला, राखलेला पुरुष; जार.

घरप स्त्री. गऱ्यांची भाजी. (गो.)

घरपट्टी स्त्री. १. घरटका; घरदेणे; घरावरील कर : 'पंचाकडे घरपट्टी बसविण्याचा अधिकार आला.' – के १६.४.३०. २. एखाद्या कार्याकरिता प्रत्येक घरावर बसविलेली वर्गणी.

घरपती क्रिवि. घरोघर : 'संध्याकाळी काळूने घरपती जाऊन सांगितले.' – बारी १०९. [सं. गृह+प्रती]

घरपाळी स्त्री. (सरकारला काही जिन्नस पुरवण्याची, सरकारचा विवक्षित हुकूम बजावण्याची, भिकाऱ्यांना अन्न देण्याची इ.) प्रत्येक घरावर येणारी पाळी, क्रम.

घरपांग पु. निराश्रितता; आश्रयराहित्य : 'तंव दरिद्रियासी ठाव तत्त्वतां। कोणीच न देती सर्वथा। जेथें घरपांग पाहतां। बाहेर घालिती पिटोनि।।' – ह २९.३५.

घरपांड्या पु. घरातल्याघरात, बायकांत पांडित्य दाखवणारा.

घरपिसा वि. ज्याला घराचे वेड लागले आहे असा; घरकोंबडा; घरकुंडा.

घरपिसी क्रिवि. प्रत्येक घरात. (झाडी)

घरपिसे न. घराचे वेड; घरकुबडेपणा; घर सोडून कधी बाहेर न जाणे.

घरपोच, घरपोचता वि. घरी नेऊन पोचवलेला, स्वाधीन केलेला (माल).

घरप्रवेश पु. पहा : **गृहप्रवेश**

घरफुंकी धोरण शत्रूच्या हाती लागू नये म्हणून स्वत:च सर्व कारखाने, धान्यादी माल वगैरे जाळून राख करण्याचे धोरण; दग्धभू धोरण.

घरफोड स्त्री. घरातील माणसांत कली माजवून देणे, कलागती उत्पन्न करणे.

घरफोडी स्त्री. १. (कायदा) एखाद्याच्या घरात त्याच्या संमतीवाचून कुलूप–कडी काढून, मोडून किंवा मार्ग नाही अशा ठिकाणी मार्ग करून (चोरी करण्याकरिता) प्रवेश करणे. २. घराची भिंत वगैरे फोडून झालेली चोरी.

घरफोड्या वि. १. घरात, राजकीय पक्षात, राज्यात फूट पाडणारा, दुही माजवणारा; घरफूट करणारा. २. घरे फोडून चोरी करणारा.

घरबशा वि. (उप.) घरकोंबडा; घरात बसून राहणारा.

घरबसल्या क्रिवि. १. घरी बसून; नोकरी, धंदा वगैरे न करता; घरच्याघरी; घर न सोडता. २. (ल.) आयते; श्रमाविना. (क्रि. मिळणे.)

घरबंद पु. घरांची वस्ती, संख्या. (को.)

घरबंद पु. घराचा बंदोबस्त; घरावरील जप्ती; घर जप्त करणे; घराची रहदारी बंद करविणे; चौकी, पहारा बसविणे : 'ऐकोनि यापरी तुफान गोष्टी। क्रोध संचरला राजयापोटीं। पाहरा धाडूनि घरबंदसाठीं। ठेवितला यासी कारागृहीं।' – दावि ४५६.

घरबंद न. पाया : 'त्या घराचे घरबंद (म्हणजे पाया) अजून पडीक अवस्थेत होते.' – सांज १७६.

घरबंदर न. जेथून जहाज प्रवासास निघाले ते मूळचे बंदर.

घरबाई स्त्री. गृहिणी; घरधनीण :'घरबाइसी पडदनी दान।'–स्थापो ८४.

घरबाडी स्त्री. बेवारशी घरांचे भाडे (ब्रिटिशपूर्व अमदानीत काही शहरांतून सरकार हे वसूल करीत असे.). पहा : **घरवाडी**

घरबार न. घरदार; घरातील मंडळी व मालमत्ता; संसार; प्रपंचाचा पसारा : 'तेवि घरबार टाकून गांवीचे जन।' – दावि ४१२. [सं. गृ]

घरबार पु. घरचा कारभार; मुखत्यारी.

घरबारी पु. १. कुटुंबवत्सल; बायकोपोरांचा धनी; गृहस्थाश्रमी; संसारी : 'भार्या मित्र घरबारिया।' – भुवन १८.७१. २. घरधनी; घरकरी; नवरा; पती : 'कां रुसला गे माझा तो घरबारी।' – होला १४८.

घरबारीपणा पु. गृहस्थपणा; कर्तेपणा : 'पुरुषास घरबारीपणा प्राप्त होतो.' – विवि. ८.२.३५.

घरबुडवेपणा पु. १. घराचा नाश करण्याचे कर्म. २. देशद्रोह; स्वदेशाशी, स्वदेशीयाशी, स्वराज्याशी बेइमान होणे : 'हा प्रयत्न त्यांचा इतर प्रयत्नांप्रमाणेंच घरबुडवेपणाचा आहे हें आम्ही सांगावयास नकोच.' – लोटिकेले १.५४८.

घरबुडव्या – बुडाऊ वि. अत्यंत त्रासदायक; दुसऱ्याच्या नाशाची नेहमी खटपट करणारा; घरघाल्या; स्वत:च्या, दुसऱ्याच्या घरदारांचा नाश करणारा; देशद्रोही; दगाबाज; दिवटा. 'हिच्या जागी मुलगा असता तर तुझ्यासारख्या घरबुडाऊ मुलात आमचं मन कशाला अडकलं असतं?' – कोसला २६५.

घरबुडी–बूड स्त्री. १. (एखाद्याच्या) संपत्तीचा, दौलतीचा नाश; सर्वस्वाचा नाश. २. एखादे घर, कुटुंब अजिबात नष्ट होणे; एखाद्या कुळाचे, वंशाचे निसंतान होणे.

घरबेग(ज)मी स्त्री. कुटुंबाच्या खर्चाकरिता धान्यादिकांचा केलेला साठा, पुरवठा, संग्रह; प्रपंचासाठी केलेली तरतूद.

घरबेत्या पु. घराची आखणी करणारा. (राजा.)

घरभर–री क्रिवि. घरात सर्व ठिकाणी, सर्वजागी; घरभर.

घरभरवण–णी, घरभरणी स्त्री. पहा : **घररिघणी.** पतीच्या घरी नव वधूचा प्रथम प्रवेश होताना करण्याचा विधी; गृहप्रवेशाचा समारंभ; वरात; घररिघवणी : 'वधूवरें मिरवून। घरभरणी करविली।' – र ४८. (गो. कु.)

घरभऱ्या वि. दुसऱ्याचे पैसे, मालमत्ता लुबाडून स्वत:चा फायदा करून घेणारा : 'तरी आपले लोक अजून समजतात की साधूंना किंवा त्यांच्या घरभऱ्या चेल्यांना पुष्कळ कळते.' – गांगा ९५.

घरभंग पु. १. घराचा नाश, विध्वंस : 'जिवलगांचा सोडिला संग। अवचिता जाला घरभंग।' – दास ३.२.६०. २. (ल.) कुळाचा, कुटुंबाचा नाश.

घरभाऊ पु. कुटुंबातील मनुष्य; नातलग; कुटुंबाच्या मालमत्तेचा, वतनवाडीचा वाटेकरी; हिस्सेदार; दायाद.

घरभाट पु. १. घराच्या आजूबाजूची आपल्या मालकीची जागा, जमीन; घरवाडी; विसवाट. (कु.) २. घराजवळचा नारळीचा बाग. (गो.)

घरभारी पु. १. पहा : **घरबारी**. २. ब्रह्मचारी, संन्यासी.

घरभांडवल न. १. कुटुंबातील मालमत्ता, जिंदगी, इस्टेट. २. एखाद्याचा खाजगी द्रव्यनिधी, ठेव; उसना काढलेला, कर्जाऊ काढलेला पैसा.

घरभांडवली वि. घरच्या, स्वत:च्या भांडवलावर व्यापार करणारा.

घरभेद पु. कुटुंबातील माणसांचे आपसांतील भांडण, तंटा; फाटाफूट; घरफूट.

घरभेदी–द्या वि. १. स्वार्थाने, दुष्टपणाने परक्याला, शत्रूला घरात घेणारा; फितूर; देशद्रोही. २. घरचा, राज्याचा, पक्का माहीतगार; घरची सर्व बिंगे ज्याला अवगत आहेत असा. ३. घरातील, राज्यातील कृत्ये, गुप्त बातम्या बाहेर फोडणारा; घर फोडणारा : 'घरभेद्या होऊनि जेव्हां।' – संग्रामगीते १४०. ४. घरात, कुटुंबात, राज्यात, तंटे किंवा कलह लावणारा.

घरभोंदू वि. १. लोकांची घरे (त्यांना फसवून) धुळीस मिळवणारा २. (सामा) ठक; बिलंदर; लफंगा (मनुष्य).

घरमहार पु. राबता महार.

घरमारू–ऱ्या वि. शेजाऱ्याला उपद्रव देणारा; त्याच्या नाशाविषयी खटपट करणारा.

घरमेढा–मेढ्या पु. घरातील कर्ता, मुख्य मनुष्य; कुटुंबाचा आधारस्तंभ.

घरमेळावा पु. घरातील माणसे, सेवक इ. : 'आणि तियेतेंचि आघवा। आथि घरमेळावा।'– ज्ञा १३.३७.

घरमेळी क्रिवि. आपसांत; घरी; खाजगी रीतीने; आप्तेष्ट मंडळींमध्ये (तंट्याचा निवाडा, तडजोड करणे).

घरमोड न. चांभाराने तयार करून दिलेले आभूषण.

घरमोड स्त्री. घर मोडून ते विकणे : 'कांहीं दिवसपर्यंत येथें घरमोडीचा व्यापार उत्तम समजला जात होता.' – लोटिकेले १.१६९. २. क्रि. घुरणे; मोडणे. – (तंजा.)

घरमोड्या पु. घरमोडीचा व्यापार करणारा : 'त्यास जेव्हा घरमोड्याने घर घेतल्यामुळे घर सोडावे लागले....' – मस्थि ३०१.

घररहाटी स्त्री. प्रापंचिक कामकाज : 'मग चालवी घररहाटी।' – नाम २८३.

घरराखण स्त्री. १. (प्रां.) घराची पाळत; रक्षण; पहारा. २. घर राखणारा; घरावर पहारा ठेवणारा.

घररिघणी, घररिघवणी स्त्री. १. नवीन बांधलेल्या घरात प्रवेश करतेवेळी करायचा धार्मिक विधी. २. घरचा कारभार; घरकाम : 'रचून विविध देहकुटी। तो घररिघवणी परिपाठी।' – विपू ७.१२८.

घररिघणे अक्रि. घरात येणे, प्रवेश करणे : 'घररिघे न बाहतां भजकाच्या।' – दावि १६१.

घररिघी स्त्री. परपुरुषाच्या घरात घुसणारी : 'घररिघी झालें पट्टराणी बळें।' – तुगा १.९.

घरलाठा–ठ्या वि. घरपांड्या; गृहपंडित; घरात प्रौढी मिरवणारा; रांड्याराघोजी : 'ऐसेआं घरलाठेआं बोलां। तो चैद्यु मानवला।' – शिव ८९९.

घरली वि. बायको; घरधनीण; स्त्री.

घरवट–ड स्त्री. १. एखाद्या कुटुंबाची सर्वसाधारण, सामायिक जिंदगी, मालमत्ता; कुटुंबाचे, संख्येचे सर्वसाधारण काम, प्रकरण (कु. गो.) पहा : **घरोटी.** २. कूळ; कुटुंब; परंपरा. (गो.) ३. आनुवंशिक गुण, रोग, भूतबाधा इ. आनुवंशिक प्रकार.

घरवण न. घरपट्टी; घरासंबंधी सरकारी देणे. (को.)

घरवणी न. घराच्या छपरावरून पडणारे पावसाचे पाणी.

घरव (वा)त, घरवरौते स्त्री. घरसंसारासंबंधीची कथा, गोष्ट. प्रपंचकथा; प्रपंचपसारा; घरकाम. 'घरवातें मोटकीं दोघें। जें गोसावी सेजे रिगे। दंपत्यपणें जागे। स्वामिणी जे।।' – अमृ १.१३. [सं. गृहवार्ता]

घरवरौते न. पहा : **घरैतेवरैते**

घरवसा पु. १. घराच्या छपराला, न झाडलेल्या भिंतीना लागलेली कोळिष्टके, जाळी, जळमटे; केरडोक. २. वाळवीचे वारूळ.

घरवसात–द स्त्री. १. वसती; राहणे; वास; मुक्काम. २. घराची जागा; घराची जागा आणि सभोवतालचे (मालकीचे) आवार, परसू, मोकळी जागा, अंगण.

घरवंद पु. घरटणा; पडक्या घराचा चौथरा; पडलेल्या घराची जागा. (राजा.)

घरवंद वि. घरंदाज; कुलीन; खानदानीचा : 'शहर पुणें हरहमेष भरलें वाडे बांधिती घरवंदानी।' – ऐपो ४२०.

घरवा पु. झाडाचे आळे. (झाडी)

घरवाघ्या पु. नवसाच्या फेडीसाठी काही वेळ वाघ्याचा वेष परिधान करून वारी (भिक्षा) मागणारा.

घरवाडी स्त्री. घर बांधलेले आवार; वाडी. कोणाच्या अनेक वाड्या असतात, त्यांपैकी जीत धन्याचे घर असते ती वाडी. (को.)

घरवात स्त्री. प्रपंच.

घरवाला पु. १. घराचा मालक. २. नवरा; घरधनी; पती.

घरवाली स्त्री. १. बायको; पत्नी; घरधनीण : 'माझ्या घरवालीने साखर पेरताच त्याने सर्व सांगितले.' – राणी चंद्रावती ५३. २. कुंटणखाना चालवणारी.

घरवासी वि. कुटुंबवत्सल; प्रपंचात वागणारा.

घरवाह पु. वहिवाट; कारभार : 'वेदमूर्ती देवस्वामी चिंचवड याचा इनाम जमिन घरवाहो करिताती त्याची सरदेसमुखी त्याची त्या खालें पडिली आहे.' – शिचसाखं ५.१८.

घरविवाद पु. वि. घराच्या मालकीचा वाद : 'ते दोघै म्हणे तुम्ही घरविवादें जावें।' – पंचो ८६.१२.

घरवी स्त्री. घरासाठी काढलेले, घरास लावलेले इमारती लाकूड, गवत, वासे इत्यादी सामान, साहित्य. (कु.)

घरवेडा वि. १. घरपिसा. २. बाहेर राहून अतिशय कंटाळल्यामुळे घरी जायला उत्सुक झालेला.

घरशोधणी स्त्री. १. स्वत:ची खाजगी कामे पाहणे. २. स्वत:च्या साधनसामर्थ्याचा विचार करणे; स्वत:ची कुवत अजमावणे.

घरसणे अक्रि. अंगावर धावून येणे : 'आली घरांतुनि तदा घरसून नारी।' – आकृ ५. [घसरणेचा वर्णविपर्यास]

घरसमजूत स्त्री. घरातल्याघरात, आपसात स्नेहभावाने, सलोख्याने केलेली तंट्याची तडजोड, समजावणी.

घरसंगणना स्त्री. (समाज.) लोकसंख्येची मोजणी करण्यासाठी घरोघरी जाऊन करावयाची गणना.

घरसंजोग पु. १. एखाद्या कामाला लागणारा घरचा सरंजाम. २. काटकसरीचा प्रपंच; घरव्यवस्था. ३. सुव्यवस्था; घरातील सुखसोयी, समृद्धता.

घरसंजोगणी स्त्री. काटकसर; मितव्यय.

घरसंसार पु. कुटुंबासंबंधीची कामे; प्रपंच.

घरसोकील वि. घरी राहून खायला सोकावलेला; घरी आयते खायला मिळत असल्याने घर सोडून बाहेर जात नाही असा; घराची चटक लागलेला (बैल, रेडा इ. पशू).

घरसॉ वि. घारा (डोळा). (गो.)

घरस्थिति–ती स्त्री. १. घराची स्थिती. २. गृहस्थाश्रमधर्म; संसार; प्रपंच : 'ऋषीस अर्पिली कन्या शांती। मग मांडिली घरस्थिती।' – कथा ३.३.६३. [सं. गृहस्थिति]

घरळणे अक्रि. १. सरपटत, गडगडत जाणे. २. घरंगळणे.

घरंगळणे अक्रि. १. गडगडत जाणे; उतरत्या जागेवरून घसरत, गडगडत खाली येणे; घरळणे; उतारावरून खाली घसरणे. २. मुद्दा सोडून भरकटणे : 'नाहीं तर विचारांस खालीं आधार न सांपडल्यामुळे विचार श्रोत्यांकडे घरंगळत जायचे.' – नि ११२. [ध्व.]

घरंडा पु. बैलाची एकसारखी पण जलद चाल.

घरंदाज वि. १. प्रतिष्ठा असलेला; कुटुंबवत्सल. २. एके ठिकाणी कायमची वस्ती, घरदार करून राहिलेला; कायमचा रहिवासी. ३. कुलीन; अभिजात; स्वसत्तेच्या घरात अब्रूने राहणारा; खानदानीचा; चांगल्या कुळातील.

घरंब पहा : **घरवसा**

घरा पु. १. (काटा, गळू इत्यादींमुळे अंगाला पडलेले) छिद्र; भोक; लहान घर. (काही जाऊन बसेल असे). २. (सामा.) छिद्र; भोक. पहा : **घर** : 'धरिल कसा सद्रस तो, ज्या कलशाच्या घरा बुडाला च।' – मोअनु ८.३९. ३. जखम; व्रण; क्षत. **० पाडणे, पडणे –** टोचून बोलणे; एखाद्याचे वर्म काढणे.

घराऊ वि. १. घरगुती; घरासंबंधी; कुटुंबासंबंधी. २. घरचे घरीच बोलायची खाजगी (गोष्ट). ३. घरी तयार केलेला (पदार्थ, जिन्नस); घरी वाढलेला, बाळगलेला (पशू); घरी लावून वाढविलेले (झाड इ.). ४. घरचा; स्वपक्षीय.

घराक वि. गिऱ्हाईक, ग्राहक.

घराचार पु. १. संसार; प्रपंच; गृहस्थाश्रमधर्म : 'परी अभ्यंतरीं घराचार मांडे।' – विपू ७.१३८. २. (ल.) पसारा; व्याप : 'तेथ वासनेचा घराचार। न मांडे पैं।' – सिसं ४.२०७. ३. घरातील मंडळींची राहाटी, रीतभात, आचरण, वागणूक, व्यवहार : 'वंध्यापुत्राचा घराचार। तैसा जीवासि संसार।' – एभा २६.३०.

घराचारी वि. १. घरंदाज. २. नवरा; पती; घरकरी; दादला : 'ऐशिया स्त्रियांचे घराचारी। खराच्या घरी नांदती।' – एभा १३.२१४.

घराडा पु. पहा : **घरडा.** भरडण्याचा आवाज. [ध्व.]

घराण घरटी; फेरा. – (तंजा.)

घराणा–णे पु. न. १. कूळ; वंश; कुळी; गोत्र : 'म्हणती पाखिज आमुचा घराणा। गुरुउपदेश नाहीं लाहणा।' – दावि १५०. २. वंशातील माणसे; घराण्यातील मंडळी. ३. ठिकाण; स्थान : 'इये पुनरावृत्तीची घराणीं। आघवीं एकवटती जयाचिया प्रयाणीं।' – ज्ञा ८.२३४. ४. परंपरा; संप्रदाय. [हिं. घराना]

घराणी स्त्री. घरधनीण; गृहपत्नी; यजमानीण; गृहिणी. (गो.) पहा : **घरकान्न, घरण** [सं. गृहिणी]

घराश्रम पु. गृहस्थाश्रम : 'असे घराश्रमीं, भजे सर्वभूतीं।' – नाम ७६०.

घरीभरी वि. विपुल.

घरू न. १. कीड लागलेल्या लाकडाचे पीठ, भुसा. २. जळमटे; कोळिष्टके घरंव. (को.) पहा : **घरवसा**

घरू वि. घरचे; खाजगी; घरगुती : 'चोरीच्या गुन्ह्याबद्दलचा विचार करतां रुपये २८।। सरकारी नसून केशव नाथू याचे घरूं होते.' – विक्षिप्त ३.८२.

घरैतेवरैते, घरौतेवरौते पु. अव. १. नवराबायको, स्त्रीपुरुष दांपत्य; जोडपे; दंपती. २. घरदार; गणगोत. पहा : **घरवरौत** : 'केवळ घरैतें वरैतें वर्तति तेथ नसावें।' – चक्रसूत्र २९.

घरोट पु. दळण्याचे लाकडी जाते : 'कसा घरोट घरोट चाले माझा घरघर।' – लोसामा ५.२२९.

घरोटा पु. घरटे : 'जशी रानपक्षीण बांधी घरोटा।' – अर्वाचीन ४९९.

घरोटी स्त्री. कुटुंबाची सामायिक मालमत्ता; वडिलोपार्जित मिळकत, इस्टेट. (को.) पहा : **घरवट**

घरोपाध्या पु. कुलोपाध्याय; कुलाचा पुरोहित, भटजी.

घरोबा पु. १. वस्तुतः एका घरचे नसता मित्रपणामुळे घरच्यासारखा झालेला स्नेहभाव; घरच्या माणसासारखा जिव्हाळ्याचा स्नेहसंबंध; ऐक्यभाव; बंधुभाव; एकमेकांकडे जाणे–येणे; घसट शेजारप्रेम : 'तारुण्य रासभस्त्रियेपासीं। तिचा घरोबा वाहे शिशीं।' – भारा, बाल ९.६२. २. (बायकी) घरकाम; गृहकृत्य; घरातील कारभार : 'त्वां आपला चालवितां घरोबा। धरूं नये किंचितमात्र लोभा।' – सारुह ७.१२०. ३. प्रपंच; संसार; गृहस्थाश्रम : 'घरोबा मांडिला दंडकाधारे; वाढली बाइको उपजलीं पोरें।' – दावि ४०. ४. (ल.) लग्न; विवाह; घरठाव (क्रि. मांडणे, करणे.) : 'बायकोने दुसरा घरोबा सोनाराशीं केला.' – थोमारो २.१५३. ५. ऋणानुबंध. – (तंजा.)

घरोर पु. घरजावई : 'घरजावयास घरोर किंवा खंदाड म्हणतात व घरातील माणसे त्यास त्याच नावाने संबोधतात.' – राके ५६१.

घरोरा खंदाड्या लग्नामध्ये हुंडा न देता त्या बदल्यात मुलीच्या बापाकडे तीन ते पाच वर्षे काम करून राहणारा मुलगा.

घरोसा, घेरोसा, घरवसा पु. १. जळमट. (को.बे.तंजा.) २. पावसाच्या ओलीमुळे भिंतीवर आलेला क्षार; लोणा.

घरौते पु. अव. गृहस्थाश्रमी मनुष्य; पुरुष; गृहस्थ.

घर्कुले लहान मुले भातुकली खेळताना आपल्या घरासाठी जे घालतात ते भिंताड, भिंत. – (तंजा.)

घर्ढिणे क्रि. १. ठेचणे २. दाढा खाणे.

घर्नळा गळा, घसा. – (तंजा.)

घर्म पु. घाम; स्वेद; श्रमामुळे त्वचेला येणारा ओलावा. पहा : **घाम** [सं.]

घर्मबिंदु–दू पु. घामाचा थेंब. [सं.]

घर्मरंध्र न. घाम ज्यातून बाहेर पडतो असे त्वचेवरील सूक्ष्म छिद्र. [सं.]

घर्मस्राव पु. घाम येणे. [सं.]

घर्व(र्वा)स पु. घर; घरातील राहणी. (गो.) पहा : **घरवसात**

घर्षक वि. घासणारा.
न. घासण्याचे, पुसण्याचे साधन. [सं.]

घर्षक पु. (भाषा.) उच्चाराच्या वेळी तोंडाच्या अरुंद फटीतून विशिष्ट आवाज निर्माण करत निघणारा ध्वनी. उदा. मराठीतील 'श' व 'स' हे घर्षक आहेत.

घर्षण न. १. घासण्याची क्रिया; पदार्थाचे एकमेकावर घासले जाणे. २. (शाप.) एका पदार्थाच्या सपाट पृष्ठभागावरून दुसऱ्या पदार्थास ओढू लागलो, तर संलग्न पृष्ठभागांच्या खरबरीतपणामुळे होणाऱ्या प्रतिबंधाला घर्षण म्हणतात. [सं.]

घर्षण न. १. (ल.) (एखाद्या गोष्टीचा, विद्येचा) अतिशय व्यासंग, अभ्यास, परिश्रम. २. एखाद्या गोष्टीची वादविवादाने केलेली वाटाघाट, चर्चा, छेडून केलेली पृच्छा, चिकित्सा. ३. भांडण; कलागत; तंटा; कटकट; बखेडा. ४. घसट. [सं.]

घर्षण कोन (भौ.) सपाट पृष्ठावर ठेवलेल्या वस्तू गतिमान होण्याच्या अगदी बेतात असताना पृष्ठलंबाशी पृष्ठाची एकूण प्रतिक्रिया जो कोन करते तो.

घर्षणजन्य वि. (शाप.) घासण्याने उत्पन्न होणारा.

घर्षणप्रेरणा स्त्री. (भौ.) परस्परांना स्पर्श करणाऱ्या दोन पृष्ठभागांमध्ये परस्परसापेक्ष गतीला विरोध करणारी प्रेरणा (बल).

घर्षणविद्युत स्त्री. (भौ.) दोन पदार्थ एकमेकांवर घासल्याने निर्माण होणारी स्थिरविद्युत. उदा. कृत्रिम धाग्यांचे कापड घासल्याने निर्माण होणारी वीज.

घर्षणविरोध पु. एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाला घासत गेल्यामुळे होणारा अडथळा.

घर्षणे उक्रि. घासणे. [सं. घर्षण]

घर्षित वि. घासलेले.

घल पु. (पातळ पदार्थाचा) थोडासा दाटपणा, चिकटपणा. (को.)

घलणे उक्रि. १. उडी मारणे : 'तरि न घलुनि महापुरीं। न घेपे बुडणयाची सियारी।' – ज्ञा १६.६९. २. घालणे; मारणे (शस्त्र इ.) : 'न घला न घला सस्त्र। राषा आमचे प्राण।' – उषा १७६९.

घल्डी स्त्री. कळशी; लहान घागर; घडली (वर्णव्यत्यास). (खा.)

घल्ला वि. घडविलेला; तयार. (झाडी)

घव पु. गहू : 'मोकेड पेटामंदी आडत्या बसला जोत्याला। नाव घवाच्या पोत्याला।' – राके ३००.

घवकर क्रिवि. एकदम; एकाएकी : 'अकस्मात अवचितां। घवकरि सस्वरूप देखतां।' – एभा १३.६७१. [ध्व.]

घवघव–वा क्रिवि. १. घोंगावत. २. बेसुमारपणे; अतिशय दाटीने; गजबजून; दाट. ३. घमघम. [ध्व.]

घवघवणे अक्रि. १. सर्वत्र सुगंध दरवळणे; सुवासाचा घमघमाट होणे. २. शोभणे; झळकणे; शोभून दिसणे : 'हरितनूच्या आश्रयें पूर्ण। अलंकार घवघविती।' – ह १८.६४. [सं. गह् = निबिड असणे.]

घवघवणे अक्रि. १. घूं, घूं असा आवाज करणे. २. रुमझुमणे; छुनछुनणे.

घवघवी वि. ठळक; स्पष्ट : 'रामप्रताप आत्यादरें। मात्रुका अर्थ घवघवी।' – वेसीस्व ६.१२. पहा : **घवघवीत**

क्रिवि. थाटाने; थाटामाटाने : 'मुषकारूढ गणेश गोसावी। रायें पूजिला घवघवी।' – वेसीस्व ६.४२.

घवघवीत वि. १. पाहताच डोळ्यांना आनंद देणारा; डोळ्यांत भरणारा; भरदार; भव्य. २. गोंडस; गुबगुबीत; धष्टपुष्ट; मोठा आणि देखणा (पुरुष, स्त्री) : 'घवघवीत डोळां पहाताती।' – रामदासी २.१२२. ३. ठळक; ठसठशीत; भरदार; डोळ्यांत भरणारा (दागिना, डोळा). ४. खूप दागिने घालून शोभणारी (स्त्री, मुलगी); तेजस्वी; भव्य; शोभणारा; भरदार (चेहरा, मुख) : 'रत्नभूषणीं घवघवीत।' – मुआदि ५.६. ५. स्पष्ट; मोठा; चांगला ऐकू येणारा : 'घंटाघोष घवघवीत।' – मुवन १३.१०६. ६. चमचमीत; उंची खाद्य पदार्थांनी भरलेले (जेवणाचे ताट, पान) : 'वाढिलेंच असें घवघवीत।' – रामदासी २.८१. ७. दरवळणाऱ्या सुगंधाने युक्त; सुवासाच्या घमघमाटाने युक्त.

घवस वि. घवघवीत; ठळक; ठसठशीत : 'लेकाच्या परीस सून करावी घवस।' – राके २५.

घवसुचे अक्रि. (गवसणे) मर्म समजणे; खुबी लक्षात येणे. (गो.)

घवा पु. खोल खळगा; तळखडकाला मिळणारा खड्डा. (मावळी) [सं. गव्हर]

घवाळा पु. चांगला नाग, साप. – तंजा.

घव्य, घव्यवाणी वि. तेजस्वी : 'नाना उदास घव्य मूर्ति।' – सप्र ७.३३. 'तंव समर्थमूर्ति घव्यवाणी देखिली।' – सप्र २.२२. [सं. गह्]

घशा पु. चुन्यासारखी पांढरी असलेली एक प्रकारची माती. (को.)

घशिटा–टे, घशीट, घशेट–टा स्त्री. न. (खोगिराला) तंग घासटू नये म्हणून खोगिराच्या प्रत्येक भागाला लावलेले चामड्याचे अस्तर.

घष्टणी–नी स्त्री. १. घासाघाशी : 'घष्टणी घिसणी घस्मरपणे। घसर घसरूं घसारवाणें।' – दास १४.४.४. २. भांडी घासण्याची नोकरी; काबाडकष्टाची नोकरी; दास्य. (गो.) [सं. घृष्]

घष्ट(स्ट)णे सक्रि. १. घासणे : 'जो सांपडला काळचपेटीं। पडपडों। पुनरपि होईल कष्टी। थाक न लागे घष्टिला च घष्टी।' –दावि २२८. २. कष्टाने काढणे, व्यतीत करणे, कंठणे (वेळ, काळ) : 'मनीं राम वेष्टी बळें काळ घष्टी।' – दावि २१६. [सं. घृष्ट]

घष्टा पु. १. पदार्थ घासताना त्याला दिलेला जोराचा घसडा; पदार्थ घासण्याकरिता त्यावरून हात फिरविण्याची क्रिया. (क्रि. मारणे.) २. एखाद्याच्या शेजारून जाताना जोराने लागलेला धक्का, घसरा.[सं. घृष्ट]

घष्टे न. तूप; कढविलेले लोणी. (ग्राम्य)

घस स्त्री. झुपका; गुच्छ; घड. पहा : **घोस**

घस स्त्री. १. व्यापाराला आलेली तूट; तोटा; नुकसान; बूड; खोट. (क्रि. सोसणे, बसणे, लागणे, येणे). २. (गळल्या, झिरपण्याने, सुकल्याने, घासले गेल्याने) पदार्थाच्या मूळच्या मापात, वजनात येणारी तूट, न्यूनता, झीज, घट. ३. सोने पारखताना कसावर उमटलेली सोन्याची रेघ; सोन्याचा कस. [सं. घृष्]

घस स्त्री. १. भांडे, कढई, किटली, मडके इ. सतत चुलीवर ठेवल्याने त्याच्या बुडाला जमणारा मशेरीचा थर; खरप; खरपी; मस; जळ. (कु.) २. लोणी कढविल्यानंतर भांड्याच्या तळाला बसणारी बेरी.

घस स्त्री. मुसंडी; जोराने घुसणे : 'मिठ्ठूनं वर्तुळात घस मारली.' – बाविबु २१०.

घस वि. एकदम उतरते; उभ्या उतरणीचे (छप्पर इ.). (राजा.)

घसळ वि. चिवट; चिकट. (व.)

घसकन–कर–दिशी क्रिवि. १. धान्य इ. एकदम पुष्कळ ओतताना होणाऱ्या घस् घस् अशा आवाजाने. २. (ल.) एकदम; एखाद्या कामाचा तडकाफडकी झटपट निकाल दाखवणारा शब्द.

घसकरणे क्रि. पायात बळ नसल्यामुळे भिंत बसणे. – (तंजा.)

घसका पु. १. रट्टा; धपाटा; बोथट अथवा धारेच्या शस्त्राने दिलेला तडाखा. २. घसरा; ओरखडा. पहा : **घष्टा २**. ३. घसडा; हिसका; हिसडा; गचका; हबका. (वा.) ० **मारणे –** लुबाडणे; न कळेल अशा प्रकारे मोठा डल्ला मारणे.

घसकाविणे क्रि. चुकीच्या मार्गाला नेणे.

घसकाविणे, घसकावून, घसकून पहा : **कचकाविणे.**

घसक्या वि. १. ज्याच्या कामात नाजुकपणा नाही असा; धसमुसळ्या; आडदांड; रानवट; अडाणी; दांडगा (मजूर, कामकरी इत्यादी). २. (ल.) बदफैली; अत्यंत कामुक; विषयलंपट; बाहेरख्याली.

घसघशा वि. १. नेहमी कटकट, कुरकुर, धुसफूस, हमरीतुमरी करणारा; घसघस करण्याची सवय ज्याला आहे असा. २. घासाघीस करणारा; करार, खरेदी विक्रीचा व्यवहार करताना घिसघीस करणारा.

घसघशीत वि. पहा : **घवघवीत** २, ३, ६.
क्रिवि. १. अघळपघळ; ऐसपैसपणाने; पुरेपूर; भरपूरपणे. २. पहा : **खसखशीत** १–३. ३. विपुलपणे; रेट; रेलचेलीने (वस्तू, क्रिया इ.).

घसघशीत वि. साधारण कढत; गरम असलेले (अंग, शरीर). (कु.)

घसघस स्त्री. १. घासाघीस; जिकीर; चिणचिण; खाराखीर; (पदार्थ विकत घेताना होणारी) कोरडी तक्रार; निरर्थक ओढाताण. २. (एखाद्याला) सदोदित दोष लावणे आणि रागे भरणे, निंदा करणे. ३. कुरकुर; फुसफुस; कुरबूर; खाजगी, कुटुंबातील कटकट, चडफड, चिणचिण : 'घसघस करितां विटे। सगट लोकु।' – दास १९.७.२१. ४. कडाक्याचा, धडाक्याचा वादविवाद, चर्चा; तंडणे; रिकामा वाद. (क्रि. करणे, लावणे, घालणे, मांडणे.) [सं. घर्ष्]

घसट, घसटणी, घसणी स्त्री. घरोबा; संघटण; मैत्री; सलोखा; सलगी; विशेष परिचय; घसरट : 'कोणाशीहि झाली तरी घसट ठेवावी, पण अतिप्रसंग करू नये.' – विकारविलसित १९. (क्रि. करणे.)

घसटणे उक्रि. १. चालताना (एखाद्या पदार्थाशी, भिंतीशी) घासून जाणे, घसवटणे, घसटून किंवा चाटून जाणे; ओरखडणे; घासणे. २. एकमेकांना कळण्याजोगा स्पर्श करून, खेटून जाणे. ३. घासणे; चोळणे; चोळवटणे; रगडणे. ४. निष्काळजीपणाने, बेदरकारपणे, लाटालाटीने एखादी गोष्ट, काम रेटून नेणे, दडपणे; फारशी काळजी न घेता (काम) करून टाकणे. ५. फरकटणे. [सं. घृष् = संघर्ष. घृष्ट > घसट किंवा घस्ट]

घसटी स्त्री. एखादा पदार्थ दुसऱ्याशी घासून गेल्याची खूण; घष्टा; घसरा; ओरखडा. प्राय: या शब्दाचा अनेकवचनी प्रयोग करतात.

घसट्या वि. १. अडाणी; आडमुठा; दांडगा; लाट्या; धसमुसळ्या (मजूर, कामकरी.) पहा : **घसक्या १**. २. सुस्त; मंद; गाफील; टोणपा; झांबऱ्या.

घसडा पु. जोराने दिलेला हिसका; हिसडा : 'गुण्यांना घसडे मारीत होत्या.' – बाविबु ५९.

घसण स्त्री. १. अति परिचय. पहा : **घसट**. २. संगत; संघटण : 'आणि फळाचिया हांवां। हृदयीं कामा जाला रिगावा। कीं तयाचिये घसणी दिवा। ज्ञानाचा गेला॥' – ज्ञा ७.१३९. ३. संसर्ग; स्पर्श : 'गगन असोनियां जनीं। मैळेना जनघसणीं।' – एभा ७.४४४. [सं. घर्षण]

घसण स्त्री. व्यापारातील, धंद्यातील तूट, तोटा, नुकसान, घट, घस. (को.)

घसण स्त्री. सवय; सराव. (क्रि. पडणे, पाडणे.)

घसण–णी स्त्री. १. बैलांची गाडी उतरणीला लागल्यावर गती कमी करण्याकरिता चाकाला लावायचा लाकडाचा दांडा; खरडी; २. घर्षण.

घसणी स्त्री. खर्च; व्यय; नाश; ऱ्हास : 'पतीची शक्ति अल्पवयात अविचारानें घसणीस पडल्यामुळें पुढें उपयोगास पडेल इतकी राहात नाही.' – विवाहविज्ञान ७.

घसणे अक्रि. घसरून खाली येणे; निखळणे : 'अशोकवनिं कांतीं निवसे। तारा क्षितिवरि काय घसे।' – निमा १.४.

घसन न. निकराचे युद्ध. [सं. घर्षण]

घसप(म)ट स्त्री. दृढपरिचय; घसट; घसरट.

घसपटणे सक्रि. घासणे : 'या निसण्यावर कुऱ्हाड घसपटायचा' –पंवा ९५.

घसपटत क्रिवि. कष्टाने सरपटत.

घसपस स्त्री. घिसाडघाई; चिकित्सा.

घसमर वि. बळकट; मजबूत. [सं. घस्मर]

घसमरपण न. खाकरून खाकरून घसा खरवडण्याची क्रिया. पहा : **घस्मर**

घसमरपण न. १. खादाडपणा. २. दुसऱ्याला गिळंकृत करण्याचा गुण.

घसमस स्त्री. धुसफूस; कटकट; तंटाबखेडा; बाचाबाच; चिडाचीड; खटका; कचकच; कलागत; धसफस. (को.)

घसर पु. जोराची लढाई : 'तैसीं घसरें मिसळेलीं। दोनी दळें।' – शिव १०४२.

घसर स्त्री. (दर, भाव, किंमत) उतरणे; कमी होणे; (बाजारात एखाद्या मालाला) मंदी येणे. [सं. घृष् + सृ]

घसरगाडी स्त्री. चाक नसलेली गाडी.

घसरगुंडी स्त्री. १. (खेळ) घसरून खाली येण्यासाठी उतरत्या फळीचे केलेले साधन. २. (ल.) अधोगती; अवनती; अपकर्ष; ऱ्हास; उतरती कळा; उच्चपदावरून खाली येणे; घसरणे : 'जुन्या शिक्षकांची अशीच घसरगुंडी झालेली आहे.' – ब्राबि १०५.

घसरट स्त्री. दाट परिचय, मैत्री. पहा : **घसट**

घसरट वि. निसरती; निसरडे असणारी; बुळबुळीत (जागा); घसरता; निसरडा; सुळसुळीत.

घसर(रं)ड–ण स्त्री. १. निसरडे असलेली, बुळबुळीत, घसरती जागा.

घसरडी वि. निसरडी; बुळबुळीत; घसरट; घसरून पडण्याजोगी.

घसरडे न. १. निसरडे; घसरड; घसरण. २. घसरडपणा; बुळबुळीतपणा.

घसरणी स्त्री. १. घसरण्याची क्रिया. २. निसरडी जागा; घसरडे.

घसरणे अक्रि. १. निसरणे; निसटणे; घरळणे; सुळकणे; उतरणीवरून, घसरड्यावरून घरंगळत जाणे. २. (ल.) एखाद्याच्या अंगावर जोराने, त्वेषाने तुटून पडणे, चाल करून जाणे, चढाई करणे; एखाद्याला रागे भरायला, निंदायला आवेशाने पुढे सरसावणे; एखाद्यावर जोराचा शाब्दिक हल्ला चढविणे; एखाद्याच्या तोंडाला लागणे : 'जोत्याजी त्याच्यावर घसरून पडला.' – स्वप ३१. ३. एखाद्या कामाला आवेशाने, जोराने लागणे, जुंपून घेणे. ४. चुकणे; चळणे; एकदम खालच्या दर्जावर येणे; न शोभण्यासारखे वागणे. ५. अधिकार, हुद्दा, आश्रय इ.पासून च्युत होणे; (नोकरीतून) कमी होणे; बडतर्फ होणे.

६. (शरीर.) क्षीण होणे; झडणे; (शरीरप्रकृती) ढासळणे. ७. मूळ स्वरूप नष्ट होणे, ऱ्हास पावणे; उच्चपदावरून ढळणे; उतरती कळा लागणे; (किंमती) खाली येणे : 'चांदीचा भाव घसरला आहे.' – के १०.६.३०; (व्यवहारात, व्यापारात खोट बसल्याने) खाली येणे; डबघाईला येणे. ८. (धैर्य, आत्मविश्वास) गलित होणे, गारठणे, पार निघून जाणे, नष्ट होणे, ढळणे, डगमगणे, डळमळणे. ९. (मनुष्य) खचणे; डगमगणे; कचरणे; हटणे. १०. पळून जाणे; पोबारा करणे; हातावर तुरी देणे. (व.) [ध्व.]

घसरती स्त्री. झपाट्याचा उतार : 'घसरतीवरच्या तिथल्या गवतांनी पाय ओढून तुम्हाला कधी तोंडघशी पाडले आहे का?' – वामा १.

घसरपट्टी स्त्री. खरडपट्टी; बेमुर्वतपणे केलेली निर्भर्त्सना; खरड; बोडंती. (क्रि. काढणे, निघणे.)

घसरपट्टी स्त्री. जड्याचे, जडावाचे काम करायचे एक हत्यार.

घसरपट्टी स्त्री. बर्फावरून घसरण्याचा खेळ खेळताना पायाच्या तळव्याखाली बांधायची लाकडी पट्टी : 'एका माणसाने बर्फावरच्या घसरपट्ट्या पायांना बांधून....' – कोउ ३१.

घसरवट वि. निसरडी; घसरडी (जागाक).

घसरविणे क्रि. अध:पात करणे.

घसरंडा पु. घसरड; घसरण; निसरडी जागा. (ना. व.)

घसरा पु. १. घसडा; ओरखडा;(एखाद्या पदार्थाला) जोराने घासून, चाटून जाणे; चाटून गेल्याने पडणारी खूण; हिसडा. (क्रि. बसणे, देणे, मारणे.) २. सपाटा; वेग; जोर : 'तैसीं घसरें मिसळैलीं। दोनीं दळें।' – शिव १०४२. ३. शेजारून झपाट्याने जाताना दिलेला रेटा; धक्का. ४. रट्टा; तडाखा. ५. (ल.) राग; कोप : 'महादेवाला लवुन तुम्ही जा रे पदर पसरा। कठीण जाचिल त्याचा घसरा।' – प्रला १३५. ६. धमकावणीचा, खडसण्याचा, खणकावण्याचा, दटावणीचा आविर्भाव, भाषण; गुरकावणी; दटावणी. (क्रि. देणे, करणे, घालणे.) ७. तुटून पडणे; हल्ला करणे : 'रा. रा. गुरुजींनीं जागे केल्यावर त्याजवर विनाकारण घसरा करून....' – लोटिकेले २.८१. ८. व्यापारात, धंद्यात आलेली बूड, नुकसान, घस, तूट, तोटा. (क्रि. बसणे.) ९. दुर्दैवाचा घाला, तडाखा; (संकटाचा) धक्का : 'जय अपजय परस्वाधीन बसला घसरा।' – ऐपो २३५. १०. राब; दटावा; दबावा – तंजा.(वा.) **० देणे** – वाटणे, घासणे, बारीक करणे : 'अशा दोन तीन मिर्च्या लेवुनी। घसरा दिला त्या पाट्यावरी।' – घाश्रलो ८४.

घसरा पु. दिवस.

घसराघसर–री स्त्री. हिसकाहिसकी; धक्काबुक्की; ओढाओढी; झुंज; झोंबाझोंबी. [घसरणे चे द्वि.]

घसवट–टा, घसाटा स्त्री. पु. १. (एखाद्या कामाचा, कलेचा) राबता; सराव. २. परिचय; घसरट; दाट ओळख. ३. वहिवाट. (वा.) **घसटीस पडणे, घसटीखाली पडणे** – १. एखाद्या कामाचा, कलेचा राबता, सराव होणे. २. दाट परिचय होणे; घसट, घसरट होणे.

घसवटणे उक्रि. १. घासले जाणे; झांजरणे; खरचटून जाणे; घासटणे, चाटले जाणे; घासल्याने झिजून जाणे : 'अहो आत्मेपणीं न संटों। स्वसंवितीं न घसवटों।' – अमृ ८.४. २. घासणे; घासटणे : 'वायोचा कातरा घसवटे। तेणें उष्णें वन्हि पेटे।' – दास १३.३.८. ३. सराव होणे; अंगी मुरणे, जडणे. ४. (मनुष्य, पशू, वस्तू) चांगली राबती असणे; सारखी उपयोगात आणली जाणे; अभ्यस्त होणे.[सं. घृष्+वट]

घसवटी स्त्री. १. पहा : **घसवट.** २. घसरा; खरचटून पडलेला ओरखडा; घष्टा : 'पाषाणघाव घसवटी। अदृश्यपणें मिरवले।' – नव २४.१३०.

घसा पु. राब वाहून नेण्याची बिनचाकी गाडी. पहा : **घसे**

घसा पु. १. गळ्याच्या आतील भाग; नरडे; अन्ननलिका. २. श्वासनलिका. २. आवाज; कंठध्वनी. [सं. घस्] (वा.) **० कोरडा पडणे, करणे** – अतिशय तहानेने घसा सुकणे, घशाला शोष पडणे. फार वेळ बोलत राहणे; घसा कोरडा होईपर्यंत एखाद्याला उपदेश, एखाद्याशी डोकेफोड करणे. **० खाणे** – घशाशी घुरघुरणे; घशात घरघर आवाज होणे; घसा वाजणे : 'घसर घसरूं घसा खाणें। घुमघुमोंचि घुमणें। योग्य नव्हें।।' – दास १४.४.४. **० निवणे** – शिरच्छेद करणे. **० पसरणे** – (एखादी वस्तू खाण्याकरिता, गिळण्याकरिता) आ करणे; तोंड उघडणे; आशाळभूतपणाने पाहणे. **० फुटणे** – (मुलगा) वयात आल्यामुळे त्याचा आवाज, स्वर बदलणे; आवाजाची कोमलता नष्ट होऊन तो मर्दानी बनणे; घाटी फुटणे. पहा : **घाटी. ० बसणे** – (ओरडण्याने, तेलकट इ. पदार्थ खाल्ल्याने) आवाज घोगरा होणे; शब्दाचे उच्चार अस्पष्ट होणे. **० वाजणे** – घोरणे; (घसा) घरघर वाजणे. **० येणे** – घशाला सूज येऊन तो दुखणे. **घशाखाली उतरणे** – १. गिळला जाणे; गिळंकृत होणे. २. (ल.) लाच खाल्लेला, लबाडीने लाटलेला पैसा पचवला जाणे. ३. कबजात जाणे : 'पण एतद्देशीय संस्थाने मात्र सरकारच्या घशाखालीं उतरविलीं.' – नि. **घशात घालणे, टाकणे** – बळकावणे; गिळंकृत करणे; (एखाद्या मालमत्तेवर) बळेच हक्क सांगून (ती) बळकावणे : 'दुसऱ्याचे देश घशात घालण्याची असुरी लालसा टिकणार नाहीं.' – के १४.६.३०. : 'सरकारचा विचार इंदूरची इस्टेट घशात टाकण्याचा होता.' – विक्षिप्त ३.१६४. **घशात पीक धरणे, अडकणे** – पाऊस न पडल्यामुळे पिकांची, कणसांची वाढ खुंटणे. **घशातून काढणे** – खाल्लेला, गिळंकृत केलेला पैसा, चोरलेला माल इ. परत द्यायला भाग पाडणे. **घशाबाहेर पडणे** – १. गिळंकृत केलेली वस्तू, पैसा बाहेर ओकून पडणे. २. पीक पोटरीवर येणे; पीक निसवणे, पिकाचे कणीस, लोंगर बाहेर पडणे.

घसाघस–सा, घसासा क्रिवि. १. गवत कापताना, पदार्थ चावताना, चर्वण करताना होणाऱ्या घस् घस् अशा आवाजाप्रमाणे; खसाखस. २. उधळपट्टीने; मनसोक्तपणे; मनाला येईल तसे; बेसुमार (पैसा खर्च करणे, खाणे इ.). [ध्व.]

घसाघसी स्त्री. तक्रार; भांडण; घासाघीस. (व.)

घसाघीस पहा : **घासाघीस** : 'ड्रायव्हरशी घसाघीस करीत वसंत म्हणाला....'– अगतिका ४८.

घसाटा पहा : **घसवट**

घसाटी वि. न कळणारे अक्षर. (झाडी)

घसाड वि. (अशिष्ट भाषेत) विपुल; पुष्कळ; रगड.

घसाडणे उक्रि. १. चोळणे; घासणे; उजळा देणे. २. (धान्य इ.) भरडणे.

घसाडा पु. जोराचा धक्का. (व.)

घसाफोड स्त्री. मोठ्याने ओरडून बोलणे.

घसारणे अक्रि. अतिशय दिपविणे. [सं. घंष्]

घसारत स्त्री. झपाट्याचा उतार : 'ती घसारत संपल्याच्या जागंला पूल' – रैत १२.

घसारा पु. घोळका : 'खंडोजी दाभाडे उभयता महाराजास घेऊन, गवतास पोरगे जात होते, त्यांचा वेष देऊन, घसाऱ्याबरोबर बाहिर निघोन गेले.' – दासब २.

घसारा पु. अनेक औषधे उगाळून एकत्र केलेले सरबरीत मिश्रण.

घसारा पु. (आसन्नमरण मनुष्याला लागलेली) घरघर; घरडा.

घसारा पु. जोराने घासणे; (एखादा पदार्थ दुसऱ्या पदार्थाला लागून गेल्याने पडणारा) ओरखडा; रेघोट्या; घस; घसरा : 'चामड्यास घसारा लागू नये म्हणून त्यावर लांकडी चिपा बसवाव्या.'–स्वारीनियम (बडोदे) ५५.

घसारा पु. झीज; इमारत, यंत्रे, सामान वगैरे वापरल्यामुळे त्यांच्या किंमतीत पडणारी तूट, न्यून, उणेपणा; नैसर्गिक व व्यावहारिक कारणांमुळे एखाद्या इमारतीचे, वस्तूचे होणारे अवमूल्यन; [अर. खसार]

घसारा निधी घसाऱ्यामुळे वापरण्यास अयोग्य झालेली मालमत्ता बदलून तिच्या जागी नवीन खरेदी करण्यासाठी राखून ठेवलेला निधी.

घसास–सा पहा : **घसाघस** : 'वीर तोडिती घसास। सिर फोडिती ठसास। शुळ टोचिती भसास। आपशुद्धी नेणती।' – दावि ४९६.

घसासित वि. घसघसणारे; तीक्ष्ण; खडबडीत : 'तें तिखेयाचें करवत। ऐसें सबाह्य घसासित।' – राज्ञा १६.२४२.

घसिट पु. स्त्री. (संगीत) इच्छित उंच स्वरापासून ध्वनीमध्ये खंड पडू न देता इच्छित नीच (खालच्या) स्वराकडे जाणे.

न. सतारीच्या तारेवर बोट ठेवून नाद उत्पन्न करण्याची क्रिया.

घसिटा पु. १. जोराने घासण्याची, चोळण्याची, पुसण्याची क्रिया; घष्टा; घसडा (क्रि. मारणे). २. (क्व.) घसरा या शब्दाचे जे इतर अर्थ आहेत त्या अर्थीही उपयोग होतो.

घसिब, घासिब वि. बळकविणारा.

घसी स्त्री. चिखल : 'जोगिया तो मसीघसी लीतला होआवा की:' – लीचउ ३७५.

घसीट स्त्री. (संगीत) वाद्यातून स्वर काढण्याचा एक प्रकार. नखीच्या एका ठोक्यातच झटकन पडद्यावर बोट सरकवून स्वर निर्माण करणे.

घसीट, घसिटा, घसेटा, घसेटे पहा : **घशिट**

घसे न. भातखाचरात उपयोगी पडणारी एकचाकी हातगाडी; आवणाचे मूठ नेण्यासाठी केलेले गाडीसारखे लाकडी वाहन. पहा : **घसा** (को.)

घसेल वि. १. कंजूष; कृपण. २. घासाघीस करणारा. (व.)

घसोटा पु. घसट; दाट ओळख : 'जास्त घसोटा नसतानाही खोलीत येताच दिसलेल्या अस्मतला (ती) म्हणाली....' – अगतिक १५८.

घस्टणी पहा : **घष्टणी** (गो.)

घस्टणे अक्रि. १. घट्टे पडणे. पहा : **घासणे, घष्टणे**. २. (ल.) किटणे (कान) : 'वक्त्याच्या मुखा पाठ पडिलें। श्रोतयाचे श्रवण घस्टोनि गेले।' – दावि २४१.

घस्टन स्त्री. दाट ओळख : 'तशी घस्टनीतली नसली तरी एकाच गल्लीतली.' – रैत ४५.

घस्टुचे अक्रि. खेटून, धक्के मारून चालणे. (गो.)

घस्त स्त्री. १. व्यापारात आलेली घट, बूड, तोटा. २. (पदार्थ सुकल्याने, गळल्याने, त्याच्या मापात, वजनात आलेली) तूट, कमीपणा. पहा : **घस** [सं घृष्ट]

घस्त स्त्री. गस्त; घरटी; पहारा. पहा : **गस्त** : ते हंमेशाप्रमाणे छावणीत घस्त घालूं लागले.' – विक्षिप्त ३.२४३. [फा. गश्त]

घस्ना, घस्नारी क्रिवि. तात्काळ. (झाडी)

घस्मर वि. जाड; दांडगा; घटमूठ; जाडाभरडा; बळकट; मजबूत (कापड, कपडा, भांडे, शरीर).

घस्मर वि. १. खादाड; अधाशी; सपाटून जेवणारा; खादूनंदन. २. (ल.) (दुसऱ्याचा) नाश, नि:संतान करणारा; दुसऱ्याला गिळणारा. [सं.]

घस्मरपण न. १. (मनाची) बळकटी; धैर्य : 'घ घ घस्मरपणेंचि मायाममता उलंथ।' – दावि २१३. २. नाश. [सं. घस्मर]

घस्मरपणे क्रिवि. क्रूरपणे; निर्दयपणे.

घस्र न. दिवस : 'तेथें घस्रें कितेकें क्रमुनि पुनरपि श्रीनटेशोपकंठी।' – वीउप २२. [सं.]

घळ स्त्री. तंबाखूची गळलेली पाने; घळीचा तंबाखू; अर्धवट पिकून किंवा खुरपण, औतकाम वगैरे करताना गळलेली पाने.

घळ स्त्री. (भूशा.) क्षरणाने निर्माण झालेली लहानशी अरुंद दरी.

घळ पु. मासे धरण्याचे एक साधन. पहा : **गळ**

घळ पु. नियोजित ठिकाणाहून पाणी न जाता, भलत्याच ठिकाणाहून ज्या भोकातून जाते असे भोक.

घळ स्त्री. (पाण्याच्या ओघाने धुपून डोंगराच्या दोन्ही दंडांमध्ये पडलेली) भेग; खाचण; ओहळ; लवण; खोलगट जागा; गुहा : 'अरण्यांत गेले पर्वताची घळ।' – रामदासी २.२५.

स्त्री. पु. (घुशींनी भिंतीत पोखरून पाडलेले) भोक, बीळ; (खेकडे, पाणी इ.नी) खडकाला, बंधाऱ्याला पोखरून पाडलेले छिद्र. [ध्व.]

घळ पु. १. झाडावरून आंबे वगैरे काढण्याची जाळी लावलेली काठी; झेला; झेली; आखी; आकडी. २. विहिरीत पडलेली घागर, बादली इ. वस्तू काढण्याचा गळ. (राजा.)

घळ वि. सैल जिभेचा; भडभड्या; बडबड करणारा (मनुष्य). (गो.)

घळ अपक्षरण (भूशा.) अनेक नाले व ओहोळ यांच्या वेगवान प्रवाहामुळे भूपृष्ठावर जागोजागी अरुंद दऱ्या निर्माण होणे.

घळई स्त्री. पठार.

घळईन न. निथळन; दळताना जात्यात घातलेला शेवटचा घास : 'उगयले नारायन चाकाची घळईन।' – जसा १३.

घळक स्त्री. (अशिष्ट) विपुलता; लयलूट; चंगळ; रेलचेल.

वि. १. विपुल; भरपूर. २. फार उत्पन्नाचा, किफायतीचा (धंदा).[ध्व.]

घळघळ–ळा क्रिवि. १. घटघटा; आकंठ; पुष्कळ; विपुल : 'आधीं

उदक आणविलें। घळघळां उदंड घेतलें।' – दास १८.१०.१९. २. अश्रूंची व पाण्याच्या प्रवाहाची विपुलता, अनिरुद्धता इत्यादिकांचा वाचक शब्द. ३. डोळ्यांतून खळखळ अश्रू ढाळीत. ४. खळखळ आवाज करीत (पाणी इ. वाहताना). [ध्व.]

घळघळ–ळा क्रिवि. सैलसर; अघळपघळपणे, सुटसुटीतपणे (दागिने, कपडे अंगाला होणे, बसणे). [ध्व.]

घळघळ घंटा १. घणघण घंटा; पोकळपणा; रितेपणा. २. पूर्ण अभाव; शून्यभाव.

घळघळणे अक्रि. १. (शरीर वाळल्यामुळे कपडे, बांगड्या, दागिने इ.) अंगाला सैल, ढिले होणे; (मोत्याचे वेजे, छिद्र मोठे झाल्याने) ढिले, सैल होऊन तारेत, दोऱ्यात हालू, सरकू लागणे. २. आजारीपणामुळे सांधे ढिले पडून अशक्तता वाटणे; गळाठा येणे; (शरीर) गळाल्यासारखे होणे.

घळघळणे अक्रि. डोळ्यांतून पाणी येणे; भावनावश होणे : 'म्हातारी माणसे वयोमानामुळे लवकर घळघळतात.' – गणगोत १६५.

घळघळाट पु. १. (कपड्यांचा, दागिन्यांचा) फाजील, अवास्तव सैलपणा; घळघळा लोंबत राहण्याची अवस्था; झोल; पोते. २. (अश्रू इत्यादिकांच्या) संतत धारा; सारखा लागलेला ओघ; मोठा प्रवाह, लोट. ३. (सामा.) समृद्धी; विपुलता; लयलूट.

घळघळाट क्रिवि. १. घटघटा; भरभर; अधाशीपणे (पाणी इ. पिणे). २. (कपडे, दागिने इ.) अतिशय सैलपणाने लोंबणे. पहा : **घळघळ** ३.

घळघळीत वि. १. सैल; ढिला; घळघळ लोंबणारा; घळघळणारा; अघळपघळ (अंगरखा, कपडा, दागिना); घळघळ पोते. २. मोठे झालेले; रुंदावलेले (कानाचे भोक, मोत्याचे वेजे इ.). ३. मोकळा; निष्कपट; खुल्या दिलाचा; संकोचरहित (मनुष्य, स्वभाव, संबंध, व्यवहार इ.). ४. उघड; प्रांजल; अकृत्रिम; मोकळ्या मनाचे; मनमोकळेपणाचे (वर्तन, भाषण इ.).
क्रिवि. १. रगडून; भरपूर; मनमुराद. २. मोकळेपणाने; अघळपघळ; प्रशस्तपणाने. ३. (अशिष्टपणे, अतिलोभाने म्हणताना) पुरेपूर; घसघशीत; भरपूर.

घळण न. स्त्री. १. पाण्याच्या प्रवाहाने पडलेली खोबण, खाचण, घळ, ओघळ, नाला : 'त्या खडकांतील भेगा व घळणी पाहून एकंदर.... अनुमान होईल.' – भू ३३. २. पाण्याच्या जोराने घळून घळून झालेली उतरती जागा, निसरडी जागा, जमीन; घसरण.

घळणे अक्रि. १. पाण्याच्या प्रवाहाने माती धुपून जाणे (नदीतीर, बांध यांची). २. खडक धुपून जाऊन घळ, ओघळ, चर पडणे. [सं. घृ = प्रसवणे; क्षरणे. गल्.]

घळणे अक्रि. १. मोत्याचे वेजे मोठे होणे, दागिन्याच्या वजनाने नाक, कानाचे छिद्र मोठे होणे, सैल होणे. २. (सामा.) हारातून, माळेतून ओवलेले मोती, मणी, फुले निखळणे, ओघळणे, गळून पडणे. पहा : **ओघळणे** [सं. घृ = प्रसरणे; क्षरणे; गल्]

घळघळीत, घळमळीत पहा : **घळघळीत** ३,४

घळम(मे)ळ स्त्री. १. (प्र.) घालमेल. (एखाद्या कामाची) धांदल; खवदव; दगदग; तारांबळ; उपद्व्याप. २. (बाह्य वस्तूचा, मनाचा) गोंधळ; घोळ; घोटाळा. (क्रि. पडणे, होणे, चालणे.) पहा : **घप्पाघोळ** : 'कोणी आड येईना या चिंदा। अशी घळमळ पडली मदा।' – पला ८६.

घळय पहा : **घळण, घळ** (को.)

घळसणचे अक्रि. चुकणे; घसरणे. (गो.)

घळा(ळ)मेळ स्त्री. मोकळ्या मनाचा, स्नेहभावाचा संबंध, दळणवळण, व्यवहार.

घळामेळीचा वि. विशेष सलगीचा; दाट परिचयाचा.

घळाळ वि. वेगवान; भरपूर.

घळाळा क्रिवि. वेग.

घळ्या वि. १. निष्काळजी; बेसावध; अनवधानी; दुर्लक्ष करणारा; हयगय करणारा; विसराळू. २. ओंगळ व गबाळे स्वरूप व वर्तन असलेला.

घळ्या वि. दुसऱ्याच्या गळी पडून, आर्जव करून, मर्जी संपादून आपले हित साध्य करून घेणारा (मनुष्य).

घंगरघोळ पु. घोटाळा; भानगड : 'असा सगळा घंगरघोळ झाला होता.' – मक (१९६०) २९.

घंगाट पु. सोसाटा. पहा : **घोंगाट**

घंगाळ न. कडक थंडी; गारठा. (क्रि. पडणे, सुटणे.)

घंगा(घा)ळ न. पहा : **गंगाळ** [सं. गंगालय]

घंगा(घा)ळपोते, घंगा(घा)ळटोपले पहा : **गंगाळपोते, गंगाळटोपले**

घंघाट पु. घणघणाट : 'तुझे गायेन घंघाटाचे : बरवे नव्हे' – पंचो १५४.१८.

घंघाळ वि. भयंकर : 'घंघाळ शंखाखें।' – गरा १०३.

घंघाळी स्त्री. एका जातीची माशी; गोमाशी. (को.) [ध्व. घं]

घंटा स्त्री. १. एक वाद्यविशेष; घाट. ही काशाची केलेली असून ती ओतीव असते. हिचा आकार मोठ्या पेल्यासारखा असून वरच्या बाजूला मोठी दोरी ओवण्यासाठी कडी असते. आतल्या बाजूला पोकळीमध्ये (आवाज, नाद निघण्याकरिता) लोखंडी, लाकडी लोळी लावतात. काहींना वरच्या बाजूला धरण्याकरिता मूठ बसवलेली असते : 'गिडिविडिया दौडका दुटाळा। घंटा जेंगटें मृदंग।' – कृमुरा ४०.११. २. तास; तासाचे ठोके वाजवण्याकरिता मिश्र धातूंची केलेली वर्तुळाकार तबकडी. (क्रि. देणे, वाजवणे, बडवणे, होणे.); (माणूस, वाहन इ.) आल्याचे किंवा इतर काही सूचना देण्याचे साधन. ३. (ल.) पुरुषाचे जननेंद्रिय; शिस्न. [सं.] (वा.) **० वाजणे, ० हालणे –** (एखादा पदार्थ) संपणे; खलास होणे; फन्ना उडणे.
पु. तास; तासाचा अवधी. (व. खा.)

घंटा–ट्या पु. अभाव; नकारघंटा.

घंटाघोष पु. १. घंटेचा आवाज. २. (ल.) गाजावाजा; बोभाटा; प्रसिद्धी. ३. कंठशोष; कानीकपाळी ओरडणे : 'इकडील सेवकपणाचा भारीपणें घंटाघोष करून संतोषवर्तमान लेहून पाठविणे.' – इसंग्राम सरदार १७.

घंटातरंग पु. निरनिराळ्या सप्तस्वरयुक्त घंटांची माळ करून तिच्यावर जलतरंगाप्रमाणे विशिष्ट राग वाजवणे. [सं.]

घंटापथ पु. (ज्यावरून गळ्यात घंटा असलेले बैल येत-जात आहेत असा) हमरस्ता; राजमार्ग; रहदारीचा रस्ता. [सं.]

घंटापळी स्त्री. जेवण्याचे पितळेचे भांडे. (माण.)

घंटापारधी पु. घंटानादाने हरिणास भुलवून फासात अडकविणारा पारधी : 'घंटापारधी जैसा । मधुर नादें मृगमानसा । भुलवोनियां पाडी फांसा ।' – भारा, बाल २.२६.

घंटाबडव्या वि. (तुच्छतेने) पुजारी; पूजा करणारा : 'कृष्णरावांच्या पदरीं गोविंदपंत नुसता घंटाबडव्या होता.' – कोरकि ३५.

घंटाशास्त्र न. घंटा तयार करण्याचे व वाजविण्याचे शास्त्र.

घंटिक (वै.) एक प्रकारची ग्रंथी.

घंटिका स्त्री. १. लहान घंटा; घागरी; घुंगरू. २. पडजीभ. ३. गळ्याची घाटी; गळ्याचा अस्थिमणी; कंठमणी; ग्रीवामणी : 'माजि घंटिका लोपे । वरी बंधु जो आरोपे । तो जालंधरू म्हणिपे । पंडुकुमरा ।।' – ज्ञा ६.२०८. [सं.]

घंटी स्त्री. १. वाघ्यामुरळींचे एक वाद्य. २. लहान घंटा. [सं. घंटिका]

घंटी स्त्री. दळण्याचे जाते. पहा : **घट्टी**

घंटीअप्पा पु. दोन्ही हातांनी घंटा वाजवीत भीक मागत फिरणारा मनुष्य.

घंटीचोर पु. चोरांची एक जात; भामटा; उचल्या. [कर्ना.]

घंटी परिपथ (विअ.) विद्युतघंटीचा आराखडा.

घंटेकाटा पु. घड्याळातील तासांचा काटा : 'घड्याळांत घंटेकांटाच नाही.' – श्रमसाफल्य २.

घंसन न. युद्ध; लढाई; धुमश्चक्री. पहा : **घमशान ४** : 'पुढीली अणीया भाले । जवळीं पांच पांच सेले । आडासनीं दोनी दोनी षर्गे । मोजे घंसनी पातलें ।।' – उषा ८२४. [सं. घर्षण]

घाइ पु. १. ठोका; वाद्यांचा गजबजाट; संमिश्र ध्वनी; कोलाहल : 'टिपरी गाजती घाई जाली ।' – ज्ञागा १०. २. संगीतातील, वादनातील ताल, गती, बोल; विशेषत: द्रुतगती. (को.) [सं. घात, घाति]

घाइ पु. प्रहार; घाव : 'दु:खशोकांच्या घाईं । मारिलियाची सेचि नाहीं ।' – ज्ञा ७.१०७. [सं. घात]

घाइटा पु. घाई; गडबड; त्वरा. (कर.)

घाइवट वि. जखमी.
पु. घाव; जखम; वार; शस्त्राचा आघात. (प्र.) घायवटा.

घाई स्त्री. १. त्वरा; जलदी; गर्दी. २. तातडी; उतावीळ; धांदल; लगबग; घायकूत. ३. धामधूम; धडाका; गडबड; तडाखा. ४. धुमाळी; धुमाकूळ; धांगडधिंगा; धावपळ; गोंधळ; दंगा. (वा.) **घाईस येणे** – जिकिरीला येणे; त्रस्त होणे; त्रासून जाणे.

घाईगर्दी स्त्री. गोंधळ; धावपळ.

घाईघाईने क्रिवि. अगदी गडबडीने; गर्दीने; लगबगीने. [घाईचे द्वित्व]

घाउस पु. १. घास; लचका : 'जे जे ठाय समांस । तेथ आहाच जोडे घाउस ।' – ज्ञा ६.२३१. २. खाणारा; ग्रहण करण्यास उत्सुक. ३. खाण्याची इच्छा. [सं. घस् = खाणे]

घाऊक वि. १. ठोकळ; भरीव; मोठी (रक्कम, संख्या, आकडा). २. सगळा; सर्वच्या सर्व; अशेष; उक्ता; उघडा. ३. ठोकविक्रीने; एकठोक; ठोकबंद. ४. मोठ्या प्रमाणावरचा : 'हे दंगे तसे निकराचे किंवा घाऊक नव्हते, किरकोळच असत.' – माजी ४८३.

घाऊल न. नफा; फायदा; किफायत. पहा : **गाऊल**

घाए पु. घाव; घाय; वार : 'तंव चैद्यु भणें हो हो राहे । माझा घाए साहे ।।' – शिव १०७१.

घाएखंडी स्त्री. घाव घालणे आणि पेलणे : 'एकु : घाएखंडी दाखविजो की :' – लीचपू २९९.

घाएवटणे अक्रि. जखमी होणे; जखमेने जर्जर होणे. पहा : **घायवटणे** : 'कटाक्षीं मन घाएवटें ।' – शिव ६६६.

घाओसणे अक्रि. गवसणे; प्राप्त होणे : 'प्रिये अव्हेरिले : धिंगतीचें ज्यालें : वियोग घाओसले : जन्मवेऱ्हीं :' – अभंगपर्व.

घाग वि. कंजूष. (व.)

घाग स्त्री. भेग. (व.)

घागर स्त्री. १. (तांबे, पितळ, माती इत्यादिकांचे) पाणी ठेवण्याचे आवळ गळ्याचे भांडे; घड्यापेक्षा मोठ्या आकाराचे पाणी ठेवण्याचे भांडे; मोठी कळशी; घट : 'अमूप अमृत फल क्षीर घागरी । दध्योदनेसीं वायन करी ।' – भारा, बाल. १२.२३. २. (दारूकाम) उडविण्याच्या दारूचे एक झाड. खापराची घागर घेऊन तिच्या बुडाला जाळीदार भोके पाडून त्या प्रत्येक भोकाच्या तोंडाशी बाण ठेवतात व तोंडावर भुईनळा ठेवून नळा दाखवतात. वर झाड उडते व सभोवार तारे व बाण उडतात. (वा.) **० उदवणे –** अश्विन शुद्ध अष्टमीला महालक्ष्मीच्या दिवशी रात्री बायका शेगडीवर ऊद घालून वर घागर धरतात ती क्रिया. **घागरी फुंकणे, ० घुमवणे –** कोकणस्थांकडील एक कुळाचार. अश्विन शुद्ध अष्टमीच्या रात्री महालक्ष्मीची स्थापना करून तिची पूजा करून तिच्यापुढे स्त्रिया घागरीत तोंडाची फुंकर घालून घुमतात ती क्रिया.

घागरगडचा सुभा (उप.) पाणी भरण्याची नोकरी; पाणक्याचे काम.

घागरघोळ पु. अनेक घुंगरू एकत्र करून केलेले विशेष वाद्य; चाळ : 'वाजवीत वाद्यें खेळत खेळ । शिंगें कहाळा घागरघोळ ।' – निगा ४२.

घागरपटॉ पु. घागऱ्यांचा केलेला मुलांच्या कंबरेत घालायचा रुप्याचा दागिना; घागऱ्यांचा कमरपट्टा, करगोटा. (गो.)

घागरमाळ–ळा, घागुरमा–ळा स्त्री. १. (हत्ती, बैल इ. प्राण्यांच्या गळ्यात घालायची) घुंगरांची माळ; गळघांटी : 'कीं ते कृष्णपक्षींची रजनी । चंद्रशोभा उदेली दशनी । घागरमाळांचे मणी । तारागणें कीं ।।' – कथा ४.९.४१. २. (सामा.) घागऱ्यांची मोठी माळ : 'मखरीं लोंबती घागरमाळा ।' – अमृतसुदामचरित्र ३४.

घागरा पु. गुजराती, मारवाडी स्त्रियांचे परकरासारखे नेसायचे घेरेदार, घोळदार वस्त्र; लेहेंगा. [दे. प्रां. घग्घर, गुज. घाघरो] (वा.) **० फडकी करणे –** वाङ्‌निश्चय करणे; वाग्दत्त वधूला घागरा फडकी चढवण्याचा विधी : 'घागरा फडकी करनंऽ ।' – खावा ९३. **० बांधणे** – रागावून खरडपट्टी काढणे : 'बाइसीं घागरा बांधला' – लीचपू ३३८.

घागरा पु. मुलांचा खेळायचा एक प्रकारचा खुळखुळा. [ध्व.]

घागरा पु. एक वनस्पतिविशेष. हिचे बी मोठे व भरदार असून वरील कवच मऊ असते. [सं. घर्घरा]

घागरा–ऱ्या गोचीड मोठा गोचीड.

घागराळे न. प्रवासात खोगिराला घागर अडकवण्याकरिता काठ्यांची व दोऱ्यांची केलेली विशिष्ट रचना, चौकट.

घागरी स्त्री. घट. पहा : **घागर** : 'परी तो न सांडीच घागरी । अमृताची ।।' – कथा ४.१४.१८८. [सं. गर्गरी]

घागरी स्त्री. (लहान मुलाच्या करगोट्याला असलेले, नर्तिकेच्या पायातील चाळ्यांप्रमाणे) घुंगरू; घाटी; क्षुद्रघंटिका; एक अलंकार : 'झुणझुणशब्दा करिति । घागऱ्या तालावरती गाती ।' – कमं ४.१०९. [सं. घर्घरी]

घागरी स्त्री. घागरा नावाची वनस्पती; तिचे फळ. (को.) [सं. घर्घरी]

घागरीलावा पु. एक पक्षी. (झाडी)

घागरे न. कणेकडाचे बूड ज्या लाकडाच्या तुकड्यांच्या खोंबणीत बसवलेले असते ते लाकूड; भोवरी.

घागरेवाली स्त्री. हायलंडर पलटण. या पलटणीतील शिपाई कमरेला लहंग्यासारखे वस्त्र गुंडाळतात.

घागऱ्या वि. घागरीसारखा; मोठा.

घागऱ्या आंबा आंब्याची एक मोठी जात; घागरीएवढा आंबा.

घागऱ्याघोळ पु. १. मनाची उडालेली त्रेधा, गोंधळ; घाबरगुंडी. २. (कामांची, वस्तूंची, पदार्थांची) अव्यवस्था; गोंधळ; घोटाळा; अस्ताव्यस्त स्थिती.

घागऱ्यादेवी स्त्री. देवी रोगाचा एक प्रकार.

घागऱ्यांची गरसोळी ठुशी. (व.)

घागा क्रिवि. धो धो पाण्याने भरून.

घागाइणे अक्रि. ओरडणे.

घागाणे सक्रि. ओरडणे; रागाने बोलणे : 'आणि बाइसांवरी घागाइली ।' – लीचपू १०६.

घागुरी स्त्री. घागरी; घुंगरू : 'तिनें बांधिल्या पायाला घागुऱ्या ।' – मसाप १.९.१९. (साष्टीकोळी)

घाट स्त्री. १. घसा; घशाचा बाहेरील भाग; घाटी; कंठ, कंठमणी. २. गळा; कंठ; आवाज. [सं. घाट] (वा.) **घाटी फुटणे –** १. (मुलाच्या) आवाजातील कोमलता जाऊन तो मोठा, प्रौढ होणे. हे (मुलगा) वयात येण्याचे लक्षण आहे. २. (गाणाऱ्याचा) आवाज घोगरा होणे; स्वरभेद होणे; स्वर बिघडणे; आवाज चिरकणे, बसणे.

घाट स्त्री. १. घंटा; जनावराच्या गळ्यातील घंटा : 'वाजती शंख घांटा । मी जाते वैकुंठा ।' – मसाप २.१.२२. २. (उप.) गुप्त गोष्ट सर्वांना सांगत सुटणारा, चोंबडा, चहाडखोर माणूस; बोंबल्यागणेश; जिभेचा, कानाचा हलका; लुतरा; गजघंटा. [सं. घंटिका] (वा.) **घाटेखाली उभे राहणे –** (शपथेचा एक प्रकार) शपथ घेणे.

घाट पु. १. प्रदेश एकमेकांपासून भिन्न करणारी पर्वतांची रांग; दोन देशांच्या सरहद्दीवरील पर्वतांची रांग. २. (विशेष अर्थाने) सह्याद्रीची रांग. ३. डोंगर ओलांडून जायचा रस्ता; डोंगरावरील वाट; खिंडीतील रस्ता. उदा. खंडाळ्याचा घाट, कात्रजचा घाट; डोंगरावरील अडचणीची व बिकट वाट. ४. नदी, तलाव इ.च्या काठावर नावेतून उतरण्याकरिता, नावेत बसण्याकरिता बांधलेला धक्का; नदीकाठी बांधलेला धक्का; उतार. ५. पाण्याचा उपयोग चांगला करता यावा म्हणून सोयीची दगडी बांधणी (विशेषत: पायऱ्यांची); नदीवरील पायऱ्या. उदा. ब्राह्मणघाट, धोबीघाट : 'ज्या नांव तीर्थ वरि घाटहिरम्य आहे ।' – नगर १५९ (नवनीत ४३३). ६. धरण; बंधारा; धक्का : 'आणि सुटलिया सिंधुजळाचा लोटु । न शके धरूं सैंधवाचा घाटु ।' – ज्ञा ९.१२४. ७. सह्याद्रीच्या रांगेच्या पूर्वेकडील प्रदेश; सह्याद्रीचे पठार (ज्याला कोकणसापेक्ष देश हे नाव आहे) : 'आम्ही घांटावरचीं माणसें आहोंत.' – कोरकि ४८३.[सं. घट्ट = घाट] (वा.) **घाटात अडवणे, धरणे, मारणे –** (चोर, लुटारू, डोंगरातील घाटात किंवा अडचणीच्या मार्गात वाटसरूंना गाठून त्यांना लुबाडतात त्यावरून) एखाद्याच्या अडचणीचा फायदा घेणे; एखाद्याला अडचणीच्या वेळी अडवून धरणे.

घाट पु. १. (भांडी, दागिने इ.चा) आकार; रचना; आकृती; घडण; डौल; ढब; ठेवण; रचना : 'अति तरल विलोकी घाट ते मेखळांचे ।' – सारुह ३.३८. २. (ल.) (बेत, मसलत, हाती घेतलेले काम इ.चे) बाह्य स्वरूप; रागरंग; रंगरूप. ३. (हेतू, योजना इ.चा) आविर्भाव; अवडंबर; उठाव; आव : 'यास्तव त्यानें स्वयंवराचा घाट तिच्या घातला.' – विक ३१. ४. योजना; बनाव; बेत : 'हा घाट जमून आला तर काय बहार होईल !' – अस्तंभा ८९. ५. विशिष्ट घडण; आकृती; बैठक; घटना; साज : 'लावले समयांचे थाट । केले उदबत्त्यांचे घाट ।' – मसाप २.१.२३. ६. घटना. [सं. घट् = रचणे, करणे]

घाट स्त्री. १. घाटलेले हरभरे, डाळ. २. (मिठाई, मिष्टान्न इत्यादिकरिता) शिजवलेले पीठ. ३. हरभऱ्यावर पडणारा एक रोग. यामुळे हरभऱ्याचा घाटा भरत नाही. (क्रि. पडणे.) पहा : **आटघाट**

घाट पु. (नाविक) गलबताच्या बाजूच्या फळ्या जोडणारा खिळा. मालवण – गोमांतकाकडे कबिला किंवा खिळे याऐवजी सुंभाचे दोर लावून फळ्या जोडतात. (को.)

घाट स्त्री. पेरणीच्या हरीचे छिद्र. (झाडी) [सं. ग्रास]

घाट स्त्री. समूह; कळप : 'दारीं आठा दिग्गजांची घाट ।' – रुस्व ८७१.

घाटकाम न. १. (बांधकाम) कोनाडे, कमानी यावर केलेले नक्षीकाम. २. (सोनारकाम) सरी, वाकी वगैरे हातांनी करण्याचे व त्यांना आकार देण्याचे काम.

घाटकार वि. घंटा ओतणारा शिल्पकार. (गो.)

घाटकावला पु. घाट चढून आल्यावर घाटावरील चौकीचा द्यायचा कर : 'घाटकावला खुशकीवर घाटी ऐन जिनस वगैरे येईल किंवा जाईल.... त्यास दरबैलीं घ्यावयाचा शिरस्ता रुपये...' – मसाप २.२.१८४.

घाटकोर स्त्री. गळ्याचा भाग; नरडी : 'असें कुभांड करून दांड होऊन भांड धरिसी घाटकोर ।' – होला ३७.

घाटगस्त–स्ती स्त्री. गस्तीचा एक प्रकार. राजगस्त व घाटगस्त असे किल्ल्याच्या तटावरून गस्त घालण्याचे दोन प्रकार होते. पहिलीत चुडी पेटवून फेरी होई व दुसरीत घाट वाजवीत गस्तीची फेरी होई : 'घाटगस्त पडली, राजगस्तीचीही चुडी पडली, ऐसा कारभार.' – पेद

घाटघडाव वि. कमजास्त.

घाटघोळा पु. एखादे कार्य पूर्ण न होता, घोटाळ्यात पडून राहणे. – तंजा.

घाटण न. १. डाळ शिजवून, ती ठेचून तोंडीलावण्याकरिता केलेले दाट कालवण : 'जुना करार, नवा करार, कुराण, जेंदावेस्ता, वेद या सर्वांचें आपल्या परिपक्व बुद्धीनें घाटण करून आमचे नूतन सामाजिक जसें आपल्या एकेश्वरास भक्तीचें मसालेदार खाद्य देतील तसें आमच्या जुन्या भक्त मंडळीकडून कोठून मिळणार?' – नि ८१८. २. निरनिराळे जिन्नस वाटणे; चेंदामेंदा करणे; ठेचणे; घोटणे; ढवळणे. [सं. घट्टन]

घाटणा पु. (खलाचा) बत्ता; घोटा; (उखळीचा) वरवंटा; वाटणागुंडा; रगड्यात डाळ इ. घाटायचा लांबोडा दगड. (कु.) पहा : **घाटू**

घा(टा)णा, घाटणेरा पु. (लाह्यांसाठी) खापरात धान्य भाजताना ते ढवळण्यासाठी, वर-खाली करण्यासाठी एका टोकाला चिंध्या बांधून बोंड केलेली काठी, दांडके.

घाटणी स्त्री. पदार्थ बारीक करण्याची बत्त्यासारखी वस्तू.

घाटणूक स्त्री. (प्रा.) (एखादी गोष्ट – विशेषतः लग्नासंबंधी) जुळवून आणण्यासंबंधीची बोलणी, वाटाघाट; बोलाचाली; घटणूक.

घाटणे उक्रि. १. (पळीने, दांड्याने, चमच्याने इ.) ठेचणे, चेचणे, घोटणे; ढवळणे : 'तुज लाविले स्वतेजें म्यांच कढी-भात-वरण घाटाया।' – मोगदा २.१६. २. आघात, प्रहार करणे; घावटणे; बडवणे; ठोकणे; ताडण करणे : 'कीं तयाही पाठीं। जे वेळीं लोह मांसातें घाटी। ते वेळीं विजयश्रियेच्या पाटीं। एकुचि बैसें।।' – ज्ञा ७.१२. ३. (ल.) त्रास देणे; गांजणे; सतावणे; बेजार करणे; जाचणे; कुतरओढ करणे. ४. चर्चा खल, वाटाघाटी करणे. (विषय, गोष्ट) घोळणे. ५. (सामा.) एकजीव करणे; मिळवणे. [सं. घट्ट, घट्टन]

घाटणे सक्रि. आहाटून घटवणे; कमी करणे : 'भीतरीले आगीची उकटी। मेदमांसांते घाटी।' – ज्ञाप्र ८.१६.

घाटणे अक्रि. घडणे; होणे : 'जीये दीसी माहाप्रलयो घाटें। उदधीचें वळण फुटें।।' – उषा ११२३. [सं. घट् = घडणे]

घाटणे न. १. घाटण्याकरिता ज्याचा उपयोग करतात तो दांडू, चमचा, पळी; घाटणा; घाटणेरा; ढवळण्याचे साधन. २. घाटण्याची, घोटण्याची, ढवळण्याची क्रिया. ३. (कुंभारी) मडक्याचे बूड घासण्याचे लाकडी हत्यार, साधन, उपकरण. (खा.)

घाटदार वि. सुंदर आकाराचा; डौलदार; पिळदार (शरीर); बांधेसूद; कळाशीदार.

घाटनाळ स्त्री. डोंगरामधील अरुंद रस्ता, वाट; खिंडीतील मार्ग.

घाटपट्टा, घाटपान पु. न. ज्याला लहान लहान घंटा, घुंगरू अडकवलेले असतात किंवा एकच लोखंडी, पितळी घाट बांधलेली असते असा बैलाच्या गळ्यात बांधण्याचा चामड्याचा, गोणपाटाचा पट्टा.

घाट(ड)पण न. (प्र.) घाडीपण; पिशाच, दैवत प्रसन्न करून घेण्यासाठी घाडी (मांत्रिक, जादूगार) जो विधी, मंत्रतंत्र करतात ते. (गो.)

घाटपाय-या पु. घाटाचा पायथा.

घाटपारधी पु. घंटानादाने हरिणीला फसवून, तिला फासात अडकवणारा पारधी : 'घाटपारधी पाश पसरी। त्यावरी तो मृगांतें धरी।' – एभा २६.२३६.

घाटपांडे-ड्या पु. नदीच्या, डोंगराच्या घाटावरील जकात वसूल करणारा अधिकारी; घाटाच्या तोंडाशी जकात घेणारा अधिकारी; जकातदार.

घाटपेच पु. डावपेच : 'असें घाटपेच परस्परें लागले आहेत.' – मशियांका ४०३.

घाटबंदी स्त्री. १. (डोंगरातील) घाटातून कोणी रहदारी करू नये म्हणून केलेला बंदोबस्त. २. (नदीचा, डोंगराचा) घाट बांधण्याकरिता झालेला खर्च वसूल करण्यासाठी बसवलेला कर, पट्टी.

घाटबारी स्त्री. घाटबंधारी; घाटातील वाट : 'रास्ते वगैरे फौज सडी पुढें गेली ती घांटबारी उतरोन पलीकडे गेली.' – ऐलेसं २४९६.

घाटबुडी स्त्री. घाटाचा पायथा; घाटपाया. (राजा.)

घाटमाथा पु. १. डोंगराचा माथा; डोंगरावरील घाटातील सर्वात उंच भाग; पठार. २. (डोंगरातील) खिंडीतून जाणारा अरुंद रस्ता.

घाटरू न. १. घाटी; कंठमणी; कंठनाल; नरडे. २. घशातील एक रोग; घटसर्प.

घाटरू-रे न. १. (बैलाच्या गळ्यातील) लहान घंटा; लहान ठोकडा. २. (निंदार्थी) घाट; घंटा.

घाटरोग पु. गुरांना घशात होणारा एक रोग.

घाटले न. १. घाटला; तांदळाच्या कण्या व नारळाच्या चवाचे दूध यांची घणसर खीर; गूळ, खोबरे, पाणी व तांदळाचे पीठ याची बनवलेली खीर; गुळवण्याला पीठ लावून घाटून केलेले (कोकणी) पक्वान्न, खाद्य. याला गोडे असेही म्हणतात. (राजा.) २. पिठले.

घाटवळ-ळी वि. घाटावरचा; सह्याद्रीच्या पूर्वेकडील मुलखातील; देशावरचा (मनुष्य).

घाटवाईन, वायन, वाहन न. घाटण्याचे वाइन-उखळ; पुरणाची डाळ किंवा इतर पदार्थ घोटण्यासाठी केलेली लाकडी किंवा दगडी उखळी. ज्याने घोटायचे त्या दगडाला घाटणा, घाटणेरा असे म्हणतात.

घाटशुद्ध वि. सुंदर; सुबक घाटाचा, घडणीचा.

घाटसर पु. बैलाच्या गळ्यातील लहान लहान घुंगरांची, घंटांची माळ; घुंगुरमाळ ज्यात ओवलेली असते ती दोरी.

घाटसर-री स्त्री. पर्वताच्या, रांगेच्या, उतरणीच्या अगदी वरचा प्रदेश; घाटमाथ्याच्या आजूबाजूचा प्रदेश; घाटमाथा.

घाटा पु. शिखर; पर्वताचा कडा, माथा : 'कुळाचाराचे घांटे। सुरिजति करपुटें।' – उगी २३१.

घाटा पु. घाटपांड्या; प्रदेशाच्या सीमेवर जकात वसूल करणारा अधिकारी.

घाटा, घाटाणा पु. ओल्या हरभऱ्याचा टरफलासहित असलेला दाणा : 'घाटा दिसे परी दाणा नाहीं।' – एभा १०.५२७. [सं. ग्रंथ.]

घाटा पु. १. पहा : **घाटणा, घाटपेरा**. २. बाजरी, उडीद, मूग इ. शिजवून व वाटून गुरांकरिता केलेले पौष्टिक खाद्य : 'एकाचिया घाट्या टोके। एका फिके उपचार।' – तुगा १८०. ३. जोंधळ्याच्या, बाजरीच्या कण्या शिजवून तयार केलेले खाद्य; भात : 'ज्या भक्षिती केवळ ताक घाटा।' – सारुह ३.१६. ४. मृत जनावर ओढण्यासाठी महारांना देण्यात येणारे धान्य.

घाटा पु. १. हातोडा. २. घंटेतील लोलक.

घाटा पु. तोटा; घट; बूड; तूट; घस. (व.)

घाटा पु. १. तुकडा. २. अन्न. ३. घास. ४. हरभऱ्याचा गुच्छ. (झाडी)

घाटाघाट स्त्री. १. (एखाद्या गोष्टीविषयी, कार्याविषयी) बराच वेळ चाललेला खल; वाटाघाट; चर्चा. २. (एखादा पातळ पदार्थ, डाळ इत्यादी) जोराने, घाईने घाटण्याची क्रिया. [घाटणेचे द्वित्व]

घाटाघुगरी स्त्री. १. हलक्या तऱ्हेचे अन्न. २. (ल.) गरिबांचे अन्न; मीठभाकर : 'घाटा घुगऱ्या कोरड्या भाकरी।' – निगा १००.

घाटाणा पहा : **घाटणे, घाटणा**

घाटावाट स्त्री. घाटातील वाट : 'त्यास आज्ञा केली कीं, तुम्ही आम्हास घाटावाट निटोप्याची दाखवून दोन प्रहराचे संधीस त्यांजवर आम्हास नेऊन सोडावे.' – होकै ९.

घाटांबा पु. गप्पागोष्टी छाटीत बसण्याची आंब्याखालची जागा, अड्डा.

घाटी स्त्री. निमचाच्या म्हणजे तलवारीच्या एका भागाचे नाव : 'गोसावी करजकर यांस सांगून घाटी वगैरे जे पाहिजे ते आणविले पाहिजे.' – पेद १७.२०.

घाटी स्त्री. घाट; घडण : 'पहावी स्वरूपाची घाटी।' – प्रभाकर (मला) १४६.

घाटी स्त्री. साखरेची गाठी. पहा : **गाठी**

घाटी स्त्री. १. कंठ; घसा; गळा : 'पूर्वी तुम्हां नाहीं भेटी। तरि कां येणें धरिली घाटी।' – गीता २.२२६१. २. घाट; कंठमणी; कंठनाल; नरडे : 'तिणे पसरितांचि जाभाडी। हनुमंत सवेग घाली उडी। आकळितां जिव्हा लडबडी। तंव घाटीबुडीं रिघाला।' – भारा किष्किंधा १८.६८. [सं. घाट] (वा.) ० **खाऊन बोलणे –** मोठ्याने बोलणे; ओरडून, खेकसून बोलणे; जीव खरडून, तोडून, खाऊन बोलणे; गळा काढून रडणे, ओरडणे; शिरा ताणून बोलणे; गळेफोड करणे. ० **खाजवणे –** घसा खवखवणे. (व.) ० **पडणे –** आवाज बसणे. (व.) ० **फुटणे, बदलणे –** १. (मुलगा वयात आल्यामुळे) २. (गाण्यात) आवाज बसणे; आवाज घोगरा होणे; कंठ फुटणे. (ना.) ० **वर येणे –** जिवावर येणे; दुष्कर वाटणे. (व.)

घाटी स्त्री. लहान घाट; डोंगरातील लहान चढण; डोंगर चढायची बांधलेली वाट : 'आसपासची जमीन डोंगराळ म्हणून अनेक लहान पण दमविणाऱ्या घाट्या चढाव्या व उतराव्या लागत.'–विवि ८.१.७.

घाटी स्त्री. वेसण; दोरीचा फास : 'काळिआनां मुखीं घाटी सूदली।' – श्रीकृष्ण २१.

घाटी वि. घाटावरचा; देशावरचा; सह्याद्रीवरच्या प्रदेशातील. घाटवळ हा शब्द लोकांसाठी व घाटी हा जनावरे, माल यांसाठी वापरतात. मुंबईत नोकराला घाटी म्हणतात : 'तवांपासून बघा घाटी झालोया.' – संगीत घोटाळा ७.

घाटी स्त्री. लहान घंटा (बैल इ. पशूंच्या गळ्यात बांधण्याची); पितळी लहान घाट, घंटा. [सं. घंटा] (वा.) ० **खाली उभे राहणे –** शपथ घेण्याचा एक प्रकार; बेल भंडार उचलणे, देवाचा निर्माल्य उचलणे ह्याप्रमाणेच देवळाच्या घंटेखाली उभे राहून खरे असेल ते सांगावे असा प्रघात आहे : 'घाटीखालीं उभें राहणे, देवावरची बेल-तुळस उचलणे, कृष्णेच्या पाण्यांत उतरणें, हीं साधनें अत्यंत कठीण प्रसंगी व अज्ञात वृत्तांतास्तव जुनीं माणसे अमलांत आणीत.' – खेया २.

घाटी खंडी वीस मणांची खंडी; घाटावरील खंडीचे माप.

घाटीव वि. १. घावटलेला; बडविलेला; तुडविलेला; चेंदामेंदा केलेला; ठेचलेला; (पळी, चमचा इत्यादींनी) ढवळलेला; घोटलेला. २. त्रासलेला; त्रस्त झालेला; छळलेला; गांजलेला. ३. वाटाघाट, चर्चा, घाटाघाट केलेला.

घाटू पु. पळीच्या आकाराचे पण मोठे-लाकडाचे-डाळ इत्यादी घोटण्याचे, ढवळण्याचे उपकरण; लाकडी मोठी पळी; एका टोकाला मोठे टवळे असलेले दांडके.

घाटूनवाटून क्रिवि. १. घोटून आणि रगडून; चेंदामेंदा, चेचा करून. २. (ल.) छळून, सतावून, त्रस्त करून. (क्रि. खाणे, पिणे, गिळणे.) (प्र.) वाटून घाटून. पहा : **वाटणे**

घाटोला-ळी वि. (उप.) घाटी. घाटवळ या शब्दाचे तुच्छतादर्शक रूप. घाटावरचे; घाटी : 'तेथे घाटोळी लोक रहात असत.' – माजी १४.

घाटौल वि. घाटदार : 'पारिजातसें घाटौलें।' – शिव ४२६.

घाटौले न. कळी : 'तंव गगनीं नक्षत्रें उमटत। जैसी आकाशीं घाटौलीं फुलत। नातरि मेघ वीणि साधित। मोतियांची।।' – रुस्व ४८६.

घाट्या पु. तीर्थाच्या ठिकाणी घाटावर स्नान करणारांना गंध व भस्म पुरवून उपजीविका करणारा ब्राह्मण; (सामा.) घाटावरचा ब्राह्मण.

घाट्या स्त्री. अव. रांधलेल्या कण्या.

घाट्या, घाटिया पु. लहान हातोडा; नक्षीचे, कलाकुसरीचे काम करायचे सोनाराचे, कासाराचे एक हत्यार; लहान हातोडी.

घाड स्त्री. भात्याणाची पेंढी; भाताच्या पेंढ्याची गड्डी, कवळा. [सं. घट]

घाड स्त्री. व्रण; क्षत; जखम : 'महाराज, कोळिष्टक कशाला? घाड भरून काढायला?' – रोज्यू २२.

घाड पु. (सुतारकाम) एक प्रकारचे चक्र, चाक; जे फिरवून दुसऱ्या चाकाला, यंत्राला गती देता येते ते.

घाड पु. (विणकाम) विणायच्या कापडाच्या काठात फुले उठवण्यासाठी चक्रे बसवलेला, मागावर टांगलेला लाकडी साचा, चाळ. (बे.)

घाड स्त्री. (सोनारकाम) सोने, चांदी इत्यादी धातूंची तार ओढून बारीक करण्यासाठी लागणारी एक करवतीसारखी आटे असलेली फळी; एक विशिष्ट रचना, योजना.

घाडकी स्त्री. घाड्याचे, देवळातील गुरवाचे काम, धंदा, हक्क.

घाडवस पु. घाड्याचा, गुरवाचा वंश. (कु.)

घाडी पु. १. देवस्कीचा एक अधिकारी; देवळाची झाडलोट, दिवाबत्ती करणारी व्यक्ती. ही गुरवासारखीच असते. 'नंतर घाडी व गुरव घरोघरी येऊन शिंपणें करतात.' – मसाप ४.४.२६१. (राजा.) २. मांत्रिक; जादूटोणा करणारा. डोक्यावर जटा असणारा, अंगात वारे संचारल्यावर भूत-पिशाचासंबंधी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सांगणारा. याला भूतपिशाच्चाबरोबर बोलणारा मध्यस्थ समजतात. (गो. हेट.)

घाडीपण न. घाडीचा धंदा; कौल, प्रसाद देणे, भुते काढणे इत्यादी.

घाड्डा पु. पिठाचा वडा. (झाडी)

घाण स्त्री. १. वास; गंध : 'जैसे खालारा धांवे पाणी। भ्रमर पुष्पाचिये घाणीं।' – ज्ञा १८.४८१. २. दुर्गंध; दुर्गंधी; नाकाला न आवडणारा

वास; दर्प. (क्रि. करणे, मारणे.) ३. घ्राणेंद्रियाला, डोळ्यांना न आवडणारी ओंगळ वस्तू; केरकचरा; खेड; रेंदा; राडा. ४. (तिरस्कारार्थी) घाणेरडा; वाशेरा, घाणेरा मनुष्य, पदार्थ. ५. (कामातील, हिशेबातील) घालमेल; घोटाळा; अव्यवस्था; गफलत; गोंधळ; भानगड; (मनुष्यांचा, कामांचा) घप्पाघोळ; हबेलंडी; गळ्हाटा; दुर्दशा; फजिती; (पदार्थाचा, सामानाचा) चिवडा; विचका; वचवच; चवढव : 'कामाची सगळी घाण केलीस.' – विवि १०.५.७.१२९. ६. एखाद्या व्यवहारासंबंधी अवशिष्ट खटले, काम, बाकी. ७. छी: थू:, तिरस्कार, चीड, त्रास, मत्सर यांचा वाचक शब्द. [सं. प्राण] (वा.) ० **करणे** – एखादे काम बिघडवणे.

घाण, घाणवट–खत–पत्र वि. गहाण, गहाणवट. पहा : **गहाणखत, पत्र.**

घाण स्त्री. चुन्याची घाणी, घाणा.

घाणकढा वि. खवट; वासाळ; घाण मारणारे; योग्य मर्यादेपलीकडे कढवल्याने वास मारणारे (तूप).

घाणकरी पु. तेलाचा घाणा चालवणारा.

घाणघूण स्त्री. घाणेरड्या वस्तू : 'घाणघूण वाहून गेली.'–आआशे ३६६.

घाणट, घाणवट वि. १. दुर्गंधयुक्त; वाईट वास मारणारा; घाणेरा. २. (ल.) बीभत्स; ओंगळ; किळस, तिटकारा, शिसारी आणणारा.

घाणणे, घाण (णा) वणे अक्रि. वाईट वास येणे; वास मारणे; उग्र वास, दर्प येणे : 'हरिकथा विरहित जे वदन । तें केवळ मद्यप्याचे भांडे जाण । विषय कृमी परिपूर्ण । निंदा दुर्गंधीने घाणतसे ।' – जै ४२.७. [सं. घ्रा]

घाणमाकड न. शिमग्याच्या दिवसात जमिनीत एक साधारण उंच खांब रोवून व त्यावर एक आडवा दांडा ठेवून त्या दांड्याच्या दोन टोकांवर मुले अथवा माकडे बसवून फिरविण्यासाठी केलेली रचना. (ना.)

घाणयारॉ पु. दुर्गंधयुक्त पानांची एक वनस्पती; घाणेरी.
वि. घाणेरडा; घाणेरा. (गो.)

घाणवट, घाणवटा स्त्री. पु. १. घाणा. २. (तेलाचा) घाणा ज्या जागेवर असतो ती जागा.

घाणवट स्त्री. १. (प्रा.) घाणीची, दुर्गंधयुक्त जागा. २. घाण येणारी, घाणेरडी वस्तू, पदार्थ.
वि. पहा : **घापट**

घाणवड स्त्री. उसाचा रस साठविण्याचे भांडे ठेवण्याकरिता आणि पिळलेली चिपाडे घेता यावी म्हणून माणसाला बसण्यासाठी केलेले डबरे. (माण.)

घाणा पु. १. तीळ, भुईमूग, करडई वगैरेंचे तेल काढण्याचे साधन, यंत्र, साचा; तेलाची गिरणी : 'घाणां गाळिले गुंडे । तेथ तेल ना पेंडी जोडे ।' – ज्ञा १७.४१९. २. तेल्याच्या घाण्याची लाट जीत फिरते ती लाकडी कुंडी. ३. उसाचा रस गाळण्याचा चरक : 'रणभूमीचा घाणा करौनी सरिसां । महाकाळु इक्षु गाळीतुसें जैसा ।' – शिव १०४३. ४. मकर–संक्रांतीच्या दिवशी ब्राह्मणाला दान देण्याकरिता स्त्रिया उखळावर ठेवतात ती धान्याची रास. ५. कांडण्याचा विधी (देवक बसवण्यापूर्वीचा); लग्न, मुंज इ. मंगलकार्यात दुरडीत तांदूळ घालून सौभाग्यवती स्त्रियांनी मंगलगीते गात तांदूळ कांडण्याचा विधी; मंगलविधीच्या आरंभी कांडण्याचा समारंभ. (क्रि. भरणे, घालणे.) ६. चुना मळण्याची घाणी. ७. दौतीत उगीच लेखणी घालून ठेवली असता होणारी विशिष्ट स्थिती, अवस्था. (ल.) कष्टाचे, कंटाळवाणे काम. [सं. घतनम्, क. गाण] (वा.) ० **करणे** – १. (मनुष्याला, प्राण्याला) छळणे; त्रास देणे; गांजणे; सतावून सोडणे; शक्तीबाहेर काम करायला लावणे. २. (कागद, कापड, कपडे इ.) विसकटून टाकणे, अस्ताव्यस्त करणे, चुरडणे, गुधडणे, सुरकुत्यांनी युक्त करणे; घुसडणे. ० **होणे** – कालवाकालव होणे; गोंधळ होणे : 'यामुळे फौजेचा घाणा होऊन येक प्रहर युद्ध जाहले.' – पेद १५.४३. **घाण्यात घालणे** – (एखाद्याला) मोठ्या संकटात लोटणे; पेचात पाडणे. **घाण्यातून पिळणे, काढणे** – १. चेंगरणे; चिरडणे; पिळून काढणे. २. (एखाद्याच्या) शक्तीबाहेरचे काम करायला लावून, नि:सत्त्व, निर्बल बनविणे; (एखाद्याचा) भुसा पाडणे. **घाण्यावर घालणे** – तुरुंगात तेलाच्या घाण्याला जुंपण्याची एक शिक्षा.

घाणा पु. एका वेळी जाते, गिरणी, घाणा इ. मध्ये घालायचा घास; एकवार घालायचे परिमाण; तेल काढण्यासाठी घाण्यात घालायचे तिळाचे, करडईचे एका खेपेचे परिमाण; खापरात भाजण्याच्या, उखळात कांडण्याच्या; तेलात तळण्याच्या पदार्थाचे, धान्याचे, औषधाचे एक वेगळे परिमाण; भर, हप्ता. (वा.) ० **घाटणे** – १. पोह्यांचे भात, लाह्या करायचे दाणे, भाजायचे दाणे वगैरे खापरात किंवा भट्टीत घालून घाटण्याने ढवळून भाजून काढणे, रगडणे किंवा ढवळणे. २. (ल.) शत्रूला चिरडून टाकणे; शत्रूचा नि:पात करणे : 'किती धाडले बहुतची मिरास जसे घाणा घातला ।' – ऐपो २.४६.

घाणा पु. मुलांचा एक खेळ.

घाणा आढी (मल्लखांब) मल्लखांबावर पायांच्या आढ्या घाण्याप्रमाणे फिरवून मारायची उडी.

घाणाते वि. घाण येणारे : 'पुहीयांनी घाणातेनि तोंडेसी बाबापासि उपवास सातरीया ।' – लीचपू ४६६.

घाणाळ वि. लांब नाकाचा. पहा : **घानाळ** [सं. घोणा = नाक]

घाणी स्त्री. १. पहा : **घाणा.** २. चुन्याच्या घाणीचे दगडी चाक.

घाणी स्त्री. घाण; दुर्गंधी; वाईट वास : 'ऐसेनि कहीं विपायें । सदन्ना वरपडा होये । तरी घाणी सुटे तंव राहे । व्याघ्रु जैसा ।' – ज्ञा १७.१५८.

घाणीचा वि. १. वास असलेला. २. (ल.) एखाद्याशी दूरचा संबंध असलेला; लांबच्या नात्याचा.

घाणेकार पु. १. तेली; तेलविक्या. २. घाणा चालविणारा.

घाणेरडा, घाणेरा, घाणेल–ला वि. १. दुर्गंधी, वाईट वास येणारा; वास मारणारा; वाशेरा. २. मलिन; घामट; गलिच्छ; किळसवाणा; ओंगळ; शिसारी, ओकारी, तिटकारा उत्पन्न करणारा कंटाळवाणा; नावडीचा; वाईट (पदार्थ, काम, भाषण, कृती, मनुष्य) : 'पांडव किमपि न वदती तूं वदसि सभेंत शब्द घाणेरे ।' – मोसभा ४.८६. ३. खवचट; कुटाळ; कुचाळ (मनुष्य, भाषण). ४. गदळ; लुच्चा; शिटाऊ; फटलंडी; बदफैली (मनुष्य).

घाणेरी स्त्री. दुर्गंधी येणारी वनस्पती.

घाणेरी – वि. कुशब्द.

घाणेरे न. वेखंड. – (तंजा).

घाणौडी स्त्री. घाणवडी. घाण्याची भोवरी; घाण्याचा बैल फिरण्याचा वर्तुळाकार मार्ग. पहा : **घानो (नौ) डी**

घात पु. १. वध; नाश; ठार मारणे; उच्छेद; संहार : 'पाता त्या उभयांस मी मज विधी घातास योजीतसे ।' – र ११. २. आघात करणे; आघात; प्रहार; मारा; घाव; तडाखा : 'धांवोनि हाणिती रथातें। एकेचि घातें शतचूर्ण ।' – एरुस्व ८.४६. ३. (कामाचा, धंद्याचा, व्यवहाराचा, मसलतीचा, योजनेचा) बिघाड; चक्काचूर; नाश; नासाडी; विध्वंस; उच्छेद; (एखाद्याचा) नाश; हानी; नुकसान : 'म्हणौनि आपणचि आपणपेया । घातु कीजतु असे धनंजया ।' – ज्ञा ६.७०. [सं. हन्]

घात पु. (ग.) समान संख्यांचा गुणाकार; एका संख्येला त्याच संख्येने गुणिले असता त्याला त्या संख्येचा घात केला असे म्हणतात. तीन या संख्येचा नऊ हा द्विघात व सत्तावीस हा त्रिघात आहे. [सं. घात = गुणाकार]

घात स्त्री. १. (शेती इत्यादिकांच्या कामांची, ऋतुपरत्वे येणाऱ्या, पिकणाऱ्या धान्याची) योग्य वेळ; मोसम; हंगाम. उदा. पेरण्याची घात; कापण्याची घात इ. : 'या दिवसांत उत्तरा व हस्त या पावसाने पेरणीस घात थोडी उशिरां आली आहे.' – खेया १६. २. (ल.) भरभराट; चलती (वा.) **० घेणे –** (एखाद्या मनुष्याचा, कार्याचा, मसलतीचा) आणीबाणीच्या वेळी नाश करणे, मातेरे करणे; बुडवणे; (एखाद्याला) आलेली संधी घालवून देऊन त्याची निराशा करून त्याला लुबाडणे; (एखाद्या मनुष्याची, कामाची) संधी दवडणे, हुकवणे.

घात स्त्री. १. हंगाम. २. रंध्याचे छिद्र. (झाडी)

घात वि. अशुभ; अमंगल; अनिष्ट. [सं. घात्य]

घातक–की वि. घातुक; हिंसक; मारक; नाशकारक; अनर्थकारक; अपकारक; अपायकारक; दुष्ट; विश्वासघातकी; ठार मारणारा.[सं.]

घातकरी वि. १. ठार मारणारा; वध करणारा; मारेकरी; प्राण घेणारा. २. उपद्रव करणारा; नुकसान करणारा; अपायकारक; नाशकारक (वस्तू, मनुष्य, जिंदगी).

घातघाई स्त्री. हाणाहाणी : 'घातघाईचे तुरळक सामने होत होते.' – श्रीयो १.८१.

घातघेणा, घातघेणे–ण्या वि. अवसानघातकी; आणीबाणीच्या वेळी घात, दगा करणारा : 'जैसा वैद्य दुराचारी । केली सर्वस्वें बोहरी । आणि सेखीं भीड करी । घात घेणा ।' – दास ५.२.२६.

घातचक्र न. एका संकटामुळे ओढवणारे दुसरे, दुसऱ्यामुळे तिसरे, तिसऱ्यातून पुन्हा पहिले अशी संकटांची परंपरा : 'यातून एक घातचक्र निर्माण झालेले आहे.' – अम ४७३.

घातचतुर्दशी स्त्री. भाद्रपद वद्य चतुर्दशी. या दिवशी लढाईत अथवा अपघाताने मेलेल्या पितराचे महालय श्राद्ध करतात. [सं.]

घातचतुष्टय न. (ज्यो.) घातकारक, अनिष्ट असा चौकडा; घातचंद्र, घाततिथी, घातनक्षत्र व घातवार यांचा समूह.

घातचंद्र पु. (ज्यो.) अशुभनक्षत्री आलेला अनिष्टकारक चंद्र. [सं.]

घातड स्त्री. (नाविक) घामत (गलबतातील, होडीतील) पाणी काढण्याची जागा. (हेट) पहा : **गमतड**

घातणे अक्रि. घात करणे; मारणे; नाश करणे. [सं. घात्]

घातपात पु. १. (व्यापक) ठार मारणे; पंगू, लंगडा, अधू करणे; हत्या, अपकार करणे. २. जाळपोळ; नाश; वध; तोटा; इजा; अपकार. ३. गुप्तपणे खून, जाळपोळ, दुसऱ्याचे विशेषत: सरकार, समाज इ. चे नुकसान होईल असे जाणूनबुजून केलेले हिंसक कृत्य; दंगा.

घातपाती वि. १. घातपात करण्याचा ज्याचा स्वभाव आहे तो; अपकारी; दुष्ट. २. जाळपोळ, हिंसक कृत्ये करून सरकारला जर्जर करणारा : 'घातपाती चळवळ निजामाच्या राजवटीविरुद्ध मराठवाड्यातही चालू होती.' – माजी ५३३.

घातप्रकाशक वि. (ग.) पहा : **घातांक**

घातमारॉ, घातमारावणॉ वि. घातकी; दुष्ट. (गो.)

घातमोड स्त्री. ठरावीक गोष्ट ठरावीक वेळी न होणे : 'पाऊस रात्रभर पडतच होता.. त्यामुळे घातमोड होऊन शेतीची कामे बंद होती.' – गार ३०.

घातवाफ स्त्री. एकदा पर्जन्यवृष्टी होऊन गेल्यानंतर पुन्हा पर्जन्यवृष्टी होईपर्यंतचा (जमिनीतून वाफ इ. निघत असलेला) पेरणीला अत्यंत अनुकूल असा काळ. (क्रि. सांभाळणे, साधणे, जपणे.) : 'क्षेत्र गुणें बीज अंकुरे । तें अनंतधावृत्ती विकारें । घातवाफ ते आदरें । साधूनि घेतली ।' – गीता १३.१७६.

घातवेळ स्त्री. १. घातुक, अनिष्ट वेळ. २. मरणाचा, घोर संकटाचा, अरिष्टाचा समय; जिवावरचा प्रसंग; प्राणसंकटाची वेळ.

घातांक पु. (ग.) एखाद्या संख्येला त्याच संख्येने किती वेळा गुणावे हे दर्शविणारा आणि त्याच संख्येच्या डोक्यावर लिहिलेला अंक. उदा. – $२^५$ = २ ला २ ने ५ वेळा गुणावे. २ × २ × २ × २ × २.

घातांकी वृद्धी (वै.) घातांकाप्रमाणे (२–४–८–१६) होत जाणारी वाढ. साधारणपणे पेशी व जंतूंची वाढ याप्रमाणे होते.

घाती पु. हंता; मारणारा : 'घाती अरिष्टासुरा ।' – गरा ७४.

घातीचे दिवस १. हंगामाचे दिवस. २. (ल.) सत्तेचा, चलतीचा, भरभराटीचा, उपभोगाचा काळ, दिवस.

घातीव न. प्राणघातक शस्त्र : 'कीं अर्थसाधक श्रोता पूर्ण । परी घातीवे घेणार प्राण ।' – नव १८.१६९.

घातुक वि. १. घातक; हिंसक; ठार मारणारा; प्राणनाशक; क्रूर; नाश करणारा : 'घातुक पक्षी.' – प्राणिमो ६३. २. अपायकारक; अनिष्ट; दुष्ट. पहा : **घातक**

घानडी स्त्री. घाणा.

घानमऊत स्त्री. १. संकट. २. अपघात. (झाडी)

घानवत पु. भुईकोट.

घाना पु. १. घाणा. २. चुराडा : 'घाना रिपुचा केला ।' – गरा १०७.

घानाळ वि. लांब नाकाचा : 'दांतिरें बोचिरें घानाळ । प्राणहीन श्रोत्रहीन बरळ ।' – दास ३.६.४३. [सं. घोण = नाक]

घानोड स्त्री. ऊस पिळण्याचे गुऱ्हाळ. (झाडी)

घानो(नौ)डी स्त्री. घाण्याचा बैल फिरण्याचा गोल मार्ग; घाण्याची

भोवरी; घाण्याचा मार्ग (सामा.) घाणा : 'कर्मभूमीचिए घानौडि। बांधौनि मिथ्या ज्ञानाची झांपडी। काळें भवंडिलीं बापुडीं। जीव पशुवें।।' – ऋ ३०; 'डोळां अज्ञानें झांपडी। भोवें देहबुद्धि घानोडी।' – दावि ३५४.

घापणे, घापतणे उक्रि. १. घालणे; घातले जाणे : 'नाना गगनौलाचिया माळा। वांझेच्या जालया गळां। घापती तो सोहळा। पाविजतसे।।' – अमृ ७.८२. २. घालवून देणे; बाहेर टाकणे; सोडणे : 'जरी आत्मा तूं एकसरा। हेंही म्हणतां दातारा। तरी आंतुल तूं बाहेरा। घापतासी।' – ज्ञा १८.२३. [सं. गृभ्]

घापी स्त्री. खलपी; लाकडाचा तुकडा. (झाडी)

घाब स्त्री. डोंगराच्या बाजूत, कातळात पडलेले खिंडार, भोक, भगदाड; आत जाता येण्याजोगे डोंगराचे बीळ. (राजा.) [सं. गर्भ]

घाबरगुंडी स्त्री. घाबरटपणा; भेदरलेली, घाबरलेली अवस्था.

घाबरट वि. भित्रा.

घाब (बि) रणे, घाभरावणे अक्रि. १. (दुःख, शोक, वेदना, आकस्मिक क्षोभ, मनोविकार इ. नी) आक्रांत, आकुल होणे. २. बावरणे; भयभीत होणे; गांगरून जाणे; गोंधळणे; काही सुचेनासे होणे. [सं. गव्हर]

घाब(बि)रा वि. १. (दुःख, शोक, वेदना, भीती इत्यादिकांनी) व्याकूळ झालेला; घाबरलेला; बावरलेला; भीतीने गोंधळून, गांगरून गेलेला. २. उतावळा : 'म्हणा मज उताविळा गुणचि घेतला घाबरें। असो मन असेंचि बा भजकबर्हिमेघा बरें।' – केका ४५. (वा.) **० पडणे –** भीती वाटणे; काळजी वाटणे : 'अधीमधीच आता काय घोटाळा होतोय का काय, असं वाटून तिला घाबरा पडला होता.' – ऊन १.

घाबराघुबरा वि. भेदरलेला; अतिशय घाबरलेला.

घाबऱ्याघाबऱ्या क्रिवि. भीतभीत; भीती वाटून : 'चुकतंय का काही? दास्या घाबऱ्या घाबऱ्या बोलला.' – राकाधाका ३.

घाबाड पहा : **घबाड**

घाम पु. १. ऊन, ज्वर, उष्णता, श्रम इत्यादिकांनी अंगाच्या त्वचेच्या छिद्रांतून येणारे पाणी; घर्म; स्वेद; स्वेदोदक. २. ओले लाकूड जळत असताना त्यातून बाहेर येणारा द्रव. ३. विस्तवावर पाणी असलेले भांडे ठेवून त्यावर झाकण ठेवले असता झाकणाच्या आतल्या बाजूला जमणारे (वाफेच्या) पाण्याचे थेंब. ४. कठोर हृदयाला, पाषाणहृदयाला फुटलेला पाझर; दया; द्रव.[सं. घर्म] (वा.) **० फुटणे, ० सुटणे –** घाबरणे; भीतीने अंगाला दरदरून घाम येणे : 'राघोबादादांना हें भाषण ऐकतांच घाम सुटला.' – इंप ६७. **० गाळणे –** अतिशय श्रम करणे.

घामगंडा पु. उष्णतेमुळे उत्पन्न होणारी पुळी. (ना.) [सं. घर्म]

घाम(मा–मे)घूम स्त्री. धापा टाकण्याची, गुदमरण्याची, श्रमाने शीण आल्याची, उकडण्याची अवस्था; (श्रमाने, उन्हाने, भीतीने) घामाने डबडबण्याची स्थिती; अंगातून घामाच्या धारा निघून जीव कासावीस झालेली अवस्था.

वि. (श्रमाने, भीतीने, उन्हाने) घाम सुटलेले; घामाने डबडबलेले (अंग, मनुष्य); श्रमाने थकलेला; धापा, सुस्कारे टाकीत असलेला.

घामट–ड वि. ओंगळ; अस्वच्छ; घाणेरडा; गैदी; ज्याच्या अंगाला नेहमी घाम येऊन घाण येते असा; मलिन.

घामटघाण, घामठा(ष्टा, सा)ण स्त्री. घामाची घाण, दुर्गंध.

घामटा पु. १. अतिश्रमामुळे आलेला घाम; निढळाचा घाम. (क्रि. काढणे, निघणे.) २. अतिशय श्रमाची अवस्था; पिट्टा पडणे. (को.)

घामणे सक्रि. ठार मारणे; नाश करणे : 'शुंभ निशुंभाचिया घामणारा। मोहनी रूप धरा दैत्यांतका।' – निगा २०९.

घामत स्त्री. (नाविक) होडीत, गलबतात पाझरून आलेले समुद्राचे पाणी; घमत. (को. कु. हेट) : 'गलबतास गोळे तीन लागू होऊन फुटले. आंत पाणी भरले. पुढे चालावयाचे राहिले. घामतात लोक बसले.' – पेद ३३.२३७.

घामल, घामलवामल वि. घामाने चिंब. (अहि.)

घामसी स्त्री. मूर्च्छा. (झाडी)

घामागार वि. विपुल : 'वांगी फुलं घामागार सरकार।' – लोसामा ४.९.

घामाझा(झो)क(को)ळ वि. घामाने डबडबलेला; घामाघूम. (क्रि. होणे.) (व.)

घामे (मै) जणे, घामेणे अक्रि. १. श्रमादिकांमुळे शरीर घामाने भिजणे : 'ऐसा मीचि एक जगीं। जया नाना कर्मांची वज्रांगी। तेणें वियोग दुःखाचिया आगी। तनु घामैजेना।।' – ज्ञाप्र ११३४; 'धाके धाकें घामेजत। दडी देत गुप्तत्वें।' – एभा १०.८. (राजा.) २. श्रमी होणे; श्रमाने थकणे, शिणणे : 'नाना चराचरीं भूतीं। दाटणी नव्हे क्षिती। तैसा नाना द्वंद्वीं प्राप्ती। घामेजेना।।' – ज्ञा १३.३४९. ३. (ल.) द्रवणे; कींव, दया येणे; हृदयाला पाझर फुटणे : 'चित्ती अंध म्हणे सुत शत वधितां, लेशही न घामेला।' – मोआश्रम १.२२.

घामेल–ला वि. घामाने डबडबलेला; घाम आलेला : 'ये उठुनिहि घामेला, जनभावी वांचला जरि मघां मेला।' – मोकृष्ण ३६.१०.

घामोळी स्त्री. घामाने अंगावर उठणारी पुळी, पुरळ, पुटकुळी.

घामोळे न. १. जिच्या योगाने अंगावर काटे उभे राहतात, अंग चुणचुणते अशी उष्णता, ऊन. २. घामाने अंगावर उठणारे पुरळ; घामोळी. ३. घाम शोषून घेण्याचे साधन; अंगरख्याच्या बगलेला, पागोट्याला, आतील बाजूला लावलेला कापडाचा तुकडा, फडके; जोड्याच्या आतल्या बाजूला लावलेला कातड्याचा तुकडा; खोगिराखाली लावलेला, ठेवलेला बुर्णुसाचा तुकडा.

घाम्यौचें अक्रि. घाम सुटणे, येणे; घामवणे; घामणे. (गो.)

घाय पु. जखम; शस्त्राचा वार, घाव, आघात : 'डोळां हरळ न विरे। पायीं कोत न जिरे।' – ज्ञा १३.५३९. [सं. घात = प्रहार] (वा.) **घायावर घाय लावणे –** जखमेवर मीठ टाकणे; दुःखावर डागण्या देणे; मेलेल्यास मारणे. **घायास येणे –** संकटाच्या, नुकसानीच्या, दुःखाच्या परिस्थितीत पडणे, सापडणे.

घाय स्त्री. बाजू; अंग : 'तैं जरासुंद घाया आला।' – शिव ४४०.

घाय स्त्री. त्वरा; जलदी; घाई. पहा : **घाई** [सं. गति]

घायक(खे)टर वि. कोडगा; निगरगट्ट; लाथाबुक्याखाऊ; निसूक; कितीही मारले, रागावले तरी न सुधारणारा. (राजा.)

घायकुठार, घायखोर वि. थोडीशी इजा झाली असता मोठ्याने ओरडून फार इजा झाली आहे असे भासविणारा; कांगावखोर.

घायकुतेपणा पु. (मनाची) दम न निघण्यासारखी अवस्था; अस्वस्थता; उतावळेपणा; घायकूत करण्याचा स्वभाव : 'त्याचा उतावळेपणा, घायकुतेपणा, प्रेमळपणा व रागीटपणा हे सर्व गुण अतिरेकामुळे हास्यास्पद होतात.' – सुदे १५१.

घायकुत्या वि. घायकूत करण्याचा, घाई करण्याचा, उतावळेपणाचा स्वभाव असणारा; हुलहुल्या; स्वत: घायकूत करणारा किंवा दुसऱ्याला घायकूत करायला लावणारा : 'परंतु बळवंतराव घायकुत्या माणूस नव्हता.' – भयंकर दिव्य.

घायकू(क)त स्त्री. न. १. मोठी धांदल; उतावळेपणा; तातडी. (क्रि. येणे.) २. (एखादे काम करण्याबद्दल) दुसऱ्याला लावलेली निकड, तगादा, नेट, आग्रह. (क्रि. लावणे, देणे, करणे, मांडणे.) ३. ताप येण्यापूर्वी होणारी तगमग, काहिली, अस्वस्थता. (क्रि. येणे.) ४. खाजवण्याची अनिवार प्रवृत्ती, अतिशय खांज; खाजेची इसळी. (क्रि. येणे.) [सं. हय् + कुथ्]

घायखंडी घाव घालणे आणि पेलणे : 'घायखंडी हानतासि सरिये।' – शिव १०६२.

घायटा पु. घाव; प्रहार; तडाखा; घायवटा; घावटा : 'ठेंचा लागती मोडती कांटे। विझती शस्त्रांचे घायटे।' – दास ३.७.४

घायटा पु. १. धडाका; गर्दी : 'मी कामाचा नुसता घायटा उसळून सोडला.' – रैत १०९. २.ओरडा. (क्रि. उडवणे.) : 'मेली रं मेली पोरगी, आबांनी घायटा उडवला.' – बेटी १२.

घायडाय पु. आणीबाणीचा प्रसंग. पहा : **घावडाव**

घायतळ न. १. घेरी; भोवळ; भोवंड; चक्कर. (क्रि. येणे.) २. आघाताने, तडाख्याने येणारा बेशुद्धपणा; मूर्च्छा. (क्रि. येणे.) ३. (ल.) विस्मय; आश्चर्य; अचंबा. ४. पहा : **घायातळ** [सं. घात + तल]

घायतावणे उक्रि. घायकुतीस येणे; घाई, उतावीळ करणे; घाबरविणे; गडबड, लगबग करणे, करायला लावणे; दुसरा घाबरेल अशी त्याला घाई करणे. (को.) [सं. घात + तापनम्]

घायतेल न. बिबा, राळ, आंबेहळद, गंधक, मोरचूद, रुईचे पान इ. तेलात मिसळून खरूज इत्यादिकांना लावण्याकरिता केलेले मलम. याला भडकतेल असेही म्हणतात.

घायप(पा)त, घायमार–री स्त्री. कोरफडीसारखी दिसणारी अतिशय उपयुक्त व औषधी वनस्पती. हिंदुस्थानातील उष्ण व सर्द प्रदेशात ही वनस्पती होते. हिच्यापासून निघणाऱ्या तंतूचे वाखाचे दोर, चटया, कुंचले इ. करतात. [सं. घातपत्र]

घायभर पु. जोरदार प्रहार; सपाटून लागलेला वार; जोराचा घाव.

घायली स्त्री. झुंजणाऱ्या, लढणाऱ्या दोन जनावरांमध्ये पडणाऱ्या तिसऱ्या जनावराला म्हणतात.

घायवट न. १. जखम; व्रण; घाव.
वि. घायाळ; जखमी झालेला : 'अडखळूनि आदळे पोट। म्हणे मी घायवट पडलों कीं।' – एभा २२.६२५.

घायवटणे अक्रि. १. घाव लागून, जखम होऊन जर्जर होणे; घायाळ होणे. २. (ल.) मनाला अतिशय अस्वस्थता वाटणे; कसेसेच वाटणे; आजारी असणे, होणे.

घायवटा पु. १.घाव; तडाखा; प्रहार. २.जखम; व्रण. ३.अतिशय शीण.

घायवारा–रे पु. न. १. जखम; व्रण; शस्त्राचा वार. २. घाव लागण्याची किंवा घाव लागून व्याकूळ झाल्यामुळे उत्पन्न होणारी भीती: 'वीरीं घेतलें घायवारें। म्हणती पळा रे पळा रे।' – एरुस्व १२.१९. (क्रि. घेणे.)

घाया नसते मीस (खोटे सोंग). – (तंजा.)

घायापाया क्रिवि. तातडीने; घाईने; जलद: 'तो घायाघाया कैवल्य देतु असे।' – लीचउ १९३.

घायातळ स्त्री. खालचा भाग. (वा.) **घायातळी आणणे –** खाली, जमिनीवर पाडणे : 'धनुष्य घालोनिया गळां। वोढुनि आणिला घायातळां।' – एरुस्व १२.१३६.

घायाळ पहा : **घायपात**

घायाळ वि. १. जखमी झालेला; शस्त्राचे वार ज्याच्या अंगावर झाले आहेत असा; शारीरिक वा मानसिक आघाताने, घावाने, व्याकूळ झालेला : 'रण तुंबळ, घुमतें घायाळ, गणती नाहीं मुडद्यांची।' – ऐपो १८५. २. (ल.) (दाव्यात, वादात) चीत, कुंठित, प्रतिहत केलेला; पराजय, कुप्रसिद्धी इ. कारणांमुळे मानखंडना पावलेला. ३. कमजोर झालेला (रोग, शत्रू इ.). ४. (लाजिरवाण्या कृत्यामुळे) मान खाली घालणारा; समाजात (आपले) तोंड लपवणारा. [सं. घात + इल्ल]

घायाळ चतुर्दशी पहा : **घात चतुर्दशी**

घायेवाट वि. घायाळ. 'घायेवाटे होति सिवनां : तया उपहुडुचि वना :' रुस्व ६६६.

घायेसुटी स्त्री. घावांचा वर्षाव : 'होतसे घायेसुटी।' – गरा ५४.

घार स्त्री. एक पक्षिविशेष : 'गीध घारी कांडेसरे' – दावि २२४. [सं. गृध्] (वा.) **घारीसारखी वाट पाहणे –** १. एखाद्याच्या येण्याकडे (घारीप्रमाणे त्यावर हल्ला करण्याकरिता) बारीक लक्ष देऊन टपून बसणे; डोळ्यांत तेल घालून बसणे. प्रतिक्षा करणे; अतिशय वाट पहाणे. २. गिध; गिधाड. – (तंजा).

घारकू(वी)ट न. तांदूळ व उडीद एके ठिकाणी दळून केलेले जाडे पीठ.

घारगा पु. १. एक खाद्यपदार्थ; पक्वान्न; तांदळाच्या, गव्हाच्या रव्यात किंवा सोजीत गूळ घालून त्याची धापटी – चांदकी करून ही तुपात तळतात. तांबड्या भोपळ्यात गूळ घालून त्यात कणिक मळून त्याचा गोळा करून त्याच्या थापट्या तुपात तळून काढतात. त्याला भोपळ्याचे घारगे म्हणतात. २. श्राद्धाच्या वेळी केले जाणारे वडे. (घाऱ्या.) – (तंजा.) [गुज. घारी, का. गारिगे]

घारणे अक्रि. १. व्यापणे; चढणे; घेरणे : 'नेणें आपुले पारिखे। घारलें तें आपुल्या दु:खें।' – निगा २८३. २. कैफ इत्यादिकांमुळे उन्मत्त होणे, माजणे; झिंगणे. ३. चढणे; घेरणे; बाधा होणे; बाधणे (विष इ.); पसरणे : 'परि तें बुद्धि विषयविखें। घारिली होती।।' – ज्ञा १०.१५८. ४. शिंपडणे; भिजविणे. [सं. घृ]

घारपट पु. घारीसारखा केलेला कागदाचा पतंग. (बे.)

घारपीठ, घारवडा पु. वड्याचा एक प्रकार; आयतोळा.

घारमोर न. लहान मुलांचा आळंचो माळंचोसारखा एक खेळ. (वा.) ०

करणे – लहान मुलाला पायाच्या धुरीवर घेऊन (घारीप्रमाणे) उंच करणे.

घारवड स्त्री. लहान घार.

घारवीट पहा : **घारकूट**

घारा वि. रंगविशेष; १. मांजराच्या डोळ्यांच्या रंगाचा (डोळा). २. घारडोळ्या (माणूस). [सं. गहिर]

घारी स्त्री. अव. पुरण घालून तळलेली गव्हाची पुरी; घारगा : 'सफेद फेणिया पदरोपदरीं । शुद्ध शर्करा भरलीं भरीं । अमृत फळें ठेविलीं वरी । अभेद घारी वाढल्या ।'–एरुस्व १४.१२०. [सं. घार्ति (कि) का]

घारीपुरी स्त्री. घारी; पुरीचा एक प्रकार : 'घाऱ्यापुऱ्या पंच मधुरस । श्रद्धापूर्वक ठेविल्या ।' – नव ९.११७.

घारुड न. १. घारींचा समुदाय. २. घार. (को.)

घारे न. झरोका; गवाक्ष.

घारेला, घारोळा वि. १. किंचित, थोडासा घारा (डोळा). २. किंचित, थोडासा घारडोळ्या; गारोळा.

घाऱ्या वि. घारोळ्या.

घाल स्त्री. १. (एखाद्यावर केलेला) हल्ला; चढाई; घाला; चाल. (क्रि. घालणे, पडणे.) २. (ल.) (आर्थिक) नाश; आघात; खराबी; नुकसानी. (क्रि. घालणे. पाडणे, पडणे) ३. (सामा.) (दैवाने, मनुष्याने, एखाद्यावर आणलेले) महासंकट; अनर्थ; आपत्ती. (क्रि. पडणे.)(वा.)**घाल घालणे –** चहाडी करणे : '(हा नागदेओ) सदाकदा गोसावीयांपुढां माझा घालु घाली ।' – लीचउ १८९.

घालकाढ स्त्री. (काही जिन्नस, सामान इ. विशिष्ट ठिकाणी) पुन्हा पुन्हा घालण्याची काढण्याची क्रिया, व्यापार; उपासाउपस. उगीच हालवाहालव.

घालकाढी स्त्री. आवकजावक; दप्तरातील कागद बाहेर दिले असताना व ते परत आले असताना नोंदण्याची वही.

घालकाढ्या पु. घालमेल करणारा; उपद्व्यापी; खेकटी उत्पन्न करणारा.

घालघसर स्त्री. १. लांबणीवर टाकणे; टंगळमंगळ; दिरंगाई; ढिलाई; चालढकल. २. रपाटणे; खच्चून भरणे; कोंबणे; ठासणे; कोंदून भरणे. ३. अनास्था; आळसामुळे दुर्लक्ष; हेळसांड. पहा : **घालघुसड**

घालघसऱ्या वि. दिरंगाई, टंगळमंगळ, चालढकल करणारा.

घालघुसड स्त्री. १. (एखादे काम, धंदा इ.) स्वैरपणाने, मनसोक्तपणे, दपटणे; पुढे चालवणे, ढकलणे. २. दडपून, गडबडगुंडा करून एखादे काम करण्याची क्रिया. ३. (जमाखर्च इत्यादिकांत) निष्काळजीपणाने, लबाडीने बाबी, रकमा घुसडणे. ४. (मूळ ग्रंथात पदरचा भाग) लबाडीने दडपून देणे; घुसडणे. ५. गोंधळ, घोटाळा इत्यादींनी युक्त भाषण, व्यवहार; लबाडीचा व्यवहार : 'मी वचन मोडून कांहीं घालघुसड केली तर मग त्याला काय समजणार आहे – बाल २.१८८.

घालघोल पु. वाटाघाट; माथेफोड.

घालटा पु. डहंळला. – (तंजा.)

घालण स्त्री. (अशिष्ट) १. संकट; आपत्ती (क्रि. घालणे) : 'बहू घालणीं घातलें पूर्वपापें ।' – दावि १६५. २. मार्गातील अडण्याचे, अडकण्याचे, रुतण्याचे, फसण्याचे ठिकाण; रुतण; दलदल. ३. (ल.) अवघड, दुर्बोध कविता. ४. नुकसानीची बाब; बुडीचा धंदा; आतबट्ट्याचा व्यवहार. ५. चोर, दरोडेखोर, लुटारू इत्यादिकांचा उपद्रव असलेले मार्गावरील ठिकाण, जागा; चोरखिंड; घालणीचे रान : 'चोरें पाळतीलें घालण पाहोनी ।' – रामदासी २.१३१. ६. (ल.) फशी, तोंडघशी पडण्याची अवस्था; तोहमत. (वा.) **घालणीस पडणे –** १. मोठ्या व दु:खकारक अशा असहिष्णुतेला, उतावळेपणाला बळी पडणे. २. उतावळेपणाने नको ते करणे.

घालणी स्त्री. घाला; छापा; हल्ला : 'मग अवचीती घालूं घालणी । इंद्रिएग्रामी ।' – ऋ ५६.

घालणे न. हल्ला; घाला; छापा : 'अनुर्धा कारणें । पडलें अवचीतें घालणें ।' – उषा ८९९.

घालणे सक्रि. १. ठेवणे; राखणे; स्थित करणे. २. सोडणे; टाकणे; फेकणे; : 'उडी घालितो संकटीं स्वामि तैसा ।' – राम ३७. ३. उडी टाकणे : 'वणवा मियां आघवा । पांखेंचि पुसोनि घेयावा । पतंगु पां हांवा । घाली जेवीं ।।' – ज्ञा १४.१९१. ४. जडविणे; लावणे; तल्लीन करणे : 'स्वरुपीं घातलें मना । यातनेसी केली यातना ।' – दास ५.९.५४. ५. मारणे; फेकणे; प्रक्षेपणे : 'अभिमंत्रुनी पंनकासस्त्रें । बाणु घातला ईस्वरें ।' – उषा १६९४. ६. ओतणे. ७. पसरणे; बाहेर मांडणे; रचणे; ठेवणे : 'आकाशीं घातीला मंडप ।' – मसाप २.२६. ८. (आत) खुपसणे; भोसकणे. ९. (एखाद्या पदार्थात दुसरा पदार्थ) मिसळणे; प्रविष्ट करणे. १०. (एखाद्या कामाला मनुष्य, जनावर) लावणे; जुंपणे; नेमणे; योजणे. ११. (दुकान, शाळा, बाजार इ.) मांडणे; स्थापन करणे; सुरू करणे.१२. (अन्न खाद्यपदार्थ इ.) वाढणे. जसे :– मला भात घाल. १३. (अंगावर धारण करण्याच्या विवक्षित वस्तू) धारण करणे; परिधान करणे; चढवणे. (वा.) **घालून घेणे –** (हट्टाने, जोराने, वेगासरशी) स्वत:चे शरीर, अंगावरून खाली किंवा आत टाकणे, फेकणे; एकदम अंग टाकणे : 'नदी भरतां भरतां घालुनिया घेती ।' – रामदास – रामदासी भा १५. पृ. २६४. **घालूनपाडून बोलणे –** वक्रोक्तीने उपरोधिक भाषेत निंदा करणे, दोष देणे; टोमणा मारणे; खोचून बोलणे :'टोंचून, घालूनपाडून बोलण्याच्या कामात बायका पटाईत असतात.'– संगीत मेनका ११. **एखाद्यावर घालणे –** एखाद्याला दोष देणे, लावणे : 'कष्टी होऊनियां लेखीं । प्रारब्धावरी घालिती ।'– दास १२.२.५. [सं. ग्रह्.]

घालणे सक्रि. एखाद्यावर अनिष्ट संकट आणणे; गोत्यात आणणे; (एखाद्याच्या) नुकसानीला कारण होणे; गंडा घालणे; (एखाद्याला) बुडवणे.

घालणे सक्रि. (मूल) प्रसवणे; (अंडी) टाकणे; गाळणे.

घालणे सक्रि. (प्रश्न, उदाहरण, कोडे इ.) सोडवायला देणे, सांगणे; हिशोब सांगणे.

घालणे सक्रि. एखाद्याला एखादी गोष्ट करायला अथवा न करायला शपथ इ. देणे; शपथ इत्यादिकांचा जोर; आग्रह करणे; शपथ घालणे.

घालणे सक्रि. १. (दरारा, धाक, भीती, भूल इ.) उत्पन्न करणे; उपस्थित करणे; उठवणे; उद्दीपित करणे. २. (वाद, गोंधळ इ.) करणे, माजविणे.

घालणे सक्रि. (भिंत, कूड इ.) बांधणे; उभारणे; रचणे.

घालणे सक्रि. (भोजन, समाराधना, ब्राह्मण, मित्र इत्यादिकांना) अर्पण करणे, देणे.

घालणे सक्रि. १. (एखादे काम) सुरू करणे, आरंभणे. २. (चाल, संप्रदाय) प्रचलित करणे, रूढ करणे.

घालणे सक्रि. (सणाच्या दिवशी पुरण इ. खाद्यपदार्थ) खायला, नैवेद्याला सिद्ध करणे; मंगलप्रसंगी ब्राह्मण जेवायला घालणे. घालणे हा धातू काही नामांना जोडूनही वापरतात. उदा. (गोष्ट) कानावर घालणे, (मुलाला) पायावर घालणे इ. या धातूचे अर्थ अनेक आहेत, पण त्या सर्वांचा भावार्थ ठेवणे, स्थापणे, मांडणे, लावणे असा आहे.

घालन पु. धोका; संकट.

घालन घालणे आरोप करणे; आळ घेणे.

घालपांड्या पु. १. बिनदिक्कत (दुसऱ्याचा) घात, नाश करणारा; कळलाव्या, आगलाव्या, घातकी मनुष्य. २. पहा : **घालवेडा**

घालपिसा पहा : **घालवेडा**

घालपिसे न. वेडाचे ढोंग; बाह्यात्कारी धारण केलेला बावळेपणा, खुळेपणा.

घालफेड स्त्री. घालमेल; तळमळ; काहिली; (ताप इत्यादींनी) जीव कासावीस होऊन शरीराची होणारी घालमेल : 'नवकिसलयतल्पीं तीजला नीजवीती। घडिघडि करिते हे भीमकी घालफेडी।' – सारुह ३.६५.

घालफेल स्त्री. (आजारी मनुष्याची होणारी) तळमळ; तगमग; कासाविसी; काहिली; तापाच्या काहिलीमुळे आजारी माणसाने इतस्ततः केलेले शरीराचे चलनवलन. (को.)

घालमिल, घालमेल–ली स्त्री. १. (ताप इत्यादिकांच्या योगाने होणारी जिवाची) तगमग, तळमळ, कासाविसी, काहिली : 'नारायण नांदे जयाचिये ठायीं। सहज तेथें नाहीं घालमेली।' – तुगा २९. पहा : **घालफेल**. २. तगमगीमुळे (आजारी माणसाने चालवलेली शरीराची) चळवळ, चुळबुळ : 'तिचा जीव घालमेल घालूं लागला.'– चंद्र १४०. ३. पोटातील क्षुब्धता, कालवाकालव. ४. (पित्तक्षोभामुळे उसासणे; उसासा येणे; (उकाड्यामुळे, उबाऱ्यामुळे शरीराचा होणारा) गदका; गदमदणे. पहा : **चबढब** [क. घालुमेलु]

घालमेल–ली स्त्री. १. (वस्तूंचा, कामांचा) घोटाळा, अस्ताव्यस्तपणा, अव्यवस्थितपणा, गोंधळ. २. धांदल; गडबड; गर्दी; धामधूम; धुमाळी. ३. सरमिसळ; सर्व एकांत एक मिसळणे; उलथापालथ. ४. (ल.) एकसारखी मसलत, हिकमत, युक्ती, बेत करणे; डावपेच खेळणे; साहसाच्या, धाडसाच्या कामात स्वतःला गुंतवणे; (उपजीविकेसाठी) अनेक उलाढाली करणे; मामलत इ. व्यवहारांची अदलाबदल, घटवटना. ५. (एखादे कार्य जुळवून, घडवून आणण्याची अनेक प्रकारची) खटपट, मसलत, गडबड, धांदल. ६. सुरळीतपणे चाललेल्या कामात, क्रमात झालेला अडथळा, भंग.

घालमेल–ली स्त्री. १. व्यवहारातील, हिशोबातील अफरातफर, डावपेच, घोटाळा, गोंधळ, छक्केपंजे, लपंडाव, लुच्चेगिरी. २. भानगड. (गो.)

घालमेलणे अक्रि. घालमेल, उलथापालथ, गोंधळ, घोटाळा करणे.

घालमेली स्त्री.अव. हेलपाटे; येरझारा. (गो.)

घालमेल्या–ली वि. १. घालमेल, चबढब, अव्यवस्था करण्याचा स्वभाव असणारा. २ चळवळ्या; खटपटी, नाना युक्त्या, हिकमती काढणारा, योजणारा; उलाढाली; कारस्थानी.

घालव(वि)णे उक्रि. १. विवक्षित स्थळी असलेला (पदार्थ, मनुष्य) दूर करणे; काढून टाकणे; हाकलणे; हाकून देणे : 'यांना एकदा येथून घालवून दिलें होते.' – विक्षिप्त २.४.३. २. धाडणे; पाठविणे; पिटाळणे; निरोप देणे. ३. (आळ, आरोप इत्यादिकांचे) निराकरण, निरसन, निरास करणे; काढून टाकणे; (प्रायश्चित्त इ. नी पाप इ.) क्षालन करणे; नाहीसे करणे; धुवून टाकणे. ४. (पैसा, संपत्ती इ.) उधळणे, उडवणे, बेफामपणे खर्च करणे. ५. (वेळ, आरोग्य, तारुण्य इ. ची) नासाडी करणे, आळसाने दवडणे, नष्ट करणे. ६. काढणे; कंठणे; अतिक्रांत करणे : 'घालवि दिवसा वनांतरी बसुनि।' – विवि ८–६–१२०. ७. (अब्रू, पत, संधी, लाभ इ.) गमावणे. ८. (काम, धंदा इ. ची) नासाडी करणे; चुथडा करणे; विघात करणे; मातेरे करणे; धुळीस मिळवणे. ९. (ग.) (एका संख्येतून दुसरी संख्या) वजा, बाद करणे; वगळणे; काढून टाकणे; कमी करणे. १०. (एखाद्या मनुष्याला त्याला जायच्या ठिकाणापर्यंत किंवा मार्गाच्या काही अंतरापर्यंत) पोचविणे; सोबत करणे; निरोप देणे; बोळविणे : 'सासु पती कांता मूल येक करून। गृहासी नेऊन घालविली।' – रामदासी २.१३८. ११. (दिवा इ.) मालविणे; विझविणे : 'रदनिके, घालविलास दिवा ?' – मृ १३. १२. (एखाद्यावर) हल्ला करणे.

घालवर स्त्री. घार. (कर, कुण.)

घालवेड पहा : **घालपिसे**

घालवेडा वि. वेडाची बतावणी करणारा; बाहेरून वेड पांघरणारा परंतु आतून धूर्त, लुच्चा असलेला.

घाला पु. १. हल्ला; धाड; चाल; प्रहार; मारा; छापा. (क्रि. येणे, घालणे, पडणे.) : 'थांबोनि घाला घालता कामें।' – एकनाथ – नरनारायणाख्यान. २. (एखाद्यावरील) मोठे संकट; अरिष्ट; आपत्ती; घात. (क्रि. घालणे.): 'सर्वस्व नाश जेणें तो याहुनि कोण वद नवा घाला।' – मोभीष्म ७.३५.

घाला प्रमाद, चूक, दोष. – (तंजा.)

घालाघाली स्त्री. (कामांचा) गोंधळ, धुडगूस, घालमेल : 'घालाघाली घालिती नित्य सासा। टाकूं बाई नेदिती हा उसासा।।' – सारुह ७.१०६

घालामेलचे अक्रि. कासावीस होणे; तगमगणे; व्याकूळ होणे. (गो.)

घाली फेडी स्त्री. लावणे–पुसणे : 'घाली फेडी निडळ। कां करुं ए गा।' – ज्ञा १८.२२१.

घालु–ल्या, घालपाडू वि. १. लबाडीने, फसवेगिरीने व्यापार, व्यवहार करणारा. २. दुसऱ्याला गोत्यात, पेचात, संकटात आणण्याचा स्वभाव असलेला. ३. कर्ज इ. रूपाने दुसऱ्याचे द्रव्य घेऊन ते बुडविणारा.

घालेडा वि. वेडेपणाचे सोंग घेतलेला. – (तंजा.)

घाव पु. १. शस्त्र, हत्यार इ. कांनी केलेला प्रहार; वार; तडाखा; आघात : 'म्हणौनी नीसाना घावो दीधला।' – उषा ८१७. २. (शस्त्र, हत्यार इ. कांच्या प्रहाराने झालेली) जखम; व्रण; घाय; क्षत. ३. (ल.) (व्यापारात झालेले) नुकसान, तोटा, बूड; (धंद्यात बसलेला) धक्का; ठोकर. (क्रि. बसणे, लागणे, पडणे, भरणे.) [सं.घात] (वा.) **० लावणे –**

(बायकी) (एखाद्या पदार्थाला, धान्याला) उखळीत घालून हळूहळू कांडणे. **निशाणी घाव घालणे –** १. युद्धारंभनिदर्शक दुंदुभी वाजवणे; शत्रूवर चढाई करून जाणे : 'घाव तेव्हां घातला निशाणीं। तेणें दुमदुमली अवनी।' – ह २२.२४. २. (कपडे धुताना) आपटणे, चोपणे, धुणे : 'पडदाणीचा घातला घाव।' – मसाप २.२२.

घावघवित पहा : **घवघवीत**

घावट (ळ)णे उक्रि. १. हळूहळू कांडणे; सडणे; कुटणे; हळूहळू घाव देणे; अर्धेमुर्धे मोडणे; चुरणे. (को.) २. लहानशी जखम करणे; घसटणे; खरचटणे; झाजरणे; ओरखडणे; हळूहळू प्रहार करणे.

घावटा पु. १. (शस्त्राने, हत्याराने झालेली) जखम; क्षत; व्रण. २. शस्त्राने झालेल्या जखमेची खूण; जखमेचा व्रण; चट्टा.

घावटी पहा : **घाव** १ : 'त्याने समोर उभ्या राहिलेल्या भाव्यावर कुऱ्हाडीची घावटी टाकली.' – हपा ३८.

घावटाँ पु. नुकसान; तोटा; बूड. (गो.)

घावडाव पु. १. एखादी गोष्ट करण्याला अनुकूल स्थिती, योग्य संधी, काल, प्रसंग : 'काळ घेउं नेदी वाव। आला तो राखें घावडाव।' – तुगा ३३८. २. कचाटी; पकड; तावड; पेच; आवाका; डावपेच; कबजा; अधिकार : 'हातां आला घावडाव। आमुचा मायबाप देव।' – तुगा ६४४. ३. युक्त्या; कपटाच्या शक्कली; लुच्चेगिरीचे उपाय; छक्केपंजे; कावा; डाव. ४. प्रयत्न; खटपटी; बेत; हिकमती. ५. घाव; प्रहार; वार : 'निवडे घावडाव। व्हावा अंगीं।' – तुगा २३०६ (वा.) **घावाडावात सापडणे –** तावडीत येणे.

घावणी पहा : **घावन** : 'ह्या पुऱ्या पोळ्या घावण्या तेथें काय उणें।' – अफला ५७.

घावणे उक्रि. (विप्र.) गावणे; सापडणे : 'गुरू उदार माऊली प्रशांतिसौख्यसाउली। जया नरासि फावली तयांसि सिद्धि घावली।' – निमा १.३३.

घावदाव पहा : **घावडाव** : 'आपल्याकडीलहि घावादावाची लढाई नादरशाहाच्या तुल्या मानतात.' – पेद २.४.

घावन न. दगडाची उखळी; उखळ; घाटवाईन. [सं. ग्रावन्]

घावन–ना पु. तांदळाच्या पिठाचे केलेले पोळीसारखे एक सच्छिद्र खाद्य; धिरडे; दोसा : 'घावन पातोळ्यांच्या ओळी।' – मसाप २.१.२१. (को. राजा. हेट.)

घावमारी स्त्री. घायपात.

घावरे न. खोकडाचे, सशाचे बीळ.

घाशि(शी)रामी स्त्री. १. (घाशीराम नावाचा पुण्यातील एक जुलमी कोतवाल सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत होऊन गेला; तो तेलंगी ब्राह्मणांना लहान लहान कोठड्यात अन्नपाण्यावाचून कोंडून ठेवीत असे. त्यावरून) श्वासावरोध होण्याइतकी माणसांची गर्दी; दाटी; कोंडमार. २. घाशिराम कोतवाल याच्या कारकीर्दीसारखा जुलमी अंमल, कारकीर्द; झोटिंगपाच्छाई; करडा अंमल : 'चार दिवस घाशीरामी चालवून घेतलेल्या अर्वाच्य पंडित मंडळीची...' – नि (घाशिराम).

घाश्या (माण.) पहा : **गाशा**

घाष्टी स्त्री. (अन्नाचा) घास : 'अन्नाचीसुद्धा घाष्टी रांडेच्याक जड झाली.' – तोरण १९.

घाष्टी स्त्री. घसा; नरडे : 'आणि कातड्यांचा व्याप करून पैसा मिळवायचा तो कोणाच्या घाष्टीत घालायचा?' – जुम्मन ४.

घास पु. १. तोंडात घालून चर्वण करता येईल इतका खाद्य पदार्थाचा अंश, परिमाण; तोंडात मावेल इतका अन्नाचा गोळा; कवळ. २. घाण्यात, जात्यात घालायचा वैरणीचा हप्ता, परिमाण. ३. जात्याच्या भोकात, खळगीत घिरटीपाशी दळले न जाता शिल्लक राहणाऱ्या दाण्यांचा समुदाय. (क्रि. धरणे.) [सं. ग्रास] (वा.) **० उतरणे, काढणे, चिरणे, मोडणे –** शिजवलेल्या अन्नाचा, भाताचा घासाएवढा गोळा घेऊन त्यावर तेल वगैरे घालून व रेघोट्या काढून अन्नाचा वीट आलेल्या माणसावरून उतरून – ओवाळून तो घास अग्नीत किंवा घराच्या बाहेर टाकतात तो प्रकार. परक्या माणसाची दृष्ट अन्नाला लागून खाणारास अन्नाची किळस, वीट येतो तेव्हा हा प्रकार करतात. **० करणे, भरणे –** (एखाद्याला) अतिशय छळणे, सळो का पळो करून सोडणे. **० काढणे –** जात्यात दळले न जाता राहणारे दाणे काढून टाकून जाते साफ करणे. **० देणे –** १. विवाहसमारंभात जेवणाच्या वेळी नवपरिणीत वधूवरांनी उखाणे घेऊन एकमेकांच्या तोंडात घास घालणे. २. भरविणे; जेऊ घालणे : 'घासभर देणे आणि कोसभर नेणें ही अवस्था या लोकांना नकोशी झाली आहे' – खेया. **० होणे –** अपयशी होणे. **घासी गू खाणे –** (अक्षरशः) (अन्न खात असताना त्याबरोबर विष्ठा भक्षण करणे. उदा. एखादी आई जेवीत असताना तिचे मूल तिच्या मांडीवर हगते. न कळत, त्या विष्ठेचा अंश अन्नाबरोबर आईच्या पोटात जातो यावरून) एखाद्यासाठी अतिशय कष्ट करणे, सोसणे; हरप्रयत्न करणे; खस्ता खाणे.

घास पु. गवत; वाळलेले गवत; तृण : 'अरिवरि शर जेंवि अग्नयुपरि घास।' – मोकर्ण १४.६१. [सं.घास, हिं]

घास स्त्री. मोत्याला छेद पाडण्याने वजनात होणारी घट, घस. [सं.]

घासकट न. (लोहार) एखादी वस्तू घट्ट धरण्याचे गावीसारखे एक हत्यार; पकड. (को.)

घासकटाउ, घासकाटू वि. (गवत कापण्याचे काम करण्याला लायक) १. अडाणी धटिंगण; धसमुसळ्या. २. (उप.) बिनधारेची, बोथट तरवार, शस्त्र. ३. (उप.) शिपाई; तरवारीने लढणारा.

घासकाटणी स्त्री. १. गवताची कापणी. १. सरकारी जमिनीवरील गवत कापण्याबद्दलचा कर. [फा.]

घासकाडी स्त्री. गवत, कडबा, वैरण इ.

घासकाम न. (सोनारी) दागिने घासून त्यांना झिलई देण्याचे काम.

घासकुटका पु. निर्वाहाचे साधन : 'सबंध रोटी एकाला गेली खरी पण इतरांना घासकुटका काहीतरी पाहिजे.' – गांगा २८.

घासखाऊ वि. (उप.) आयते खाण्याशिवाय दुसऱ्या कशाकडेही लक्ष न देणारा (कुटुंबातील ऐदी, निरुद्योगी मनुष्य).

घासगहाण न. गहाणाचा एक प्रकार. यात व्याजाऐवजी गहाण टाकलेल्या जमिनीचे उत्पन्न धनकोने घ्यायचे असते.

घासगीस स्त्री. कटकट : 'कामाचीबी लई घासगीस.' – दुर्गा ३६.

घासघाई स्त्री. गडबड; धांदल : 'केतकरांची जेवायची घासघाई सुरु झाली की...' – मीचहे – ५६.

घासघीस पहा : **घासाघीस**

घासटणे उक्रि. १ घासणे; खरचटणे; खरवडणे; घसटणे. २. (ल.) बुचाडणे; लुबाडणे; बुडवणे; नागवणे.
अक्रि. (घासले जाणे, घसवटणे यावरून) (एखाद्यास व्यापारधंद्यात) बूड येणे; ठोकर बसणे; तोटा होणे. [सं. घृष्]

घासण स्त्री. (व्यापारात आलेली) घस; बूड; नुकसानी; तोटा. (क्रि. बसणे, लागणे, येणे.) (को.)

घासणी स्त्री. १. घासण्याची, जोराने पुसण्याची, घासटण्याची, उटण्याची, उजाळा देण्याची क्रिया; घासण्याची क्रिया. २. ज्याने घासायचे, उजाळा द्यायचा तो पदार्थ; घासण्याचा पदार्थ. उदा. अंगघासणी; दातघासणी. ३. (भांडी इ. घासण्यास केलेला) गवत, पाने, काथ्या इत्यादिकांचा चोथा. ४. (ल.) कचाकची; घासाघास; जिगजिग; कटकट; भांडाभांडी; चकमक. ५. गांजणूक; जाच; छळ.

घासणे उक्रि. १. घर्षण करणे; चोळणे; जोराने पुसणे, साफ करणे; घासटणे. २. खरडणे; चिरडणे; ओरबडणे. ३. रागे भरणे; कानउघाडणी करणे; खरडपट्टी काढणे; खडसणे. ४. वादविवाद, चर्चा, भवति न भवति, काथ्याकूट करणे. ५. (एखाद्याला व्यवहारात) फसविणे; बुडविणे; बुचाडणे. ६. (ल.) पुन:पुन्हा (एखाद्या अभ्यासाची) आवृत्ती करणे; घोकणे; पाठ करणे. ७. पढवून तयार करणे; पढविणे; मेहनतीने अभ्यास करणे, करविणे. ८. उजाळा देणे; गंज घालविणे; आवृत्ती करून (ज्ञान इ.) तयार करणे, ताजे ठेवणे.
उक्रि. १. घासले जाणे. २. (ल.) (एखाद्याशी) भांडणे; झगडणे; चकमक होणे; खेटणे; स्पर्धा करणे. ३. घासाघीस करणे; आग्रह, अट, हट्ट धरणे; ओढून धरणे. [सं. घर्षण] (वा.) **घासून घेणे –** १. (निराशेने, संतापाने, निष्फळ झालेल्या मत्सराने) हात चोळणे, चुरमुळणे; चडफडणे. २. सोसणे; सहन करणे (नुकसान, दु:ख). **घासत बसणे –** परत परत तोच मुद्दा सांगणे; उगाळत बसणे.

घासदाणा पु. १. सैन्याला गवत व वैरण पुरवण्याच्या खर्चासाठी बसवलेला कर, खंडणी. हा कर मराठे मुलुखगिरीच्या काळात स्वत:च्या लष्करासाठी शत्रूंच्या गावांतून वसूल करीत. हा पैसा, धान्यरूपाने वसूल केला जात असे. याला मेजवानी असेही म्हणत : 'जमीनीच्या उत्पन्नाप्रमाणें दोनपंचमांश हिस्सा घासदाण्याच्या रुपानें वसूल घेण्याचा खुद्द गांवाशीं ठराव केला.' – गांगा ८. २. (सामा.) सरबराई; दाणावैरण; पाहुण्याची बडदास्त.

घासदाणा पु. जनावरांना द्यायचे गवत, दाणे इ.

घासपार्टी स्त्री. आर्यसमाजातील शाकाहारी पक्ष. : 'लाला मुनशीराम हे घासपार्टीचे' – गुजगो ३१२.

घासपूस स्त्री. साफसफाई; संस्कार : 'पराकोटीची अश्रद्धा पेलणे मला शक्य व्हावे अशी माझी घासपूस श्री. कुलकर्णी यांच्या सहवासात झाली.' – माचू २५१.

घासफळ न. (वन.) फळांचा एक प्रकार. गवताच्या फळांचा प्रकार.

घासमुटका पु. पिशाच्चांचा उपद्रव टाळण्यासाठी, त्यांना संतुष्ट करण्यासाठी बाहेर टाकायचा अन्नाचा गोळा. (क्रि. देणे, टाकणे, उतरणे.)

घासलकडी स्त्री. चारा, धान्य व सरपण. अशी घासलकडी मुलखातून सक्तीने गोळा करण्याचा सैन्याचा जुना रिवाज असे : '... लोक येथून बिदा करावें कां की हा प्रांत सरकारचा घासलकडी खाले लोटला जाईल.' – पेद २०.५४.

घासलेट, घास्टेल, घासतेल न. केरोसीन तेल; रॉकेल: 'घास्टेल पायजे बाटली भरून.' – मिरास ११८.

घासाघास स्त्री. १. पुन:पुन्हा घासणे. २. (ल.) नेहमी खडसावणे; खरडपट्टी काढणे; कानउघाडणी करणे. ३. बाचाबाच; कलागत; कटकट. [घासणेचे द्वि.]

घासाघीस स्त्री. १. बोलाचालीत ओढून धरणे; ताणून धरणे; खल; हुज्जत; जिकीर; घिसघीस करणे. २. वादविवाद; चर्चा; काथ्याकूट. ३. (स्पर्धा, मत्सर इत्यादिकांनी होणारी) कचाकची; चकमक; भांडाभांडी. (क्रि. करणे, मांडणे, लावणे.) ४. सैन्याचे किरकोळ हल्ले. [घासणेचे द्वि.]

घासापुसचे अक्रि. १. चौकशी करणे. २. घासाघीस करणे. (गो.)

घासापूस स्त्री. चौकशी. (गो.)

घासारी पु. (सोनारी) घासणारा; मोती वगैरेवरील खरड घासून त्याला आकार व तजेला देणारा.

घासावणे अक्रि. (आजाराने अंथरुणावर) खितपत पडणे, अशक्त होत जाणे. (गो.)

घासी स्त्री. कष्ट; त्रास; दु:ख : 'पापियांची घासी कां लावावी । तो पापाविना असतां ।' – क्रिपु २.९.२२. [क.]

घासी न. 'रंगविल्या कोरे रेसिमाचे कापड' – (तंजा).

घासीव वि. घासलेला; खरडलेला; घासटलेला.

घाळ स्त्री. (पाण्याच्या प्रवाहाने, जोराने पडलेला) ओहळ; घळ; चर; खाच. (को.)

घाळ वि. १. गहाळ; गाहाळ; अव्यवस्थित; घोटाळ्या; गोंधळ्या; विसराळू (मनुष्य); अस्ताव्यस्त; विस्कळीत; गोंधळयुक्त (काम, धंदा, कागदपत्र इ.). २. गाफील; बेशुद्ध; असंबद्ध. (गो.)

घाळघोळ पु. १. (बेत, मसलत, वस्तू, काम इ.चा) गोंधळ; घोटाळा; खिचडी; अव्यवस्था; गोलंकार. २. धांदल; गडबड; हैराणगत.

घाळण स्त्री. घळण; (भिंत, बांध, धरण यांतील) भेग; भगदाड; खिंड; खिंडार. (क्रि. पडणे, होणे.) (को.)

घाळणे अक्रि. (मोत्याचे वेजे, कानाचे छिद्र) मोठे, सैल होणे; घळणे. [सं. गव्हर]

घाळणे सक्रि. गमावणे; हरवणे; भलत्या जागी ठेवणे; गहाळणे.
अक्रि. १. विसरून घोडचूक करणे; गोंधळल्यामुळे चुकणे, घसरणे; बेसावधपणे फसणे. २. आडमार्गाने जाणे; भटकणे; भलतीकडे जाणे.

घाळाजणे अक्रि. चुकणे; सांडणे. (गो.)

घाळापडणे अक्रि. १. सांडणे; गहाळ होणे. २. ढिले पडणे. (गो.)

घांग स्त्री. १. दखलगिरी; सावधानता; जाणीव. (क्रि. ठेवणे, राखणे, धरणे, असणे, राहणे.) : 'त्याला मेजवानीची घांगही नव्हती.' – अस्तंभा १३५. २. आठवण; सई; स्मरण; याद (क्रि. येणे, आठवणे)

दोन्ही अर्थी सामान्यत: अकरणरूपी प्रयोग करतात. (तंजा.)

घांग वि. १. काही एका गोष्टीविषयी अंगी सामर्थ्य असून रडण्याचा स्वभाव असलेला (मनुष्य); रड्या; कोणी पैसा मागितला असताना, काम करायला सांगितले असताना नाकारणारा; माघार घेणारा; रडगाणे गाणारा. २. रडवा; थोड्याशा इजेने मोठी आरडाओरड करणारा. (को.)

घांगचाळे पु. अव. १. (पैसा देण्याविषयी, काम करण्याविषयी अक्षमतेबद्दल) कुरकुर; पिरपिर; रडगाणे. २. (थोडासा धक्का लागल्याने दुबळ्या, अशक्त प्राण्याचे) केविलवाणे व मोठ्याने आक्रोश करणे; किंकाळी.

घांगरणे अक्रि. घाबरून, गांगरून जाणे; भयभीत होणे; घोटाळणे; भांबावणे. [सं. गर्ह > गागर्ह = गांगरणे]

घांगशा पु. गोंधळ; कटकट; वाद; घोळ; तंटा; बखेडा : 'घांगशा घालीत आहों. निर्गम आज्ञेप्रमाणे होईल.'–पेद ३३.३७४. [ध्व.]

घांगा क्रिवि. धो धो पाण्याने भरून : 'पाणी वरून पडतें जमिनी गेल्या घांगा।' – वलो २१.

घांगावणे, घागाइणे अक्रि. भीतीने गांगरून, गोंधळून जाणे; सुचेनासे होणे; भांबावणे; गांगरणे : 'तैशीच घागाइली तियें एकें वेळें।' – भाए ३२२. (व.)

घांगुसणे अक्रि. चाचपडणे : 'दृष्टी जाऊनि नि:शेख। अंध जाला घांगुसे।' – मआदि २.४२. [सं. घृष्]

घांगूड पु. फुलातील गड्डा, कंद (ज्याला पाकळ्या फुटलेल्या असतात तो); (कमळाच्या) पाकळ्या गळाल्यानंतर राहिलेला गड्डा, दांडा. (को.)

घांघरणे पहा : **घांगरणे**

घांघवसणे सक्रि. शोध करणे : 'जें मना कलितां कुवाडें। घांघवसिता बुद्धी नातुडे।' – राजा ५.६७.

घांघु(घो)(गो)सणे उक्रि. १. घासाघीस करणे. २. बारकाईने शोधणे; चिकित्सापूर्वक छाननी करणे : 'जे मना आकळितां कुवाडें। घांघुसितां बुद्धी नातुडे।' – ज्ञा ५.६७.

घांची पु. तेली.

घांट स्त्री. घंटा : 'ऐसीया महात्मेयांचां कपाळी घाली घाट.'–लीचउ ५१.

घांटॉ पु. पाच हात लांबीचे एक जुने माप. (गो.)

घांड्डॉ पु. खाडीचे खारे पाणी शेतात शिरण्यासाठी ठेवलेले दार. (गो.)

घांश्याल न. घासलेट; रॉकेल; केरोसीन. (कु.) [इं. गॅस + ऑईल]

घांसावचे अक्रि. घास मारणे. (गो.)

घिउंदे न. दुधापासून केले जाणारे एक पेय : 'ते आदि कुमारी विनोदें। महाकवी नवरसांचे घिउंदे। पेहे देउनि परियेदे। अनुहति शब्दीं।' – नरुस्व ९.

घिगावणे अक्रि. घाबरणे : '... दोगे खालीं मोर्चास ठेविले होते तेच धास्तीने घिगाऊन संभाजी राजे यांचें निशाण घेतलें.' – पेद १०.५०.

घिगी स्त्री. तुळया, ओंडके, बडाले इ. उंच चढवण्यासाठी केलेली दोन लाकडांची कैची; वाकलेल्या, कललेल्या झाडाला धीर, आधार देण्याकरिता लावलेली कैची. (राजा.) (वा.) **घिग्या लावणे –** (असमर्थ, नाखूष मनुष्यास एखादे काम करण्याची) उठावणी देणे; चेतविणे; रडतराऊत घोड्यावर बसविणे.

घिघावणे अक्रि. दुरवस्था होणे; दुर्दशा होणे; वैतागणे; विपन्न होणे : 'पठाण रोहिल्यात कांहीं अवस्था राहिली नाही. बहूत घिघावले आहेत व अजीजी करून पायां पडतात.' – हिंदखं १.५५.

घिटकना क्रि. १. गिळणे. २. खाणे. (झाडी)

घिट्टी स्त्री. घिरटी; वेढा; फेरा. (गो.)

घिणघिण स्त्री. कटकट; चिरचिर : 'अस्तुरिकां पुरुषाची। रोज घरीं घिणघिण। कोण्या ब्राह्मणानं वेड्या। असं लावलं लगीन।' – वलो ४४. (व.)

घिनघिन्या वि. कुरबूर करणारा. (झाडी)

घिरगीस–सा पु. कीड लागलेल्या लाकडाचे पीठ. पहा: **किरकिसा**

घिरघिर स्त्री. काळजी : 'टिळकांनाही घराची घिरघिर वाटत होतीच.' – स्मृचि ३०.

घिरघिरचे अक्रि. १. घेरी येणे, २. फिरत राहणे; गरगर फिरणे. (गो.)

घिरघिराट पु. (जाते इ.चा) घरघराट; घर्‌घर्‌ आवाज. [ध्व. घिरचे द्वि.]

घिरघिरे न. लहान मुलांचे खेळणे; भिरभिरे, गिरगिरे. [ध्व.]

घिरट न. रडाटगाडगे.

घिरट पु. १. भात भरडण्याचे जाते; मोठे जाते. (राजा. कु. गो.) पहा : **घरट.** २. वेढा; फेरा; घेर; गराडा; घिरटी : 'तेथें अलिकुलांचा घिरट।' – कथा १.१.१४. [सं. घरट्ट]

घिरट–टी स्त्री. (जातीतील) घरागणिक एकेक माणसाला दिलेले जेवण; मेजवानी. (कर.)

घिरटणे सक्रि. घरटात (घिरटात), जात्यात धान्य इ. घालून भरडणे. (राजा.)

घिरटणे अक्रि. फिरणे; घुमणे : 'याचाच विचार त्याच्या डोक्यात घिरटत होता.' – वानगी २७.

घिरटी स्त्री. १. जाते; घरटी. २. वर्तुळाकार फिरणे; फेरी; गिरकी; गिरकांडा; भ्रमण (क्रि. घालणे.) : 'नाना अवतारांच्या घिरटी। स्वये घेत परमात्मा।' – ह १८.१७२. ३. वळसा; फेरा. (क्रि. घालणे.) ४. हेलपाटा; येरझार; फेरी; (निष्फळ झालेली) खेप. ५. गस्त; (पोलिसाचा) फिरता पहारा. ६. लपत छपत, चोरून, लपून गिरकी घेणे; गिरकी घेत टेहळणे. पहा : **घरटी** [सं. घरट्ट]

घिरत न. तूप :'आत शोभती घिरताची वाटी...'–जसा ६१३.[सं. घृत]

घिष्टपिष्ट स्त्री. घासाघीस : 'अशी दोनचार दिवस घिष्टपिष्ट जाली.' – मइसा.

घिसघिशा वि. घिसघिस, घासाघीस करण्याचा स्वभाव असलेला.

घिसघिस, घिसघीस पहा : **घासाघीस**

घिसण न. घासणे; घर्षण; घासणी : 'अग्नी सकळां ठाई आहे। कठीण घिसणीं प्रगट होये।' – दास १६.५.२०.

घिसणी स्त्री. १. घासणे : 'वायोचि कठिण घिसणी। तेथे निर्माण झाला वन्ही।' – दास १२.१.२. २. घासाघीस.

घिसणे सक्रि. (अशिष्ट) घासणे. [सं. घृष्]

घिसा, घिसली घिसाडी पु. लोहारकाम करणारी एक भटकी जात; यह या जातीचा मनुष्य : 'घिसा चतुरु अपाडेंसीं।' – ग्रंथराज २.६०.

घिसाडकाम न. घिसाड्याचे काम : 'तांबटकाम अगर घिसाडकाम करून पोट भरणारे निष्पाप ते जोडपे!' – पापू ३८.

घिसाडघाई स्त्री. फाजील गडबड; उतावळेपणाची कृती.

घिसाडा वि. कठोर; राकट : 'त्याचा घिसाडा झालेला चेहरा .... पाहून लोक पांगले' – पुत्र ११५.

घिस्सा पु. (कुस्ती) कुस्तीतील एक डाव. यात आपल्या एका हाताने जोडीदाराच्या बरगडीवरून हात घालून आपल्या जोडीदाराच्या मांडीजवळ लांग धरायची नंतर आपल्या दुसऱ्या हाताने जोडीदाराच्या आपल्या जवळ असलेल्या हाताचे कोपर धरून त्याला ओढून चीत करायचे. या डावाला घिस्सा म्हणतात. याचे घिस्सा चतुरशिंगी, नालमोज्याचा इ. अनेक प्रकार आहेत. [सं. हिंस्]

घिस्सा पु. ठोसा : 'त्यानं किशाच्या नाकावर घिस्सा मारला.' – पधों ४४.

घिस्सी स्त्री. एका बाजूने फरकटत जाण्यासाठी (गाडीच्या) आखाला चाकाऐवजी बांधलेले तिरपे लाकूड. (व.)

घी न. तूप. [हिं.] [सं. घृत]

घीव पु. खरेदी करणारा.

घीवकेणी पु. तूप विकणारा : 'खोत कुणबी दाणे दाणी । घीव केणी ।' – दावि ७०.

घी(घे)वर पु. फेसलेल्या रव्याचे तळून, पाकवून केलेले पुरीसारखे पक्वान्न. [सं. घृतवर]

घीस स्त्री. घट; झीज : 'शरीरें घीस साहाणें । दुर्जनासीं मिळोन जाणें । निंदकास उपकार करणें । हा सत्त्वगुण ।।' – दास २.७.६९.

घुई स्त्री. १. अळवाचा कांदा; अळकुडी. (ना.) २. कोय; अठोळी, बाठी. (ना. व.)

घुई स्त्री. रातकिडा. (व.) [ध्व.]

घुक्क वि. काळाकुट्ट; घोर; निबिड; घनदाट. (ना.)

घुगघुगी स्त्री. गळ्याची घाटी, कंठमणी याच्या खालचा खोलवट भाग.

घुगरा पु. (नाविक) चार मोठे जाडे दोर घेऊन त्यांचा एक मोठा नाडा (गलबताच्या उपयोगाचा) करण्याची क्रिया. यासाठी एक लाकडी चौकटीचे यंत्र असते. (राजा.)

घु (घुं) गरावणे अक्रि. १. (प्रां.) चिडून, संतापून (एखाद्याच्या) वसकन् अंगावर येणे; (एखाद्यावर) तुटून पडणे. २. धुडकावणे.

घुगरी स्त्री. १. न भरडता, सालीसकट भिजवून शिजवलेले (विशेषत: द्विदल धान्य; शिजवलेले हरभरे, कडधान्य; हरभऱ्याची उसळ. २. चणे, तूर, वाटाणे इ. ची उसळ. (व.) ३. धान्याची, पिकाची मळणी झाल्यानंतर कमाविसदार, पाटील, सरकार यांना शेतकरी हक्कादाखल देत असत तो वाटा : 'यावरी पाटील कुलकर्णी याची । काय रीत परभारा नेमणुकीची । घुगरी किंवा बलुत्याची । ते लावणीवर कोणे विधी ।।' – पैगाषेंदु ४. (ल.) लभ्यांश; फायदा; स्वार्थ साधेल अशी परिस्थिती : 'जिकडे घुगऱ्या तिकडे उदय.'– जोफु १४२. [क. गुग्गरी] (वा.)**घुगऱ्यांचा न्याय –** घुगऱ्या हातात घेऊन बोलणे; दिव्य करण्याचा एक प्रकार : 'घुगऱ्यांचा न्याय एकीकडे ठेवून आधीं देशपांडे व कुलकर्णी यांचा व खंडेराव याचा न्याय घ्यावा.' – पेम ४८३. **० पाखडणे –** मुलाला देवी येऊन बऱ्या झाल्यावर देवीच्या देवळात करायचा विधी. (वा.) **एखाद्याच्या सटीच्या घुगऱ्या खाणे, खाल्लेल्या असणे –** एखाद्यापेक्षा ज्ञानाने व अनुभवाने अधिक चतुर व प्रौढ असणे; वयाने मोठा असणे. (सटीच्या दिवशी मूल जन्मल्याच्या सहाव्या दिवशी – सटी देवीची पूजा करून तिला घुगऱ्यांचा नैवेद्य दाखवितात, आप्तेष्टांनाही घुगऱ्या वाटतात, त्यावरून) एखाद्याच्या सटीच्या, बारश्याच्या घुगऱ्या खाल्लेला मनुष्य त्या (दुसऱ्या) मनुष्यापेक्षा अनुभवाने, वयाने, ज्ञानाने पुष्कळच अधिक असणार. त्याला लहान माणसाने शिकवू नये.

घुगरू पु. मोगऱ्याची एक जात.

घुगरू पु. घुंगट; घोंगता.

घुगा पु. पूर्णपणे उमललेली कळी; फूल.

घुगा पु. छपरावर घातलेल्या भातेणाच्या जुन्या पेंढ्या; घरावरील तृणाची कुजकी पेंढी, गुंडी. (को.)

घुगी स्त्री. पाऊस इत्यादिकांपासून संरक्षणार्थ डोक्यावर घालायची बुर्णुसाची, सखलादीची घोंगी, खोळ; बुर्णुसाचे शिरस्त्राण; बनातीची कुंची. [फा.कूकी]

घुगी स्त्री. वाऱ्याचा झपाटा; वाऱ्याची वावटळ; भोवरी. (को.)

घुगी स्त्री. किंकाळी; कर्कश आरोळी; किंचाळी.(को.)[सं.घु = ओरडणे]

घुगी, घुगूम स्त्री. घुबड. (गो.) [सं. घूक]

घुग्गू पु. राग; घुस्सा. (व.)

घुघरी पहा : **घुगरी**

घुघु(गु)बाळ न. अजाणते मूल, लेकरू; कुकूबाळ; लहान मूल.

घुघू स्त्री. घुबड, पारवा, होला इत्यादिकांचा आवाज; घूत्कार. [ध्व.]

घुघू–गू वि. लहान; चिमुकले; छबकडे; कुकुले (मूल अथवा पोरकटपणा अंगी असलेला मोठा मुलगा किंवा मुलगी).

घुघू वि. खुजा; दुबळा (मनुष्य).

घुट पु. बहुमताने केलेला ठराव. (गो.)

घुटकन–कर–दिनी–दिशी क्रिवि. १. घुटक्यासरशी; गट्कन; पाणी इ. गिळण्याच्या आवाजाप्रमाणे (क्रि. पिणे). २. एकदम; खुटकन. (क्रि. जाणे.) [ध्व.]

घुटका पु. गुटका; पाणी, इ. पातळ पदार्थाचा घोट; आवंढा; चूळ. (क्रि. घेणे.) पहा: **गुटका** [सं. घुट्]

घुटका पु. एखादे काम करताना अवयवविशेषाला अलौकिक शक्ती येण्याकरिता योगी, बैरागी लोक तोंडात धरण्याकरिता जी गोळी देतात ती; गुटका; गुटिका; गुटी; ताईत; गुंडी. पहा : **गुटका** : 'काहींना काही प्रयत्न व्हावा । पूर्वज स्नेहस्थु जटिळ बोलावा । घुटका बनवावा की चुटका ।' – दावि २६०. [सं. गुटिका]

घुटघुट–टा क्रिवि. घटाघट; घटघटा. पहा : **घटघट** [ध्व. घुट्चे द्वि.]

घुटणे; घुटकणे अक्रि. सहन करणे; गिळणे : 'नाना नि बयानं माझ्या घुटिलं माझ्यासाठी ।' – तीसा २९९; 'चार महिने घेतले घुटकून ।' – एहोरा वासुदेव २८.

घुटना न. (कुस्ती) कुस्तीतील एक डाव. आपले दोन्ही हात जोडीदाराच्या आपल्या बाजूच्या बगलेतून घालून बाहेरील हात दंड धरून ओढायचा व आपल्या पायाची नळी त्याच्या मानेवर ठेवायची आणि त्याचा धरलेला दंड ओढून व मानेवर पाय देऊन त्याला चीत करायचा.[हिं.]

घुटम(मु)ळणे अक्रि. १. रेंगाळणे; अडखळणे; मागे-पुढे करणे. २. गुटमळणे; गुरमळणे. ३. अंतकाळची घरघर लागली असताना प्राण न जाता घोटाळत राहणे; जीव अडकणे. [सं. घुट् + म्लै]

घुटराण वि. अतिशय घाणेरडा (वास); दुर्गंधयुक्त. (ना.)

घुटवळणे अक्रि. १. अंतकाळच्या वेदनांनी युक्त होणे; आचके देणे; तडफडणे; प्राण जाण्याची पाळी येणे. २. प्राण कंठाशी येणे. ३. (एखाद्या मनुष्याच्या, पदार्थाच्या उत्कंठेमुळे) घाबरे होणे; घायकुतावणे.

घुटा पु. गुठा; एक प्रकारचे औत. (बे) पहा: **गुठा, गुठे**

घुटी स्त्री. १. गुटी; जायफळ इ. औषधे उगाळून त्यात दूध घालून तान्ह्या मुलाला पाजायचे मिश्रण: 'नाहीं दिधली घुटी स्वहस्तें।' - देकृष्णजन्म (पद) ५३. २. योगी, बैरागी देतात ती अजब शक्तिदायक गुटिका; सिद्धीने मंतरलेली गोळी. पहा: **गुटका, घुटका, गुंटिका** [सं. गुटी = गोळी](वा.) ० **देणे** - भारणे; भोंदणे; भुलवणे; भुरळ घालणे; मोहनी घालणे. ० **बसणे** - (गुटिकेचा) परिणाम होणे; अंमल दिसू लागणे, लागू पडणे.

घुटी स्त्री. १. लहान आंबा. २. एक झाड. (झाडी) [सं. गुटी]

घुटी स्त्री. उसाचे पेरे, कांडे.

घुटी स्त्री. मादक पदार्थ, पेय; मद्य; दारू; नशा; कैफ : 'याच सुमारास खंडेरावांचे घुटी घेणे वाढत चालले...'- देवी श्री अहिल्याबाई ५४.

घुटू न. सशाचे पिलू. (माण.)

घुटूघुटू क्रिवि. घटाघट.

घुटे न. उडदाच्या डाळीचे हिरवी मिरची ठेचून व कोथिंबीर घालून केलेले पातळ कालवण.

घुट्ट न. प्राणोत्क्रमण होताना कंठातून निघणारा आवाज.
क्रिवि. घुटकन; घुटदिशी. [ध्व.]

घुट्टा पु. मुठीत दांडू धरून दांडूच्या करंगळीकडील बाजूला पुढे आणून दांडूवर चिन्नी (विटी) ठेवायची व ती दोनदा उडवून त्याच बाजूने पुन्हा चिन्नी मारायची. याला घुट्टा म्हणतात. (कर.)

घुट्टा वि. ठेंगणा; ठेंगू; बुट्टा; गिड्डा. (व.)

घुड पु. घुमट. (गो.)

घुड न. (कोंबड्या इत्यादींचे) खुराडे : 'घुडात कोंबड्याने आरवायला सुरवात केली.' - तोरण १३७.

घुडगे न. घुबड. (राजा.)

घुडणे अक्रि. मरणप्राय इजा होणे. [सं. गुड्]

घुडणे अक्रि. (प्रवास-निजणे, जेवणे, मरणे इ. करायला) सिद्ध होणे; (प्रवास, अनंतत्वाचा प्रवास करण्याच्या) बेतात असणे. [सं. घट्]

घुडवो पु. शेताला पाणी देण्याकरिता दोन्ही बाजूंना दोन दोन दोऱ्या बांधलेली, एक हात लांबीची चपटी टोपली. या टोपलीने दोन इसम डबक्यातील पाणी वर शेतात फेकू शकतात. (कु.)

घुडा पु. कळस : 'आई सोनेरी तुजा घुडा।' - घालो ५४. (को.)

घुडा-ड्या पु. वरंगळ जातीच्या तांदळातील एक प्रकारचा तांदूळ.

घुडाघूड स्त्री. (जाण्याला, काम करण्याला) सिद्ध, तयार होणे; प्रवासाला जाण्याच्या वेळची (माणसाची, पशूची) सिद्धता, तयारी, सज्जीकरण. (राजा.) [घुडणेचे द्वि.]

घुडा-डी पु. स्त्री. शेताचा विभाग. (गो.)

घुडी स्त्री. कबुतरखाना; खुराडे; पहा : **घुड**

घुडे-डा न. पु. आकाराने अर्धवर्तुळाकार व उंच असे शेताला पाणी देण्याचे एक प्रकारचे सूप. पहा : **घुडवो**

घुड्ड न. १. (खिन्नता येण्याच्या वेळचा) पोटात होणारा गडगड आवाज. २. मेघगर्जना; विजांचा कडकडाट; गडगडाट. [ध्व.क. गुड्ड]

घुण पु. लाकूड कोरणारा एक किडा : 'कै खट्वांग जुनें घुणें लिबडिले हे खड्ग कैचें करीं।' - निमा १.६६. [सं. घुण]

घुणघुणा पु. नाकपुड्यातील पडद्याचा खालचा मांसल भाग; नाकातील एक अवयव; गुणगुणा; घोळण; घोणा.

घुणघुणाट पु. घों घों असा आवाज : 'घनु वाजे घुण घुणा।' -ज्ञागा २६३.

घुणा पु. १. (सोनारी) साखळीचा, दागिन्याचा दुहेरी दुवा; आवळगाठ (याचा आकार ळ सारखा असतो). (क्रि. देणे.) २. बिरडे; गेंद; पेच; बोंडी; मणी (तोडा इ. दागिन्यांचा). ३. दोरांची, साखळ्याची एकात एक गुंतवून (शोभेसाठी) केलेली मोठी गाठ, गोंडा, झुबका. ४. लाकडाशी लाकूड जोडून ती लाकडे तेथे घट्ट राहावीत असा बांधण्याचा प्रकार. ५. (उतरणीवर वेग कमी करण्यासाठी) गाडीच्या चाकांच्या मागे घालायचा लाकडाचा दांडा, काठी, खरडी. (क्रि. घालणे, लावणे.) ६. (ल.) अडथळा; खोळंबा. ७. साखळीची एकटी कडी. - (तंजा.) (वा.) ० **घालणे** - अडथळा करणे; खीळ घालणे; व्यत्यय आणणे. ० **घेणे** - एखादे ओझे घट्ट बांधताना दोराची दुहेरी अढी, दुमड, विळखा (घोणा) घेणे.

घुणा-ण्या वि. दुर्मुखलेला; एकलकोंड्या; आतल्या गाठीचा; तोंडाचा जड; घुमा; कपटी. - (तंजा.) पहा : **घुम्या**

घुणाक्षर न. १. घुण नावाच्या किड्याने लाकूड कोरल्यावर उमटलेल्या उठलेल्या अक्षराची आकृती; किड्याने कोरलेल्या जागेत अभावितपणे उठलेले अक्षराकार चिन्ह: 'विपायें घुणाक्षर पडे। टाळिये काउळा सांपडे।' - ज्ञा १७.३०१. २. भुंग्याच्या गुंजारवात, गुणगुणण्यात अक्षरासारखे भासते, ऐकायला येते ते. [सं.]

घुणाक्षरन्याय पु. (न्याय.) घुणाक्षरावरून बनवलेला न्यायशास्त्रातील एक न्याय. किड्याने सहजगत्या कोरलेल्या आकृतीत एखाद्या अक्षराचे, वस्तूचे, मनुष्याचे, साम्य (चित्र) आढळते. यावरून यदृच्छाघटित अकल्पित गोष्टीला हा न्याय लावतात. सहजासहजी घडणारी गोष्ट; असंकल्पित घटना: 'हा घुणाक्षरन्यायाने या कटकटींतून खरोखरचा नांव विचारण्याचा कानडी प्रश्न उमटला की काय?' - भा ६३.

घुणे वि. अज्ञानी.

घुनी स्त्री. फार लहान कान असलेली मेंढी. (माण.)

घुपळा पु. घोळका : 'घुपळा घुपळा करून बसल्याली लोक एका ठिकाणला जमा व्हाय लागली.' - रैत ७१.

घुबड न. १. रात्री घू घू असा आवाज करणारा एक पक्षी; हा दिवसा दडून बसतो (म्हणून याला दिवाभीत असेही म्हणतात.) व रात्री भक्ष्य शोधण्याकरिता बाहेर पडतो. हा उंदरांचा संहार करतो. घुबड व त्याचा

घू घू आवाज ही अशुभ मानली जातात. दिवांध; घूक; डुडूळ २. (निंदार्थी) हिडिस व ओंगळ दिसणारी म्हातारी स्त्री.

घुबा पु. कळा; न फुललेली कळी. (को.)

घुबा पु. ताडामाडाच्या चुडताला वेष्टून असलेला कापसासारखा भुगा. चकमकीपासून उत्पन्न होणारी ठिणगी यावर घेतात. चकमकीचा कापूस. (गो.)

घुबुकेल न. टावके; गुप्त ठेवा. पहा: **घबुकेळ** (क्रि. लागणे, सापडणे.)

घुम स्त्री. गोम; घोण.

घु(घू)म पु. कानाच्या मधल्या पाळीत घालण्याची लहान बुगडी; कुर्डू. (गो.कु.)

घुमकट न. (बे.) चाकाच्या तुंब्यावरील धावेप्रमाणे असलेली लोखंडी कंगणी, कडे. पहा : **गुमकट**

घुमकांवचे सक्रि. गुद्दे मारणे; ठोसे देणे; ढोसणे. (गो. घुमको = गुद्दा)

घुमकी स्त्री. (वादन) डाव्या हाताने डग्ग्यावर तळहाताचा मनगटाजवळील भाग टेकून बोटांनी जो गंभीर ध्वनी काढतात तो. [ध्व.]

घुमको पु. गुद्दा; ठोसा; ढोसा. (गो.) [ध्व.]

घुमघुमणे अक्रि. (तोफ इत्यादिकांचा) घुमघुम आवाज होणे; दुमदुमणे; दणाणणे; दणदणणे; घुमणे: 'घुमघुमिती घोषा। वेदपद्याच्या।' – ज्ञा १५.१८८ [ध्व.]

घुमघुमी वि. घुमघुमणारा : 'कां घुमघुमी मंदराचलें। क्षराब्धि जैसा ।।' – राज्ञा ११.४७९.

घुमट पु. देऊळ इ.च्या कळसाखाली असलेला डेऱ्याच्या आकाराचा बंदिस्त भाग: कळस; अर्धगोलाकृती छप्पर. [फा. गुंबद, हिं. गुम्मट]

घुम(मा)ट न. घुमटाच्या आकाराचे एक चर्मवाद्य. हे घुमटाच्या आकाराच्या मातीच्या (मोठ्या) घड्याच्या तोंडाला चामडे लावून तयार करतात : 'थोड्या वेळानें मध्यभागी बसलेल्या तिघां–चौघां इसमांनीं आपापल्या घुमटावर प्रास्ताविक थापा देण्यास सुरवात केली.' – सह्याद्रि ६६.

घुमटला वि. घुम्या; एकलकोंडा; मुखस्तंभ. (ना.)

घुमटा पु. (विशिष्ट वाद्यांचा) घुमणारा आवाज; गजर.

घुमटी स्त्री. १. लहान घुमट. २. देव्हारा. (गो.)

घुमड पु. १. घूम; डोळ्यांतील खुपऱ्या. (क्रि. येणे, फोडणे, बसणे.) २. (मुलांच्या भाषेत) पापण्यांचा तांबडा अंतर्भाग (जो भिववण्याकरिता बाहेर काढतात तो).

घुमडा पु. पारवा : 'घुमडे घुमघुमिती भारी।' – क्रिपु ३३.१३.

घुमण न. घुबड.

घुमणे अक्रि. १. पहा : **घुमघुमणे** 'जंव नाशु नाहीं पवना। तंव वाचा आथी गगना। म्हणौनि घुमे।' – ज्ञा ६.२७८. २. (वाद्ये इत्यादिकांनी) आतल्या आत बराच वेळ खोल आवाज काढणे. ३. (वाद, गप्प, आजार, आवाज, खेळ, काम इ.) रेंगाळणे; लांबत जाणे; चिघळणे; रेंगणे. ४. (पिशाच्चसंचारामुळे, थंडीच्या हुडहुडीमुळे, अतिश्रमामुळे, रेंगाळलेल्या दुखण्यामुळे, हरीक इत्यादिकांचा मांद चढल्याने) हूं हूं करणे; धापलणे; उसासणे; लाहक्या देणे; थापा, सुस्कारे टाकणे; कुंथणे : 'तरवारीनें केक मेले कैक घायाळ तिथे घुमती।' – विवि ८.४.८०. ५. (हरीक इ. धान्य पदार्थ) चिवचिवणे; उमळणे; खतखतणे; फसफसणे. ६. (अंगात संचारलेले भूत) चेष्टा करू लागणे; खेळणे; हालचाल करणे. ७. (पारवे इ. पक्ष्यांनी आपला) घूं घूं असा आवाज करणे; (पक्ष्यांनी) तारगंभीर आवाज करणे, गाणे. ८. (एखाद्या गोष्टीचा) बराच काळ बोलवा असणे. ९. (एखादी गोष्ट गुप्तपणे) कर्णोपकर्णी पसरणे;पसरलेली असणे. [सं. घूर्णन]

घुमपट पु. गाडीच्या तुंब्यासभोवार असलेला लोखंडी वाळा, कडे. पहा : **घुमकट** (गो.)

घुमर(रि)णे अक्रि. १. (पिशाच्चसंचार होऊन) घुमणे; हूं हूं असा आवाज करणे; अंगात येणे. २. (भूतपिशाच्चाने) चेष्टा करणे; खेळणे; वारे शिरणे. (को.) [सं. घूर्ण्]

घुमरा वि. थोडीशी झिंग, नशा आणणारा.

घुमरा पु. आवाज घुमविण्याची क्रिया : 'पण वयपरत्वे त्यांच्या गळ्यातील घुमऱ्याचा जोर व तान–आलापातील कस राहिला नाही' – अस्ताई १०१.

घुमराई स्त्री. विपुलता; घुमरी : 'येकच रणवाद्याची घाई। वीरश्रीची घुमराई।' – होला १८८.

घुमरी स्त्री. १. गुराख्यांचा एक खेळ. यात तोंडाने घुमण्यासारखा आवाज काढून नाचतात. (क्रि. घालणे.) २. मोठमोठ्याने आरडणे, ओरडणे. (क्रि. घालणे.) : 'घुमरी घालीत जोर बैठक देवळींत व शेतांत देखील फावेल तेव्हां मारावी.' – खेया. ३. एक बासरीसारखे वाद्य : 'घुमऱ्या मोहऱ्या पावे सुस्वर।' – ह १०.१५.

घुमरी स्त्री. टेंगूळ. (झाडी) [हिं. गुमडा]

घुमरी स्त्री. १. लयलूट; विपुलता; चंगळ; सुकाळ; समृद्धी; भर; उत्कर्ष : 'त्याचिया पिकासी आलिया घुमरी। आल्या गाईवरी अणिक गाई।' – तुगा २९. २. (ल.) पीक; धान्य; दाणा : 'मेघा तोषोनि यावरी। इच्छिल्या ऐसी वृष्टि करी। तेणें पिकती घुमरी। आणि गोधनेंही दुभती।।' – निगा ४६. (क्रि. येणे.) [सं. घस्मर (?)] वि. भरपूर; विपुल; समृद्ध : 'ऐशिया वोजा परी। बीजें पेरिलिया क्षेत्रीं। पीक पिकेल घुमरी।' – एभा ६.३०७. [ध्व.]

घुमवणे सक्रि. फिरवणे; हिंडवणे : 'तिथल्या अनेक गल्लीबोळातून त्यांनी मला घुमवलं.' – गणगोत ११८.

घुमवणे सक्रि. ठोक देणे; हैराण करणे : 'विश्यादादाने डाप्याच्या बहिणीचा पदर ओढला. त्यावेळी मामूने त्याला काय घुमवले होते.' – वासू ३.

घुमशण, घुमशान न. धांगडधिंगा; मनसोक्त नाच. (गो.) पहा : **घमशान**

घुमसुला पु. धिंगाणा. (क्रि. घालणे.) : 'कमरेवर हात ठेवून ती घुमसुला घालू लागली.' – सराई.

घुमा पु. (भोवऱ्याच्या खेळात) भोवऱ्याच्या डोक्यावर पाडलेला खोचा; डाव जिंकणाराने हरलेल्याच्या भोवऱ्यावर आपला भोवरा मारणे. [का. गुम्मु = मारणे.]

घुमा पु. १. (मनुष्य, पशू वठणीवर आणण्याकरिता, पशू माणसाळविण्याकरिता दिलेला) चोप; दणका; धबका; धपाटा;

कठोरपणाने वागवणे; जरब दाखवणे. (क्रि. घालणे, गाजवणे.) २. (अतिशय काम केल्याने, आजारीपणाने आलेला) शीण; थकवा; निरुत्साह; (छळणुकीमुळे, तगाद्यामुळे आलेला) त्रासिकपणा; हुळहुळेपणा; (बेदम मार मिळाल्याने अंगाचा उडालेला) खुर्दा; चकनाचूर; खुरमा; चक्काचूर. (क्रि. घालणे, गाजवणे, घेणे.) ३. मोडकळी; खुर्दा; चूर.

घुमा पु. १. (एखादे काम, धंदा) दिरंगाईवर, लांबणीवर टाकून बसणे; चालढकल झालेली अवस्था. (क्रि. घालणे.) २. (एखाद्या हाती घेतलेल्या कामाची चालवलेली) दिरंगाई; चालढकल; हयगय; अळंटळं; चेंगटाई. (क्रि. घालून बसणे, घेणे.)

घुमा पु. एक प्रकारचा नाच, खेळ : 'नाच ग घुमा।'–मसाप २.२३४. [ध्व.]

घुमा–म्या वि. १. दुर्मुखलेला; एकलकोंडा; मनमोकळा नसलेला. २. वरून स्तब्ध पण आतल्या आत धुसफुसणारा; आतल्या गाठीचा; खोल मनाचा. ३. मुखस्तंभ; तोंडाचा जड; अबोल्या; मितभाषी. ४. (ल.) ठोंब्या; सुस्त; जड; दगड; टोणगा (मनुष्य). [प्रा. गुम्म = मुग्ध, क. गुम्मन]

घुमाऊ–व पु. १. गावकरी, शेतकरी यांजपासून (गाव, शेत याबद्दल) सरकारी वसुलापेक्षा घेतलेला जादा आकार. २. (रत्नागिरी, कोल्हापूर इ. भागात) आंबराई, कुरण, शेतजमीन इत्यादिकांचा मक्ता, कौल. क्रिवि. खंडाने; मक्त्याने; कौलाने. (कर.) [हिं. घुमान. सं. घम्ब्]

घुमाट (कु. हेट.) पहा : **घुमट**

घुमाणघुस्का वि. आतल्या गाठीचा; घुमा; खोल मनाचा पण कपटी. (व.)

घुमार न. आजार, रोगराई. (व.)

घुमारा न. घुमण्याचे कार्य, क्रिया. पहा : **घुमारा** : 'मायेचे घुमार सर्वांगी भरलें वारें।' – दावि ५०१.

घुमारणे अक्रि. (कैफ, मादक पदार्थ इत्यादिकांच्या) अमलाने, कैफाने युक्त होणे; धुंदी, कैफ चढणे: 'तेणें घुमारिला भीमसेन। परि कपट नेणती धर्मार्जुन। मग निजेला पंडुनंदन। वृकोदर तो।।'–कथा ५.१.२९.

घुमारणे अक्रि. फिरणे; थैमान घालणे : 'त्याने माझ्या तोंडामध्ये कशी लगावली नाही याचेच आश्चर्य घुमारू लागले होते.' – वासू २.

घुमारा पु. मांत्रिक; पंचाक्षरी : 'कोणी वैद्य घुमारा पहा बाई आसल पुरता।' – पला ९६.

घुमारा पु. घुमणारा आवाज, नाद : 'नलगे रवि दंड डेरा। काढुनि दे आतील घुमारा।' – ह ६.११.

घुमारा–रे पु. न. (भूत, पिशाचादिकांचा) अंगात संचार होणे; वारे येणे; अवसर; संचार : 'काय आतां घुमारें येईल अंगासी।'– व ३१.

घुमारी स्त्री. कैफ; धुंदी : 'जेया लागे मधु घुमारी। तोचि अपवित्रु।' – क्रिपु २२.५२.

घुमारीन वि. घुमणारा ; अंगात वारे येणारा (देह, अंग); पछाडले जाईल असे : 'नाहीं येत वारें अंगासी माझीया। घुमारीन काया नव्हे माझी।' – ब ३५.

घुमाव पु. (संगीत) कर्णेंद्रियाला अनुभूत होणारा आवाजाचा लहानमोठेपणा.

घुमावाघ पु. १. गर्जना न करता सावजावर झडप घालणारा वाघ. २. (ल.) वाच्यता, उगाच वटवट न करता आपले काम साधून घेणारा खोल मनाचा मनुष्य. ३. अतिशय आळशी मनुष्य (आळशी वाघाप्रमाणे).

घुमिली वि. धुंद; कैफ चढलेला; तर्र झालेला (डोळा इ.) : 'राधा हरिला पुसती । नेत्र विलासती लाल भासती। उघड दिसती दृष्ट घुमिली।'– होला २२.

घुमी स्त्री. घुमण्याचे प्रमाण : 'नगाऱ्यांची आणि ढोलांची विशिष्ट घुमी तज्ज्ञांकडून तपासली जाते.' – अआगो १२५.

घुमेबाजी स्त्री. भोवऱ्याचा एक खेळ; भोवऱ्याच्या खेळात डाव जिंकणाराने जिंकलेल्या गड्याच्या भोवऱ्याला खोच देण्याचा प्रकार; घुमा.

घुम्म क्रिवि. गप्प; न बोलता.

घुम्मज पु. घुमट : 'जगातील सर्वात मोठा असा निळा घुम्मज....' – पडरे ३०७. [फा. गुम्बझ्]

घुम्मनघुसा वि. घुमा ; आतल्या गाठीचा : 'माणसानं सदा घुम्मनघुस्यागत असूने.' – रैत ६७.

घुयऱ्या वि. घुम्या. (व.)

घुरकणी स्त्री. वाघाची डुरकावणी, डरकाळी. (गो.)

घुरकणे अक्रि. (वाघ इत्यादीने) ओरडणे; आरोळी ठोकणे. पहा : **गुरकणे** : 'पदतळीं असती दोनी व्याघ्र। घुरकोनि पाहती रूप उग्र।' ह्व दावि ३४४. [हिं. घुरकना] [सं. घुर]

घुरकी पहा : **घुमरी** १

घुरकी स्त्री. चक्कर; फेरा; धक्का; भोवरा; हिसका; टोला: 'ऐकिल्यास उत्तम नाहीं तर एके घुरकींत हातपाय गळून पडतील.' – मइसा ५.७९. [ध्व.]

घुरकॉ वि. डुरकणारा; घुरकणारा; डुरक्या फोडणारा (वाघ इ.). (गो.)

घुरगडी स्त्री. एक प्रकारचा हुक्का. (हेट.)

घुरगुटणे पहा : **गुरगुटणे**

घुरघुर, घुरघूर स्त्री. पहा: **गुरगुर; घरघर** [सं. घुर्]

घुरघुरणे अक्रि. १. पहा : **गुरगुरणे.** २. वाजणे: 'तुरतुरिती काहाळां। घुरघुरितीं टिवाळा।' – शिव २. [सं. घुर्]

घुरघुर वात ज्याच्या योगाने पोटात गुरगुरते व स्नायूंच्या शक्ती क्षीण होतात असा वाताचा विकार.

घुरघुरा पु. एक किडा; घोगेरा. [ध्व.]

घुरघूस पु. स्त्री. फकिराच्या हातातील एक हत्यार.पहा : **गुरगुज**

घुरघूस क्रिवि. गाढ; स्वस्थ; घोरत. पहा: **गुरघुस.** (क्रि. निजणे.) (वा.) **० मारणे –** पाय पोटाशी घेऊन निजणे; गुरगुटून निजणे.

घुरट–टा वि. १. ज्याच्या अंगाला दूध, दही, ताक, लोणी इत्यादिकांचा कुजट व उग्रट वास येतो असा (बकरा, मांजर, वाघ इ.) : 'तुझिये अंगीं घुरट घाणी। बहु खासी दूध तूप लोणी।'– तुगा १२९. २. घामट; घाणेरडी : 'घाणेरी घुरटी तुला तरि कसी ते मानली नाकळे।' – निमा १.६६.

घुरट वि. घुमा.

घुरटा(ष्टा)ण स्त्री. (मेंढा, मांजर इ. जनावराच्या अंगाची येणारी) उग्रट, कुजट घाण; घुरष्टाण.

घुरणे अक्रि. १. घोरणे. २. घुरघुर आवाज करणे (मांजर इ.नी). [सं. घुर]

घुरणे अक्रि. जमणे; गोळा होणे: 'कितीतरी कावळे त्याच्याभोवती घुरले होते.' – शेलूक १४७.

घुरदळणे अक्रि. जुगार खेळणे, इकडून तिकडे उड्या मारणे; धांगडधिंगा घालणे; धिंगामस्ती करणे; धुडगूस, धिंगाणा घालणे; खिदडणे; धिंगडणे. [सं. खुर्द]

सक्रि. पहा : **गुधडणे**

घुरदळा–के पु. न. १. पहा : **गुधडा.** २. खिदडा; धिंगाणा; धांगडधिंगा; धिंगामस्ती. (क्रि. घालणे, मांडणे.)

घुरदळी–ळ पहा : **घुरदळा** २. (क्रि. घालणे, मांडणे.)

घुरम्याउंदीर पु. १. मोठ्या जातीचा उंदीर; शेतातील उंदीर. २. (ल.) अट्टल, बिलंदर चोर. ३. कावेबाज व कारस्थानी, पाताळयंत्री मनुष्य.

घुरम स्त्री. दोन टोकांचे इरले. (गो.)

घुरमळणे अक्रि. १. (एखाद्या पदार्थाभोवती) घिरट्या घालणे; घुटमळणे; रेंगाळणे. उदा. पतंग दिव्याभोवती, माशा गोड पदार्थाभोवती घुटमळतात तसे. २. (काही एका आशेने) एखाद्याच्या भोवती असणे, लोचटपणाने पुढे पुढे करणे; लाळ घोटणे. ३. (विझण्यास आलेल्या दिव्याची ज्योत, निघून चाललेला प्राण) घुटमळणे; लिकलिकणे; झिरूमिरू, मरूमरू करणे. ४. कचरणे; कां कूं करणे; आशंकणे; घोटाळणे; गडबडणे. ५. (बोलताना) अडखळणे; चाचरणे; बोबडी वळणे. ६. अस्पष्ट, संदिग्ध बोलणे. ७. चेंगटाई करणे; गोंधळणे; माशा मारीत बसणे. ८. पेंगणे; झोपेला येणे : 'हळूहळू सर्वच जण घुरमळले.'– खरादे ७८.[सं. घूर्ण्.]

घुरमुळणे पहा : **घुरमळणे** ३ ते ७.

घुरम्यांव न. मांजर पिलाला शोधत असताना जो घुरघुरयुक्त म्यांव म्यांव असा आवाज करते तो. (क्रि. करणे.)

घुरंगुटॉ पु. कोळी, कीटक. (गो.)

घुराब न. एक प्रकारचे गलबत. पहा : **गुराब** [फा. गुराव]

घुराळी स्त्री. घुरवळी; गुरवळी; गुरळी; गुळाची पोळी; गुळाचे एक पक्वान्न : 'त्यावर वाढित्या घुराळ्या.'– लोसामा ५.५७

घुरुघुरू क्रिवि. घुरघुर असा आवाज करत : 'जिजा घुरूघुरू घोरत होती.' – व्यंमाक ३२.

घुरूत पु. पिठाची चिकट कांजी. (गो.)

घुरे न. १. एक रोग; अपस्मार; फेफरे. (क्रि. जडणे, लागणे, येणे.) २. घेरी; चक्कर; भोवळ. (क्रि. येणे.) [सं. घूर्ण, घूर्म]

घुरे न. एक प्रकारची घाण येणारे झाड, लाकूड : 'कां बावनें आणि घुरे । हा निवाडू तंवचि सरे । जंव न घेपती वैश्वानरें । कवळुनि दोन्ही ।।' – ज्ञा १८.१२५३.

घुर्मिल स्त्री. एक प्रकारची वेल. (गो.)

घुर्मी स्त्री. १. झोपेची तंद्री, झापड, सुस्ती : 'अवघी रात्रीं निद्रा केली। अझुनी घुर्मी कां दाटली ।' – दावि २६०३. २. धुंदी : 'विघरोन गेलीसे आतां उर्मी । जिराली घुर्मी नयनांतील ।' – दावि ३९६. ३. भोवळ : 'सर्वेचि व्यापिला घुर्मी' – उह १९५७. [फा. गुर्मी]

घुर्रा पु. १. राग. २. झाडाभोवतीचे कुंपण.

घुल–ला स्त्री. एक प्रकारचा मासा. (गो.)

घुलकावणी पहा : **गुलकावणी**

घुलकावणे सक्रि. पहा : **गुलकावणे.** १. फसविणे; गुलकावणी दाखविणे; हुलकावणी देणे; फूस लावून ठकविणे: 'त्याला विश्वास दाखवून घुलकावून घुलकावून घात तर करणार नाहीत?' – वज्राघात २०५. २. नखऱ्याने, लाडीगोडीने (मान इ.) वेळावणे, हालविणे : 'पुच्छ नाचवी कडोविकडी । मान घुलकावी घडिघडी ।' – ह ३१.५६.

घुलकी स्त्री. हुलकावणी दाखवणे : '.... अन् नारायीन देव चटकन् घुलकी देऊन तटून पळून गेला.' – आलो ४९.

घुलघुला पु. खुळखुळा. (झाडी)

घुलणे अक्रि. झुलणे; गरगर फिरणे. [सं. घूर्ण्, घुण्]

घुलवणे उक्रि. झुलवणे; थापा देऊन खोटी आशा उत्पन्न करणे.

घुलविणे सक्रि. फसवणे; भुलविणे; झुलविणे : 'नंतर ज्या ठिकाणी दाणापाणी नाहीं, असे जागीं निजामास घुलवीत नेऊन अगदी लढून जेर केलें.' – मइसा २ पेश ५६.

घुला पु. पिवळसर, तपकिरी रंगाची ठिपकेदार मोठी कवडी; कवडीचा एक प्रकार : 'शीख सिंपी घुला कवडे । आधीं त्याचें घर घडे । किंवा आधीं निर्माण किडे । हे विचारावें ।।' – दास ९.७.५.

घुला–ले पु. न. सुरवंट; कुसरूड.

घुला–ले वि. वाकडी मान करून पाहणारा वाकडमान्या : 'तारसें घुले काणें कैरें ।' – दास ३. ६. ४१.

घुलावणी, घुलकावणी, घुलवणे स्त्री. फूस लावणे; लुलुपुतु करणे; चाळवणे; चाळवणूक; गुळगुळथापडी; थापा देणे; प्रलोभन, फसवणूक.

घुले वि. अरुंद. (ना.)

घुल्ल वि. वाकडे (पाहणे) : 'हुल्ल कपाळ ज्याचें । घुल्ल पाहणें ह्याचें ।' – दावि ५०.

घुवा वि. चिखलाने माखलेला. – (तंजा.)

घुशा–श्या वि. घुसणारा; आगंतुक.

घुशी स्त्री. १. (मधून, मध्ये) जोरात घुसणे, शिरणे. (क्रि. मारणे.) २. जोराचा रेटा, धक्का. (क्रि. देणे, मारणे.)

घुशू न. (मुलांच्या भाषेत) स्नान; आंघोळ. (गो.)

घुसखोर पु. जबरदस्तीने आत शिरणारा; आक्रमक; आगंतुकी; हल्लेखोर.

घुसखोरी स्त्री. अनधिकाराने, जबरदस्तीने आत प्रवेश करणे.

घुसघुसणे अक्रि. उष्मा भासणे, होणे. [कु.]

घुसडणी स्त्री. घुसडण्याची कृती. पहा : **घुसडणे**

घुसडणे सक्रि. १. जोराने आत खुपसणे, शिरकावणे, घालणे. २. (ग्रंथात, लिखाणात पदरचा भाग) दडपून देणे : 'हिंदुधर्मातील रीतीभातींनी आमचा पुष्कळ तोटा होत आहे हे अर्जात हलकेंच घुसडून द्यावें.' – लोटिकेले ४.४०. ३. आडदांडपणे, इजा होईल अशा रीतीने वापरणे, उपयोग करणे. ४. (मनुष्य, जनावर इ.ना) दमवणे; भुस्कट पाडणे; (पुस्तके, कागद इ.) चुरगळून, चोळवटून जातील अशा तऱ्हेने वापरणे; चुथडा करणे.

अक्रि. रेटून, जोराने आत शिरणे; (स्वत:ला) जोराने आत ढकलणे.

घुसडा पु.१. गुधडा; धिंगाणा; दुर्दशा. (क्रि. मांडणे.) : 'असे

एकसारखे बोलत त्यानें आईच्या अंगाचा घुसडा मांडला.' – यख ५१. २. (वाईट रीतीने वापरलेल्या कपडे, कागद, पुस्तके इत्यादिकांचा) चुथडा; चोळामोळा; दुर्दशा; चेचा; चेंदा; धुडगूस; (मनुष्य, जनावर इत्यादींची) फार काम करून घेतल्याने झालेली दुर्दशा; दामटी वळलेली स्थिती.

घुसणी स्त्री. (गोट्यांचा खेळ) गोट्यांच्या खेळात हरलेल्या गड्याला द्यायची एक प्रकारची शिक्षा. हिचे कोपरघुसणी, पेरघुसणी व कानघुसणी असे तीन प्रकार आहेत.

घुसणी स्त्री. आत घालण्याची क्रिया; शिरकाव करणे.

घुसणी स्त्री. श्वास कोंडणे. (क्रि. होणे) : 'निजसुरी बाळकावरि पडली। तेणें तेया घुसणी जाहाली।' – क्रिपु २६.१६.

घुसणे क्रि. गवसणे, नेम धरणे : 'ठणुनि लाथ घातली कंबर घुसून। येवूनी सांगती लेकाला गाऱ्हाणं।' – एहोरा (वासुदेव) २८.

घुसणे अक्रि. १. जोराने आत शिरणे; प्रवेश करून घेणे; दपटून शिरकणे; दुर्गम अशा स्थळी, गर्दीत, बळाने, युक्तीने प्रवेश करून घेणे. चंचु प्रवेश करणे. २. (ल.) (हक्क, अधिकार, आमंत्रण नसता जमातीत) आगंतुकाप्रमाणे प्रविष्ट होणे, शिरणे; आगंतुक जाणे. [सं. गवेषण]

घुसपटणे पहा : **घुसमटणे**

घुसपणी स्त्री. गुंतागुंत; गोंधळ; घोटाळा. (गो.)

घुसपागोंधळ पु. गुंतागुंत; घोटाळा.

घुसपाल पु. (कान इ.) पिळण्याची, पिरगळण्याची क्रिया; कानाला खडा लावणे; पुन्हा न करण्याचा निश्चय. (गो.)

घुसपूचे अक्रि. गुंतणे; गोंधळणे. (गो.)

घुसमट स्त्री. १. श्वासनिरोध; जीव कोंडणे. २. पहा : **घुसमड.** ३. धांदल; कोंडमारा; उलघाल; कुचंबणा : 'तेच पेलताना नाकी नऊ येत होते, घुसमट घडत होती !' – गाणे ४.

घुसमटणी स्त्री. गुदमरणी; श्वासाचा कोंडमारा. (गो.)

घुसमटणे अक्रि. १. दम कोंडल्यासारखे होणे; गुदमरणे; श्वासावरोध होणे. २. (ल.) कोंडमारा झाल्याने, तोंड दाबून बुक्कीचा मार अशी अवस्था झाल्याने अगदी जेरीला येणे; कोंडमारा होणे; अडचणीत सापडणे. ३. घुसडले जाणे; अस्ताव्यस्त होणे; चोळवटून जाणे; चुथडा होणे.

घुसमटमार पु. गुदमरणे; कोंडमारा; दम कोंडणे. (गो.)

घुसमड स्त्री. १. तुडवणी; गुधडा पाडणे; मर्दन, चोळामोळा. २. धुडगूस; धिंगाणा; धिंगामस्ती; धांगडधिंगा.

घुसमडणे अक्रि. घुसणे; शिरणे : 'आईच्या कुशीत घुसमडून त्यांच्या गोजिरवाण्या पिलांनी त्याचे अनुकरण केले.' – व्यंमाक २.

घुसमडणे पहा : **घुसमाटणे १**

घुसमाट(ड)णे सक्रि. १. (एखाद्याची) रग जिरवणे; (एखाद्याला) जमिनीवर लोळवून त्याची गात्रे शिथिल करणे. (ना.) २. रगडणे; दडपणे : 'मुरगाळीतां कान घुसंमडीत सावधान।' – तुगा ३२०६. ३. कोंडमारा करणे.

घुसमारा पु. फेकाफेक.

घुसमांडणे सक्रि. कोंडमारा करणे.

घुसलखाना पु. १. स्नानगृह; न्हाणीघर. २. खलबतखाना; एकांताची खोली. [अर. घुस्ल = स्नान + फा. खाना =घर.]

घुसळखांब पु. (ताक, दही इ.) घुसळण्याची रवी दोरीने ज्या खांबाला अडकवलेली असते तो खांब; घुसळ्यासाठी उपयोगी खांब.

घुसळण न. घुसळण्यासाठी भांड्यात घातलेले दही, विरजण इ. घुसळण्याची क्रिया : 'उठुनी प्रातकाळीं गौळणी घुसळण घुसळीती।' – भज १०.

घुसळणे सक्रि. १. (दही इ. भांड्यात घालून) रवीने जोरात फिरवणे; मंथन करणे; ढवळणे. २. गदगदा जोराने हलवणे; इकडून तिकडे ढकलणे. ३. (एखाद्याला) फार किंवा अवघड कामे सांगून दमवणे, राबवणे, बेजार करणे; जेरीला, जिकिरीला आणणे; घाम काढणे. याच अर्थी हाडे घुसळणे असाही प्रयोग आहे. [सं. घृष्]

घुसळप न. १. घुसळण्याची क्रिया. २. घुसळण्याचे विरजण. (कर.) पहा : **घुसळण** १.

घुसळा पु. १. घुसळून निघालेला पदार्थ. २. (घुसळून काढलेला) लोण्याचा गोळा, नवनीत.

घुसळीव वि. घुसळलेला; मंथन केलेला.

घुसा, घुस्सा पु. १. राग; रागाची लहर : 'मोठा घुसा येऊन...' – मदरू १.१७. २. अढी; अवकृपा. [फा. घुस्सा]

घुसा, घुस्सा पु. ठोसा; गुद्दा; धपका; धक्का; तडाखा. [हिं. घूसा]

घुसाडणे पहा : **घुसमाटणे**

घुसारा पु. धडक (क्रि. करणे.) : 'एखाद्या जनावराने जर घुसारा केलाच तर त्याचा पहिला धडका स्टुलावर बसणार.' – वाघसिंह ११३.

घुसूप न. झुडूप.

घुस्तांवचे सक्रि. पायांनी तुडवणे. (गो.)

घुस्मारणे सक्रि. मारणे; घुसमटून मारणे; खुर्दळून ठार करणे : 'येणें गोपाळें चाणूर घुस्मारिला।' – दावि २०.

घुळघुळ–ळा क्रिवि. पाझरणाऱ्या, झुळझुळणाऱ्या पाण्याप्रमाणे किंवा किणकिणणाऱ्या घंटांप्रमाणे आवाज करीत; घळाघळा; खळाखळा. [ध्व.]

घुळघुळणे अक्रि. १. (पोट, पोटात) गुरगुरणे; गडगडणे; घुळघुळ असा आवाज होणे. २. (झिरपणाऱ्या पाण्याने) घुळघुळ असा आवाज करणे. ३. गडबडत, गडगडत लोळत जाणे; घुळत जाणे.

घुळणा पु. नाकातील पडदा; घोणा; घोळ्या.

घुळणे अक्रि. लोळणे; गडगडणे; गडगडत जाणे; घरळणे; लोटत जाणे. [सं. घुण्, घूर्ण]

घुळमडचे अक्रि. श्वास, दम कोंडल्याने गुदमरणे. (गो.) पहा : **घुसमटणे**

घुळी वि. देवी (या रोगाचा) प्रादुर्भाव न झालेला. – (तंजा.)

घुळी पु. १. देवाला सोडलेला बैल; पोळ; सांड (हा नेहमी मोकळा फिरत असून ह्याच्याकडून कोणतेही काम करून घेत नाहीत). (क्रि. सोडणे.) : 'तारुण्याच्या मदें न मानी कोणासी। सदा मुसमुसी घुळी जैसा।।' – तुगा ३१७४. २. (ल.) रिकामटेकडा, खाऊनपिऊन माजलेला माणूस; पोळ. [का. गुळी. सं. (गौ) गलि.]

घळूमुळू (करणे) काकू (करणे); एखादी गोष्ट करण्याबद्दल निरूत्साह दाखविणे : 'आधी घुळूमुळू घुळूमुळू करतील...' – रैत १२९.

घुंग पु. भुंगा; भ्रमर : 'तळ्यांत म्हैस बसली होती. तिच्या शिंगात घुंग होऊन धाकटा मुलगा जाऊन बसला.' – मसाप १.२.२२. [ध्व.][सं. ङ्]

घुंग(गु–गू)ट पु. डोक्यावरून, तोंडावरून आच्छादनार्थ घेतलेले वस्त्र, कपडा; बुरखा. (वा.) **घुंगटमुंडी घालणे –** तोंड झाकणे.[हिं. घुंघट]

घुंगरटे न. चिलट; मच्छर; केंबरे; डास. पहा : **घुंगरूट**

घुंगरा पु. एका टोकाला घुंगरू बांधलेली काठी. हिचा ताल धरण्यासाठी उपयोग होतो. (ना.)

घुंगरू न. रेशमाची एक जात.

घुंगरू–र पु. न. घागरी. हा धातूचा, पोकळ असून आत खडा घातलेला असतो, त्यामुळे आवाज होतो. ह्याचा आकार करवंदाएवढा गोल असतो. याच्या वरच्या बाजूला दोरा ओवण्याजोगी कडी, नाक असते. [हिं. घुंघरू]

घुंगरूट, घुंगुरटे–गुडे, घुंघुरट–डे, घुंगर्डे न. १. चिलट; मच्छर; केंबरे; (लहान) डास : 'घुंगर्डी म्हणती आमुचे घर। निश्चयेंसी ।।' – दास १.१०.४१. २. (ल.) लहान मुलगा; अगदी लहान व अशक्त मनुष्य; क्षुद्र माणूस. [क. गुंगुरू = माशी]

घुंगस पु. तटबंदी असलेल्या शहराच्या, गावाच्या वेशीबाहेर असणारा कोट, बाह्यकोट.

घुंगार पु. कोणताही पदार्थ विशेषत: मांस इ. मऊसर शिजल्यावर खाली उतरून थंड होऊ देतात. थंड झाल्यावर त्याचे कोंडाळे करून त्यात एक निखारा ठेवतात आणि त्यावर तूप ओतून लागलीच भांड्यावर झाकण ठेवतात. या कृतीला घुंगार असे म्हणतात. [क्रि. देणे]

घुंगुटपट पु. बुरखा; बुरख्याचे वस्त्र.

घुंगुर पहा : **घुंगरू** : 'होती नाद निघे सुमंजु हलती जीं कांचिचीं घुंगुरें।' – कमं २.६८.

घुंगुरकेश पु. (अव.) कुरळे केस.

घुंगुर, घुंगुरुडा, घुंगुरडे, घुंघुरडा, घुंघुरूडा–डे पहा : **घुंगरटे** : 'घुंगुरडा ऐसे वदन। म्हणे पर्वत सगळा ग्रासीन।' – ह ३५.१०.९.

घुंगुरवाळा पु. घुंगरू, घागऱ्या लावलेला (लहान मुलाच्या पायात घालायचा) वाळा : 'वाजवरे बाळा। वेल्हाळा। रुमझुम घुंगुरवाळा।' – वाग्वैजयंती.

घुंगैरा पु. काळा, तांबडा भुंगा. (ठा.)

घुंघरट, घुंघरुट पहा : **घुंगरटे**

घुंघाट–टी पु. स्त्री. घुबडांचा आवाज; घुत्कार : 'दिवाभीतांचे घुंघाट।' – मुआदि ३६.५८; 'क्रूर श्वापदांची दाटी। दिवाभीतांची घुंघाटी।' – भाराबाल १२.६३. [ध्व.]

घुंघातणे अक्रि. (घुबड इत्यादिकांनी) आवाज करणे; घूं घूं असा आवाज करणे; गुणगुणणे : 'जैसे सर्व लोक निजलिया। उलूक उठे घुंघातु।' – हंको. [ध्व.] [सं. घु]

घुंघुर, घुंघुरटे, घुंघुरडे, घुंघुरडा पहा : **घुंगरू, घुंगरटे**

घुंघुरदा पु. घों घों असा आवाज करणारा भुंगा, भ्रमर, भोवरा. [ध्व.]

घुंघूर पहा : **घुंगुर, घुंगरु**

घुंघूर पु. फुलाचा कांदा; घांगूड.

घुंची स्त्री. खोळ : 'सिदूने मेणकापडाची घुंची अंगावर घातली.' – जाण ३२.

घुंबड स्त्री. गर्दी; झुंबड. (बे.) [क. गुंपु]

घुंबरडा पु. १. कबुतरांचा घूं घूं असा आवाज; कबुतरांचे घुमणे. २. (ल.) गोंगाट; कलकलाट (मुलांचा – खेळण्याच्या वेळेचा). (क्रि. घालणे, करणे.)

घुंवचे अक्रि. स्वत:भोवती फिरत राहणे; गरगर फिरणे; झिंगणे. (गो.)

घुंवळ स्त्री. भोवळ; घेरी; चक्कर. (गो.)

घुंवळचे अक्रि. घेरी, चक्कर येणे; मस्तकात भ्रमण होणे. (गो.)

घूक पु. घुबड; दिवाभीत : 'देते परघूकातें सुहृदब्जांचे प्रभाकर दरा जे।' – मोद्रोण १२.२५. [ध्व. सं. घूक]

घूकदृष्टि–ष्टी स्त्री. (घूक म्हणजे घुबड हे दिवसा डोळे पूर्ण उघडत नाही व किलकिले करून पाहते यावरून) डोळे अर्धवट मिटून पाहणे. [सं.]

घूट पु. घोट. (झाडी)

घूट(घूं)ट वि. लठ्ठ व ठेंगू; धष्टपुष्ट आणि बुटका. (को.)

घूड पु. १. घोस; पुंज; पुंजका; घड; गुच्छ. २. काप इ. दागिन्यांना लावतात तो मोत्यांचा घोस, झुबका. ३. घुमट; मनोरा; डेरा (गो.) [क. गुड्डु]

घूड न. कोंबड्या झाकून ठेवण्याची मातीची घुमटी; कोबड्यांचे खुराडे. (कर.) [क.गुड्डु]

घूड न. कणसासकट पेंढ्यांची टोके उभी करून लावलेली रास. (बे.) [क. गुड्डु]

घूण पु. लाकूड, धान्य वगैरे पोखरणारा किडा. [सं.]

घूत्कार पु. घुबडाचा आवाज. [ध्व.]

घूम पु. डोळ्याच्या पापणीच्या आतील बाजूला होणारा रोग; (सामा.) खुपरी घुमड. (क्रि. येणे. फुटणे, होणे.)

घूम पु. हरलेल्या गड्याच्या भोवऱ्याला पाडलेला खोचा. [क. गुम्मु = मारणे]

घूम पु. घूमपेंढीच्या खेळातील व आट्यापाट्यामधील एक पारिभाषिक शब्द. [क. गुम्मु = मारणे]

घूम पु. (कवायत) अर्धचक्कर मारणे. [सं. घूर्ण्]

घूमजाव पु. १. कवायतीतील एक हुकूम. हा हुकूम मिळाल्यास ज्या दिशेला आपले तोंड असेल तिच्या विरुद्ध दिशेला ते करणे. २.बदल.

घूय घालणे मुलांचा एक खेळ. यात एखाद्या मुलाला कोंबळ्याखाली झाकून त्याला डहाळ्यांनी झोडपतात. त्यामुळे त्याला राग येऊन तो सवंगड्याला पकडायला धावतो. (कु.)

घूर पु. माशाची एक जात. (गो.)

घूर्ण वि. १. धुंद; मस्त; माजलेला : 'अहंमहामदें उन्मत्त पूर्ण। देह तारुण्यें अति घूर्ण।' – एभा ३. ५१७. २. भ्रमणारा; घुमणारा. [सं.]

घूर्णन न. गरगर फिरणे; परिभ्रमण करणे; फेर, गिरकी घेणे, भोवंडणे.[सं.]

घूर्णन अक्ष (भौ.) एखादी वस्तू ज्या भोवती फिरते तो अक्ष, आस.

घूर्णनकेंद्र न. (यंत्र.) चक्राकार गतीचा केंद्रबिंदू.

घूर्णनत्रिज्या स्त्री. (यंत्र.) गिरक्या घेणाऱ्या वस्तूंचे केंद्रांतर.

घूर्णना स्त्री. भ्रमाची अवस्था.

घूर्णवात पु. चक्रवात.

घूर्णित वि. १. गरगर फिरवलेले; भ्रमविलेले; भ्रमण करायला लावलेले.

२. (ल.) बेसावध; मूर्च्छित; धुंद : 'एकें घूर्णितें सावधें ।'–ज्ञा ११.१२६.

घूर्णितकरण न. (नृत्य) उजवा हात बाजूला करून वाटोळा फिरवणे, डावा हात दोलित करणे, पायाचे स्वस्तिक करून त्या स्वस्तिकांतून पाय दूर करणे हा प्रकार. [सं.]

घूल पु. एक प्रकारचा नरभक्षक वन्य राक्षस : 'तो काहीं घूल किंवा सैतान नव्हता.' – वज्राघात ११०.

घूल स्त्री. (गो.) पहा : **घुला**

घूस स्त्री. १. उंदराच्या जातीचा पण उंदरापेक्षा मोठा प्राणी : 'कां न सदन बांधावे कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस ।' – मो स्फुट आर्या २ (नवनीत) २५४. २. (उप.) अतिशय काळ्या वर्णाची स्त्री. (वा.) **घुशीचा सापळा –** (ल.) एखाद्याला पेचात आणण्याकरता रचलेला डाव, व्यूह.

घूस स्त्री. पाखडताना धान्यातून निघणारे, उडणारे भुसकट; माती इ. (कु.गो.)

घूसखोर पहा : **घुसखोर**

घूं घूं उद्गा. घुबडाचा आवाज, ओरडणे : 'कुंभकर्णाच्या घरावरी । दिवाभीत घूं घूं करी ।' – बाल ७.६.२. भुंगे, माशा इत्यादिकांचा आवाज. [ध्व.]

घृणा स्त्री. १. वीट; तिरस्कार. २. दया; करुणा. [सं.]

घृणास्पद वि. कंटाळा, वीट येण्यासारखे; किळसवाणे; तिरस्करणीय.

घृणी वि. दयाळू; कृपावंत; दयार्द्र; मायाळू; कनवाळू; करुणाशील.[सं.]

घृत न. तूप; आज्य : 'अथवा इंद्रियें आणि प्राण हेचि यज्ञोपचारभरण। अज्ञान घृत ।।' – ज्ञा ९.२४०. [सं.]

घृतकुमारी स्त्री. कोरफड; कुमारी; कुवारकांडे; कुवारी. [सं.]

घृतकुल्ल्या मधुकुल्ल्या स्त्री. १. (तुपाचे पाट व मधाचे पाट) तूप व गोड पदार्थ यांची चंगळ, रेलचेल, समृद्धी. २. (ल.) मिष्टान्नाचे सुग्रास व चमचमीत भोजन : 'पुराणांचा शिमगा जेव्हापासून सुरू झाला व भटांच्या घृतकुल्या मधुकुल्या देशांत प्रवृत्त झाल्या तेव्हापासून... कौशल्य चट सारें पार वाहून गेलें.' – नि. [सं.]

घृतधेनु–नू स्त्री. तुपाच्या गोळ्याला गाय समजून पूजा करून ब्राह्मणाला दान करायचा गोळा. [सं.]

घृतबुद्धि–द्धी स्त्री. बुद्धीचा जडपणा; मंदबुद्धी; जडबुद्धी; बुद्धीची ग्रहणशक्ती तीव्र नसणे. (पाण्यात तुपाचा थेंब थिजतो किंवा फार हळूहळू पसरतो यावरून).
वि. मंदबुद्धीचा; तल्लख बुद्धी, ग्रहणशक्ती नसणारा. [सं.]

घृतविपाक पु. (रसा.) तूप खतखतणे, फसफसणे, रासायनिक प्रक्रिया होणे : 'साखरेचा दुग्धविपाक व नंतर घृतविपाक होऊं देऊन...' – सेंपु २.५.४.

घृतश्राद्ध न. तीर्थयात्रा करण्याच्या उद्देशाने घराहून निघताना करायचे श्राद्ध. यातील मुख्य द्रव्य घृत (तूप) असते म्हणून याला हे नाव आहे.[सं.]

घृतस्नानी वि. पानावर तूप वाढल्यानंतर स्नान करणारा; स्नान केल्याबरोबर खायला बसणारा; जेवण तयार होईपर्यंत स्नान न करणारा.

घृताम्ल न. (रसा.) गाईच्या लोण्यात असलेले एक अम्ल. कॉडलिव्हर ऑईल तसेच दुसऱ्या काही प्रकारच्या चरबीत व काही उद्भिज्ज कोटीतही हे सापडते.

घृष्ट वि. घासलेले; चोळलेले; घर्षण पावलेले. [सं.]

घृष्टतल न. घोड्याच्या पायाला होणारा एक रोग. हा घोड्याच्या खुरांचे तळवे अधिक घासले गेल्याने होतो – अश्वप २.३८.

घृष्टि–ष्टी स्त्री. १. घर्षण; घासणे : 'का दोहीं काष्ठाचिये घष्टी । माजीं वन्हि एक उठी ।' – ज्ञा १८.११५९. २. (ल.) संसर्ग; स्पर्श; सहवास; संघटन; घसट : 'काय द्विजु अंत्यजघृष्टीं । अंत्यजु नोहें ।।' – ज्ञा १७.५१. [सं.]

घृष्णेश्वर पु. बारा ज्योतिर्लिंगापैकी एक.
वि. (ल.) मंद बुद्धीचा; बथ्थड; दगडोबा. [सं.]

घेऊघेवडी स्त्री. लोभी, खादाड स्त्री.

घेऊ देणे या शब्दसंहतीचा उपयोग पूर्वकालवाचक धातुसाधितांना जोडून करतात. अशा वेळी त्याचा अर्थ एखाद्याला एखाद्या क्रियेचा विषय, त्या क्रियेच्या अधीन होऊ देणे किंवा एकाद्याने स्वत:करिता एखादी गोष्ट करणे असा होतो.

घेऊपाशेरी स्त्री. १. दुसऱ्यापासून विकत घेताना दुकानदार वापरतात ते पाच शेरांचे माप. हे सर्वसाधारण मापांपेक्षा किंचित मोठे असते. २. (ल.) अयोग्य, अन्याय्य लोभीपणा; अनीतिमूलक लोभ.
वि. दुसऱ्याचे जिन्नस गैरवाजवीपणे, जुलमाने लाटणारा, लाटण्याची इच्छा धरणारा; दुर्वृत्त लोभी.

घेऊ (ओ) पासरी, घेऊ (ओ) बा वि. नेहमी दुसऱ्यापासून घेणारा; उसने काढणारा, परंतु दुसऱ्याला कधी देण्याची, उसने देण्याची सवय नसलेला (मनुष्य); अप्पलपोट्या; स्वार्थी.

घेगा–घा, घेंगा–घा पु. १. एखाद्याला काही काम करायला प्रवृत्त करण्यासाठी त्याला सर्वांनी मिळून दिलेली उठावणी, उत्तेजन, नेट. (क्रि. करणे.); ढोकणे. २. (एखाद्या विरुद्ध उठलेले) काहूर; गिल्ला; ओरड; गवगवा. (क्रि. करणे.) ३. (एखाद्या कामात, उद्योगात केलेला) जोराचा व निर्धाराचा नेट, प्रयत्न; हल्ला; गर्दी; चढाई. पहा : **एलगार.** ४. (एखाद्या कामाची) तातडी; घाई; निकड. ५. निकराचा हट्ट. (क्रि. होणे.)

घेगाटणे अक्रि. रेकत बोलणे; दरडावून बोलणे; घेंगावणे. (व.)

घेघाट पु. हाकाहाक; घे घे असे ओरडणे.

घेघाल अ. भरपूर. (व.)

घेघे स्त्री. १. नेटाचा प्रयत्न; जोराचा, निकराचा हल्ला; घेगा. २. लढाईच्या वेळी हल्ला करताना आवेशाने ('हा वार घे' अशा अर्थी) योद्धे हा शब्द उच्चारतात : 'तोंडानें बोलुनि घे घे ।' – संग्रामगीते ७६. [घेणेचे द्वि.]

घेघेमार पु. १. निकराचा, नेटाचा, जोराचा एकत्रितपणे प्रयत्न, हल्ला; चोहोकडून अनेकांचा पराकाष्ठेचा प्रयत्न. २. (ल.) हातघाईची लढाई (कारण अशा वेळी घे, घे, मार, मार अशी वीरश्रीची भाषा चालू असते. ३. दाणादाण (क्रि. होणे).
क्रिवि. घाईने; उतावीळपणाने; मागेपुढे न पाहता; विचार न करता.

घेटा पु. बोकड; एडका; मेंढा : 'शिकारी संबंधात प्राथमिक व्यवस्था करण्यासाठी पाठवलेल्या अमलदारांस पाडे, घेटे मिळवून देण्यासाठी...'

– सिंहाचे व वाघाचे शिकारीसंबंधी नियम. (बडोदे) [हिं. घे]

घेटाघेटी स्त्री. मुलांचा एक खेळ.

घेटी स्त्री. बकरी; कोकरू. [गु.]

घेटु(टो)ळी स्त्री. (वै.) एक प्रकारची औषधी वनस्पती. हिला पुनर्नवा असे म्हणतात. पांढरी व काळी असे हिचे दोन प्रकार आहेत : 'पोट फुगण्याची व्यथा असणारांनी घेटोळी किंवा खापरीची भाजी खावी.' – निजी ५७.

घेटो पु. (राज्य.) १. शहराच्या ज्या भागात ज्यू लोकांना सक्तीने ठेवले जात असे तो भाग किंवा वस्ती. २. कोणत्याही वांशिक किंवा सांस्कृतिक अल्पसंख्याकांना सक्तीने वस्तीसाठी राखून ठेवलेला भाग. [इं.]

घेणी स्त्री. १. घेणे; ग्रहण करणे; स्वीकार : 'अहो प्रत्यक्षादि प्रमाणीं। कीजे जयाची घेणी।' – अमृ ७.४२. २. (गंजिफांचा खेळ) दशावतारी गंजिफातील एक पारिभाषिक संज्ञा; ज्या गड्याकडे राजा असून वजीर नसेल त्याचा वजीरवाल्या इसमाकडून डाव घेण्याचा हक्क. ३. (लग्नांत) दुसऱ्या पक्षाकडून घ्यायची रक्कम, जिनसा इ.; करणी, हुंडा.[सं. ग्रह]

घेणे सक्रि. १. स्वीकारणे; प्रवेश देणे; अंगीकारणे; आपल्या हातात येईलसा करणे : 'त्यात घेऊं ये तितुकें घ्यावे।' – दास १५.९.३२. २. धरणे; पकडणे; हिसकणे; झोंबाडणे : 'जे घेय हातीं बरवी विपंची।' – सारुह १.२. ३. लागणे बसणे; मिळणे (मार इ.). ४. समाविष्ट, प्रविष्ट, अंतर्भूत करणे; आत येऊ देणे. ५. कवटाळणे; कैवार घेणे; पत्करणे; उचलणे (पक्ष, बाजू, धर्म इ.). ६. कबूल, मान्य करणे; मान्यता, संमती, अनुमोदन देणे; ग्राह्य समजणे. ७. योग्यता, किंमत जाणणे (गुणांची); आदरणे; चांगले लेखणे (गुणांबरोबर उपयोग). ८. हस्तगत करणे; मिळवणे; पैदा करणे; शोधून मिळवून आणणे; संपादन करणे (खबर, बातमी, चाहूल, पायरव). [सं. ग्रह]

घेणे सक्रि. १. समजणे; मानणे : 'ये दुजे नाहींचि घेई। सर्वत्र मी गा।।' – ज्ञा १५.४११. २. ऐकणे : 'वाक्य घेऊनि हरुषली आई।'– दावि १६०.

घेणे सक्रि. १. मनात आणणे, बाळगणे, ठेवणे (शंका, संशय, तिरस्कार इ.) : 'मागे हांसति गौळणी हरिपुढें ह्या घेतलीसे भ्रमें।' – आकृष्ण ३८. २. आविर्भाव आणणे, पांघरणे; लटके धारण करणे (वेड, सोंग इ.).

घेणे सक्रि. १. मुकवणे; हरण करणे; नाश करणे; बुडविणे (प्राण, शील इ.). २. छाटणे; तोडून टाकणे; कापणे.

घेणे सक्रि. लागणे; आवश्यकता असणे; खर्ची पाडणे; खपवणे; आटवणे; खाणे (वेळ, स्थळ, शक्ती).

घेणे सक्रि. खडकावणे; खडसणे; ठोक देणे; मारणे.

घेणे सक्रि. विशिष्ट आचरण, वर्तन, कृती करणे. उदा. शोध, वाद, गाठ, लढाई, माप घेणे.

घेणे सक्रि. हाताने देणे; उचलून देणे; जवळ नेणे. ह्या अर्थी नेहमी आज्ञार्थीचा प्रयोग होतो.

घेणे सक्रि. जोडणे; मिळविणे; स्वतःवर आणणे; ओढवून घेणे (उपहास, निंदा, मार); विषय होणे (निंदा, मार इ.चा).

घेणे सक्रि. पलीकडे जाणे; ओलांडणे (डोंगर, विशिष्ट स्थिती); संपविणे; शेवटास नेणे; सिद्धीस नेणे (प्रवास, मजल इ.).

घेणे सक्रि. १. जोडणे; सामील करणे; वाढविणे. २. स्वतःला जोडणे; जडवून घेणे; लावून घेणे (सवय, खोड, व्यसन).

घेणे सक्रि. आणणे; घालणे; माथी मारणे; अंगाला चिकटविणे (आरोप, आळ, बालंट, तुफान).

घेणे सक्रि. १. (एखाद्या वस्तूने दुसऱ्या वस्तूचा स्वतःवर) परिणाम होऊ देणे; विकार पावणे; परिणाम लागू करून घेणे. २. जवळ येऊ देणे, पाजणे. (गाईने वासराला)

घेणे सक्रि. मारणे; बळी घेणे; नाश करणे.

घेणे सक्रि. स्थापणे; ठेवणे; आदराने स्पर्श करणे : 'येऊनि तुजजवळीं। चरण घेतिल तव भाळीं।' – रत्न १७.

घेणे अक्रि. जाणे; पळून जाणे; एखाद्याचा आश्रय करणे.

घेणे अक्रि. वळणे; कल होणे; एखादी गोष्ट करायला तयार होणे (मन इ. नी) : 'त्यामुळें ह्याचा शब्दशः अर्थ करण्यास आमचे मन घेत नाहीं.' – मसाप २. ११७.

घेणे अक्रि. (भय, रोग, मोह इ.कांच्या) ताब्यात जाणे; (ज्वर, भय मोह, दुखणे इ.कांनी) घेरले जाणे; व्यथित होणे : 'आणि तेणें आपुलेपणाचेनि मोहें। तुम्ही संत घेतले असा बहुवें।' – ज्ञा ९. १७.

घेणे सक्रि. (बुद्धिबळांचा खेळ) एकाने दुसऱ्याचे मोहरे मारणे. कित्येक वेळी क्रियापदाच्या पुढे घेणे याचे रूप मनसोक्तपणे लावतात. अशा ठिकाणी ते कारक हा क्रियेचा कर्ता आहे असे दाखविते; तर काही ठिकाणी शब्दावर जोर देण्याकरिता त्याचा उपयोग करतात. विशेषतः कर्त्याविषयी जोराने बोलायचे असल्यास क्रियापदाला जोडून घेणे याचा प्रयोग करतात. परंतु सामान्यतः अशा वाक्यरचनेने विशेष अर्थ ध्वनित होत नाही व वाक्य चांगल्या रीतीने पुरे करण्यातच केवळ याचा उपयोग करतात. जसे : – पोराने हात पोळून घेतला. काही वेळा एखादी क्रिया आटोपून, उरकून टाकणे या अर्थी पूर्वकालवाचक धातुसाधितास घेणे हा शब्द जोडतात. उदा. स्नान करून घ्या, मी भात शिजवून घेतो, हे तुम्ही मनावर घ्या. इ.

घेणे सक्रि. (घेणे ह्या क्रियापदाचे निरनिराळ्या संबंधात अनेक प्रयोग होतात. उत्पादन-घर-चालीवर-जागा-शेवट-तोडीवर-त्वरेवर-घाव-परीक्षा-पाठ-रान इ. अनेक शब्दांना जोडून घेणे या क्रियापदाचा होतो. त्याचप्रमाणे देणे, टाकणे, मारणे, घालणे व पाडणे या धातूंप्रमाणे अनेक धातुसाधितांना जोडूनही घेणे शब्दाचा प्रयोग करतात. उदा. आटोपता घेणे, आखडता घेणे, काढता घेणे. श्वास, रजा, सूड इ. शब्दांना जोडूनही घेणे या क्रियापदाचा उपयोग होतो. शिवाय उपयोग करणे, गिळणे, सहन करणे, सोसणे (रोग, व्यसन इ.) जडवून घेणे इ. अनेक अर्थ होतात.

घेणे न. लूट : '... तह केला कीं जे घेणे येईल. त्यात पायींच्याचा येक विभाग व स्वारांचे दोन विभाग.' – पे ३३.१३२.

घेणे न. उसनी दिलेली, परत यायची रक्कम, प्राप्ती, पहा : **घेणे देणे**

घेणेकरी-दार वि. १. सावकार; धनको; कर्जदार. २. काही काम न करता पोटभर खाण्यास मिळण्याचा हक्क सांगणारा (नातलग, आजारी नोकर).

घे-दे स्त्री. १. अटी तटीचे भांडण; हातघाई : 'ऐसी घे-दे होताए।' –

लीचउ १२६.२. २. शाब्दिक झटापट : 'पंडित केसोबास... सकाळींचि घे–दे म्हणौनि थोरें जिज्ञासा करी होते.' – स्मृस्थ १२४.

घेणेदेणे न. १. उसने देणे व घेणे; देवघेव; परस्पर व्यवहार (एखाद्याशी करण्याचा) : 'मग सुखानुभूतीचीं घेणीं देणीं। मंदावो लागली ।।' – ज्ञा १६.१२. २. व्यापार; दळणवळण; उदीम.

घेतणे सक्रि. स्वीकारणे; पत्करणे. [सं.ग्रह्]

घेता–धा वि. घेणारा : 'जे मुकुटचि वृथा नटति घेते।' – मोआश्रम ४.२४.

घेतादेता वि. १. नेहमी पैसे उसनवार, कर्जाऊ घेऊन वेळच्या वेळी फेडणारा; कर्जाच्या बाबतीत चोख व्यवहार करणारा; नेहमीचे गिऱ्हाईक. २. (यावरून) शेजारधर्माचे दळणवळण ठेवण्याचा स्वभाव असणारा.

घेतादेता क्रिवि. (व्यापारात) शेवटी नक्की ठरवण्याच्या वेळी; देवघेवीच्या रदबदलीच्या शेवटी; प्रत्यक्ष देवघेवीच्या वेळी; किंमत ठरवून खरेदी करायच्या वेळी.

घेतावणा वि. घेण्याकडेच प्रवृत्ती असलेला.

घेते न. अंत:करण.

घेपणे सक्रि. (कर्मणी) घेणे; ग्रहण करणे : 'तंव आपुलिये पळीं हात। घेपतिही।' – अमृ २.१८. [सं. गृभ्]
अक्रि.घेतले, ग्रासले जाणे; वेढले जाणे : 'तो कामनामात्रें न घेपे।' – ज्ञा ३.७१.

घेपाट पु. (एखाद्या गोष्टीसाठी एखाद्याचा) हट्ट; एकसारखे पाठीस लागणे. (क्रि. घेणे.) (व.)

घेपु(पो)देपु (पो) पु. १. ज्यापासून काही लाभ नाही असे उसनवार घेणे – देणे; बिनव्याजाने पैसे देणे : 'सट्टाबट्टा करिसी गड्या रे घेपुदेपु नाना।' – देप २१३. २. (सामा.) फिरून फिरून केलेली व त्रासदायक अशी देवघेव.

घेमार पहा : **घेघेमार** : 'घेमार सुरू जे झाली।' – संग्रामगीते १३५.

घेमारगर्दी स्त्री. घनचक्कर; अतिशय गडबड : 'पण अशा घेमारगर्दीत तसें करण्यास फारच थोडी सवड सांपडते.' – पार्ल १००.

घेमारि स्त्री. 'घे' आणि 'मारी' – या दोन रणगर्जनांचे मीलन : 'घेमारि भूतावळी।' – गरा १०४.

घेर–रा पु. १. एखाद्या वस्तूच्या एका बिंदूपासून निघून तिच्याभोवती फिरत पुन्हा त्याच बिंदूला येईपर्यंत होणारे तिचे अंतर. २. परिघ; फेर; वेढा; मंडल. ३. (अंगरखा इ. वस्त्रांचा) घोळ, पालव, झोळ, पदर. ४. शेंडीभोवती राखलेले केसांचे वर्तुळ; संजाब. ५. कुंपण; वई; आवार. ६. विळखा; पकड. [सं.ग्रह, हिं.](वा.) **घेरात घेणे –** जाळ्यात धरणे; भुरळ घालणे : 'त्याच्या घरी राहून अंजीने त्याला घेरात घेतले होते.' – बनगर १०९.

घेरणी वि. आकाशात मंडले करणारी, घेरे घालणारी कबुतरांची एक जात: 'पत्रें सादर जाती त्यांत आज्ञा कीं घेरणी खबुतरे खामखा मेलवून पाठविणें.' – पेद २८.२५.

घेरणी स्त्री. वेढा; विळखा; घेरा : 'कालभुजगाविआं घेरणी। तैसिआ दिठीं डंकिती कामिनी।' – दाव ४४९.

घेरणे उक्रि.१.सर्व बाजूंनी वेढा देणे; वेष्टणे; गराडा घालणे : २. (एखाद्याला) संकटात गोवणे; पेचात आणणे; कचाटीत पकडणे : 'हा कोण घुटमळतो आहे येथे? स्वारीत घेरलें पाहिजे.' – पुण्यप्रभाव. ३. (ताप, भूक, झोप इ.नी) पछाडणे, व्याकूळ करणे, ग्रासणे. [सं. घिर्]

घेरदार वि. १. मोठा घेर, परीघ असलेला. २. मोठा घोळ, संजाब, फेर असलेला (अंगरखा इ.) : 'बारा हजारांना केसरी झगा। घेरदार बारा हजार।' – ऐपो ४४. ३. मोठा घेरा असलेली (शेंडी).

घेरना पु. भोवरा; आवर्त.

घेरविणे सक्रि. (कित्ता, वळण, अक्षरे इ.) कोरड्या लेखणीने गिरविणे; वळविणे; कित्त्यावरून लेखणी फिरविणे.

घेरा पु. पहा : **घेर.** १. डोंगरी किल्ल्याच्या भोवतालचा तीन चार कोस घेराचा प्रदेश, प्रांत. २. एक वाद्यविशेष. हे मोठ्या डफासारखे असते. [सं. ग्रह्]

घेरा पु. पेच; गोता; अडचण; कचाटी.

घेरा पु. तीराचा एक प्रकार. याचे पाते रुंद असते.

घेराओ पहा : **घेराव**

घेराघेरी, घेरघर स्त्री. १. गनिमी लढाई. २. वेढा : 'मोगल फौजा चहूकडून उतरऊन घेराघर केला आहे.'– पेद २०.८६. (क्रि. करणे.) [घेरणेचे द्वि.]

घेराव पु. असंतुष्ट कामगार, नोकर, विद्यार्थी इत्यादिकांनी आपल्या तक्रारींचा विचार व्हावा म्हणून अधिकारी, अध्यापक इत्यादींभोवती जमा होऊन त्यांना वेढा घालणे, इकडेतिकडे जाऊ न देणे : 'प्रिन्सिपॉल, व्हाइस चॅन्सेलरला घेराव करा.' – पेआ १६५.

घेराव पु. समुदाय; घेर; दाटी : 'चीड व देवदाराच्या भव्य वृक्षांचा घेरावा अनुपम छाया विस्तारीत होता.' – हिप्र ७०.

घेरी स्त्री. चक्कर; भोवळ; मूर्च्छा; भोवंड; अंधेरी; झीट. (क्रि. येणे.)

घेरी स्त्री. मोठा डफ : 'घेरी वैरिविदारणा।' – गरा १०२.

घेरू पु. १. किडलेल्या लाकडातून पडणारे भूस. पहा : **घरू** २. न झाडलेल्या भिंतीवर, छपरावर लागलेली कोळिष्टके, जळमटे; घेरोसा. (को.)

घेरेदार, घेरेबाज वि. गोल; मोठा घेर असणारा; मोठा वाटोळा आकार असलेला.'त्याहून काकणभर अधिक खबरदारी असल्या घेरेबाज पगडीवाल्यास घ्यावी लागते.' – आलेसं २५५.

घेरोसा पु. : पहा : **घेरू** २, **घरोसा**

घेऱ्या पु. सुतळी तयार करताना तिला पीळ देणारा मनुष्य.

घेलगटणे सक्रि. गांगरून टाकणे; गोंधळात टाकणे : 'शंभर जणांनी शंभर प्रश्न विचारून त्याला घेलगटलं.' – वळीव ७४.

घेलचोद्या वि. (अशिष्ट) मूर्ख; मठ्ठ; घोडचुका करणारा; अशुद्धाळ; विसराळू; निष्काळजी; वेडझवा. (को.)

घेलाशेट पु. (उप.) १. अति हव्यास असलेला मूर्ख, चिवट मनुष्य. २. उलाढाल्या व्यापारी. ३. अर्धवट, बावळट मनुष्य. [सं. गृहीत]

घेव पु. (एखाद्यापासून) घ्यायचा, यायचा जिन्नस, पैसा इ. घेणे. (कु.)

घेव वि. घेण्याजोगे : 'घेव ये तेंचि घ्यावें। घेव न ये तें सांडावें।' – दास ११.४.२४.

घेवडा पु. १. एक वेल. याला वालाचा वेल असेही म्हणतात. २. (सामा.) या वेलाची शेंग. हिला घेवडी, घेंगडी असेही म्हणतात. याच्या पांढरा,

पिवळा, काळा, चवधारी, बोट-घेवडा व गर्वा-घेवडा अशा जाती आहेत. शेंगांची व दाण्यांची भाजी करतात. [सं. गर्वा]

घेवडी स्त्री. १. घेवड्याचा वेल; शेंग; दाणा. २. घेवडी मुंगी.

घेवडे न. घेवड्याची शेंग. (कु.)

घेवणी स्त्री. घेणी; घेणे; येणे. (चि.)

घेवदेव, घेवादेवा-वी स्त्री. पु. १ व्यापारधंदा; उदीम. २. देवघेव; घेणे-देणे इ. चा व्यवहार; दळणवळण.

घेवपत धंदा, व्यापार, व्यवहार, उदीम नावापुरते भांडवल असून बहुतेक पतीवर चालवलेला धंदा, व्यापार.

घेवबा वि. दुसऱ्यापासून नेहमी घेण्याचा स्वभाव असलेला.

घेवाणनोंद स्त्री. (ग्रंथ.) वाचकांकडून पुस्तक परत आल्यानंतर त्याची ग्रंथालयाच्या दप्तरात करावयाची नोंद.

घेवाणदेवाण स्त्री. (संक्रांतप्रसंगी सुवासिनी स्त्रिया परस्परांना वाण (वायन) देतात-घेतात त्यावरून). १. आपसांतले (उसने) देणे-घेणे; देवघेव. २. पैशाचा व्यवहार. ३. (मेजवानी, लाभ, नुकसानी, भेट, आहेर इत्यादिकांची) परत फेड; परत करणे; प्रतिक्रिया.

घेवाणे, घेवाई जाणे क्रि. १. भूतबाधा होणे. २. वश होणे, कह्यात येणे. ३. परिस्थितीने गांजणे.

घेवारी पु. १. घाऊक माल घेऊन किरकोळीने विकणारा; केवट्या, डाळपिठ्या, हिंगमिऱ्या वाणी. २. (प्रां.) बागेतील निपज, पैदास, माळवे विकत घेऊन बाजारात किरकोळीने विकणारा व्यापारी.

घेवासे क्रिवि. घेता येण्यासारखे. (राजा.)

घेंगडी-री, घेडी, घेडीमुंगी, घेडा स्त्री. पु. एका जातीची तांबडी व आकाराने मोठी असलेली चावरी मुंगी; घेवडी, चाचड. या मुंग्या समुदायाने राहतात.

घेंगशा पु. गोंधळ; घासाघीस : 'आजपावेतों घेंगशातच काल व्यतीत होतो, काम कांहींच होत नाहीं.' - माशियांका २८८.

घेंगा स्त्री. मसाल्याची पातळ भाजी (शेव वा पातवड्या सह). (अहि.)

घेंगा (घा) वणे अक्रि. १. (एखाद्यावर) कडकडणे; जळफळणे; तोंड सोडणे; चवताळणे. २. गर्दीमुळे रंजीस येणे; (कामाच्या निकडीमुळे) बेजार होणे.

घैर(रा)व पु. घेरू; कोळिष्टक; कोळिंजन; जळमट. (गो. कु. हेट.) पहा : **घेरोसा**

घैलटचाली स्त्री. हेकेखोरपणा; वेडगळपणा; घैलटपणा. (को.)

घैलाट-ड, घैशा-स वि. मूर्ख व हेकेखोर; हट्टी; अगदी वेडगळ; अजागळ व आळशी; स्वच्छंदी व मठ्ठ. (को.)

घैसास वि. वृत्तिदर्शक पदवी.

घैंचा पु. तांबड्या देठाची शेवरी.

घो वि. घाबरलेला, हुल्ला. - (तंजा.)

घो, घोऊश, घोव पु. १. नवरा. २. पुरुष. (राजा. को. बे. गो.) पहा : **गोहो**

घोईन्द्र नपु. आक्रोश; धडपड. (व.)

घोक पु. १. पाठांतर; घोष; गजर : 'सांगितलें संतीं करा नामाचा घोक।' - निगा २३५. २. घोकणी; चिंता, काळजी. (क्रि. घेणे.)[सं. घोष]

घोककाम्या वि. अर्थाकडे लक्ष न देता, संदर्भ लक्षात न घेता घोकंपट्टी करणारा (विद्यार्थी); दुसऱ्याच्या सांगण्याचा हेतू, मर्म लक्षात न घेता सांगण्याप्रमाणे अक्षरशः चालणारा.

घोकणी-नी स्त्री १. (एखादी गोष्ट लक्षात राहावी म्हणून) पुनः पुन्हा घोकण्याची क्रिया; आवृत्ती. (क्रि. करणे, घेणे, गाणे.) : 'अजुनि तरि करि ही घोकणी।' - राला ८८. २. त्याच त्याच गोष्टीचा पुनःपुन्हा उच्चार, निदिध्यास; एकच गोष्ट धरून बसणे; आपली इच्छा, हेतू पुन्हा पुन्हा सांगणे. (क्रि. घेणे, लावणे, करणे, लागणे, मांडणे, धरणे.) : 'सुख असल्यावर दिनासारिखे कां भोति फिरते। घोकण्या करिते।' - सला २०. ३. झुरणी; खंत; खेद. (अहि.) [सं. घुष्]

घोक (ख) णे, सक्रि. १. पुनः पुन्हा म्हणून पाठ करणे; घोष करणे; पाठ म्हणणे : 'आम्ही अहर्निशीं नाम घोकूं।' - रामदास स्फुट अभंग ४७ (नवनीत १५४). २. (एखाद्या गोष्टीची) जपमाळ घेणे; घोष लावणे; वारंवार सांगणे, उच्चारणे. [सं. घुष् - घोषण]

घोकमळ वि. अतिशय पातळ; पाणचट (सांबार, कॉफी इ.). (गो.)

घोकरणे अक्रि. घों घों करणे. [ध्व. सं. घुक्]

घोकरी क्रिवि. घोंघों आवाज करीत : 'आणि कृष्णार्जुनांचे बोलणें। घोकरि आलें श्रवणें।' - राज्ञा ९.५२६.

घोकंपट्टी स्त्री. घोकण्याची क्रिया. पहा : **घोकणी** १. (क्रि. करणे.) : 'दुसऱ्या इयत्तेत फळ्यावरील शब्द मुलांनी आपल्या वहींत उतरून घेऊं नयेत, कारण या योगानें घोकंपट्टी करण्याची सवय मुलांना लागते.' - अध्यापन ७४. २. अर्थ न समजता केलेले पाठांतर.

घोकाणी स्त्री. चिंता : 'घोरि पडली घोकाणि। मनामाजि॥' - क्रिस्त ५.२७.

घोकीव वि. १. पाठ केलेला; घोकलेला (धडा इ.). २. स्मरणात, ध्यानात पक्का ठेवलेला; मनात पक्का ठसलेला.

घोकीव, घोक्या वि. १. समजून न घेता, ध्यानात न ठेवता निव्वळ घोकंपट्टी करणारा; मंद (विद्यार्थी). २. पोपटपंची करणारा; घोकूनच फक्त ध्यानात ठेवणारा. ३. कोणत्या वेळी काय बोलायचे हे पढविलेला; लाच घेऊन बनावट साक्ष देणारा (साक्षीदार इ.).

घोके बुक्या. -(तंजा.)

घोगन पु. दृष्टी, डोळे. (झाडी)

घोगर न. मोठे घुंगरू. (ना.)

घोगर पु. एक वृक्ष. याच्या पानांचे पात्र श्राद्धाला वाढतात. (झाडी)

घोगरा, घोग्रा पु. एक प्रकारचा नदीतील मासा.

घोग(घ)रा वि. १. फुटक्या मडक्याच्या ध्वनीप्रमाणे, म्हशीच्या ओरडण्यासारखा असलेला (आवाज); बसलेला, फुटलेला, पिचका (आवाज, कंठ). २. फुटलेल्या, पिचक्या, चिरक्या, बसलेल्या आवाजाचा (मनुष्य). ३. भरड; ज्यातला कंप कोरडा, तुटक व अपुरा वाटतो असा (आवाज). [सं. घर्घर]

घोगरी स्त्री. घुंगूर : 'पाई घालिती घोगऱ्या।' - जसा १०२.

घोगला पु. १. फोड. २. घट्टा. ३. भाजल्याने, देवीने येतो तसा फोड : 'दळणकांडणानें आले हाताला घोगले।' - लोसामा ५.२८७.

घोगला वि. पोकळ; पोखरलेला (दाणा इ.).

घोगली वि. पोचट; पोकळ : 'पेरण्याकरितां सरकी चांगल्या कापसाची, ज्यात घोगली सरकी कमी आहे अशी घ्यावी.' – महाराष्ट्रकृषीवल २४ ऑगस्ट १९३०.

घोगवरी, घोगारी पु.१. कोळी भंडाऱ्यासारखी एक जात. २. मराठ्यांच्या आरमारातील एक लढाऊ जात : 'मराठे व घोगारी व थोडेसे आरब सिद्दी ऐसे आहेत..' – पेद १६.७८.

घोगा पु. ओरड; गिल्ला; आरडाओरडा : 'जलद चला ऐसा घोगा करूं लागते.' – मदरू २.२७ [फा.]

घोगा वि. मोठा; प्रसिद्ध : 'तुका म्हणे आम्हाजोगें। विठ्ठल घोगे खरे माप।' – तुगा १७९८.

घोगार, घोगारणे पहा : **घोंगाड, घोंगाडणे**

घोगी पु. नरडे. (अहि.)

घो(घों)गे–घे, घोघा–वे क्रिवि. १. घों घों आवाज करीत. २. (ल.) जलदीने; सत्वर : 'पैं सरितेचेनि ओघें। सिंधुजळा मीनलें घोघें।' – ज्ञा ८.८४.

घोगोला : पु. एक जलचर; कासव. (झाडी) [हिं.]

घोग्या वि. वेडगळ; साधा; सरळ; बावळट; कोणाकडूनही सहज फसविला जाणारा. (व.) [हिं. घोंगा = मूर्ख मनुष्य]

घो(घों) घाट–ण पु. १. समुद्र, नदी, वारा इत्यादिकांचा घों घों असा आवाज. पहा : **घोंगाट.** (क्रि. घालणे.) २. भुंगे, माशा इत्यादिकांचा गुणगुणाट. ३. गलबला; गिल्ला; हुल्लड; हाकाटी; कलकलाट. (क्रि. करणे, मांडणे, घालणे.) ४. (ल.) गाजावाजा; गवगवा; परिस्फोट; डंका वाजणे. (क्रि. करणे.)

घोघावणे, घोघेणे अक्रि. (समुद्र, वारा इ. कांनी) घों घों असा आवाज करणे, गर्जणे. (राजा.) [ध्व.]

घोघे न. १. घबाड; डबोले; आकस्मिक सापडलेला ठेवा, झालेला लाभ: 'तें एक मोठें घोघें सांपडलें.' – विवि १०.५.१२४.
वि. मोठे.

घो घो १. समुद्र, वारा, नदीचा प्रवाह, पूर इत्यादिकांचा आवाज, गर्जना : 'घो घो शब्दें पूर चालला।' – नगंर (नवनीत ४२५). २. एखाद्या पदार्थाभोवती जमणाऱ्या माशांच्या थव्याचा आवाज. ३. धबधबा. (गो.) क्रिवि १. प्रचंड लाटा, सोसाट्याचा वारा, मुसळधार पाऊस यांच्या गर्जनेप्रमाणे आवाज करीत, होत. २. (मनुष्यांच्या घोळक्याच्या) गोंगाटाच्या, गलबल्याच्या, गलक्याच्या आवाजाप्रमाणे; खूप खेचाखेचीने; (माणसे इ.कांनी) गजबजत; पेव फुटल्याप्रमाणे घोंगावत. पहा : **घवघवा, घवघव** [ध्व.]

घोघ्या वि. घो घो करणारा; घोघावणारा.

घोट पु. (पाणी इ. द्रव पदार्थ) गिळण्याचे एक वेळेचे परिमाण; घुटका; चूळ : 'बहु उग्र गमे घेतां गरळाचा जेंवि घोट कामारी।' – मोभीष्म ८.४१ (क्रि. घेणे.) (वा.) **नरडीचा घोट घेणे, करणे, भरणे, काढणे –** (एखाद्याचा घोट करणे, गिळणे) अतिशय छळून, गांजून हैराण करणे; प्राण घेणे; ठार मारणे : 'तें घोंट भरूं धांवसी। देखतांचि घेसी जिवें त्यातें।' – एभा ५.२.

घोट, घोटक पुन. १. घोडा, अश्व : 'निजकरें तव स्पंदन घोटकां। धरिन मी करिं शत्रू सघोट कां।' – वामन विराट ६. १११. २. (बुद्धिबळात) घोडा या नावाचे मोहरे. [सं.]

घोटखोर पु. १. पाणबुड्या. २. दक्षिणेतील काही मराठा संस्थानात गावचा पाणबुड्या हा एक सरकारी नोकर म्हणून समजला जात असे. विहिरीत, तळ्यात पडलेल्या जिनसा काढून देणे हे ह्याचे काम असे.

घोटणी स्त्री. १. घोटण्याची क्रिया. २. (सोनारी) सोन्याचे मणी घोटण्याची, सारखे करण्याची आवटी; घोटण्याचे हत्यार, साधन. ३. कटकट; घासाघीस; जिगजिग. (ना.)

घोटणे न. घोटण्याचे उपकरण; घोटणी; घोटा.

घोटणे उक्रि. १. गिळणे : 'अगस्ती धांवे समुद्र घोटुं।' – मुसभा ७.१८. २. (ल.) सहन करणे; भोगणे (दु:ख, अपमान) : 'मुनि त्या अपमानातें घोटी जेविं त्रिलोचन गरातें।' – मोआदि २२.७.

घोटणे उक्रि. १. (कागद इ.) गुळगुळीत करण्याकरिता (कवडा इ.) कठीण व गुळगुळीत पदार्थाने घासणे. २. चुरडणे; खलात घालून बारीक करणे; वाटणे; उगाळून बारीक करणे; गरगटणे. ३. नीट मिश्रण होण्याकरिता हलवणे; ढवळणे; मळणे; खलणे. ४. (श्लोक, धडा इ.) पाठ करून पक्का करणे; घोटवणे; (अक्षरे, वळण) घटवणे, वळवणे. [सं. घृष्]

घोटणे अक्रि. बाहेर पडणे; गळ्यातून स्पष्ट होणे (आवाज वगैरे) : 'त्यांचा आवाज त्यांना घोटंना.' – उअं १९.

घोटभर वि. एका घोटात मावेलएवढा पातळ पदार्थ (पाणी, दूध वगैरे).

घोटमाळणे अक्रि. एकाच जागी थांबणे; घुटमळणे : 'धूर घोटमाळून जेवणघरच धुमसल्यागत झालं होतं.' – चिताक १०.

घोटर घाटर क्रिवि. कोरडे – वाटणे. (झाडी)

घोटवाल पु. वालाची एक जात. याची शेंग चापट व लहान असून दाणा वाटोळा करवंदासारखा असतो.

घोट सुपारी झाडावरच्या झाडावर वाळून तयार झालेली सुपारी.

घोटा पु. १. पायाची नळी व चवडा यांच्यामधील सांध्याचे वर आलेले हाड. २. दोन्ही घोट्यांवर मारलेला आडवा वार.

घोटा पु. वेलदोडे, बदाम इ. मसाल्याच्या पदार्थांसह घोटून केलेले भांगेचे मादक पेय : 'ब्राह्मणांचें तीर्थ घेतां त्रास मोठा। प्रेमें घेतो घोटा घटाघटां।' – तुगा ४३३४. [सं.घृष्ट]

घोटा पु. १. दागिने घोटण्याचे, झिलई देण्याचे एक साधन. हे गार किंवा एखादा दगड मुठीत बसवून केलेले असते. पहा : **घोटणी**. २. लाकडी लाठ्या, मुसळ, बत्ता.

घोटाळणी स्त्री. १. इकडेतिकडे भटकणे, भ्रमणे; भटक्या मारणे. २. घिरट्या घालणे; घुटमळणे; घोटाळणे. [सं.घुट्]

घोटा(ट)ळणे अक्रि. १. (गुंतागुंतीच्या मार्गात, चक्रव्यूहात) इकडेतिकडे, मागेपुढे फिरणे, भ्रमणे. २. वळणे; तोंड फिरविणे; दिशा बदलत फिरणे; गरगर फिरवणे; घुटमळणे. ३. (गवताच्या काड्या, केरकचरा इ. वाऱ्याच्या झोताबरोबर) इतस्तत: उडणे; गरगर फिरत राहणे. ४. (नदी इ.) वळणावळणांनी वाहत जाणे; भोवरे करीत वाहणे. ५. (मन इ.) गोंधळून जाणे, घोटाळ्यात पडणे; दिङ्मूढ होणे; बावरणे; गडबडून जाणे; गुंतणे.

६. घोटणे : '(नारळ) खडी सारुनि घोटाळिला होता।' – लीचउ ३०९. सक्रि. गोंधळून टाकणे; गुंतवणे; बुचकळ्यात पाडणे; घुटमळायला लावणे : 'जातो परी तव मोहनी। घोटाळीत आहे प्राणालागुनी।' – नव २१.४९.

घोटाळणे सक्रि. १. घाटणे; घोटविणे; घोटून गुळगुळीत व टणक करणे (जमीन, भिंत इ.) : 'चीत्र लीहावेयाची आईती केली। नीट भींती कापडीली। घडी सारूनी घोटाळली। वर्ते षडी मेळवीली।' – उषा २८.१३. २. कित्त्यातील अक्षरांवरून कोरडी लेखणी फिरवून अक्षरे गिरवणे, घटविणे, वळविणे.

घोटाळा पु. १. (कामे, हिशेब, वस्तू इत्यादिकांचा) गोंधळ; अस्ताव्यस्त स्थिती; गळ्हाटा; गुंतागुंत; गोलंकार; खिचडी.

घोटाळा पु. १. लोळघोळ; अफरातफर. २. (वारा, पाणी, गवताच्या काड्या, धूळ इत्यादिकांची) गिरक्या, घिरट्या, वळणे घेत जाण्याची स्थिती; गरगरा फिरणे; भ्रमण करणे. ३. (मनाची) गोंधळून, बावरून, दिङ्मूढ झालेली अवस्था; मनाचा गोंधळ. ४. नागमोडीची, वेडीवाकडी जागा, स्थळ; गुंतागुंतीचे काम. ५. (वाऱ्याने) दिशा, रोख बदलणे; घोटाळणे. ६. एकंकार; गोलंकार. [सं. घुट्]

घोटाळा–ळे पु. न. कागद घोटण्याचा कवडा, घोटा; घोटकवडा : 'सुऱ्या कातऱ्या जागाईत। खळी घोंटाळें तागाईत।'– दास १९.१०.१५.

घोटी स्त्री. बोरासारखं पण कठीण फळे येणारे काटेरी झाड. [सं. घोटा]

घोटी स्त्री. १. लहान आकाराचा आंबा; गोटी (ना. व.) २. लहान आकाराचा दगड : 'घोटी ऐसी फोडी होती.' – लीचपू ४४६.

घोटी स्त्री. घोकंपट्टी. (क्रि. मारणे.)

घोटी स्त्री. फणसाच्या गऱ्यातील बी; अठळी : 'मग फणसाच्या उकडलेल्या घोट्यांची रोवळी तिने मध्ये ठेवली.' – चक्र ४३.

घोटी स्त्री. गाईची कास.

घोटी स्त्री. धोतराचा पदर कनवटीला खोवून किंवा लंगोटाची लोंबती धांदोटी वर करून खोवली असता होणारा घोळ.

घोटी(टू)क पु. एका जातीचे झाड व ज्याचे फळ. पहा : **घोटी** (गो.)

घोटीझेला पु. गोटी, आंबे झाडावरून काढायची झेलणी, आकडी.

घोटी(टे)र पु. पक्ष्याचे घरटे.

घोटीव वि. १. घोटलेले; घोटून घोटून, घासून गुळगुळीत केलेले. २. उजाळा दिलेले; चकचकीत केलेले : 'पंधरेयाची चोखडी। घोंटीव जैशी।।' – ज्ञा ६.२२४. ३. चांगले वळवलेले, मेहनत घेऊन काढलेले (अक्षर). ४. ठरावीक; ठरीव; विवक्षित; नेहमीच्या प्रचारातील : 'इतर लोक नव्या–जुन्या पद्धतीच्या घोटीव शिव्या देऊन वेळ मारून नेत असतील.' – विक्षिप्त १.५६.

घोटू पु. घोटून केलेला पदार्थ; घोटा : 'स्वानंद रसाळ फळ घोटु।' – भारा बाल १.१७.

घोटे न. गुरांना औषध इ. पाजण्याचे नळकांडे, नळी. (राजा.).

घोटेस्नान न. १. फक्त घोटे, पाय धुणे. २. (ल.) थोडक्यात आवरणारे स्नान.

घोट्या पु. १. जड्याचे, दागिने इ. घोटण्याचे उपकरण. पहा : **घोटणी**. २. गवंड्याचे गिलावा गुळगुळीत करण्याचे हत्यार, साधन.

वि. १. अभ्यास घोटणारा, पाठ करणारा; नुसताच पाठांतरावर भर देणारा; मंदबुद्धी; ढोर मेहनती. २. एकसारखे घोकणे; पाठ करणे; मोठ्याने वारंवार म्हणणे.

घोडकट, घोडके न. (घोड्याला तिरस्काराने लावायचा हा शब्द) रोडके, अशक्त, मरतुकडे घोडे.

घोडका पु. मोतद्दार; घोड्याची काळजी घेणारा; सैस.

घोडकुदळ पु. (उप.) मुंजीचे वय झालेले असून मुंज न झालेला मुलगा; घोडमुंजा.

घोडकुदळ स्त्री. (उप.) उपवर असून लग्न न झालेली दांडगट, नाचरी मुलगी.

घोडकूल न. १. लहान घोडे; तड्डू. (गो.) २. ओट्याच्या खांबावर तिरपा टेकू (करण) देऊन त्यावर कोरलेली घोड्याची आकृती. (खा.)

घोडके–का न. १. पु. ज्याच्या भरीला करळ्या व तरसे घालून गाड्याची तक्तपोशी, बैठक तयार करतात अशी चौकटीतील दोन बाजूंची दोन उभी लांब लाकडे. २. तेल्याच्या घाण्याच्या कातरीला खिळलेले व जुवाचा दोर बांधायचे लाकूड.

घोडके पु. ढोर जमातीचा गुरू.

घोडकेळ न. हलक्या जातीचे एक भसाडे केळ.

घोडकोस पु. तीन मैलांचा कोस.

घोडक्या–का पु. १. घोड्याचा खिदमतगार; घोड्याची देखभाल करणारा; मोतद्दार : 'घोड्यास शिपाई काय करील घोडका।' – ऐपो ३७२. २. चाबूकस्वार; अश्वशिक्षक.

घोडगा–गी पु. स्त्री. (उप.) वयाने प्रौढ पण पोरकटपणा, नाचरेपणा अंगी असलेला मुलगा, मुलगी; मूर्ख व ठोंब्या असा वयस्क मुलगा.

घोड (डे) गाठ स्त्री. (बुद्धिबळांचा खेळ) एकमेकांच्या रक्षणासाठी खडी असलेली घोड्याची दुक्कल.

घोडचवड स्त्री. घोडदौड; घोडा चौफेर उडविणे; चवडचाल : 'घोडचवडीखाली नाना पुण्याला आला.' – ऐपो १६२.

घोडचाल स्त्री. १. घोड्याची चाल. २. (ल.) जलद चाल.

घोड(डे)चिलट न. मोठे चिलट; डास; मच्छर.

घोडचूक स्त्री. मोठी व अक्षम्य चूक; ढळढळीत चूक.

घोडचोट्या वि. (अश्लील) घोड्याच्या चोटासारखा मोठा चोट असलेला (मनुष्य).

घोडजावई पु. (उप.) मोठ्या वयाचा नवरामुलगा; घोडनवरा.

घोडजाळी स्त्री. (भोवऱ्यांचा खेळ) विरुद्ध पक्षाच्या भोवऱ्याला खोचा देऊन आपला भोवरा दूर जाऊन फिरत राहील अशा रीतीने भोवरा फेकण्याचा प्रकार.

घोडतोंड्या वि. घोड्याच्या तोंडासारखा लांबट चेहरा असलेला; कुरूप; लांबट, ओबडधोबड चेहऱ्याचा.

घोडदौड स्त्री. १. घोड्यासारखे पळणे; घोड्याचे धावणे; अतिशय वेगाने जाणे. २. (ल.) अतिशय जलद प्रगती : 'युद्धपरिस्थिती गंभीर. जर्मनांची सर्वत्र घौडदौड.' – लव्हाळी ६७. ३. शर्यतीचे घोडे ज्या वर्तुळाकार मार्गावरून धावतात तो मार्ग : 'मुधोळकडे असताना आम्ही घोडदौडी

(रेसकोर्स) कडे कधीकधी फिरावयास जात असू.' – स्मरण ३३९.

घोडनट न. ज्याचे एक तोंड आढ्यावर व एक लगीवर येऊन दरम्यान तिरपे राहते, असे ठोकतात ते लाकूड.

घोडनवरा पहा : **घोडजावई.** [क. गुडग = लड्ठ, होडग = मुलगा.]

घोड(डे)नवरी, घोडवळ पहा : **घोडकुदळ** स्त्री. 'हे मोठमोठ्या घोडनवऱ्या घरात बाळगल्याचे परिणाम बरं !'–झांमू. [क.]

घोडनील पु. १. नीलगाय. २. एक शिवी. (झाडी)

घोड(डे)पाळणा पु. घोड्याला (लाकडी चौकटीला) टांगलेला पाळणा; हलग्यांना न टांगता जमिनीवर घोड्याला अडकवलेला पाळण्याचा एक प्रकार; पाळणा टांगण्यासाठी एका आडव्या लाकडाला चार पाय लावून करतात ती रचना; घोडी.

घोडपिंपळी स्त्री. मोठ्या जातीची पिंपळी.

घोडपुत्र पु. घोड्याला (विशेषत: बुद्धिबळातील घोड्याला) प्रेमाने किंवा प्रतिष्ठेने संबोधण्याचा शब्द.

घोडपेटे,घोडे न. १. दोन भोपळे पुढे व दोन भोपळे मागे असे बांधून केलेला तराफा; रहाटगाडग्याचे कोळवे जिच्यावर ठेवतात ती लाकडी चौकट. २. भोपळ्यावर दोन्ही बाजूंना पाय टाकून, घोड्यावर बसल्यासारखे बसून पाण्यावर तरंगणे.

घोडबच्य न. दुबळा घोडा पुष्ट होण्यासाठी एक औषध : 'घोडबच्य पावशेर, राई पावशेर भाजलेलीं काळीं मिरें पावशेर... मिश्रणापैकीं आतपाव दररोज देत जावें.' – अश्वप १.१७५.

घोडबाव, घोडविहीर स्त्री. घोड्यांना पाणी पिता येईल अशा तऱ्हेने बांधलेली विहीर.

घोडबाही स्त्री. १. दाराच्या दुहेरी चौकटीच्या आतल्या चौकटीतील दोन्ही बाजूचे खांब. २. खटाऱ्याच्या बैठकीच्या चौकटीच्या दोन बाजूंची लांब लाकडे. पहा : **घोडके, घोडे**

घोडबाळ वि. (उप.) पोरकट चाळे करणारा प्रौढ पुरुष, स्त्री; पोरकट माणूस.

घोडमल्ली, घोड(डे)मात स्त्री. (बुद्धिबळांचा खेळ) घोड्याने मात करण्याचा प्रकार; घोडमात; प्रतिपक्षाचे घोडे व राजा आणि आपले घोडे, राजा व एकच प्यादे राखून प्यादेमात करणे.

घोडमा वि. वयाने मोठा पण पोरकटपणाने वागणारा.

घोडमाशी स्त्री. १. मोठ्या आकाराची हिरवी, काळसर माशी. २. (सामा.) मोठी माशी.

घोडमासा पु. एक प्रकारचा मासा; सागराश्व. याचे तोंड काहीसे घोड्यासारखे दिसते. याला लांब शेपूट असते. हा उभा पोहतो.

घोडमुख–ख्या पु. १. घोड्याचे तोंड असलेले किन्नर नावाच्या देवयोनीतील पुरुष. याचे वर्णन पुराणांतरी सापडते. २. (ल.) अगदी कुरूप घोडतोंड्या माणूस : 'एक मीरवलें भुरळें पींगळें। घोडमुखें ।।' – दाव २८५.

घोडमुंगळा पु. मोठा व काळा मुंगळा.

घोडमुंगी स्त्री. मोठी, काळ्या जातीची मुंगी.

घोडला पु. मूल रांगताना त्याची होणारी घोड्यासारखी आकृती.

घोडलाट स्त्री. नदीच्या मुखातून समुद्राच्या भरतीचे पाणी आत घुसत असताना येणारी मोठी लाट.

घोडली स्त्री. (नाविक) शौचाला बसण्याकरिता वऱ्याला चार दोऱ्यांनी अडकविण्यात येणारी चौकट. (को. हेट.)

घोडवडी स्त्री. घोडे बांधण्याची पागा : 'भानवसा मागा दक्षीणिली भीतीसीं घोडवडि ।।' – स्थान ४४.

घोडवळ स्त्री. १. बांधलेल्या घोड्यांची ओळ, रांग. २. घोड्यांचा तबेला; घोडशाळा; घोडसाळ. ३. लांबलचक, ठेंगणे व बेढब घर; मागरघर दांडसाळ; केवळ तबेल्यासारखे असलेले घर; कोठडी.

घोडवळ स्त्री. न झोडपलेल्या, झोडपून दाणे न काढलेल्या धान्याच्या पेंढ्यांची रास, गंजी.

घोड (डे) वाट स्त्री. घोड्याकरिता केलेली, फक्त घोड्याला जाता येईल अशी वाट, रस्ता (विशेषत: डोंगर इत्यादीवरून).

घोडविवाह पु. वयाने अतिशय मोठ्या पुरुषाचे अगदी लहान मुलीशी होणारे लग्न; विषमविवाह : 'आपली नात शोभेल अशा दहा वर्षाच्या पोरीशीं लग्न लावण्यास तयार असतात व असा घोडविवाह करूनही फिरून समाजांत हिंडण्यास... त्यांस दिक्कत वाटत नाहीं.' – लोटिकेले ४.९६.

घोडवेल स्त्री. (सांकेतिक) घोड्याची लीद. औषधात घोड्याच्या लिदीचा उपयोग करायचा असला तर या शब्दाने निर्देश करतात.

घोडशाळा, घोडसाळ स्त्री. १. घोड्यांचा तबेला. २. प्राणिसंग्रहालय.

घोडशिष्य पु. (निंदार्थी) विद्यार्जन करू पाहणारा, मोठ्या वयाचा, विद्या मोठेपणी शिकायला सुरुवात करणारा मनुष्य.

घोडशी स्त्री. घडवंची. (राजा. कुण.)

घोडशीर स्त्री. १. पायाच्या टाचेच्या वरच्या बाजूला असलेली शीर, नाडी; दवणशीर. पहा : **धोंडशीर.** २. (क्व.) पायाचा किंवा हाताचा स्नायू.

घोडशेंदणी स्त्री. एक प्रकारचे रानटी फळ : 'घोड्याच्या पोटात दुखायला लागले म्हणजे हे फळ चारतात.' – व्यंमाक २५.

घोडसटवी स्त्री. १. उग्र स्वरूप धारण केलेली देवी. (क्रि. लागणे.) २. घोडी व्याल्यापासून सहाव्या दिवशी करायची सटवीची पूजा. (वा.) **एखादीला घोडसटवी लागणे –** १. घोडसटवीप्रमाणे उग्र व विक्राळ दिसणे. २. घोडसटवीची बाधा होणे.

घोडसर पु. घोड्यांची पागा.

घोडसाहानी पु. घोडदळाचा अधिकारी : 'घोडसाहानी: खापरिखी: उत्कृष्ट पाइकु' – पंचो ८३.६.

घोडस्नी स्त्री. अंथरूण ठेवण्याची घडवंची. (झाडी)

घोडा पु. १. खूर असलेला एक चतुष्पाद प्राणी. याचा उपयोग ओझे वाहण्याच्या, गाडी ओढण्याच्या व बसण्याच्या कामी करतात. याच्या अनेक जाती आहेत. लहान घोड्याला तट्टू म्हणतात व घोड्याच्या पिलाला शिंगरू म्हणतात. २. (उप.) मूर्ख व ठोंब्या असा वयस्क मुलगा; वयाने मोठा पण पोरकट मनुष्य. ३. (ल.) शरीर वाहून नेतात म्हणून पायांना (दहाबोटी) घोडा असे म्हणतात. ४. (ल.) घोडेस्वार : 'तीन हजार घोडा पेशव्यांचे तैनातींत ठेवा.' – विवि ८.७.१२९. [सं. घोटक] (वा.) ० **आडवा घालणे –** (एखाद्या कार्यात) अडथळा, विघ्न आणणे : 'आणि म्हणूनच तुम्ही घोडा आडवा घातलांत वाटतं?' – चंद्रग्र ६८. ० **उभा करणे, बांधणे –** (घोडा) थोडा वेळ थांबवणे;

जरासे थांबणे; घाई न करणे (घाईत व धांदलीत असणाऱ्या मनुष्याला उद्देशून या वाक्प्रचाराचा उपयोग करतात.). **० काढणे, फेकणे –** १. बांधून ठेवलेला घोडा बाहेर काढणे, हाकारणे, जोराने पिटाळणे. २. (एखाद्याने) पळ काढणे, पोबारा करणे, निसटणे. **० चालविणे –** डोके खाजवणे; युक्ती लढविणे. (कर.) **० टाकणे –** घोडा फेकणे, उडवणे, अंगावर घालणे : 'आरेरे टाकौनि घोडा । भणती यांचिआं जटैं उपडा ।' – शिव १४१. **० मैदान जवळ असणे –** (घोडा धावण्यात कसा काय आहे याची परीक्षा त्याला मैदानात पळवून करता येते यावरून) ज्याची परीक्षा करायची तो पदार्थ, मनुष्य व परीक्षेला लागणारी सामग्री ही दोन्ही जवळ असणे; एखाद्या गोष्टीची निरर्थक चर्चा न करता तिला कसोटीला लावणे, कसोटीची वेळ किंवा सामग्री जवळ असणे; हा सूर्य हा जयद्रथ अशी अवस्था असणे. **० हाकणे –** पळून जाणे; निघून जाणे; पोबारा करणे. **घोड्याच्या किंवा हत्तीच्या पायांनी येणे व मुंगीच्या पायांनी जाणे –** (आजार, संकट, अडचण इ. च्या संबंधात हा वाक्प्रचार योजतात) जलदीने येणे व धीमेपणाने जाणे. **एखाद्याच्या घोड्याने पेंड (पेण) खाणे –** या वाक्प्रचारात पेण = प्रवासातील टप्पा, मुक्कामाची जागा याऐवजी चुकीने पेंड हा शब्द उपयोगात आणतात. लांबच्या प्रवासात निरनिराळ्या टप्प्यांच्या ठिकाणी घोडी उभी राहत. त्यामुळे टप्प्याचे ठिकाण आले की घोडे तेथे अडून राही, पुढे हलायचे नाही. यावरून एखादे कार्य करताना कोणी अडून बसणे. **घोड्यापुढे धावणे –** जिकिरीचे, दगदगीचे, कष्टाचे काम करणे. एखाद्याची कष्टाची सेवा, चाकरी करणे; (उप.) एखाद्याची ओंगळ खुशामत करणे; अतिशय उत्साह दाखविणे; एखाद्याची थुंकी झेलणे. **घोड्यावर घोडा घालणे –** (लिलाव इत्यादिकात) चढाओढ करणे; एखाद्याने केलेल्या किमतीपेक्षा अधिक किंमत पुकारणे; उडीवर उडी घालणे. **घोड्यावर बसणे –** दारू पिऊन झिंगणे; ताठ्यात असणे. **घोड्यावर बसविणे –** इच्छा नसताना जबाबदारी लादणे. **घोड्यावर बसून येणे –** घाईने येणे; आपले काम तातडीने करण्याबद्दल दुसऱ्याला घाई करणे. **सर घोड्या पाणी खोल, सर घोड्या पाणी पी –** (घोड्या मागे हो, पाणी खोल आहे. तेथूनच पाणी पी) अंदाज घेऊन काम करावे; कोणतीही गोष्ट जपून पुढे पाहून करावी. **घोड्यास हात घालणे –** लगाम खेचून घोडा थांबविणे : 'आतां पळूं नये. व्यर्थ मरूं नये. घोड्यास हात घालावे.' – पेदभा ४१.१८९.

घोडा पु. गवतात आढळणारा एक किडा.

घोडा पु. १. बुद्धिबळाच्या खेळातील एक मोहरे. हे सर्व बाजूंनी दोन सरळ व एक आडवे अशी अडीच घरे जाते. या मोहऱ्याचा विशेष असा आहे की, हे इतर मोहऱ्यांच्या डोक्यावरून उडून जाते. अशी गती इतर मोहऱ्यांना नसते. २. बंदुकीचा हातोडीच्या आकाराचा भाग. हा दाबला असता ठिणगी उत्पन्न होते व बार उडतो; चाप. ३. (मुलांचा खेळ) दोन पायांत काठी घालून (तिला घोडा मानून) मुले धावतात तो काठीचा घोडा. ४. कपडे ठेवण्यासाठी खुंट्या ठोकलेला खांब; स्नान करणाऱ्या माणसाचे कपडे ठेवण्यासाठी जमिनीत रोवलेली काठी, खांब, स्टँड. ५. पाळणा टांगण्यासाठी एका आडव्या लाकडाला चार पाय लावून करतात ती रचना; घोडी. ६. पालखीचा दांडा ज्याला बसवलेला असतो ते दुबेळके, बेचके; पालखी ठेवण्याच्या जागी ती ज्याच्यावर ठेवतात ती दुबेळके असलेली रचना. ७. गाड्याच्या बैठकीच्या चौकटीची दोन बाजूंनी लांब लाकडे; गाडीच्या दांडक्याला आधार द्यायचे दुबेळके. ८. पहा : **घोडला** (क्रि. करणे.) ९.(दिवे इ. लावण्याची) दोन बाजूंना पायऱ्या असलेली घडवंची; (पिपे, पेट्या ठेवण्याची) लाकडी घडवंची. १०. नारळ सोलण्याचा, शेंड्याला सुरी बसवलेला खांब; नारळ सोलण्याचा एक प्रकारचा साचा. ११. समुद्राच्या भरतीच्या पाण्याचा चढ, फुगोटी, फुगारा; लाटेचा उंच भाग; नद्यांच्या मुखातून वर गेलेले समुद्राच्या भरतीचे पाणी. १२. ओबडधोबड असा आकडा, फासा, पकड. १३. दाराच्या दुहेरी चौकटीच्या वरच्या बाजूचे, परस्परांना जोडणारे दोन लाकडी तुकडे. (त्यांच्याच जोडीच्या खालच्या बाजूच्या तुकड्यांना छिली म्हणतात.) १४. (खाटीक इत्यादिकांचे) साकटणे, सकोटन; खाटकाचा ठोकळा. १५. (मुद्रण) केसी व गॅली ठेवण्यासाठी केलेली घडवंचीवजा चौकट. १६. फळा, चित्रफलक इ. उभा ठेवण्याची लाकडी उभी चौकट. १७. रहाटगाडग्याचे कोळवे ज्यावर ठेवतात ती लाकडी चौकट (को.). १८. पोहण्याचा चार भोपळ्यांचा तराफा. १९. (विटीदांडूचा खेळ) विटी मारण्याचा एक प्रकार. (क्रि. मारणे.) (गो.) (वा.) **० लागणे –** १. वरच्या स्वाराला यत्किंचितही हिसका न बसेल अशा रीतीने घोड्याने पळणे. २. (शर्यतीत) आपण ज्या विशिष्ट क्रमांकाच्या घोड्याचे तिकीट घेतले असेल तो घोडा निदान पहिल्या तीन क्रमांकात येणे. [सं. घोटक]

घोडाआढी स्त्री. (मल्लखांब) उजव्या हाताचा पंजा व डाव्या हाताचा पंजा वरच्या दिशेला मल्लखांबावर दूर अंतरावर धरून मारायची उडी.

घोडागद्योन् पु. प्राचीन महाराष्ट्रात वापरात असलेले एक नाणे.

घोडाघोडा पु. लहान मुलांचा एक खेळ.

घोडा घोडा टाळीचा घोडा मुलींचा एक खेळ.

घोडाचोळी स्त्री. गंधक, पारा, हरताळ इ. एकत्र करून केलेली गोळी. हिला संस्कृत भाषेत अश्वकंचुकी असे म्हणतात.

घोडामैदान न. घोड्याची परीक्षा करण्यासाठी, त्याची चाल, गती इ. पाहण्यासाठी वापरण्यात येणारे मैदान.

घोडावज न. वेखंड.

घोडी स्त्री. १. घोडा या जातीच्या प्राण्याची मादी. २. (ल.) वयस्क असून पोरकटपणा करणारी, हुंदडणारी, धांगडधिंगा घालणारी मुलगी; घोड कुदळ. (वा.) **० काढणे, ० भरविणे –** घोडीला घोडा दाखविणे, देणे; घोडी फळविणे. **० घेणे –** (एखाद्याशी) घासणे; कटकट करणे; मत्सरबुद्धीने दोष काढणे. **घोडी टालेस येणे –** घोडी उलटणे, उफराटी होणे : '... हाताचा झटका आणेनीस (अनीनीस) बसला त्यानें घोडी ठालेस येऊन घोडी अंगावर पडली...' – नाग २.१७७.

घोडी स्त्री. १. सतार, तंबोरा इ. तंतुवाद्यांच्या भोपळ्यावर एकदीड इंच उंचीची हस्तिदंती अगर लाकडी पट्टीची बैठक. हिच्यावरून तारा पुढे खुंटीला गुंडाळलेल्या असतात. २. पूर्वी शाळेत मुलांना देण्यात येणारी

एक शिक्षा. वर उंच आढ्याला बांधलेल्या दोरीवर मुलाला लोंबकळत ठेवण्यात येई. अशा प्रकारच्या शिक्षा देण्याच्या प्रकाराला घोडी देणे असे म्हणत असत : 'एखाद्या मुलाशी माझं वाकडं झालं की, रचलंच त्याच्यावर किटाळ आणि दिलीच त्याला पंतोजीकडून घोडी.' – चंद्रग्र ८० (क्रि. घेणे, देणे). ३. उभे राहून पखवाज वाजविता यावा म्हणून तयार केलेली घडवंची : 'इतक्यात देवळाच्या एका कोपऱ्यात मृदंग ठेवावयाची उंच घोडी सुनंदाला दिसली.' – सुदे २५. ४. गवत इ. वाहण्याकरिता खटाऱ्यावर उभारलेला सांगाडा, चौकट. ५. जमिनीपासून फळा उंच ठेवण्याकरिता व त्याला उतार देण्याकरिता केलेली लाकडी चौकट, सांगाडा. ६. (सुतारी) जे लाकूड तासायचे असते ते हलू नये म्हणून त्याला आधार देणारे दुसरे लाकूड, चौकट इ. हे लाकूड एका विशिष्ट तऱ्हेने सोयीस्करपणे बसवतात. ७. (विणकामात) सूत उकलण्यासाठी केलेले लाकडी चौकटीसारखे साधन. ८. (सोनारी) पायात घालण्याच्या साखळ्यांच्या कड्या वाकविण्यासाठी असलेला बोटाइतका निमुळता खिळा, मोळा. (हेट. नाविक) ९. छोटे शीड उभे करण्यासाठी असलेले कमानीसारखे लाकूड. १०. बंधाऱ्याच्या मुखाशी (पाणी सोडण्याच्या ठिकाणी) पडद्यासारखी बांधलेली भिंत. या भिंतीवरून पाणी जात असते. ११. गलबताच्या कडेला शौचाला बसण्याकरिता टांगलेली लाकडी चौकट (हेट.). १२. साकटणे; सकोटण. १३. दाराच्या दुहेरी चौकटीच्या वरच्या बाजूचे, परस्परांना जोडणारे दोन लाकडी तुकडे. १४. तीन पायांचे दिवा ठेवण्याचे बुरडी तिकाटणे, तिवई. १५. पाटाला खाली मारतात ते (दोन) आडात. १६. हत्तीवरील हौदा, चौकट : 'साहेब नौबतीकरिता हत्तींवर लाकडी घोडी घालून...' – ऐरा ९.५०६. १७. उभे खुंटाळे; स्टँड : 'तिकोनी खुंट्यांची घोडी आणि रुमाल ठेवावे.' – स्वारीनियम ७०. १८. सामान ठेवण्याचा घोडा. १९. गोट्यांच्या खेळात हरणाराला खेळाच्या शेवटी मिळणारी शिक्षा. [क. कानगुडी = हातपाय बांधणे]

घोडीकुर स्त्री. कुरघोडी : 'घोडीवरी होईल स्वार। त्याचा बहुत पडेल भार। भारा खाले निघेल बूर। पोरें म्हणती घोडीकूर।' – मध्व १७७.

घोडीपिढी न. अव. घोडी वगैरे सामान : 'परंतु ते आपली घोडीपिढी संभाळावयास गेले.' – पेद १.७८.

घोडु पु. घोडा.

घोडुला पहा : **घोडला.** (क्रि. करणे.)

घोडूक (गो.) पहा : **घोडके**

घोडे न. (सामान्यत: लिंगभेद न धरता) घोडा या जातीतील जनावर. (वा.) ० **उभे करणे –** अडथळा आणणे. **एखाद्याचे घोडे थकणे –** एखाद्याने (प्रवास, धंदा, व्यापार, अभ्यास इ.कांत) थकून जाणे; हतबल होणे; पुढे रेटण्याची शक्ती न उरणे. **एखाद्याने आपले घोडे पुढे दामटणे, ढकलणे, हाकणे, घालणे, पुढे रेटणे –** १. इतरांच्या पूर्वी आपला कार्यभाग साधून घेण्याचा घाईने प्रयत्न करणे : 'ब्रिटिश वसाहतींनी आपल्या हक्कांचे घोडें पुढे दामटलें.' – सासं. २. लुब्रेपणाने दुसऱ्यांच्या संभाषणात तोंड घालून त्यांच्यावर आपले विचार लादणे. **एखाद्याचे घोडे मारणे –** एखाद्याचे नुकसान करून त्याला राग आणणे (पूर्वी प्रवासाचे मुख्य साधन घोडे असे. प्रवासाचे घोडे ठार केल्यास त्याचा प्रवास थांबत असे व त्यामुळे त्याचे फार नुकसान होई, यावरून) एखाद्याचे फार नुकसान करणे. **गांडीखालचे घोडे –** संसारादी निर्वाहक मालमत्ता, वाडी इ. आधारभूत मुख्य साधन. **घोडी आडवी घालणे –** १. शत्रूवर तुटून पडून त्याच्या चालीला अडथळा करणे. २. (एखाद्याला त्याच्या कामात संकट, अडथळा, व्यत्यय आणणे : 'जर त्यांणीं आपल्यावर चालून घेतलें तर आम्ही आडवीं घोडीं घालतो.' – ऐलेसं ४२९७. **घोडी घालणे, घोड्यांच्या अनीना उचलणे –** घोडदळातील सर्व स्वारांनी ईर्षेने शत्रूवर एकदम तुटून पडणे.

घोडे न. पहा : **घोडा** ६, ७, १७, १८.

घोडेकातरा पु. एक औषधी पदार्थ.

घोडेकार पु. घोडस्वार : 'हा पैलु घोडेकारू।' – उगी ५९.

घोडेकुसळी स्त्री. एक प्रकारचे जाड गवत; घोडेघास : 'तिकांडी घोडेकुसळी।' – गीता २.५३.८६.

घोडेखाद स्त्री. १. घोड्यांचे चरणे, हरळी खाणे. २. फक्त घोड्यांना चरता, खाता येईल इतक्या वाढीचे गवत.

घोडेखोत पु. घोडे भाड्याने देण्याचा धंदा करणारा; भाड्याच्या घोड्यांचा नाईक.

घोडेघाटी स्त्री. एक प्रकारचे रेशमी कापड.

घोडेघास न. विलायती गवत; लसूण घास.

घोडेपाऊल न. एक वनस्पतिविशेष.

घोडेबाज्या पु. घोडेबाजी; घड्यात फटाके घालून उडविण्याचा एक आतषबाजीचा प्रकार : 'आज दिपवाळीचे सायंकाळी घोडेबाज्या वगैरे आतसबाजी झाली.' – ऐलेसं ४७१४.

घोडेला : पु. नाकतोड्या. (झाडी) [सं. घोटक]

घोडेस्वार पु. मुलांचा स्काऊटचा एक खेळ.

घोडोंडी स्त्री. पागा : 'तया रायाचे घोडोंडी येंकु देडिका बांधला होता.' – पंचो १६०-१५.

घोड्यागोवर पु. एक प्रकारचा गोवर. याच्या पुटकुळ्या मोठ्या असतात.

घोड्याचा दाणा १. (उप.) हरभरा. २. (ल.) बुंदीच्या लाडवाला तुच्छतेने म्हणतात.

घोड्याचा पूत, लेक (उप.) मूर्ख; गाढव; गद्धा.

घोड्याची जीभ (रा.) एक वनस्पतिविशेष.

घोड्याची मुंज, घोड्याचे बारसे एखादा कोठे जायला निघाला असता, फाजील चौकशी करणाऱ्या माणसाने त्याला 'का, कुठे जाता' असे विचारले असताना हा शब्दप्रयोग वापरतात.

घोड्याचे मूत १. कुत्र्याचे मूत; अळंबे; भुईछत्री. २. कुजलेल्या लाकडातून फुटलेले आळंबे.

घोड्याच्या पाठीवर भरधाव; झर्कन; त्वरेने. (क्रि. जाणे, करणे.)

घोड्याच्या पाठीवरचा कोस कंटाळवाणा व लांबणीचा कोस; घोड्यावरून गेल्यासच कोसाएवढे व कंटाळवाणे न वाटणारे अंतर.

घोड्यावर स्वार चढेल, मग्रूर : 'आता जाफरखान आले ते घोड्यावर स्वार ! रूपये मागू लागले.' – हिंगणे दभा २.३५.

घोड्यांचे नाटक सर्कस. (ना.)

घोण स्त्री. पुष्कळ पाय असलेला, सरपटणारा एक प्राणी; गोम.

घोण, घोणवासा स्त्री. घराची काटकोनात असणारी पाखी जेथे मिळतात तो सांधा; या सांध्यावरील वासा; कोनवासा. याला घोणवासा असेही म्हणतात. (को.)

घोण स्त्री. दु:खाने, खिन्न मनाने गुडघ्यात मान घालून बसण्याची अवस्था; खिन्नावस्था : 'ते भीमकी हें मग घोण घाली।' – सारुह २.६९. (को.) ० **घालून बसणे**– दु:खाने, खिन्न मनाने गुडघ्यात मान घालून बसणे; खिन्न असणे. (क्रि. घालणे) ० **घालणे –** लांबणीवर टाकणे; लांबविणे. (व.)

घोण स्त्री. घार. (गो.)

घोणशा वि. सुस्त; मंद; लठ्ठ व आळशी. (को.)

घोणस पु. सर्पाची एक विषारी जात. हा सर्प जाड असून चारपाच फूट लांब असतो. याचा रंग पिवळसर असून पाठीवर मध्यभागी काळ्या मोठ्या ठिपक्यांची उभी रांग असते. पहा : **घणस** : 'जसा नकुळ घोणसां गमला।' – मोउद्योग ११.१२०. (को.) [सं. घोनस]

घोणसकांडे न. एक विशिष्ट प्रकारची वनस्पती. ही दिसण्यात घोणसासारखी दिसते. हिची वेटोळीही घोणसाच्या वेटोळ्यासारखी दिसतात. गुरांना घोणस सर्प चावला तर ती गुरे ही वनस्पती जेथे असेल तेथे जातात व ती खातात.

घोणसे पडवळ आखूड पडवळाची एक जात.

घोणा पु. १. नाक : 'येता तल्पसमीप कांत ललना ते वक्र घोणा करी।' – विरस १७. २. दोन्ही नाकपुड्यांमधील मांसल पडदा; घुळणा; घोळणा; घुणघुणा [सं.घ्राण.] (वा.) ० **फुटणे –** उन्हामुळे, उष्णतेमुळे नाकातून रक्त वाहू लागले.

घोणा पु. लाकूड कोरणारा किडा. (राजा.) [सं.घुण्]

घोणाटणे सक्रि. मोठ्याने ओरडून, ओरडाओरड करून (गुरे, हरिण, सावज इ.) एके ठिकाणी हाकून आणणे, हाकणे.
अक्रि. १. (माशा, भुंगे इ.) घों घों करीत एकत्र जमणे. २. डरकाळ्या फोडीत, हंबरत हंबरत एकत्र होणे, जमणे (गुरे इ.). ३. कासावीस होणे; घायाळ होणे. (राजा. कु.) [सं. घु]

घोणाटा पु. १. (माशा इ.) घोंघावत एकत्र जमणे; घोंघावणे. २. (काम, वस्तू, व्यवहार इ.चा) गोंधळ, गुंतागुंत, घोटाळा, अव्यवस्थितपणा.

घोण्या पु. १. पाख्यांचा सांधा; घोणवसा. २. घोणवाशावर, पाटिसावर घालतात ते नळे.

घोन पु. मान. (झाडी) [सं. घोण]

घोन न. नाक. (व.) [सं.घ्राण]

घोनता पु. घोंगता; अंगरखा : 'बंधू माझा नेणता। त्याला शिवला घोनता।' – घाश्रलो ७३. (घा.)

घोनसी स्त्री. चांदीचा हार. (झाडी)

घोनारणे सक्रि. खाली पडणे; लोळविणे : 'मी अहंकाराते घोनारीं।' – उगी २५.

घोन्याड स्त्री. बलिप्रतिपदेला बलिराजा बनविण्याचे गवत. (झाडी)

घोप पु. झुबका; गुच्छ; घड; घोस. (को.)

घोपड पु. (प्रां.) मोठे, खुजे व पसरट असे अळंबे, कुत्र्याचे मूत.

घोपाण स्त्री. मर्दपणा; ताकद; शक्ती. (कु.)

घोवार न. भ्रम.

घोबे न. १. अकल्पित रीतीने झालेला मोठा लाभ; घबाड; घबूक. (क्रि. येणे, मिळणे, सापडणे, हाताला लागणे.) २. (व्यापार इत्यादिकांत) सट्ट्याने झालेला फायदा. ३. अल्पप्रयासाने संसाराचा निर्वाह होण्याइतके द्रव, धान्य इ. देणारा यजमान किंवा शेत.

घोय : पु. पदर; घोळ (व.).

घोयटीक स्त्री. सराव; अभ्यास; घसरट. (गो.)

घोयरा पु. सरड्याच्या जातीचा एक प्राणी.

घोयेल स्त्री. घोरपड. (झाडी)

घोर पु. १. वीणा इ. वाद्यांतील खर्ज स्वराची तार; (वाद्यातील) खर्ज स्वर. २. झोपेतले घोरणे. ३. मृत्यूसमयी होणारा घशातील घरघर असा आवाज : 'हा वेदार्थ सागरू। जया निद्रिताचा घोरू। तो स्वयें सर्वेश्वरू। प्रत्यक्ष अनुवादला।।' – ज्ञा १.७२.

घोर पु. १. काळजी; धोसरा; मानसिक अस्वस्थता; चिंता. (क्रि. पडणे, घेणे, करणे, लागणे.) : 'त्याचा नित्याचा घोर नाहींसा होऊन त्याची स्वभाववृत्ति प्रबळ झाली.' – नि ७०३. २. अन्य स्थळी गेलेल्या माणसाबद्दल घेतलेली खंत, घोकणी. (क्रि. घेणे.)

घोर वि. १. भयंकर; अघोर; भयप्रद; भयानक; क्रूर; विक्राळ (मुद्रा, आवाज, काम, घडणाऱ्या गोष्टी). २. निबिड; दाट; घनदाट; गाढ; भयाण (अंधार, अरण्य इ.) : 'मी राजाच्या सदनि अथवा घोर रानीं शिरेन।' – खरे, जन्मभूमि. ३. घनघोर; तुंबळ; हातघाईचे; निकराचे (युद्ध, लढाई इ.) : 'कलह उत्पादी अतिघोर।' – एभा १.२०४. ४. गाढ, घनघोर (निद्रा).

घोर पु. १. हल्ला; विध्वंस : 'केला मखीं घोर निशाचरांनी।' – अविश्वा २०. २. आक्रोश; आकान्त; रडारड; कोलाहल. ३. आरडाओरडा; गलबला; गिल्ला; गलका; गोंगाट; कल्ला (क्रि. करणे). ४. संकट : 'मान अपमानाचे पडिले। भ्रांतीचे घोरीं।' – दावि २६०.(वा.) ० **करणे –** राग; वैषम्य मानणे; गवगवा करणे : 'त्यांच्या पालख्याचा रोजमरा आपण वजा केला त्यामुळें त्यांनीं फारच घोर केला आहे.' – पेद भाग २० २२९. **घोरात पडणे –** संकटात पडणे, सापडणे.

घोर वि. १. अचाट; अवाढव्य; (इमारत). २. अफाट (भरलेली नदी).[सं.]

घोर पु. साहस; धाडसी कृत्य : 'कैकईनं केला घोर। रथ घेतला हातावर।' – जसा २०६. [सं.]

घोर पु. पैंजण. (झाडी)

घोरकंड पु. आरारूटची एक जात.

घोरचा पु. जाच; जुलूम: 'आता सुलतानीचा तर घोरचा नाही.' – जोफु ११२.

घोरड न. सुस्त, गैदी, नेभळा, अव्यवस्थित, झोपाळू अशा माणसाला तिरस्काराने लावायचा शब्द. (राजा.)

घोरड वि. १. योग्य प्रकारे न घोळलेले (मणी). २. न भाजलेले (चणे). (झाडी) [सं. घुर्णा]

घोरडदेव पु. १. सर्व पदार्थांच्या शिजलेल्या मिश्रणाचा नैवेद्य ज्याला लागतो असे दैवत. २. (ल.) अनेक पदार्थांचे मिश्रण; खिचडी. (व.)

घोरणे अक्रि. झोपेत श्वासोच्छ्वासावेळी घर्र घर्र असा आवाज होणे. [सं. घुर्]

घोरन पु. भाजी घट्ट व्हावी म्हणून लावावयाचे पीठ.

घोरनी स्त्री. १. रवी, घोळणी. २. मणी घोळण्याचे साधन. (झाडी)

घोरपड स्त्री. १. सरड्याच्या जातीचा एक मोठा सरपटणारा प्राणी. हिला उष्ण व ओलाव्याची हवा लागते. हिची चरबी औषधी आहे. ही आपल्या नख्यांनी खडकाला अतिशय घट्ट धरू शकते. २. (ल.) लचांड; लिगाड; त्रासदायक काम, मनुष्य : 'ही घोरपड विश्वामित्राच्या गळ्यांत पडली.' – नाकु ३.९४. ३. (ल.) अरिष्ट; मोठे संकट; आळ; तुफान : 'बाळकृष्णपंतावर कोणती घोरपड येणार हे पाहण्याकरितां टपून आहोत.' – विक्षिप्त १.३७. (वा.) **एखाद्यावर घोरपड आणणे –** एखाद्याला गोत्यात आणणे, संकटात आणणे. **एखाद्यावर घोरपड येणे –** संकटात, पेचात, अडचणीत सापडणे. **० गळ्यात पडणे –** न आवडणारी गोष्ट, बायको स्वीकारावी लागणे : 'ह्या जातीय निवाड्याची ही घोरपड जी एकदा भारतीय राजकारणाच्या गळ्यात पडली.' – निप्र ५. **० गळ्यात बांधणे –** नको असलेल्या, न आवडणाऱ्या, कुरुप स्त्रीशी लग्न लावून देणे.

घोरपळी स्त्री. एक प्रकारचा रोग. (खा.)

घोबे न. किफायत शीर सौदा.

घोरबंद पु. खोगिराचा पुढचा बंद. पहा : **गोरबंद**

घोरमार पु. भयंकर आवाज.

घोरवाणी वि. अमंगल वाणी.

घोरवेळ स्त्री. (ज्यो.) १. अशुभ, अनिष्ट, भयसूचक वेळ. २. (अनिष्टतेच्या ध्वनितार्थावरून) करकरीत तिन्हीसांजा; टळटळीत मध्यान्ह.

घोरंकार पु.अव. (एखाद्या कार्याबद्दलचा) पराकाष्ठेचा प्रयत्न; खटाटोप; नेटाचा, आवेशाचा यत्न; अनेक प्रकारची उलाढाल; साहस, हिकमत.

घोरं(रां)दर वि. भयंकर : तुंबळ, घनघोर, निकराचे (युद्ध) 'झोटी धरूनि पाडिती अपार। घोरांदर मांडिलें।' – एरुस्व ८.४४; 'युद्ध मांडिलें घोरंदर।' – मुआदि १३.१२. [सं. घोरतर]

घोरंदर वि. गाढ; घोर : 'निद्रा आली घोरंदरी।' – क्रिपु २.३४.४.

घोरासुरांचे आख्यान (उप.) डाराडूर झोप; घोर झोप : 'घालून ठेवलेले अंथरुण पायानंच उलगडून ही अश्शी घोरासुराच्या अख्यानाला सुरवात...' – फाटक नाट्यछटा २.

घोरांटी स्त्री. (प्रां.) मरणसमयी लागणारी घरघर; घोर.

घोरांधर पहा : **घोरांदर** : 'अमरां असुरांसारिखे घोर। युद्ध माजले घोरांधर।' मुआदि २३.१२७.

न. संकट : 'जो होय निर्धारीं रक्षेता: घोरांधरापासौनि–ऋम ४०८.'

घोरिवडा पु. गौळवाडा (को.)

घोरेणी स्त्री. घोरणे; घरघर. (गो.)

घोरोप पु. मगज. (गो.)

घोल पु. दोन डोंगरामधील खिंड; दरी; खोल खिंडार. (को.)

घोल न. गर्द झाडी असणारी राई. (कु.)

घोल स्त्री. १. ढोल; गुहा. २. परसात जाण्याचे दार. (गो.)

घोल पु. न. पाणी न घालता घुसळलेले व लोणी न काढलेले दही. [सं.]

घोल पु. एक वाद्य : 'सुसंद ताल घोल वात' – उह ८४.

घोलणे सक्रि. माखणे; लिप्त करणे : 'मग तैसां चि कां घोलिलीं। परमानंदें।।' – राज्ञा ७.१८३.

घोलणे उक्रि. (सुतारकाम) लाकडाला पाडलेली भोके पटाशीने साफ करणे. (खा.)

घोलमडणे सक्रि. घोळणे. (माण.)

घोलमाडणे सक्रि. १. हिसकाहिसकी करणे. २. त्रास देणे.

घोलसरी स्त्री. बकुळीचे झाड. (व.)

घोलसा पु. येरझार; ये – जा. (क्रि. घालणे.) (कु.)

घोला पु. मचाण : 'हा जवान पोरगा वाघाच्या बालाही उमगून येणार नाही असे घोले शिकाऱ्यासाठी बांधून देतो.' – वामा २.

घोलाणा पु. घोळ; गोंधळ.

घोला (ळा) णा पहा : **घोळणा**

घोलाना पु. डोंगरावरील दरी, खबदाड, घळ, लवण, खोलगट भाग : 'भाजी मिळेना घोलान्यात अंबाबाईच्या न्हानीपाशी।' – जसा ६६.

घोलारी स्त्री. आतल्या गाठीची स्त्री. (अहि.)

घोलावणी स्त्री. भुलावणी; फुसलावणी; भुरळ.

घोलावणे उक्रि. फूस लावणे; भुलविणे; गोंजारणे. पहा : **घुलावणे**

घोलांकार पहा : **घोळंकार**

घोलांट–टी न. स्त्री. कोलांटी उडी : 'एकनाथाचे ग्रंथ व त्याचे चरित्र यांच्या परिशीलनाने मंडळांतील लोकांच्या घोलांटया उलट्या पडतील अशी शंका स्वप्नीं तरी येणें उचित होईल काय?' – भागवत देशीभाषा १०.

घोली स्त्री बाजू; वाट : 'उफराटी घोली करूनि मसुऱ्याला गेला।' – ऐपो ११८.

घोलू वि. बावळट. (झाडी)

घोल्लर पु. १. बैलाच्या गळ्यातील मोठा घुंगरू. २. पैंजण. (झाडी)

घोल्लर वि. सैल. (झाडी)

घोव पु. नवरा; पती; प्रेमिक. पहा : **गोहो** [सं.गोघ]

घोवकरीण स्त्री. पत्नी; बायको; सौभाग्यवती स्त्री; सवाष्ण. (राजा.)

घोवकी स्त्री. पुरुषत्व; मर्दपणा; पौरुष.

घोवगाडा पु. नवरा, दीर इ. सासरचे माणूस; पालनकर्ता माणूस.

घोवदी पु. पुरुष; बाप्या; गृहस्थ. (राजा.)

घोवबा पु. नायकिणीचा मुलगा. (गो.)

घोवसांडा दिवस उन्हाळ्यातील दिवस. (कु.)

घोष पु. (मोती इत्यादिकांचा) घोस, झुबका : 'मर्गजामणीचें घोषें। कमलकांति होति हसासें।' – शिव ४०९.

घोष पु. गवळीवाडा; गवळ्यांची वस्ती : 'गुरुसुत महेंद्र धनु घन शर ते जलवृष्टि सैन्य तो घोष।' – मोकर्ण १३.१२. [सं.]

घोष पु. १. (समुद्र, ढग, अध्ययन, पठण इत्यादिकांचा) एकसारखा होणारा मोठा गंभीर आवाज; गर्जना; पुकारा, गजर : 'ते जयजय घोष कलरवें। स्वर्ग गाजविताती आघवे।' – ज्ञा ११.३३६. २. परा वाचा; परा,

पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार वाणींपैकी परा वाणी; यांनाच अनुक्रमे घोष, ध्वनी, नाद व आकार अशीही नावे आहेत : 'पैं ब्रह्मबीजा जाहला अंकुरू। घोषध्वनीनादाकारू। ' – ज्ञा ९.२७५. ३. घोकणे; पाठ करणे. ४. (आपला उद्देश, इच्छा इत्यादिकांचा) पुन: पुन्हा उच्चार करणे, सांगणे; एकाच गोष्टीचा निदिध्यास. पहा : **घोकणी** २. (क्रि. घेणे, लावणे, लागणे, मांडणे). [सं.घुष्]

घोष पु. स्वरनलिकांच्या कंपामुळे ध्वनीत येणारे एक वैशिष्ट्य. 'क' या ध्वनीत घोष नाही, 'ग' मध्ये आहे.

घोषक पु. कर्णा.

घोषण–णा न. स्त्री. १. मोठ्याने बोलणे, वाजविणे, ऐकविणे. २. प्रसिद्ध करणे; जाहीर करणे; प्रसिद्धी. (क्रि. करणे.) (वा.) **० देणे –** सर्वांनी मिळून एकच ध्येयवाक्य, घोषवाक्य उच्च स्वरात म्हणणे किंवा जयजयकार करणे.

घोषणापत्र न. जाहीर पत्रक; जाहीरनामा : 'डॉ. भाभा यांनी विज्ञानविषयक भारतीय धोरणाचे एक घोषणापत्र तयार केले.' – भाआशे ४२.

घोषमंदिर न. गोठा; गुरे बांधण्याची जागा : 'तो राधेची सासू म्हातारी । तीही नसे कदा घरीं । सदा राहे घोषमंदिरीं । दधिमंथना कारणे ।' – ह ८.५८.

घोषयात्रा स्त्री. गाई, म्हशी इ. पशूंचे अरण्यात चरणे, बागडणे इ. पाहण्याची क्रीडा. [सं.]

घोषा पु. गाजावाजा; कीर्ति : 'याच्या किर्तीच्या घोषा दूर गेला ।' – ऐपो १११.

घोषित न. सूचना; जाहिरात : 'लाउडस्पीकरमधून निनादणारी ती घोषिते...' – खर्डे ११८. (क्रि. करणे.)
वि. अधिकृतपणे प्रकट किंवा जाहीर केलेले.

घोस पु. मांस; सागुती : 'अम्बा त्या बाईनें घोस गाईचा पाहिला.' – ऐपो १.५८. [फा. गोश्त]

घोस पु. (मोती, फुले इ.कांचा) गुच्छ; झुपका; तुरा; झुमका : 'सन्मुख भेटला राजहंस । मुक्ताफळांचा घोंस मुखीं धरुनी ।' – मारा बाल १२.२४. [सं. गुच्छ]

घोस वि. मोठा; देखणा; पुरा; लठ्ठ व दिखाऊ; घवघवीत. [सं.गुच्छ]

घोस पु. १. (नाविक) शिडाच्या पुढील (नाळीकडील) भाग; परबाणाचे नाळीजवळचे टोक. हे दुसऱ्या टोकापेक्षा जाड असते. शीड दोन्ही टोकांनी परबाणाला बांधलेले असते. हे केव्हाही डोलकाठीच्या मागे जात नाही. वाऱ्याच्या दिशांप्रमाणे शीड बांधण्याचा एक प्रकार व दमाण हा दुसरा प्रकार आहे. (को.) २. शीड बांधण्याची दोरी. ३. वाऱ्याची दिशा. ४. गलबताने प्रवास करणे; विवक्षित स्थळी गलबताने केलेली फेरी; समुद्रावरील सफर.

घोस पु. (आवेश, उत्साह, ऐश्वर्य, वैभव इ.कांचा) प्रकर्ष; वैपुल्य; भर; जोस. [सं.घोष्] (वा.) **घोसात असणे** – ऐश्वर्यात दंग असणे, मनोराज्य करणे. **भर घोसाने, घोसानिशी, भरल्या घोसाने –** सर्व शक्ती एकवटून, नेटाने व छातीठोकपणे; भगीरथ प्रयत्नाने.

घोस पु. फडा.

घोसणे सक्रि. १. शोधणे. २ गवसणे; सापडणे.

घोसदार वि. (मोत्यांचा) घोस असलेले (कर्णभूषण इ.); घोस लागलेला; घोसांनी युक्त; भरदार.

घोसफळ न. (वन.) एकाच फुलातील सुट्या किंजदलापासून बनलेल्या फळांचा झुबका.

घोसबाळी स्त्री. मोत्याचे घोस लावलेली कानात घालायची बाळी : 'कोथिंबिरी, टांपण, घोंसबाळ्या ।' – सारुह ६.२४; स्त्रियांचे कर्णभूषण.

घोसबाळे पु.अ.व. दागिन्यात बांधायचा लटकता लोलक, ताईत, करण.

घोसवाला पु. १. पैलूचा अगर बिनपैलूचा. २. टोकावर छिद्र असलेला, लांबट हिरा.

घोसळणे उक्रि. १. जमिनीवर लोळवणे, घोळसणे. २. ढोसळणे; धरून गदगदा हलविणे. (व.) ३. चांगले चोळणे.

घोसा पु. फुलांचा गजरा, गुच्छ. (को.)

घोसा पु. गोषा : 'अजून घोसा राकून हाय घराणं ते! शिर्क्यांच्या बाईचं नक नदरं पडायचं न्हाई!' – भेटी ३.

घोसाळ वि. नाद निर्माण करणारा; घोष, आवाज करणारा : 'चंद्रकांताचेया बाळानेयां वरी । घोंसाळेयां कांकणां चांकरीं ।' – शिव ३४०.

घोसाळ वि. १. घोसांनी युक्त; घोसांनी, घडांनी लहडलेला. २. (ल.) गुटगुटीत : 'सुनीळु घोंसाळें । निऱ्हां शोभेंति डोळे ।' – शिव ४१८.

घोसाळवेल स्त्री. तांदळाची एक जात. ह्या जातीचा तांदूळ जाडा असून लवकर तयार होतो.

घोसाळा पु. एक कर्णभूषण : 'आकर्णपूर्ण घोसाळे' – पूजा ५४.

घोसाळी–ळे स्त्री. न. १. एक प्रकारची वेल; गिलक्यांचा वेल. याची भाजी, भजी करतात. २. घोसाळीचे फळ; गिलके; पारोसे. ३. दोडके. (गो.) ४. (ल.) क्षुद्र पदार्थ; बहुधा शून्य; नास्तिवाचक.

घोसाळी स्त्री. एक प्रकारचा दृष्टिक्षेप : 'घोसाळी करी उबारा : गजबजौनि पाडी' – मूप्र २१६५.

घोसुले न. घोस; घड.

घोळ स्त्री. समुद्रातील तांबडसर पांढऱ्या रंगाचा मासा. (को. गो.)

घोळ पु.१. पुन: पुन: हलवणे; घोळणे; फिरवणे; छानणे. २. (ल.) चर्चा; वादविवाद; वाटाघाट; मंथन. ३. गोंधळ; घोटाळा; अडवणूक : 'उगा लोळसा घोळ मोठा करी तो ।' – राक १.३६. (क्रि. घालणे.) ४. (वस्तूंचा, सामानाचा, हिशोबाचा, कामांचा) गोंधळ; गळफाटा; घोटाळा; घप्पाघोळ; अस्ताव्यस्तपणा; गुंतागुंत. ५. गडबड; धांदल; तारांबळ; त्रेधा. ६. धामधूम; लगबगीची हालचाल; दौडदौड; धावाधाव : 'दुजी तों मुलीचा म्हणे थांग नाहीं । असा मांडिला घोळ पौराजनांहीं ।' – अर्वाचीन १३५. (क्रि. घालणे. मांडणे.) (वा.) **घोळात पडणे –** निकाल न लागणे.

घोळ, घोळकांठी पु. स्त्री. १. काठीच्या टोकाला बसवलेल्या कोयंड्यात लोखंडाचे तुकडे घातलेली खुळखुळ असा आवाज करणारी कडी. रात्रीच्या वेळी चालताना सापांना भिवविण्यासाठी हिचा उपयोग करतात. २. (वाघ्या इ. लोकांचे) लोखंडाच्या कांबीला कड्या अडकवलेले वाद्य : 'टाळ घोळ मृदंग कुसरीं । नाना चरित्रें गाती गजरीं ।' – एभा ११.१२७४. ३. ढाल.

घोळ पु. १. धान्य इ. सुपात, चाळणीत घोळल्यानंतर मागे राहिलेला गाळसाळ, गदळ भाग. (राजा) २. हरभऱ्याचा, तुरीचा कोंडा. (कर.)

घोळ पु. तोरडी; पायात घालायचा स्त्रियांचा एक अलंकार. (व.)

घोळ पु. १. (अंगरख्याचा) घेर; खालचा परीघ (लुगडे, परकर, धोतर इ.चा); ओचा, सोगा, पदर : 'पीतांबराचा बहु घोळ लोळे।' – सारुह ५.३४. २. मासे अडकण्यासाठी जाळ्याच्या टोकावर बांधलेली पिशवी. (गो.)

घोळ स्त्री. डोंगरामधील दरी; कपार; खबदड; घळ.

घोळ स्त्री. एक पालेभाजी. हिच्या दोन जाती आहेत.

घोळ चुनत. – (तंजा.)

घोळका पु. १. (मनुष्यांचा, प्राण्यांचा) अव्यवस्थित समुदाय, जमाव, गर्दी. २. गोंगाट; गलबला; कलकलाट. (क्रि. चालणे, होणे, पडणे, मांडणे, करणे.) ३. (कामे, प्रकरणे इ.चा) घोटाळा, गोंधळ, खिचडी.

घोळकाकडी स्त्री. तोंडले.(व.)

घोळकांवचे अक्रि. घोटाळणे; घोटाळत राहणे. (गो.)

घोळकोटंबा, घोळकोटमा पु. कापडाचा घोळ लावलेला खंडोबाच्या वाघ्याचा भिक्षा मागण्याचा चौकोनी लाकडी कोटांबा. खंडोबाचे भक्त याची पूजा करतात : 'त्या खिरीपैकीं वाघ्या मुरळी यांस त्यांचा घोळकोटंबा भरून खीर द्यावी लागते.' – ऐरा २०३.

घोळगुलाब पु. घोळीच्या वनस्पतीवर संस्कार करून तयार केलेली गुलाबाची एक जात.

घोळघोळून, घोळूनघोळून क्रिवि. १. आलटूनपालटून; बदल करून; आळीपाळीने; परतपरत; एकामागून एक. (क्रि. करणे, खाणे, घेणे, देणे.) २. वारंवार, पुन: पुन: घोळण्याची क्रिया करून; पुन: पुन: इकडून तिकडे हलवून, ढकलून, घोळसून, चर्चा करून, मनात आणून, उच्चारून, घोळणे याच्या त्या त्या अर्थी द्विरुक्तीने क्रिया करून : 'हा मंत्र लोकांच्या तोंडीं आपोआप येतो व तोच घोळघोळून पाठ होऊन जातो.' – सासं २४०१. [घोळणेचे द्वि.]

घोळचे अक्रि. उपयोगी पडणे. (गो.)

घोळटीक, घोळटीकाय स्त्री. सराव; ओळख; घरोबा; घसरट. (गो.)

घोळण न. १. सुपाने, चाळणीने (धान्य इ.) घोळण्याची क्रिया. २. सुपात, चाळणीत घोळायचा धान्याचा एक वेळचा हप्ता. ३. पोळी लाटताना तिला लावायचे पीठ, पिठी. (व.)

घोळणा पु. गुढी पाडव्यास केली जाणारी कडुनिंबाच्या फुलांची चटणी.

घोळणा पु. १. धान्य भाजताना ते हलविण्यासाठी एका टोकाला चिंध्याचा चेंडूसारखा बोळा बांधलेली काठी किंवा दांडू; घाटाणा; घाटणा; घाटू. पहा : **घाटणा** : 'घोळण्या नांव लक्षुमण। करितें भर्जन लाह्याचें।' – निगा २८६. (को.) २. भात चाळायची बारीक वेळूची चाळण. ३. ठसे उठवण्याचे सोनाराचे एक साधन, हत्यार.

घोळ (ळा) णा पु. नाकपुड्यांमधील पडद्याचा खालचा, मुळाचा मांसल भाग. पहा : **घोणा** (क्रि. फुटणे.) [सं. घोणा]

घोळणी स्त्री १. घोळण्याची क्रिया. पहा : **घोळण** १. २. सोनाराचे एक हत्यार. पहा : **घोळणा** ३.

घोळणी स्त्री. प्रदर; धुपणी. (राजा.)

घोळणीपुनीव स्त्री. भाद्रपद शुद्ध पौर्णिमा. (व.)

घोळणे न. घाटणा; घाटाणा; घाटू. पहा : **घोळणा** १

घोळणे, घोळविणे उक्रि. १. (धान्य इ. सुपात घालून हलके, बारीक, जड मोठे इ. दाणे निराळे करण्याकरिता) इकडे तिकडे हलविणे; हिंदळणे; पाखडणे. २. (दाणे किंवा अधिक पदार्थांचे) मिश्रण होण्याकरिता ताट, परात, सूप इत्यादिकांत घालून हलविणे; खुंदलणे; ढवळणे; माखणे; लेपणे : 'ऐक्यें घोळिली बुद्धि कैसी। मानु श्रोत्यांसी वाढविला।' – एभा ९.४६३. ३. जोराने ओढणे व ढकलणे; खुदळणे; अपाय होईल अशा तऱ्हेने ओढाताण, हिसकाहिसकी करणे; घोळसावणे. ४. (गंजिफांचा खेळ) गंजिफांची, पत्त्यांची गल्लत करणे; पिसणे. ५. (एखादी गोष्ट) चिंतनाचा, वादाचा, चर्चेचा विषय करणे; वाटाघाट करणे; वादविवाद करणे; विचार करणे; (एखादी गोष्ट) पुन: पुन: मनात आणून मनन करणे, परत परत म्हणणे : 'निमुटपणें वर पाहू लागली म्हणजे असे वाटे कीं कांहीं तरी तिच्या मनांत घोळत आहे.' – पाव्ह १८. ६. खोदून खोदून विचारणे; उलटसुलट प्रश्न विचारणे. ७. (एखाद्या कामात) सरावणे; वहिवाटणे; राबत्यास पडणे. ८. (एखाद्या गोष्टीशी, गोष्टीचा) नेहमी प्रसंग पडणे; (एखादी वस्तू उदा. रुपये, दागिने इ.) हातात खेळवणे; इकडून तिकडे देणे, इकडून तिकडे ठेवणे. ९. चोळामोळा करणे; वापरणे; वर्दळीत, वापरण्यात येणे, आणणे. १०. चाळवणे; गोंधळात टाकणे; छकविणे; भुलविणे : 'घातकी न देखो तैसा दुसरा। घोळितो नृपाला पेचुनी।'– दावि ४५७. ११. घुमणे 'भटोबासांचा भिक्षाशब्द गुजरध्वनि घोळिला उमटे।' – स्मृस्थ २१९. १२. त्रास देणे; छळणे; जेरीला आणणे; सतावणे; जाचणे; कष्टविणे : 'यालागीं दुकाळा करितों मनन। आम्हाहि घोळिला बहुता परीनें।' – दावि २७. [सं. घुण्–घूर्ण]

घोळणे, घोळविणे उक्रि. (सुतार – सोनार काम) तासून, घासून, घोटून गुळगुळीत करणे.

घोळदार वि. ज्याचा उत्तम घोळ आहे असे (वस्त्र, काठी इ.).

घोळनाट स्त्री. आढ्याचे लाकूड; मोठा खांब. (व.)

घोळपाट पु. घोटाळा; गोंधळ. (व.)

घोळबोटवा पु. १. एक प्रकारचा गव्हला. २. (ल.) हरकाम्या, हरहुन्नरी, लुडबुड्या मनुष्य; एक ना धड भाराभर चिंध्या अशी ज्याची स्थिती आहे असा मनुष्य.

घोळमाडणे उक्रि. १. ओढाताण, हिसडाहिसडी करणे; त्रास देणे. २. छळणे; गांजणे; जाचणे; त्रासविणे; सतावणे. ३. (क्व.) घोळणे इतर अर्थी.

घोळलेला वि. मुरलेला; तयार झालेला.

घोळसणे, घोळसावणे उक्रि. घोळणे. १. (चूर्ण, द्रव पदार्थ इत्यादीत) ढवळणे. २. (एक पदार्थ दुसऱ्या पदार्थात भिनून जाईल अशा तऱ्हेने) हलविणे; मिसळणे; खालीवर करणे; उलथापालथ करणे. ३. (ल.) कुचलणे; कुट्टा काढणे; खुबलणे; लोळविणे; मारपीट करणे; खुंदळणे : 'देह घोळसितां नरकद्वारीं। तो अणुभरीं कुंथेना।' – एभा

२६.३४०. ४. घोळणे; वाटोळे फिरवणे : 'नाचविसी पाय गे घोळसूनि भोय ।' – निगा ९२.

घोळं(ळां)कार, घोळांकार पु. गोंधळ; घोटाळा; गोलंकार.

घोळाणा पु. (क.) गोंधळ; गुंतागुंत; घोटाळा.

घोळाणा–ना पु. १. हातावर चोळून मीठ घालून खातात तो हरभऱ्याचा हुळा, ज्वारीचा हुरडा इ. : 'हुरडा ओव्या घोळाणा। तिळगुळेंसि चाखविले सुजाणा।' – एभा ३१.४०१. २. कडुनिंबाची कोवळी पाने, चिंच, बिबे इ.चे मिश्रण करून त्याला फोडणी देऊन तयार केलेला पदार्थ. हा आर्द्रा नक्षत्राच्या सुरुवातीला बदलत्या ऋतुमानाचा शरीरावर होणारा परिणाम टाळण्यासाठी खातात. (व.ना.) ३. कच्ची पालेभाजी कुसकरून तिखट, मीठ, तेल वगैरे घालून केलेला खाद्यपदार्थ; घोळणा.(व.)

घोळामेळाने क्रिवि. घोळका करून : 'घोळामेळाने माणसे उभी होती.' – मुंगी १२४.

घोळांद्रे न. रंजीस आणणे; सारखे पाठीस लागणे. (व.)

घोळी स्त्री. एक प्रकारची भाजी. (बे.)

घोळीव वि. १. घोळलेला. २. गुळगुळीत केलेला : 'सर्वांगानें गोल असा घोंळीव हिरा कोणी गिळल्यास त्यापासून इजा होत नाही.' – पदाव १.७०. ३. गाळीव; निवडक. (व.)

घोळून क्रिवि. एकदिलाने; श्रमविभागाने. (गो.)

घोळ्हाटमंडळ पहा : **गोल्हाट**

घों उद्गा. सोसाट्याचा वारा, समुद्राच्या लाटा इ.कांचा मोठा आवाज : 'आणिक श्रीकृष्णांचे बोलणें। घों करी आलें श्रवणें।' – ज्ञा ९.५३१.

घोंग न. सोंग; वेष : 'नंदालयीं बाळक घोंग त्याचें। ब्रह्मादिकां दुर्लभ सोंग त्याचें।' – सारुह १.६०.

घोंग(गा–घ)ट न. १. तोंडावरून घेतलेले वस्त्र; बुरखा. पहा : **घुंगट.** २. (ल.) भरलेले आभाळ; पाऊस डवरून आलेले आकाश. (क्रि. घालणे.) [सं. गुठ् – गुंठन] (वा.) ० **घालणे –** रुसणे.

घोंग(गा)ट न. १. घों घों असा आवाज करणाऱ्या, घोंगावणाऱ्या माशांचा समुदाय; गोंगाट. २. घुंगुरटे : 'मज सिंहासि बळ दाविसी। घोंगटांचे।' – कथा ३.१०.७९. ३. झट; लचांड; झेंगट; शुक्लकाष्ठ.

घोंगुटी स्त्री. मान. (झाडी) [सं.घोणा]

घोंगड न. कांबळे; घोंगडे. (व.)

घोंगडगुंची स्त्री. पाऊस निवारण्यासाठी वापरायची घोंगड्याची खोळ. (बे.)

घोंगडबाऊ पु. द्वाड मुलांना भिवविणारा घोंगडे पांघरलेला मनुष्य; बागुलबोवा.

घोंगडी–डे स्त्री.न. १. कांबळ्याची एक पट्टी; दोन घोंगड्या उभ्या शिवून जोडल्या असता कांबळा होतो : 'येरे घोंगडीच्या पांघरणारा। गाई वळणारा।' – भज ६३. २. कर्नाटकी कांबळ्यासारखी, पांढरी, भारी, किंमती घोंगडी. [क. गोंगडि]

घोंगडे न. १. लचांड; लोढणे; पायखोडाबेडी; दुस्सह, दुर्वाह्य, परंतु करणे अवश्य असलेले काम इ. २. (शिव्या देऊन, धक्के मारून, उपहास करून एखाद्याची केलेली) फजिती; त्रेधा; हबेलंडी; दुर्दशा. (वा.) **० गळ्यात येणे, पडणे –** एखादे लचांड मागे लागणे. **० भिजत ठेवणे, पडणे –** एखाद्या प्रश्नाचा निकाल न लावता तो तसाच अनिर्णीत राहू देणे, राहणे. **एखाद्याच्या गळ्यात घोंगडे घालणे –** एखाद्याला काही उपद्रवकारक काम सांगणे; एखाद्यांच्या मागे त्रासदायक कर्तव्य, लचांड लावून देणे.

घोंगड्या वि. (ल.) गरीब कामकरी, मजूर.

घोंगड्या वि. काळ्या रंगाचा मोठा (सुरवंट).

घोंगण न. गुरफटून घेतलेली स्थिती.

घोंगण न. गोळा केलेला कचरा; गळ्हाटा; राडा; खळमळ; घाण; खिचडी (अशा वस्तूवर माशा घों घों करतात त्यावरून).

घोंग(गा)णा पहा : **घोळ(ळा)णा**

घोंगणे अक्रि. १. घों घों असा आवाज करणे; गर्जणे (वारा, लाटा इ.नी). २. घोंगावणे; घों घों आवाज करणे (माशा इ. नी). ३. एकत्र जमणें; गर्दी, गिल्ला करणे. [ध्व. घों घों]

घोंगता–ती–ते पु. स्त्री. न. १. घोंगडी रुंदीच्या बाजूने दुमडून एका बाजूस शिवून केलेली खोळ. (क्रि. घेणे.) २. (लहान मुलांची) कुंची; एक प्रकारचा झगा. (कु.) पहा : **घोंगशी**

घोंगत्याकुंवर पु. पुष्य नक्षत्राचे एक नाव. कारण या नक्षत्राचा पाऊस फार पडत असल्याने घोंगत्याचा खप फार होतो.

घोंगरट स्त्री. घोंगडी : 'लक्ष्मीबाई आली पांघरली घोंगरट।'–जसा ९९.

घोंगशी स्त्री. १. लहानसे कमानीवजा देऊळ. (व) २. पहा : **घोंगता** (सर्व अर्थी). ३. फाटून भोकसा पडलेल्या वस्त्राला चोहोकडून एकत्र करून शिवले असता येणारा झोळ.

घोंगस स्त्री. पहा : **घोंगता.** पावसाकरिता केलेली घोंगडीची खोळ; घुंगी. (व.)

घोंगसूड वि. अनाहूत. (झाडी)

घोंगा पु. घोंगडबाऊ; बागुलबुवा. (कु.)

घोंगाट–ण न. १. तोंडावरून वस्त्र, बुरखा घेतलेली अवस्था; घुंगट. (क्रि. घालणे, मारणे, घेणे.) २. पावसाचे अवडंबर अंधारी; मळभ.

घोंगाट–ण न. १. माशांचा, भुंग्यांचा गुणगुणाट. २. माशांचा थवा, समुदाय, घोळका : 'जें का खरकटलें मरकटलें। अत्यंत घोंगाणे घोंगाळिलें।' – हंको. ३. (ल.) लोटालोटी; झोंबाझोंबी; घेघेमार; झोड; झूम; रेटारेटी. उदा. भिकाऱ्यांची भिक्षा मिळविण्यासाठी इ. (क्रि. पडणे, बसणे, जमणे, उडणे.) पहा : **घोंगट.** ४. पहा : **गोंगाट**

घोंगाडणे अक्रि. एकत्र जमणे; गोळा होणे (आकाशात ढग इ.).

घोंगाणा वि. १. आरडाओरड करणारा; घोंगावणारा. २. ओंगळ; घाणेरडा : 'काय घोंगाणी घाघाणी। ताकामध्यें घाटी लोणी।' – तुगा ६२३.

घोंगाणी स्त्री. आरडाओरड करणारी स्त्री.

वि. १. ओंगळ; घाणेरडी. २. अडाणी.

घोंगाय(व)णे अक्रि. १. घों घो (माशा इ–कांनी) करणे; (माशा इ. बसल्यामुळे) बुजबुजणे; घाणेरडे होणे : 'हे बहुतांचें उच्छिष्ट ताट। घोंगायलें

विकारीं ।' – मुरंशु ४०८. २. मोठ्याने घों घों करीत जाणे, गोळा होणे.

घोंगेणे पहा : **घोघेणे**

घोंगी, घोगी स्त्री. पावसापासून रक्षण करण्याकरिता, डोक्यावर घेण्यासाठी केलेला घोंगता; खोळ. पहा : **घुगी** १. [हिं. घूघी = पिशवी]

घोंगेरा, घोंघेरा पु. मुंग्याच्या जातीचा एक लहान किडा. हा बांबू कोरतो व जमिनीत बीळ करून राहतो; घुरघुरा.

घोंगो पु. बागुलबोवा; घोंगडबाऊ. (गो. कु.)

घोंगोला : पु. भुंगा. (झाडी) [क. गुंगड]

घोंघट पहा : **घोंगट, घोंगाट**

घोंघाणी माशी १. गुं गुं करीत येऊन मेवामिठाई इ. खाद्यपदार्थांवर बसणारी (मोठी) माशी. २. (ल.) भोजनभाऊ; पंक्तिपठाण; पंक्तिबारगीर.

घोंघावणे पहा : **घोंगावणे**

घोंची स्त्री. डोक्यावरून पाठीवर घ्यायचे लहान मुलांचे खोळीसारखे रेशमी पांघरूण : 'अंगडं टोपडं घेतें घोंचीला काळा खण। गोऱ्यापणाला मोडवान।' – बा १५८.

घोंट स्त्री. १. एक काटेरी वनस्पतिविशेष. (को.) २. एक जंगली काटेरी वेल. हिच्या कोवळ्या पानांची भाजी करतात. (राजा.)
न. १. सदर वनस्पतीचे फळ. २. झाडावरच पिकून कठीण झालेली सुपारी; घोटसुपारी. (को.)

घोंटेर, घोटीर पु. पक्ष्याचे घरटे : 'नेलीं घेंटेरीचीं पिलं चोरूनु। पखे नाथिली।' – ख्रिपु १.१४.२. (गो.) [सं.कोटर]

घोंटोणी स्त्री. आपोष्णी; आपोशन. (गो.)

घोंप पु. झुपका; गुच्छ; फुले; शेंगा, बी इत्यादींना असणारा देठ; घड; घोस. (को.)

घॉघॉ पु. पाणलोट; उंचावरून पडणारा पाण्याचा प्रवाह. (गो.) [ध्व.]

घॉल वि. दाट झाडी. (गो.)

घॉळकांवचे सक्रि. हेलपाटे, खेपा घालायला लावणे; नाचविणे. (गो.)

घाँगा पु. (मुलांच्या भाषेत) बागुलबोवा. (गो.)

घाँटॉ पु. दाणे, तंबाखू इत्यादिकांत आढळणारा किडा. (गो.)

घाँशॅ पु. लहान मुलांच्या पोटात होणारा एक विकार. (गो.)

घौघा पु. दंगा; दंगल.

घौस वि. १. खणखणीत, टणटणीत; डोर; पहाडी (आवाज, वाद्य). (को.) २. (रूढ) मोठा व देखणा; ठसठशीत; ठसकेबाज; घवघवीत (दागिना इ.).

घ्न वि. १. (समासात उत्तरपदी) ठार मारणारा; नाश करणारा. उदा. रोगघ्न = रोग नाहीसा करणारे, वातघ्न = वात नाहीसा करणारे, कफघ्न, दोषघ्न, जंतुघ्न इ. २. न मानणारा. विसरणारा. उदा. कृतघ्न.

घ्या उद्गा. पहा ! ऐका ! 'हे घे' या अर्थी.

घ्येरूंसा वि. १. गेरूसारखा. २. (ल.) कस्पटासमान; केराप्रमाणे : 'धन ग संपदा तुझ्या सांदीचा घ्येरूसा।' – लोले १८०.

घ्रष्टी स्त्री. घसट; दाट मैत्री : 'हळुहळु घ्रष्टी पडलीं।' – लीचउ ४८१.[सं. घृष्टि]

घ्राण न. १. नाक; नासिकाज्याने वास कळतो ते इंद्रिय; घ्राणेंद्रिय : 'घ्राणीं लाविजती मुक्ताफळें। तरी तयांचें काय कळे। मोल मान।।' – ज्ञा १५.३९५. [सं.]

घ्राणगर्त स्त्री. (वै.) वास ग्रहण करणाऱ्या पेशी ज्या खोलगट भागात असतात तो भाग.

घ्राणस्थाली स्त्री. (वै.) ज्या पेशीसमूहापासून घ्राणेंद्रिय विकसित होते अशा पेशींचा समूह.

घ्राणक्षेत्र न. (वै.) वासाची संवेदना जाणणारा मेंदूतील भाग.

घ्रात वि. वास घेतलेले; हुंगलेले. उदा. अनाघ्रात. [सं.]

घ्राता वि. वास घेणारा; हुंगणारा : 'वास सुवास सुमन। घ्रेय घ्राता आणि घ्राण। कृष्णमकरंदें जाण। विश्रांति संपूर्ण स्वयें येती।।' – एभा १.२५३. [सं.]

■ ■ ■

ङ

ङ मराठी वर्णमालेतील विसावे अक्षर आणि पाचवे व्यंजन. 'वाङ्मय', 'पराङ्मुख', 'वाङ्निश्चय' यासारखे मोजके शब्द सोडून एरवी फक्त कंठ्य व्यंजनापूर्वी येणारे. अशा ठिकाणी त्याचे लेखन त्यापूर्वी येणाऱ्या स्वरावर शिरोबिंदू देऊन होते. 'अंक', 'असंख्य', 'रंग', 'उल्लंघन'. हा वर्ण शब्दारंभी येत नाही.

■ ■ ■